17-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
RDB/ KGS/ KTG/ 10:02

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**अशासकीय कामकाज - विधेयके**

**पृ. शी.** : स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध विधेयक.

L.C.BILL NO. XVII OF 2006.

(A BILL TO PROHIBIT EVE TEASING AND TO PROVIDE FOR CERTAIN OTHER MATTERS CONNECTED THEREWITH.)

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 17- स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करणे व त्याच्याशी संबंधित विवक्षित बाबींची तरतूद करणे यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, हे विधेयक यापूर्वी मी स्वत: दोन वेळा विधान परिषदेमध्ये मांडले होते. एकदा विधेयक मांडले परंतु ते विधेयक अर्धवट मांडल्यानंतर काही कारणाने सभागृह तहकूब झाले. त्यानंतर पुन्हा एकदा बिल सभागृहामध्ये मांडले होते. दुर्दैवाने या विधेयकाच्या संदर्भामध्ये शासनाने घुमजावची भूमिका घेतली. महाराष्ट्राच्या गृह विभागाने वर्तमानपत्रातून एक निर्णय जाहीर केला. हेच विधेयक विधानसभेमध्ये विधानसभा सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवर यांनी मांडले होते. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवर व सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मांडलेले विधेयक आम्ही स्वीकारले आहे आणि त्यानुसार सूचना जारी करीत आहोत, फौजदारी दंड प्रक्रियेमध्ये बदल केला आहे, असे प्रेस स्टेटमेंट आले आणि महिला संघटनांनी त्याचे स्वागतही केले. या बातमीची शाई वाळते न वाळते तोपर्यंत शासनाने जाहीर केले की, आम्ही असा बदल केलाच नाही. यामध्ये महिलांच्या प्रश्नाच्या संदर्भात नामुष्की झाली असे मला वाटते. यासंदर्भात शासनाची किती उदासिनता आहे याचे चित्र यामध्ये दिसून येते. या छेडछाडीच्या संदर्भात जी भूमिका घेतली त्यासंदर्भात या विधेयकामध्ये मी असे सुचविले आहे की, हा गुन्हा दखलपात्र आहे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

परंतु तो गुन्हा जामीनपात्र आहे. याचा परिणाम म्हणजे गुन्हा घडल्यानंतर आरोपीला जामीन मिळतो. पोलीस दिरंगाईमुळे जामीन त्वरित मिळतो. त्यासाठी अनेक कारणे दिली जातात. पोलिसांनी कोर्टामध्ये म्हणणे मांडले नाही, आरोपी आजारी आहे अशी कारणे सांगितली जातात. ज्यावेळी छेडछाड होते त्यावेळी ती कोठे झाली ? छेडछाडीचा नुसता प्रयत्न झाला काय ? काही वेळा नुसता प्रयत्न झाला परंतु प्रत्यक्षात छेडछाड पूर्ण झाली नाही असे सांगितले जाते.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 10:05

(डॉ. नीलम गो-हे .....)

गेट वे ऑफ इंडिया या ठिकाणी 31 डिसेंबरला जो प्रकार घडला त्याचे जे छायाचित्रण केले होते त्यामध्ये त्या मुलीचे वस्त्रहरण करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसत होते. तरी देखील संबंधित पोलीस अधिका-यांनी तक्रार दाखल करुन घेतली नाही. पोलिसांनी असे सांगितले की, तक्रार आली नाही. खरे म्हणजे अशा प्रकरणी पोलिसांनी सुमोटो तक्रार दाखल करुन घेतली पाहिजे अशी कायद्यामध्ये तरतूद आहे. हा जामीनपात्र गुन्हा असला तरी ब-याच वेळेला मुली तक्रार करण्यास कचरतात. अशाच एका घटनेमध्ये गेल्या तीन वर्षापूर्वी पोलिसांनी तक्रार दाखल करुन घेतली नाही आणि नंतर तिला जाळून मारण्यात आले. तेव्हा छेडछाडीचे रुपांतर गंभीर अशा अत्याचारामध्ये होण्यापूर्वीच या छेडछाडीला आळा बसला पाहिजे. या विधेयकामध्ये अशा प्रकारचे गुन्हे करणा-याला पहिल्यांदा 15 दिवसांची शिक्षा आणि पुन्हा त्याच गुन्हेगाराने तोच गुन्हा केला तर त्याला एक महिन्याची शिक्षा करावी सुचविलेली आहे. गेल्या तीन-चार वर्षापासून विविध माध्यमातून आम्ही महिला संरक्षण कायद्याचा पाठपुरावा करीत आहोत. आमच्या महिला आमदारांच्या शिष्टमंडळाने या सभागृहामध्ये महिला सरक्षण कायद्याची मागणी देखील केली होती. त्यावेळी सभागृहामध्ये सांगण्यात आले होते की, आम्ही कौटुंबिक संरक्षण कायदा हा परिपूर्ण करीत आहोत. हा कायदा केन्द्राकडे पाठविण्यात आला. परंतु दुर्दैवाने त्या कायद्यामध्ये अनेक त्रुटी होत्या. लैंगिक छळ आणि कौटुंबिक हिंसाचार हे दोन्ही विषय एकाच विधेयकामध्ये समाविष्ट केल्यामुळे शेवटी केन्द्राने त्या कायद्यास मंजुरी दिली नाही आणि स्त्रियांच्या वाट्याला कोणताच कायदा आला नाही ही वस्तुस्थिती आहे. ज्या वेळी मुंबईमध्ये आणि राज्यात अन्य ठिकाणी छेडछाडीच्या घटना घडतात त्यावेळी हा प्रश्न चर्चिला जातो. मग अशी ही शंका घेतली जाते की, त्या महिलेला पैसे देऊन कशावरुन तिने चिथावणी दिली नसेल, कशावरुन ही खोट्या स्वरुपाची तक्रार नसेल ? छोडछाडीच्या संदर्भात सात-आठ बाबींचा अंतर्भाव मी या विधेयकामध्ये केलेला आहे. छेडछाडीच्या संदर्भातील व्याख्या व्यापक करण्याची आवश्यकता आहे. आपल्या हिंदी आणि मराठी चित्रपटामध्ये जी काही दृश्ये दाखविली जातात त्यामध्ये छेडछाड कुठे सुरु होते आणि कुठे संपते याबाबतीतही काही मर्यादा असली पाहिजे. जेव्हा दोघांची संमती असते त्यावेळी गोष्ट वेगळी असते. परंतु मुली जेव्हा एखादी गोष्ट तिला आवडत नसल्याबद्दल पोलिसांकडे तक्रार करते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 10:05

(डॉ. नीलम गो-हे...)

त्यावेळी पोलिसांनी तक्रारीची दखल घेतली पाहिजे. पोलीस मात्र असेच सांगत असतात की, मुलीची तक्रार आली नाही. एखादा पुरुष कोणत्याही स्त्रिला त्रास देण्यासाठी म्हणून बोललेल्या किंवा लिहिलेल्या शब्दाद्वारे खाणाखुणांनी आणि किंवा दृश्य हावभावांनी किंवा अंगविक्षेपाद्वारे, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कोणतीही कृती करतो किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी असभ्य शब्दात गाणे, शिळ घालतो किंवा कोणतेही असभ्य शब्द वापरतो किंवा गाणे किंवा लावणी, पोवाडा म्हणतो अशा वेळी स्त्रियांची छेडछाड केलेली आहे असे समजण्यात यावे. त्याच प्रमाणे लोकलमधून किंवा मोटारीतून जाताना स्त्र्यांच्या अंगावर थुंकणे, त्यांना घेराव करणे, त्यांना मागे-पुढे जाण्यामध्ये अडचण करुन त्यांची भंबेरी उडवणे, त्यांना उद्देशून द्वैअर्थी शब्द वापरणे, ज्यातून सूचक अर्थ निर्माण होईल अशी गाणी मोठमोठ्याने म्हणणे अशाही गोष्टी घडत असतात. या गोष्टींचा देखील छेडछाडीच्या व्याख्येमध्ये समावेश करावयास पाहिजे. छेडछेडीच्या संदर्भात असेही बोलले जाते की, स्त्रियांनी आदर्श अशी वेषभूषा करायला पाहिजे जेणेकरुन त्यांची कोणी छेडछाड करणार नाही. छेडछाडीला चिथावणी मिळणार नाही अशा प्रकारचा त्यांचा पोशाख असला पाहिजे याबद्दल दुमत नाही. एका सर्व्हेमध्ये असे म्हटलेले आहे की, लोकल मधून प्रवास करीत असताना महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यातून आम्ही प्रवास करतो असे अधिकाधिक महिलांनी सांगितले. जनरल डब्यातून प्रवास करतो असे फारच थोड्या महिलांनी सांगितले. परंतु रात्रीच्या वेळी बहुसंख्य स्त्रिया जनरल डब्यातून प्रवास करतात. याचे कारण विचारले असता असे सांगण्यात आले की, रात्रीच्या वेळी महिला राखीव डब्यामध्ये महिलांची संख्या कमी असते त्यामुळे जनरल डब्यातून प्रवास करीत असताना सुरक्षितता वाटते. काही स्त्रियांनी सांगितले की, सुरक्षिततेच्या नावाखाली जनरल डब्यातून प्रवास केला तर आम्हाला छेडछाडीचा त्रास होतो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

विशेषत: पुलावरुन जात असताना, या सभागृहातील सन्माननीय सदस्य कधी ना कधी रेल्वे स्टेशनवर गेले असतील, त्या पुलावर अचानक समोरुन येऊन महिलांना धक्के मारणे, त्यांच्यावर वस्तू फेकणे, महिलांच्या डब्यावर पाण्याच्या बाटल्या फेकणे, छोटे दगड कागदामध्ये पुरचुंड्या करुन मारणे, तृतीय पंथी, भिकारी, दारुडे, पाकिटमार यांचे प्रमाण 25 टक्के, डब्यामध्ये महिला पोलीस नसणे यांचे प्रमाण 5 टक्के आहे. स्त्रियांना विचारल्यानंतर त्यांनी कारणे सांगितली. ज्यावेळी विधेयक मांडले जाते त्यावेळी अशी भूमिका घेतली जाते की, असे कायदे झाले तर उगीचच स्त्रिया उठतील आणि प्रत्येकाबद्दल तक्रारी करतील. निम्म्या लोकांना कायम जेलमध्ये जाण्याची वेळ येईल. याबद्दल स्त्रियांना विचारले, छेडछाड झाल्यानंतर काय केले? 60 टक्के स्त्रियांनी दुर्लक्ष केले. 10 टक्के स्त्रियांनी प्रतिकार केला. 5 टक्के स्त्रियांनी छेडछाड करणाऱ्यांची पिटाई केली. 25 टक्के स्त्रियांनी पोलिसांकडे तक्रारी केल्या. पिटाई करणाऱ्या 5 टक्के आणि पोलिसांकडे तक्रारी करणाऱ्या 25 टक्के व प्रतिकार करणाऱ्या 10 टक्के स्त्रिया वगळल्या तर उर्वरित स्त्रियांना किरकोळ तक्रारींकडे दुर्लक्ष करणे सोयीस्कर वाटते. ज्याचे स्वरुप हिंसेमध्ये होते किंवा वेगवेगळे प्रकार, ज्यामध्ये ॲसिड फेकणे, पाणी फेकणे, सिगारेट किंवा बिडीचे जळते थोटूक टाकणे, तंबाखूचा फवारा मारणे अशा प्रकारांचा स्त्रियांना सातत्याने सामना करावा लागतो. म्हणून दखलपात्र गुन्ह्याबरोबर अजामीनपात्र असा शब्द मी घातला आहे. जामीन मिळता कामा नये. आज आपल्या देशामध्ये अशी परिस्थिती आहे की, फिर्यादीपेक्षा आरोपीला तारखा पडलेल्या खूप आवडतात. तारखा पडल्या की, निकाल उशिरा मिळतो आणि मधल्या काळात आरोपी पाहिजे तो कारभार करण्यामध्ये मोकळा झालेला असतो. म्हणून दंडाधिकारी आहेत, त्यांनी तिथल्या तिथे या संदर्भात निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरुन परत कोर्टात केस उभी रहात असताना जो काळ जातो त्या काळामध्ये ती स्त्री तेवढ्या क्षमतेची रहात नाही. "सेहत" या संस्थेने भारतभर सर्वेक्षण केले. तेव्हा त्यांना असे दिसून आले, "दै.लोकसत्तेने" देखील या संदर्भात वृत्त प्रकाशित केले होते. भारतात एक बलात्काराची केस नोंदविली जाते तेव्हा 68 टक्के केसेस घरात दडपल्या जातात. नोंदविलेल्या गुन्हयातील 4 टक्के आरोपींना न्यायालयात सजा मिळते इतके हे प्रमाण कमी आहे. कोर्टात केस जाऊन कोर्टाची कालमर्यादा संपेपर्यंत विलंब होत असेल तर ते कितपत योग्य आहे? कोठेवाडीसारखा बलात्काराचा खटला गंभीर स्वरुपाचा झाला होता.



17-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )C.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

ॲड.उज्ज्वल निकम यांच्यासारखे उत्तम वकील, नगरमधील श्री.रामराव वाघ यांच्यासारखे कार्यक्षम पोलीस अधिकारी आणि नगरमधील श्रीमती शालिनी फणसेकर-जोशी यांच्यासारख्या संवेदनशील न्यायाधीश असल्यामुळे खटल्याचा निकाल वेळेवर लागला. किरकोळ तक्रारींमध्ये स्थानिक अधिका-यांमध्ये अनास्था आणि मुलीची होणारी बदनामी याची भीती प्रचंड प्रमाणात असते असे दिसून आले. फोनवरुन धमक्या देणे, मोबाईल फोनवरुन अश्लील मजकूर पाठविणे, धमक्या देणे या तक्रारींचा छेडछाडीमध्ये अंतर्भाव आहे. म्हणून कार्यपध्दतीचा विचार केला तर वर्षानुवर्षे चालणाऱ्या कोर्ट केसेसपेक्षा अजामीनपात्र गुन्हा दाखल करावा. दखल घेण्याच्या संदर्भात पोलिसांना तेवढे मॅण्डेट वाटत नाही. पोलीस सुध्दा पाहिजे तेवढी दखल घेत नाहीत. मुलीला प्रत्येक वेळी, तुझी छेडछाड केली म्हणजे तुझे काहीतरी चुकले असेल असे सांगण्यात येते. "सातच्या आत घरात" या चित्रपटात हा मुद्दा मांडण्यात आला आहे. काही केसेसच्या संदर्भात युवा पिढीने मर्यादा पाळली पाहिजे. अनेकदा सर्वसामान्य आणि गरीब घरातील सुंदर मुली असतील त्या आपल्याच मालकीच्या आहेत अशी परिस्थिती शहरांमध्ये आणि छोट्या गावांमध्ये असते. शहरामध्ये मुलीची शाळा बंद होते. कारण विचारले तर, मुलीची शाळा दूर अंतरावर आहे, ते योग्य वाटत नाही म्हणून 15 किंवा 16 व्या वर्षीच मुलीचे लग्न करण्याची प्रवृत्ती दिसून येते. 8 मार्च हा दिवस जागतिक महिला दिन साजरा केला जातो. सहकार क्षेत्रामधील नामवंत व्यक्तीने फोन केला, ते म्हणाले, विहार स्वातंत्र्य असले पाहिजे. शहरामध्ये महिलांना कुठेही जाण्याचे स्वातंत्र्य असावे. रात्रीच्या वेळी चित्रपट बघतो. टॉयलेटला जात असताना 25 वर्षाच्या बाईने 3 वर्षाच्या मुलीची सोबत घेतलेली असते.

(नंतर श्री.जुन्नरे.......

डॉ. नीलम गो-हे.......

आज महिला कोणत्याही परिस्थितीत सुरक्षित नाहीत असे मला वाटते. या विधेयकाला उत्तर देण्यासाठी महिला व बालकल्याण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. ज्या ज्यावेळी या प्रश्नाच्या संदर्भात विचारणा केली जाते तेव्हा तेच तेच उत्तर दिले जाते. सभापती महोदय, कौटुंबिक हिंसाचाराची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात जी.आर. निघालेला आहे परंतु असे असतांनाही यासंदर्भात कारवाई केली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. खरे म्हणजे कौटुंबिक हिंसाचाराचा त्रास महिलांना घरातूनच होत असतो. नातेवाईकच खरे म्हणजे यात त्रास देत असतात. विधवा असतील तर त्यांना अधिक प्रमाणात त्रास दिला जातो. यासंदर्भात मी नागपूरच्या अधिवेशनात माननीय मुख्यमंत्री महोदयांना प्रश्न विचारला होता की, याबाबत प्रोहिबिशन ऑफिसर का नेमला नाही ? तेव्हा त्यांनी सांगितले की, याप्रश्नाच्या संदर्भात महाराष्ट्र शासन सक्षम आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य सक्षम असले तरी महिलांवर अत्याचार होतच आहेत. विशाखा निकालपत्राच्या संदर्भात देखील अंमलबजावणी झालेली नाही. कॉल सेंटर, बीपीओ किंवा इतर ठिकाणी रात्री ज्या महिला कामावरुन घरी जातात त्यांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या महिलांना घरी पोहचविण्यासाठी कंपनी वाहनांची सुविधा उपलब्ध करुन देत असते. परंतु ब-याच ठिकाणी त्या वाहनावरील ड्रायव्हरच बलात्कार करीत असतात. अशा अनेक घटना पुढे आलेल्या आहेत. परंतु यासंदर्भातही काही ठोस उपाययोजना झालेली नाही.

सभापती महोदय, मंत्रालयातील महिला वरिष्ठ अधिका-यांनी सुध्दा आम्हाला टॉर्चर केले जात असल्याची तक्रार माननीय मुख्यमंत्र्यांकडे आणि वरिष्ठ आय.ए.एस. अधिका-यांकडे केली होती, परंतु संबंधित प्रकरणात संबंधित व्यक्तीची बदलीही न होता उलट या महिलांनाच त्रास दिला जात आहे. अशी किती तरी उदाहरणे माझ्याकडे आहेत त्यामुळे यासंदर्भात योग्य ती कारवाई होणे अपेक्षित आहे. यासंदर्भात तक्रार केली तर महिला व बालकल्याण विभागाकडे, महिला आयोगाकडे, सेमिनारकडे हा विषय पाठविलेला आहे त्यामुळे यावर योग्य ती कारवाई होईल असे सांगितले जाते. असे सांगितल्यामुळे महिलाही खुष होतात परंतु त्याचा रिझल्ट मात्र काहीच मिळत नाही अशी वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, विशाखा निकाल पत्रात यासंदर्भात सात शिफारशी करण्यात आलेल्या आहेत परंतु यासंदर्भात अद्यापपावेतो नोडल ऑफिसरची नेमणूक

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे.......

झालेली नाही. लैंगिक शोषण हा अजामीनपात्र गुन्हा करुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. प्रत्यक्षात महिला व बालकल्याण विभागाकडे अशा प्रकारच्या किती तक्रारी आहेत व त्यातील किती तक्रारींची दखल घेतली याची सुध्दा माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्रीमहोदयांच्या जिल्हयामध्ये सुध्दा अशाच प्रकारच्या दोन घटना घडलेल्या असतांना त्या ठिकाणी जामीन कसा काय मिळालेला आहे? त्यामुळे यासंदर्भातही दिलासा मिळण्याची आवश्यकता आहे. महिला व बालकल्याण विभागाने चांगल्या प्रकारचे काम केले असते तर महिलांना निश्चितपणे न्याय मिळाला असता. पूर्वीसूध्दा अशाच प्रकारचे प्रश्न मी उपस्थित केले होते परंतु त्या प्रश्नांच्या संदर्भात अंमलबजावणी होत नाही परंतु उत्तरामध्ये सांगितले जाते की, आम्ही एवढया एवढया बचत गटाची स्थापना केलेली आहे, बचतगट स्वाभिमानी होण्यासाठी आम्ही प्रयत्न केलेले आहेत. सभापती महोदय, केवळ महिला बचत गट स्थापन झाल्यामुळे हे प्रश्न सुटणार नाहीत. बचतगट काही अशा प्रकारची कामे करीत नाहीत. त्यामुळे शासनाने स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध या विधेयकाला चालना द्यावी आणि हे अशासकीय विधेयक शासनाने स्वीकारावे अशी विनंती करते.

प्रश्न प्रस्तुत झाला.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ( महिला व बालकल्याण मंत्री ) : सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गो-हे यांनी सन 2006 चे अशासकीय वि.प.वि. क्रमांक 17 - महाराष्ट्र स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध विधेयक, 2006 मांडलेले आहे, तसेच या विधेयकाच्या संदर्भात आपले विचारही व्यक्त केलेले आहेत.

सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात हे विधेयक मांडता न आल्यामुळे या अधिवेशनात त्यांना हे विधेयक मांडावे लागलेले आहे. या अशासकीय विधयेकाच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी राज्यातील महिलांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. प्रथेप्रमाणे मी सन्माननीय सदस्यांना हे विधेयक मागे घेण्याची विनंती करेन व त्याही हे अशासकीय विधेयक मागे घेतील परंतु या विधेयकाच्या निमित्ताने सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी या कायद्याच्या अंमलबजावणीच्या निमित्ताने शंका उपस्थित केलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.........

त्या सर्व शंकाचे निरसन करणे आणि या संदर्भात राज्य शासनाचे काय धोरण आहे त्याची माहिती देणे क्रमप्राप्त वाटते.

ही गोष्ट खरी आहे की, महाराष्ट्र राज्याची प्रगती होत आहे, विकासाचा दर वाढत आहे, राज्याचा जी.डी.पी.वाढत आहे, इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट वाढत आहेत. सर्वसाधारणपणे ग्रामीण भागांचे शहरीकरण व्हायला लागले आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, काळ बदलतो तशी समाज रचना देखील बदलत जाते. पूर्वी महिलांना जितके स्वातंत्र्य नव्हते त्यापेक्षा अधिक स्वातंत्र्य आतामिळत आहे. महिला मोठ्या प्रमाणावर पुढे येत आहेत. आपण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महिलांसाठी 33 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. पण आता त्याही पलिकडे जाऊन महिला दैनंदिन कामकाजामध्ये पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. महाराष्ट्र राज्य हे प्रगतीशील राज्य आहे. अशा प्रगतीशील राज्यामध्ये महिलांच्या बाबतीत ज्या घडना घडत आहेत ती बाब निश्चितपणे या राज्याला शोभणारी नाही, ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही. या सर्व परिस्थितींचा विचार केला तर दोन विभागांमध्ये या संदर्भातील प्रश्न हाताळण्याची आवश्यकता आहे. स्त्रियांची कोणीही छेडछाड करावी अशी समाजाची मानसिकता झालेली आहे. विशेष करुन मुलींच्या बाबतीत हे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडतात. पण त्या संदर्भातील तक्रारी रेकॉर्डवर येत नाहीत हे आपणा सर्वांना माहीत आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्त्रियांची छेडछाड होत असल्याबाबत जे अशासकीय विधेयक मांडलेले आहे ते अर्थातच त्यांनी पूर्ण अभ्यास करुनच मांडलेले आहे. या संदर्भात एक स्वंयपूर्ण कायदा असावा अशी त्यांची भूमिका आहे आणि ती योग्य आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, केंद्र सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ लॉ ॲन्ड जस्टीस विभागाने "प्रोटेक्शन ऑफ वुमन फ्रॉम डोमेस्टीक व्हायोलन्स ॲक्ट, 2005" हा नवा कायदा देशामध्ये लागू केला आहे. या कायदाद्याच्या अंमलबजावणीचे नोटीफिकेशन 17 ऑक्टोबर 2006 रोजी काढण्यात आलेले आहे. हा कायदा फक्त जम्मू आणि काश्मिर वगळता सर्व राज्यांना लागू झालेला आहे. हा कायदा लागू झ ाल्यानंतर या कायद्याचा आधार घेत केरळ मधील एका महिलेने दिनांक 27 ऑक्टोबर 2006 रोजी पहिली तक्रार दाखल केली. त्या तक्रारीचा "नॅशनल न्यूज"म्हणून उल्लेख करण्यात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.........

आला. या कायद्यामध्ये स्त्रियांचा मानसिक, शारीरिक छळ, लैगिंक छळ, हुड्ंयाची मागणी करणे इत्यांदीचा समावेश आहे. या कायद्याच्या कलम 3 मध्ये या सर्व बाबींचा अंतर्भाव केलेला आहे. याच कायद्याच्या कलम 32 मध्ये स्त्रियांची छेडछाड करणे अथवा त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास देणे ही बाब दखलपात्र गुन्हा म्हणून नमूद केलेली आहे....

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, रेकॉर्डवर येण्यासाठी मी सभागृहाला सांगू इच्छिते की, डोमेस्टीक व्हायोलेन्स बिलच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने रुल्स केलेले नाहीत. खरे म्हणजे आतापर्यंत रुल्स व्हावयास पाहिजे होते. कायद्यामध्ये व्हिक्टिमची व रिस्पॉन्डंडची व्याख्या केलेली आहे त्याचा उपयोग कसा करता येईल, ते मंत्रिमहोदयानी तपासून घ्यावे.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे....

याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून जो विषय सभागृहापुढे आणला आहे व त्यातील जी गरज त्यांनी नमूद केली आहे, ती शासनाने मान्य केली पाहिजे, असे मला वाटते. स्त्रियांची छेडछाड होते, त्याबाबतीत आपल्याकडे कायदा आहे, परंतु त्यामध्ये पळवाटाही आहेत. कायद्याने सगळयाच गोष्टी कंट्रोल होत नाहीत. त्यासाठी प्रिव्हेन्शन ऑफ ॲट्रोसिटीज ॲक्टनुसार आयपीसीचे कलम 498, 494 प्रमाणे डोमेस्टीक व्हायोलन्सचे बिल सभागृहापुढे आणावे लागेल. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या छेडछाडीसंबंधी राज्य शासनाने काहीतरी निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे. खरे म्हणजे, याबाबतीत राज्य शासनच बिल आणेल असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हे डोकेदुखीवर पोटदुखीचे औषध होईल.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, डोमेस्टीक व्हायोलन्स ॲक्ट हा केंद्र सरकारचा आहे. त्यामध्ये ज्या प्रोव्हीजन्स आहेत, त्या केंद्र सरकारने नोटीफिकेशनद्वारे इश्यू केलेल्या आहेत. याठिकाणी मी प्रचलित व्यवस्थेसंबंधी सांगू इच्छितो. यासंदर्भात कोणत्याही महिलेची छेड काढली तर त्याबाबतीत ती महिला न्यायदंडाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करु शकते, अशाप्रकारची प्रोव्हीजन यामध्ये केलेली आहे. याबाबतीत ती महिला डायरेक्ट न्यायदंडाधिकाऱ्यांकडे ॲप्लीकेशन करु शकते. त्या महिलेची तक्रार ग्राहय धरुन त्यावर इनकॅमेरा केस चालविण्यासंबंधीचीही प्रोव्हीजन यामध्ये आहे. यामध्ये नुकसान भरपाईचे आदेश, निवासी घरात राहण्याचे आदेशही आहेत. तसेच, नोकरीच्या ठिकाणी संरक्षण मिळण्याच्या दृष्टीनेही तीन क्रमांच्या कलमामध्ये तरतुदी नमूद केलेल्या आहेत. चार क्रमांकाच्या कलमामध्ये मुलांचा ताबा मिळण्याच्या दृष्टीनेही आदेश किंवा ठळक बाबी या कायद्यामध्ये दिलेल्या आहेत. तसेच, न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा भंग केल्यास, कलम 31 प्रमाणे 6 महिने ते 1 वर्षापर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची अथवा रुपये 20,000 पर्यंत दंड अशाप्रकारची तरतूद यामध्ये केलेली आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे, इन- कॅमेरा क्रॉस व्हेरिफीकेशन घेण्यासंबंधीही कलम 16 मध्ये तरतूद केलेली आहे. बहुसंख्य केसेससंबंधी आयपीसी कलम 294, 354,, 498 (A), 509 खाली गुन्हे दाखल होतात. परंतु जिल्हा पोलीस अधीक्षक, इन्सपेक्टर, डीवायएसपी हे अशा केसेसचे गुन्हे कलम 509 खालीच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

दाखल करुन घेतल्याचे आपण पाहतो. त्यामुळे अशा प्रश्नांकडे राज्य सरकारने गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपल्याला कलम 509 मध्ये सुधारणा घडवून आणावी लागेल. आपल्याला कलम 509 च्या अंतर्गत येणाऱ्या सर्व गुन्हयांची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी करावयाची असेल तर आयपीसी कलम 509 मध्ये सुधारणा करण्याची शिफारस करावी लागेल. आयपीसी कलम 509 हे इंडियन पीनल कोड असल्यामुळे आपल्याला त्यामध्ये सुधारणा करता येत नाहीत, त्यासाठी आपल्याला केंद्र शासनाकडे शिफारस करावी लागते. त्यामुळे कलम 509 मध्ये जोपर्यंत आपण सुधारणा घडवून आणत नाहीत, तोपर्यंत डोमेस्टीक व्हायोलन्सच्या संदर्भातील अंमलबजावणीचा प्रश्न निर्माण होणार आहे. आपण या सभागृहामध्ये 20-25 सन्माननीय सदस्य मिळून कायदा पास करुन घेतो, परंतु यासंदर्भातील पळवाटा शोधण्याच्या दृष्टीने लाखो लोकांच्या मनात अगोदरच व्यूहरचना चालू असते. आज समाजामध्ये दोन्ही बाजूचे वर्ग आहेत. कायद्याचा बोजवारा उडवणाराही वर्ग आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील पुढे सुरु...........

म्हणून या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी कशी करावी, याचा विचार करणे आवश्यक आहे. भारतीय दंड विधानाच्या कलम 509 संदर्भात काल विधानसभेमध्ये देखील विस्तृतपणे चर्चा झाली. डोमेस्टिक व्हायोलन्स ॲक्ट लागू झाल्यापासून भारतीय दंड विधानाच्या कलम 509 खाली गुन्हे दाखल होत आहेत. या कलमान्वये दाखल होणारा गुन्हा जामीनपात्र आहे. या कलमाखाली गुन्हा दाखल झाल्यानंतर फार तर संबंधित व्यक्तिला पोलीस स्टेशनमध्ये बोलावून घेणे, त्याला ताकीद देणे, तात्पुरती अटक होऊन जामीन मंजूर करणे, अशा प्रकारची कारवाई होईल. म्हणून या कलमाच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भाने विचार करावा लागणार आहे. राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी 50 टक्के लोकसंख्या ही महिलांची आहे. त्याचप्रमाणे आता राज्यात आय.टी.उद्योग, बी.टी.उद्योग, कॉल सेंटर्स मोठया प्रमाणावर विकसित होऊ लागले आहेत. प्रत्येक कुटुंबामध्ये आता पुरुषांबरोबर महिलाही काम करु लागल्या आहेत. शिक्षणाची दालने सर्वच समाज घटकांसाठी खुली झालेली असल्यामुळे सर्वच क्षेत्रात महिला फार मोठया प्रमाणावर पुढे येऊ लागल्या आहेत. राज्य शासनाचा असा प्रयत्न आहे की, इयत्ता नववी, दहावी, अकरावी, बारावी या वर्गांच्या शालेय अभ्यासक्रमात डोमेस्टिक व्हायोलन्स ॲक्टच्या संदर्भात एखादा संक्षिप्त धडा अंतर्भूत करावा. याचे कारण असे आहे की, हा ॲक्ट देशात लागू झाला असला तरी त्याबाबतची फारशी माहिती अद्याप समाजाला नाही. ग्रामीण तथा शहरी भागातील अनेक लोकांना, महिलांना, विविध संघटनांना देखील या ॲक्टची फारशी माहिती नाही. त्यामुळे या ॲक्टच्या संदर्भाने शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये सेमिनार घेणे, प्रसार माध्यमांचा उपयोग करुन व्यापक प्रसिद्धी देणे या प्रकारचे प्रयत्न करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. आता महाराष्ट्रात महिला बचत गट, महिला मंडळे या माध्यमातून एक मोठी चळवळ निर्माण झाली आहे. अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, पूरक पोषण आहार या माध्यमातून मोठया संख्येने महिला पुढे येऊ लागल्या आहेत. या सर्व माध्यमांचा उपयोग करुन या ॲक्टचा प्रसार, प्रचार करण्याची मोहिम आखावी लागणार आहे. केवळ सरकारच्या माध्यमातून ही जागृती होईल, असा माझा दावा नाही. या राज्यात सामाजिक कार्य करणा-या ज्या विविध संघटना, संस्था आहेत यांनाही बरोबर घेऊन आपल्याला पुढे जावे लागणार आहे. तालुका पातळीवर, जिल्हा पातळीवर संनियंत्रण समिती नेमून महिलांच्या बाबतीतील या प्रश्नाकडे पहावे लागणार आहे. या राज्यात पूर्वी हुंडाबळी, बालविवाह चळवळ

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील पुढे सुरु.............

निर्माण झाली होती. एखाद्या ठिकाणी जर बालविवाह होत असल्याचे निदर्शनास आले तर तेथील ग्रामसेवक किंवा मुख्याधिकारी त्याविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करु शकतात, अशा प्रकारचे अधिकार आपण त्यांना दिलेले आहेत. त्याचा परिणाम असा झाला आहे की, बालविवाहाला आळा बसण्याचे काम सुरु झाले आहे. अशाच पद्धतीने याही बाबतीत समाजामध्ये परिवर्तन घडवून आणावे लागणार आहे, सर्व घटकांना बरोबर घेऊन जावे लागणार आहे. स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन समाजाला बदलावा लागणार आहे. सरकारच्या बरोबरच समाजातील विविध संघटना, संस्था, समाजसेवक यांनाही हे काम करावे लागणार आहे. आपण शासनाची एक 'हेल्प लाईन' यापूर्वी सुरु केली आहे. जरुर त्यामध्ये अजून काही अडचणी आहेत, त्याही दूर केल्या जातील. या सर्व चर्चेतील मूळ मुद्दा असा आहे की, या ॲक्टची अंमलबजावणी कशा पद्धतीने होणार आहे. केंद्राने हा कायदा तयार केलेला आहे व नियमावली तयार करण्याची जबाबदारी त्या त्या राज्यांवर सोपविली आहे. त्या राज्यांनी त्यांना आवश्यकता असेल त्या पद्धतीने नियमावली तयार करावयाची आहे. आपल्या राज्याने अद्याप नियमावली तयार केलेली नाही, हे आम्ही अगोदरच मान्य केलेले आहे. तीन/चार महिन्यांचा कालावधी लोटूनही अद्याप प्रोटेक्शन ऑफिसरची नेमणूक करण्यात आलेली नाही, हे देखील मान्य आहे. प्रोटेक्शन ऑफीसरशिवाय आपण कायदेशीर लढाई लढू शकणार नाही. आजच्या या अशासकीय विधेयकाच्या निमित्ताने मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, हे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी विधानसभा व विधानपरिषदेतील सर्व महिला सन्माननीय सदस्या तसेच ज्या ज्या सन्माननीय सदस्यांना या विषयामध्ये रस असेल त्या सर्वांची एक बैठक आयोजित करण्यात येईल. या ॲक्टअंतर्गत जी नियमावली तयार करावयाची आहे त्या अनुषंगाने या सन्माननीय सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील किंवा त्यांचे काही विचार असतील तर ते या बैठकीत ऐकून घेण्यात येतील, त्यावर विचार होईल व योग्य प्रकारची नियमावली तयार करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकेल. एकदा नियमावली तयार झाल्यानंतर गृह विभागाचा रोल महत्वाचा ठरणार आहे. त्याचप्रमाणे शालेय शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, ग्राम विकास विभाग, नगरपालिका, जिल्हा परिषदा यांचाही रोल महत्वाचा ठरणार आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KTG/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ......... 10:35

श्री.हर्षवर्धन पाटील ..........

या सर्व विभागांना एकत्रितपणे काम करावे लागणार आहे. आपल्याला शहरामध्ये होणारे अत्याचाराचे प्रमाण रोखावे लागणार आहे, स्लम एरियामध्ये होणारे अत्याचाराचे प्रमाण रोखावे लागणार आहे. हा केवळ महिला व बाल विकास विभागाचाच प्रश्न आहे, असे नाही. या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस स्टेशनची स्थापना करावी लागणार आहे आणि तेथे दोन महिला पोलीस अधिका-यांची नेमणूक करावी लागणार आहे. काही भागांमध्ये स्वतंत्र महिला पोलीस स्टेशन स्थापन करावे लागणार आहे. कारण पोलीस स्टेशनमध्ये एखादी महिला तक्रार नोंदविण्यासाठी गेली आणि त्या पोलीस स्टेशनमध्ये पुरुष पोलीस अधिकारी असेल तर त्या महिलेला तक्रार नोंदविण्यात ब-याच अडचणी येत असतात. अशा पद्धतीने या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. नियमावली तयार करण्यासाठी 3-4 महिन्यांचा विलंब झाला, हे मी मान्य करतो. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये यासंदर्भातील नोटिफिकेशन काढण्यात आले होते. परंतु त्यावेळी आचारसंहिता लागू झालेली होती. यासंदर्भात आमच्या दोन बैठकाही झालेल्या आहेत. जे नियम तयार करावयाचे आहेत ते तयार करण्यापूर्वी सन्माननीय सदस्यांची बैठक घेण्यात येईल व त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल. राज्यातील महिलांना संरक्षण देणे, महिलांवरील अत्याचार रोखणे, महिलांवर अत्याचार झाला असेल तर कायद्याचा बडगा दाखवून दोषी व्यक्तींवर कठोर कारवाई करणे, अशी भूमिका घेतली जाईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी डोमेस्टिक व्हायोलन्स ॲक्टबद्दलची सूचना स्वीकारली याचे मी स्वागत करते. माझा प्रश्न असा आहे की, माझे विधेयक स्त्रियांच्या छेडछाडीसंदर्भातील आहे. सार्वजनिक ठिकाणी महिलांवर होणारे अत्याचार आणि कुटुंबातील हिंसाचार हे दोन वेगवेगळे मुद्दे आहेत. स्त्रियांची छेडछाड करणा-या गुन्हेगाराला जामीन मिळू नये, हे बरोबर आहे. पण सेंट्रल रेल्वेने जायचे आहे आणि तुम्ही वेस्टर्न रेल्वेचे उदाहरण देत आहात. मला माननीय मंत्री महोदयांच्या हेतूबद्दल शंका घ्यावयाची नाही. पण प्रोटेक्शन ऑफिसरची नेमणूक केव्हा केली जाईल ? याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. बजेटमध्ये आर्थिक तरतूद नसेल तर प्रोटेक्शन ऑफिसर नेमण्यासाठी पुढचे वर्ष उजाडेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ........

डोमेस्टिक व्हायोलन्स ॲक्ट संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक नाही. स्त्रियांची छेडछाड विधेयकासंदर्भात शासन कोणते पाऊल उचलणार आहे, हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे, अशी माझी विनंती आहे.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, भारतीय दंड विधानाच्या कलम 509 अन्वये गुन्हा दाखल करावा लागतो. डोमेस्टिक व्हायोलन्स ॲक्ट अंतर्गत गुन्हा करणा-याला शिक्षा होईल. दोन महिन्यांच्या आत रुल्स फ्रेम करु, असे माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन द्यावे. डोमेस्टिक व्हायोलन्स ॲक्टचे मी समर्थन करीत आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी मांडलेले विधेयक महत्वाचे आहे. स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करणारा कायदा करण्यासंदर्भात आम्ही प्रयत्न करु असे माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन द्यावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी डोमेस्टिक व्हायोलन्स ॲक्ट संदर्भात सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे महिलांची छेडछाड यासंदर्भात सांगत आहेत. रुल्स फ्रेम करतांना या कायद्याचा आधार घेऊन आपल्याला या गोष्टी करता येतील काय, हे तपासून बघावे लागणार आहे. महिला व बाल कल्याण विभागातर्फे अशा प्रकारचा प्रस्ताव आणला जाईल व तो प्रस्ताव आणण्यापूर्वी आपण बैठक घेऊन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करु. साधारणत: हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भात आपण एक बैठक घेऊ. तसेच, तातडीने प्रोटेक्शन ऑफिसरची नियुक्ती करण्यात येईल. प्रोटेक्शन ऑफिसरची नियुक्ती केल्यानंतर अंमलबजावणी करण्यात येईल. आय.पी.सी. च्या कलम 509 संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. त्यासंदर्भात देखील आपण एकत्रितपणे चर्चा करु.

यानंतर कु.खर्चे ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि त्यातूनही काही गोष्टी जर शिल्लक राहत असतील तर त्या देखील नवा कायदा करुन त्यामध्ये कव्हर करण्याचा प्रयत्न करु, त्यामुळे सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी सदर विधेयक मागे घ्यावे, अशी मी त्यांना विनंती करीत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या सभागृहाच्या गॅलरीमध्ये काय चालले आहे, ते आपण जरा बघता का ?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.सावंत सभागृहाच्या गॅलरीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासाची तयारी चालू आहे.

डॉ.नीलम गो-हे :या छेडछाडीच्या संदर्भातील विधेयक आपण पाहिले पाहिजे, यासंदर्भात देखील कायदा आणण्याच्या दृष्टीकोनातून पुढाकार घेऊन कायदा करण्यात येईल, असे आपण म्हटले पाहिजे. कौटुंबिक हिंसाचाराला आळा घालण्यासाठी " प्रोटेक्शन ऑफिसर " च्या नेमणूकीची कालमर्यादा आपण सांगितली नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : ठीक आहे, सदर अधिवेशन संपल्यानंतर आपण प्रोटेक्शन ऑफिसरच्या नेमणूकीबाबत विचार करु.

डॉ.नीलम गो-हे : ठीक आहे, मी यावर विश्वास ठेवते, नाहीतर या विधेयकाकरिता पुढील अधिवेशन उजाडेलच, चुकीची प्रसिध्दी करु नका, स्वीकारले तर स्वीकारले म्हणा, मग अधिवेशन संपल्यानंतर "अद्याप स्वीकारलेले नाही " असे जाहीर करणे चुकीचे आहे, असे मला वाटते. बचतगटांसारख्या उपक्रमांमधील गोंधळांमुळे वैफल्यग्रस्त होऊन " अक्कू यादव " सारखे प्रकरण पुन्हा घडावयाला नको.

सभापती महोदय, हे विधेयक मागे घेण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

**अशासकीय विधेयक क्र.12 बाबत.**

**उपसभापती** : यानंतरचे विधेयक सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे असून माननीय मंत्रीमहोदयांच्या विनंतीनुसार ते नंतर घेण्यात येईल.

आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.00वाजता सुरु होईल.

( 10.41 ते 11.00 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित झाली आहे.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ KTG/ कु. खर्चे नंतर --- 11.00

( स्थगिती नंतर --- )

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**तोंडी उत्तरे**

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत खामगांव (जि. बुलढाणा) सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे घेण्यात आलेल्या कामातील गैरव्यवहाराबाबत**

**(1) * 24725 श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी, श्री. जगदीश गुप्ता** : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) खामगांव, जि. बुलढाणा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान सपाटीकरण व कुंपण घालण्याच्या कामाला स्थानिक विकास निधीअंतर्गत दिनांक 23 जून, 2002 रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली होती, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर काम हे मैदान सपाटीकरण व कुंपण घालण्याचे असतांना त्या कामासाठीचा पैसा ग्लेझ टाईल्स व सेरेमिक टाईल्सचे फ्लोअरींग व इतर संकिर्ण बाबींवर खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, जिल्हाधिकारी यांनी या कामाबाबत चौकशी करण्यासाठी माहे जून, 2006 मध्ये चौकशी समिती गठीत केली होती, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणकोणत्या अधिकाऱ्यावर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे,
(5) अद्याप कारवाई अपूर्ण असल्यास ती केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. रविशेठ पाटील, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) दिनांक 24 जून, 2002 अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(2), (3), (4) व (5) या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक 17 जुलै, 2006 च्या आदेशान्वये त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे. चौकशी समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त असून समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा एक अत्यंत महत्त्वाचा असा प्रश्न आहे. आमदारांना जो स्थानिक विकास निधी मिळत असतो त्याचा गैरवापर झाल्याचे हे प्रकरण आहे. खामगाव शहरामध्ये नगर परिषदेच्या मालकीचे मैदान आहे, जे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदान म्हणून ओळखले जाते. या मैदानामध्ये सपाटीकरण आणि मैदानाला कंपाऊंड घालण्याचे काम या स्थानिक विकास निधीतून सुचविण्यात आलेले होते. त्याला प्रशासकीय मान्यता देखील मिळाली होती. परंतु तेथे सपाटीकरण आणि कंपाऊंड न करता तो सगळा पैसा तेथे ग्लेझ टाईल्स,

...... जे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 24725 .....

सिरॅमिक टाईल्सचे फ्लोअरींग करण्यामध्ये वगैरेमध्ये खर्च करण्यात आला. त्या संबंधी मी स्वत: 16 जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली. त्यानंतर 17 जुलैला जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली आणि त्याबाबत आता येथे उत्तर देताना शासनाकडून सांगण्यात आले आहे की, त्या समितीचा अहवाल अद्याप पावेतो प्राप्त झालेला नाही. सभापती महोदय, मी स्वत: खामगाव निवासी असून मी येथे अत्यंत जबाबदारीने विधान करतो आहे की, सदर मैदानामध्ये हे काम करण्यासाठी नगरपरिषदेची कोणत्याही प्रकारे ना हरकत घेण्यात आलेली नाही आणि स्थानिक विकास निधीच्या पैशाचा अपहार करून तो पैसा दुसऱ्याच कामासाठी खर्च करण्यात आलेला आहे. खरे तर या कामाच्या चौकशीसाठी एवढा वेळ लागण्याचे कारण नाही. या प्रकरणी मी तक्रार केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आल्यानंतर या कामाची चौकशी काय करण्यात आली ? त्यासाठी नेमलेल्या समितीने त्याबाबत गेल्या 8 महिन्यात काय केले ? त्या समितीचा अहवाल अद्याप का प्राप्त झाला नाही ? सभापती महोदय, त्या समितीमध्ये सदस्य तरी कोण नेमले आहेत ? तर या कामाशी वा या विभागाशी संबंध नसलेले असे जलसंपदा विभागाचे अधिकारी सदस्य म्हणून त्या समितीमध्ये आहेत. समिती नेमल्यानंतरही त्यांच्याकडून 8-8 महिने झाले तरी कोणताही अहवाल येत नाही आणि त्याबाबत कारवाई देखील होत नाही. माझा येथे स्पष्ट आरोप आहे की, सत्तारूढ पक्षाच्या आमदारांनी या पैशाचा अपहार केला असून हे सारे प्रकरण दाबण्यात येत आहे. म्हणून मी येथे नेमका प्रश्न विचारतो की, त्या समितीचा अहवाल केव्हा येणार आहे ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, तेथील आमदारांच्या सुचनेनुसार या मैदानाला कंपाऊंड घालणे आणि मैदानाचे सपाटीकरण करणे या कामासाठी 4 लाख 89 हजार रूपये खर्च करण्यात आलेले आहेत आणि त्यासाठी प्रशासकीय मान्यताही मिळालेली आहे. त्यात ग्लेझ टाईल्स, सिरॅमिक्स टाईल्स वगैरे सर्व काही नमूद केलेले आहे. सदरहू कामास 24.6 ला मान्यता आली आणि 12.6 ला काम पूर्ण झाले आहे. सन्माननीय सदस्यांची या कामाबाबत 'यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे' अशी तक्रार 16.6 रोजी आलेली आहे. त्याबाबत चौकशी एस.इ., एस.इ.(व्हिजिलन्स) यांच्याकडून केली असता त्यात कोठेही निकृष्ट दर्जाचे काम झालेले नाही वा त्यात भ्रष्टाचार झ ालेला नाही असे ....

...... जे 3 ....



KBS/ KGS/ KTG/ कु. खर्चे नंतर --- 11.00

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या पद्धतीने झालेला भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न शासनाकडून, राज्यमंत्र्यांकडून केला जात असेल तर ते बरोबर नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी जे सांगतो आहे ते असत्य असेल तर मी माझ्या पदाचा राजीनामा देईन. आपण याच्या चौकशीसाठी वाटल्यास विधानसभा सदस्यांची समिती नेमावी आणि आपण या स्पॉटवर जाऊन पाहिले तरी आपल्या ही गोष्ट लक्षात येईल. तेव्हा अशा प्रकारे आपण भ्रष्टाचाराला पाठीशी घालणार असाल तर मग आम्ही येथे कशासाठी आलो आहोत ? सभापती महोदय, हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. हे खेळाचे मैदान असून त्याचे सपाटीकरण करायचे म्हणजे तेथे ग्लेझ टाईल्स वगैरे लावायच्या असतात का ? .... सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे.

**सभापती** : मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेत्यांचा हा प्रश्न आहे आणि ते तेथील स्थानिक आहेत. त्यांना तेथील वस्तुस्थिती चांगल्या प्रकारे माहीत आहे. त्यांनी तक्रार केल्यानंतर आपण याबाबत सगळी चौकशी करणे आवश्यक आहे. जी काही चौकशी या प्रकरणी केली आहे ती योग्य नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा याबाबत आपण पुन्हा चौकशी करावी अशी त्यांची मागणी आहे. ती आपण मान्य करावी. .

( यानंतर श्री. गागरे ..... के 1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24725 .....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदान सपाटीकरण व कुंपन घालण्याच्या कामात भ्रष्टाचार व अनियमिता झालेली आहे.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांचे असे म्हणणे असेल तर पुन्हा चौकशी करुन एक महिन्यात अहवाल मागवितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अत्यंत खेदाने नमूद करतो की, मंत्री महोदय जबाबदारीने निवेदन करीत नाहीत. त्यांनी अधिकाऱ्यांना संरक्षण देऊ नये. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदान सपाटीकरण व कुंपण घालण्याच्या कामाला मान्यता दिली हे बरोबर आहे. परंतु या कामासाठीचा पैसा ग्लेझ टाईल्स व सिरॅमिक टाईल्सचे फलोअरींग व इतर संकिर्ण बाबींवर खर्च करण्यात आला आहे. मंत्री महोदय सभागृहास चुकीची माहिती देत असून दिशाभूल करीत आहेत. अधिकाऱ्यांना वाचविले जात आहे. सरकारने त्यांना धारेवर धरले पाहिजे. तातडीने अहवाल मागितला पाहिजे. त्या संदर्भात शहानिशा करायला हवी, परंतु हे करण्याची मंत्री महोदयांची मानसिकता दिसत नाही. अशा प्रकारे मंत्री सभागृहात उत्तर द्यायला लागले तर कठीण होईल. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अधिकाऱ्यांनी केलेल्या चुका आपण कशासाठी आपल्या अंगावर घेत आहात ?.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सदरहू बांधकामाबाबत सर्व चौकशी करुन मी सभागृहात बोलत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अधिकाऱ्यांनी चौकशी केली आहे, चौकशीमध्ये निष्पन्न झालेली अधिक माहिती जर तुम्हाला पाहिजे असेल तर ती उपलब्ध आहे.

**सभापती** : मंत्री महोदयांनी मैदान सपाटीकरण व कुंपण या कामाला प्रशासकीय मान्यता दिलेली होती. विरोधी पक्षाच्या सदस्यांचे असे म्हणणे आहे की, मैदान सपाटीकरण व कुंपण घालण्याचे काम असताना त्या कामासाठीचा पैसा टाईल्स व इतर बाबींवर खर्च करण्यात आला असे झाले असल्यास ही आक्षेपार्ह बाब आहे. याबाबत मंत्री महोदयांनी रिवाईज ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲप्रूव्हलबाबत किंवा आणखी काही माहिती असल्यास सभागृहास सांगावी.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

ता.प्र.क्र.24725 .....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या कामाचा पैसा टाईल्स व इतर बाबींवर खर्च करण्यात आला आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामात भ्रष्टाचार झालेला असेल तर त्यांना स्पष्ट सांगितले पाहिजे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कोणकोणती कामे करता येतात याबाबत नियम आहेत. ज्या कामाची त्या गावात आवश्यकता असेल त्यास परवानगी दिली जाते, परंतु काही आमदारांना याची कल्पना नसते. माझा प्रश्न असा आहे की, ज्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली, ते काम जमिनीचे सपाटीकरण व कुंपणाचे होते, टाईल्सचे नव्हते. या कामामध्ये ग्लेझ टाईल्स सिरॅमिक टाईल्सचे फलोअरींग व इतर संकिर्ण बाबींचा समावेश आहे काय, याचा खुलासा करावा.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, या कामामध्ये टाईल्स लावणे व  इतर बाबींना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, या कामाच्या समावेश अंदाजपत्रकात करण्यात आला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : टाईल्स लावून केलेल्या बांधकामाबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

.....नंतर श्री.सरफरे

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24725...

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, माझ्याजवळ प्रशासकीय मान्यतेचे विवरणपत्र आहे. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच्या ठिकाणी टाईल्स लावण्यात आल्या आहेत. त्यामध्ये कुठेही गल्लत झालेली नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. आम्हाला आपल्याकडील फोटो पहावयाचे नाहीत. आमदारांनी स्थानिक विकास निधीमधून कामांची मागणी केली आहे, त्यामध्ये मैदानाच्या सपाटीकरणाच्या कामाचा समावेश आहे...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे त्या कामांचे फोटो आहेत त्यावरुन असे दिसते की, त्याठिकाणी टाईल्स लावण्याचे काम चांगल्याप्रकारे झाले आहे. त्यापेक्षा आणखी काही काम नव्याने करावयाचे असेल तर ते आपल्याला करता येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, आमदारांनी स्थानिक विकास निधीमधून ज्या कामांची मागणी केली त्यामध्ये मैदानाच्या सपाटीकरणाच्या कामाचा समावेश आहे. मैदानाच्या सपाटीकरणाचे काम झाल्यानंतर ते खेळण्यासाठी लायक होईल अशाप्रकारची उपाय योजना करण्याची आवश्यकता होती. परंतु त्याठिकाणी टाईल्स लावून त्याचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. हा कोणत्या कामाचा भाग आहे ? आणि याकरिता निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय?

श्री. रविशेठ पाटील :सभापती महोदय, या कामांना प्रशासकीय मान्यता घेण्यात येऊन त्याप्रमाणे काम करण्यात आले आहे, त्यामध्ये गैर काहीही झालेले नाही.

**सभापती** : मंत्रिमहोदय, कोणकोणत्या प्रशासकीय बाबींना मान्यता घेण्यात आली त्याची यादी आपण वाचून दाखवावी.

श्री. रविशेठ पाटील : प्रशासकीय मान्यता घेतलेल्या कामांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे. पाण्याची टाकी बसविणे, मैदानाचे सपाटीकरण करणे, टाईल्स लावणे, लोखंडी जाळया लावणे, रंगरंगोटी करणे, प्लॅस्टरींग करणे व पाईपलाईन्स टाकणे इत्यादी कामांचा समावेश असून त्याकरिता 2 लाख 30 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. त्याठिकाणी नगरपरिषदेच्या मालकीचे मैदान असून त्या मैदानाच्या एका कोपऱ्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आहे. या पुतळयाच्या परिसराच्या सुशोभिकरणासाठी पैसे मागितले असते तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

आम्ही समजू शकलो असतो त्याला आमची हरकत नव्हती. परंतु हा निधी मैदानाच्या पूर्ण कंपाऊंडच्या खर्चासाठी मागितला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिसराच्या सुशोभिकरणासाठी खर्च करण्यात आला आहे. याठिकाणी गल्लत करण्यात आली असल्यामुळे त्याला आमची हरकत आहे. मैदानाचे काम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली परंतु दुसऱ्या कामासाठी निधी खर्च करणे हे चुकीचे आहे. याकरिता नगरपरिषदेचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले नाही, कंप्लिशन सर्टिफिकेट सुध्दा घेतले नाही. तरीसुध्दा कामाची बिले मंजूर करुन घेण्यात आली आहेत हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे मैदानाच्या सपाटीकरणाच्या कामासाठी 9 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता. परंतु आमदार स्थानिक विकास निधीमधून 5 लाखाच्या खर्चामध्ये कामांचा समावेश करावयास पाहिजे. त्यामुळे 5 लाखाच्या मर्यादेमध्ये काम घेऊन ते पूर्ण करण्यात आले.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मैदानाच्या सपाटीकरणाचे काम झाले नाही हे मी याठिकाणी जबाबदारीने सांगत आहे. अशाप्रकारे मंत्रिमहोदय अधिकाऱ्यांना पाठिशी घालणार असतील तर आम्ही याठिकाणी प्रश्न कशासाठी उपस्थित करावयाचे?

**सभापती :** माननीय राज्यमंत्र्यांनी माननीय विरोधी पक्षनेत्यांबरोबर प्रत्यक्ष जागेवर जाऊन व पहाणी करुन चर्चा करावी. त्यावेळी संबंधित अधीक्षक अभियंता यांना बोलावून घेऊन ज्या ज्या कामांना प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे त्या कामांच्या संदर्भात त्यांच्याशी चर्चा करावी. आणि संबंधित कामांची अंमलबजावणी चुकीच्या पध्दतीने झाली असेल तर तशाप्रकारचा अहवाल आपण सभागृहाला सादर करावा अशी या प्रश्नाच्या निमित्ताने आपणास सूचना करतो.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्याची अकरावी पंचवार्षिक योजना**

**(२) * २७४६३ श्री. मधुकर सरपोतदार , श्री. दिवाकर रावते , डॉ. दिपक सावंत , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. सुरेश जेथलिया , श्री.परशुराम उपरकर , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे :** सन्माननीय नियोजन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या अकराव्या पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी मार्च, २००७ पासून सुरु होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दहाव्या पंचवार्षिक योजनेतील कामांचे मूल्यमापन करुन नव्या योजनेचे धोरण ठरविण्यासाठी राज्य नियोजन मंडळाने विविध अभ्यासगटांची स्थापना केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दहाव्या पंचवार्षिक योजनांच्या ठरविलेल्या कामांवर उद्दीष्टांवर प्रत्यक्ष किती खर्च होता, दहाव्या योजने पुढील कोणते प्रश्न आले हे पाहून नवे धोरण सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ठरविण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मार्च, २००७ पासून सुरु होणाऱ्या अकराव्या पंचवार्षिक योजनेत राज्याच्या विकासाचा दर किती ठेवण्याचे शासनाचे उद्दीष्ट ठरविले आहे ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता** : (१) अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी सन २००७-१२ असा आहे.

(२), (३) व (४) अकराव्या पंचवार्षिक योजनेचे प्रारुप तयार करण्यासाठी राज्य नियोजन मंडळाने विविध अभ्यासगटांची स्थापना केली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.27463 ......

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, काही प्रश्न आपल्याला अधिक माहिती मिळावी या उद्देशाने उद्देशाने विचारले जातात. अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये कोणकोणत्या कामांची तरतूद केली आहे, त्या कामांचा आपल्या राज्याला कितपत उपयोग होणार आहे ? या अनुषंगाने माहिती मिळविण्यासाठी येथे प्रश्न विचारले गेले आहेत. सन्माननीय मंत्री महोदयांनी मासलेवाईक उत्तर दिलेले आहे की, "अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी सन 2007-12 असा आहे." कोणत्या महिन्यापासून हा कालावधी सुरु झालेला आहे याची माहिती दिलेली नाही. पुढे उपप्रश्न क्रमांक (2),(3) व (4) च्या सदर्भात उत्तर दिलेले आहे की,"अकराव्या पंचवार्षिक योजनेचे प्रारुप तयार करण्यासाठी राज्य नियोजन मंडळाने विविध अभ्यासगटांची स्थापना केली आहे. म्हणजे मी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे न देता उत्तरामध्ये नको ती माहिती दिलेली आहे हे उचित नाही. प्रत्येक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात त्या मागे माहिती मिळविणे, हा त्यांचा महत्वाचा उद्देश असतो. उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या माध्यमातून माहिती मिळाली नाही तर आम्ही कशाला प्रश्न विचारायचा, असा प्रश्न पडतो. मी उपप्रश्न क्रमांक 2 विचारलेला होता की, "असल्यास, गत दहाव्या पंचवार्षिक योजनेतील कामांचे मूल्यमापन करुन नव्या योजनेचे धोरण ठरविण्यासाठी राज्य नियोजन मंडळाने विविध अभ्यासगटांची स्थापना केली आहे हे खरे आहे काय ? याचे उत्तर "होय" असे म्हटलेले आहे. तिसरा उपप्रश्न विचारलेला होता की, "असल्यास, दहाव्या पंचवार्षिाक योजनांच्या ठरविलेल्या कामांवर उद्दिष्टांवर प्रत्यक्ष किती खर्च होता, दहाव्या योजनेपुढील कोणते प्रश्न आले हे पाहून नवे धोरण सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ठरविण्यात येत आहे, हे खरे आहे काय ? पुढे चौथा उपप्रश्न विचारलेला होता की, असल्यास, मार्च,2007 पासून सुरु होणाऱ्या अकराव्या पंचवार्षिक योजनेत राज्याच्या विकासाचा दर किती ठेवण्याचे शासनाचे उद्दिष्ट ठरविले आहे ? या दोन्ही उपप्रश्नांना उत्तर दिलले आहे की, "अकराव्या पंचवार्षिक योजनेचे प्रारुप तयार करण्यासाठी राज्य नियोजन मंडळाने विविध अभ्यासगटांची स्थापना केली आहे. अशाप्रकारचे वेगळे उत्तर का देण्यात आले ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, अकराव्या पंचवार्षिक योजनेचे प्रारुप तयार करण्याचे काम सुरु आहे. यासाठी 13 अभ्यासगट नेमलेले आहेत. 13 अभ्यासगटानी 15 मार्चपर्यन्त अहवाल देणे अपेक्षित होते. या अभ्यासगटामध्ये काही स्थनिक संस्थांचे प्रतिनिधी आहेत,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

काही अशासकीय सदस्य आहेत. मधल्या काळामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्यामुळे ते त्या कामामध्ये गुंतले होते. म्हणून या अभ्यासगटांचा 15 मार्चपर्यन्त अहवाल येऊशकला नाही. त्यांनी आता 15-20 दिवसाचा कालावधी वाढवून मागितलेला आहे. त्यांच्याकडून 15-20 दिवसामध्ये निष्कर्ष येणे अपेक्षित आहे. त्यांनी काढलेल्या निष्कर्षावर प्रारुप तयार होईल. ते झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये किती खर्च झालेला आहे ?

डॉ.सुनील देशमुख : दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सन 2002-03 मध्ये 11,562 कोटी रुपयाचा नियतव्यव होता, त्यापैकी 7,739 कोटी रुपये खर्च केलेला आहे. म्हणजे 66 टक्के खर्च झालेला आहे. सन 2003-2004 मध्ये 12053 कोटी रुपये नियतव्यय होता, त्यापैकी 7214 कोटी खर्च झालेला आहे. म्हणजे 61 टक्के खर्च केलेला आहे. सन 2004-05 मध्ये 9665 कोटी रुपये नियतव्य होता, त्यापैकी 9815 कोटी रुपये खर्च झालेला आहे. म्हणजे 101 टक्के खर्च झालेला आहे. सन 2005-06 मध्ये 11014 कोटी रुपये नियतव्यय होता, त्यापैकी 14674 कोटी रुपये खर्च झाला म्हणजे 133 टक्के खर्च झालेला आहे. सन 2006-07 मध्ये 14829 कोटी रुपये नियतव्यय होता त्यापैकी 14 हजार कोटी रुपये खर्च झालेला आहे. म्हणजे 107 टक्क्यापर्यन्त खर्च पोहोचलेला आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 27463......

प्रा. फौजीया खान :सभापति महोदय, प्रश्न क्रमांक तीन के अन्तर्गत यह पूछा गया है कि दसवीं पंचवर्षीय योजनाओं में निश्चित कार्यो पर प्रत्यक्ष कितना खर्च था तथा क्या यह सही है कि दसवी योंजना के सामने आए प्रश्नों को देख कर नई नीति 11वीं पंचवर्षीय योजना में निश्चित की जा रही है ? इसी प्रश्न से संबंधित मेरा यह प्रश्न है कि, जेण्डर ओरिएन्टेड बजेट के लिए महिला बाल कल्याण विभाग के अन्तर्गत ही केवल महिलाओं के लिए बजट प्रस्तावित किया जाएया या फिर हर विभाग के अन्तर्गत महिलाओं के लिए बजट प्रस्तावित किया जाएगा, तथा माननीय प्रधानमंत्री जी ने जो 15 सूत्रीय कार्यक्रम जाहिर किया है, उसमें एक मुद्दा यह भी है कि अल्पसंख्याक के कल्याण के लिए बजट में 15 प्रतिशत धनराशि का प्रावधान किया जाएगा. अत: क्या 11 वी पंचवर्षीय योजना में अल्पसंख्याक के कल्याण के लिए बजट प्रावधान पर फोकस किया जाएगा ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, जे अभ्यासगट नेमलेले आहेत त्या अभ्यासगटाने पंचवार्षिक योजनेचा प्रारुप आराखडा तयार करण्यासंदर्भात खालील बाबी विचारात घ्यावयाच्या आहेत. सध्या चालू असलेल्या योजनांपैकी ज्या योजना आता आवश्यक नाहीत अथवा काही योजनांमधील एखादाच भाग चालू ठेवणे आवश्यक असेल त्याचा विचार करुन बंद करावयाच्या योजनांची यादी द्यावी, योजनांचे ड्युप्लिकेशन टाळणे, योजनेच्या आखणीबरोबरच नियतव्यय उपलब्ध तथा अर्थसंकल्पित करणे व तो संबंधित कार्यान्वियीन यंत्रणांना उपलब्ध करुन देणे व प्रत्यक्ष लाभ लाभार्थ्यांपर्यंत जाणे या साखळीची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी डिलिव्हरी सिस्टीम सुधारणे, प्रत्येक वर्षी घेण्यात येणा-या योजनांमधून प्रतिवर्षी जो नियमव्यय उपलब्ध होईल त्यामधून किती साध्य पूर्ण करता येईल, त्याची मोजणी करता येईल असे उद्दिष्ट निश्चित करणे, ज्या योजना चालू आहेत व ज्यामधून प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत अशा योजनांबाबत 90 टक्के पूर्ण झालेले प्रकल्प, 75 टक्के पूर्ण झालेले प्रकल्प, 60 टक्के पूर्ण झालेले प्रकल्प व 50 टक्के पूर्ण झालेले प्रकल्प याची यादी तयार करुन हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी आवश्यकता व प्राथम्यक्रम ठरवावा अशा प्रकारचे टर्मस् आणि रेफरंसेस दिलेले आहेत. एकूण 13 अभ्यासगट तयार केलेले आहेत. त्यामध्ये अकराव्या पंचवार्षिक योजनेतील अग्रक्रम व लागणारी साधनसंपत्ती, विकास कामांमध्ये खाजगी गुंतवणूकदारांचा सहभाग, कृषि व ग्रामीण विकास, पाटबंधारे, ऊर्जा,





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 27463......

डॉ. सुनील देशमुख....

शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजना, महिला विकास, उद्योग व पर्यटन तसेच मानव विकास अशा 13 समित्या स्थापन केलेल्या आहेत. या समित्यांनी आपले निष्कर्ष 15 मार्चपर्यंत द्यावयाचे होते. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे अशासकीय सदस्य कार्यबाहुल्यामुळे शेवटच्या दोन बैठकांना उपस्थित राहू शकले नाहीत. येत्या पंधरा दिवसामध्ये या 13 समित्यांचे अहवाल येतील. त्या अहवालावरुन अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये महाराष्ट्राचे काय धोरण असावे, आपला विकासाचा दर किती असावा, तो 10 टक्के असावा की 12 टक्के असावा या सगळ्यांचे फायनलायझेशन करणार आहोत. शासन या 13 विषय समित्यांच्या निष्कर्षाची वाट पाहात आहे.

प्रा. फौजीया खान :सभापति महोदय, मैंने दो प्रश्न पूछे थे, जिनका जवाब नहीं मिला है.मैंने यह पूछा था कि, क्या बजेट प्रावधान करते समय जेण्डर ओरिएन्टेड बजेटिंग और मायनारिटीज वेल्फेअर के बारे में शासन का फोकस रहेगा ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. फौजीया खान ह्या महिला विकास समितीमध्ये आहेत. ती समिती आपले निष्कर्ष सांगणार आहे. जेंडर बजेट वगैरे बाबतीत तसे निष्कर्ष त्यांनी दिले तर त्याचा विचार करणार. या महिला विकास समितीमध्ये सन्माननीय सदस्या तज्ज्ञ म्हणून आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, दहाव्या पंचवार्षिक योजनेचे किती प्रकल्प आजपर्यंत रखडलेले आहेत आणि ते पूर्ण करण्यासाठी किती नियतव्यय लागणार आहे ? ज्या विविध समित्या नेमलेल्या आहेत त्या समित्यांमधील अशासकीय सदस्य उपस्थित नसल्यामुळे आपले काम पूर्ण होऊ शकले नाही. ते अशासकीय सदस्य कोणकोण आहेत ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, कोणते प्रकल्प रखडलेले आहेत याची प्रत्येक विभागाकडून माहिती मागवावी लागेल. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. या 13 समित्यांवर जे अशासकीय सदस्य आहेत त्याची यादी फार मोठी आहे. आपण म्हणत असाल तर ती यादी मी वाचून दाखवतो. सभापती महोदय, ही यादी मी पटलावर ठेवतो. प्रत्येक समितीमध्ये सहा ते दहा सदस्यांची नावे आहेत.

..3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 27463......

डॉ. दीपक सावंत : त्या समितीमध्ये सर्व पक्षाचे लोक आहेत काय ?

डॉ. सुनील देशमुख : एका समितीवर श्री. मोरेश्वर टेमुर्डे हे तज्ज्ञ आहेत.

डॉ. दीपक सावंत : अशासकीय सदस्य कोणकोण आहेत ?

डॉ. सुनील देशमुख : या समित्यांवर डॉ. सी.डी.थत्ते, श्री. संपतराव पवार सदस्य आहेत. एका समितीवर प्रा. फौजीया खान तज्ज्ञ म्हणून आहेत. त्यांनी बचत गटामध्ये चांगले काम केलेले आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता. प्र.क्र. 27463....

श्री. मधुकर चव्हाण : केन्द्रीय नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. अहलुवालिया यांच्याकडून एक पत्र आलेले आहे की, महाराष्ट्रातील ज्या योजनांवर 50 टक्क्यापेक्षा कमी खर्च झालेला आहे त्या योजनांचा पुढच्या पंचवार्षिक योजनांमध्ये समावेश करता येणार नाही. परिणामी ताकारी सारख्या अन्य योजनांवर 50 टक्क्याच्या आत खर्च झालेला असल्यामुळे पुढच्या पंचवार्षिक योजनांनांमध्ये त्या योजनांसाठी तरतूद करण्यात आली नाही हे खरे आहे काय ?

श्री. जयंत पाटील : कोणत्या योजनांचा पंचवार्षिक योजनांमध्ये समावेश करावयाचा हे राज्याने ठरवायचे असते. त्यामुळे त्यांच्याकडून अशा प्रकारचे पत्र येण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : ज्या योजनांवर 50 टक्क्याच्या आत खर्च झालेला आहे अशा योजनांचा समावेश 11व्या पंचवार्षिक योजनांमध्ये केल्यानंतर त्यास केन्द्राने मंजुरी दिली नाही हे खरे आहे काय ?

श्री. जयंत पाटील : नाही.

डॉ. नीलम गो-हे : पंचवार्षिक योजना करताना केन्द्राने असे सुचविलेले होते की, प्रत्येक विभागाने स्वत:चे कामकाज कसे चालले आहे याबाबतीत सल्ला, अंमलबजावणी आणि मूल्यमापन करण्यासाठी समित्या कराव्यात. 10व्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी असे सांगण्यात आले की, ज्यावेळी मिडटर्म रेव्हयू घेतला त्यावेळी त्या त्या विभागाने समित्या नेमलेल्या नसल्याचे दिसून आले. तेव्हा या समित्या नेमण्यास विलंब का झाला ? केन्द्र सरकारने जेंडर रिस्पॉन्सिव्ह बजेट स्वीकारलेले आहे, तसे ते आपणही स्वीकारणार आहात काय ?

डॉ. सुनील देशमुख : महिला विकास समिती नेमलेली आहे. या समितीने पंचवार्षिक योजनेमध्ये कोणकाणत्या तरतुदी करावयाच्या यासंबंधी सूचना करावयाच्या आहेत.

डॉ. दीपक सावंत : समित्या नेमण्यास विलंब का झाला ?

डॉ. सुनील देशमुख : विलंब झालेला नाही. 11वी पंचवार्षिक योजना पूर्ण झालेली नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख............. ता.प्र.क्र.27463..........

केंद्र शासनाने त्या संदर्भात काहीही सांगितलेले नाही. त्यामुळे विलंब झाला असे म्हणणे योग्य नाही. 15 मार्चपर्यंत अंतिम स्वरुप येईल. त्यांच्या ज्या सजेशन्स असतील त्या जरुर इनकॉर्पोरेट करण्याचा प्रयत्न करु.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुण्यांमध्ये पोलिसांनी अति सावध राहण्याचा दिलेला इशारा**

**(३) * २४३९१ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. जैनुद्दीन जव्हेरी, श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बंगळूर येथे अटक करण्यात आलेला काश्मिरी अतिरेकी याने पुण्यातील स्थानिक अतिरेक्यांकडून शस्त्रास्त्रे घेतल्याची कबूली दिल्याने पुणे शहरात रेड अलर्ट जारी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पकडण्यात आलेल्या काश्मिरी अतिरेक्यांकडून मोठ्या प्रमाणावर दारु गोळा व शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली आहे, हे खरे काय,

(३) असल्यास, पुण्यातील अतिरेक्यांना शस्त्रास्त्रे पुरविण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचा निष्कर्ष काय आहे ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरीता** : (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) बंगळूर येथे अटक करण्यात आलेल्या काश्मिरी अतिरेक्याने पुण्यातील स्थानिक अतिरेक्याकडून शस्त्रास्त्रे घेतल्याची कबुली दिल्याबाबत कोणत्याही प्रकारची अधिकृत माहिती बंगळूर पोलिस अथवा त्यांच्या गृहखात्याकडून आलेली नाही अथवा त्यांचे तपास पथकही आलेली नाही. मात्र सदरबाबत दुरध्वनीद्वारे संपर्क करुन माहिती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार व वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीवरुन अतिरेक्याचे महत्त्वाचे लक्ष हे आय.टी.उद्योग क्षेत्र असल्याने पुणे शहरातील सर्व पोलीस ठाणे व अधिकाऱ्यांना सतर्क करण्यात आले आहे व सुरक्षेविषयक सर्व सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अतिरेक्यांची संभाव्य आश्रयस्थाने हॉटेल्स/लॉजेस इ.चेक करुन वृत्तपत्रातील बातमीची शहानिशा करण्यात आली आहे. अधिक गोपनिय माहिती घेण्याचा प्रयत्न चालू आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : माननीय सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे. पहिल्या प्रश्नाचे उत्तर "बंगळूर पोलिसांनी बंगळूर येथे अटक करण्यात आलेल्या काश्मिरी अतिरेक्यांबाबत बंगळूर पोलिसांशी संपर्क साधून माहिती प्राप्त केली."असे वाचावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्हाला सुधारित उत्तराची प्रत प्राप्त झालेली नाही.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : शासनाकडे ही माहिती आताच प्राप्त झाली आहे.

**सभापती** : सन्माननीय गृह राज्यमंत्री महोदयांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, छापील उत्तर वितरीत केल्यानंतर उत्तरामध्ये सुधारणा करावयाची असेल तर ती सुधारणा अगोदर करायवयाची असते. सुधारित उत्तर याठिकाणी जोडायचे असते. तसे आपण केलेले नाही. सबब हा प्रश्न मी आज राखून ठेवीत आहे.

--------

.3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पाचोरा, (जिल्हा जळगाव) येथील लघू पाटबंधारे विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत

**(४) * २७५६३ श्री.दिलीपराव सोनवणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त :**
सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा तालुक्यातील (जिल्हा जळगांव) लघु पाटबंधारे विभागाचे उप अभियंता प्रमोद खंडू सोनार यांच्या घरावर दिनांक २७ जानेवारी २००७ रोजी लाचलुचपत विभागाच्या घुळे येथील पथकाने छापा टाकला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू छाप्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरीता** : (१) श्री. प्रमोद खंडू सोनार, उपविभागीय अभियंता, लघूपाटबंधारे बांधकाम उप विभाग, पाचोरा, जिल्हा जळगांव यांच्या घरांची व पाचोरा येथील शासकीय कार्यालयाची दिनांक २५ जानेवारी २००७ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जळगाव, धुळे व नाशिक पथकांकडून झडती घेण्यात आली.
(२) सदर झडतीत श्री. सोनार यांच्या जळगांव येथील निवासस्थानी रुपये ५,११,४००/- रुपयांची मालमत्ता आढळून आली. तसेच पाचोरा येथील कार्यालयात श्री. प्रमोद सोनार यांचे नावाचे रुपये २,१०८/- शिल्लक असलेले एक व रुपये १००/- भरणा केलेले दुसरे अशी दोन बँक पासबुक आढळून आली. श्री. प्रमोद सोनार यांच्या विरुध्दच्या उघड चौकशीत त्यांनी त्यांच्या पत्नीसह अपसंपदा धारणा केल्याचे निष्पन्न झाल्याने ते व त्यांच्या पत्नी विरुध्द जिल्हापेठ जळगांव पोलिस स्टेशन गु.र.क्र. ३००६/२००७ कलम १३(१)(ई) सह १३(२) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ व भा.दं.वि. कलम १०९ अन्वये दिनांक २५ जानेवारी २००७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, पाचोरा तालुक्यातील लघुपाटबंधारे विभागातील उपअभियंता श्री.प्रमोद खंडू सोनार यांच्या घरावर लाचलुचपत विभागाने दिनांक 27.1.07 रोजी छापा टाकला हे खरे आहे काय? या छाप्यात काय आढळून आले? राज्यातील इतर भ्रष्ट अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, लोकसेवक श्री.प्रमोद खंडू सोनार, उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे बांधकाम उपविभाग, पाचोरा, जि.जळगाव यांच्याविरुध्द तक्रारी आलेल्या होत्या. 1978 ते 1997 पर्यंत त्यांनी केलेल्या कामातून अपसंपदा गोळा केली अशा तक्रारी आल्यामुळे चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये त्यांच्या घराचीही झडती घेण्यात आली. त्या झडतीमध्ये त्यांच्याकडे रु.5,56,945 इतकी अपसंपदा आढळून आली. ही अपसंपदा 54.55 टक्के अधिक असल्याचे निष्पन्न झाले. म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली होती.

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : त्यांना अटक केली परंतु निलंबित केले का? निलंबित केले नसेल तर केव्हा करणार?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्यांना अटक केली होती. परंतु ते सरकारी कर्मचारी असल्यामुळे 48 तासापर्यंत त्यांना अटक झाली असती तर त्यांना ताबडतोब निलंबित केले गेले असते. त्यांना अटक केली त्याच दिवशी जामीन मिळाल्यामुळे निलंबित केले नाही. त्यांना निलंबित करावे असा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे पाठविण्यात आला असून ते निलंबित होतील.

श्री.वसंतराव खोटरे : ते पोलीस कोठडीत किती तास होते?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : एक दिवस सुध्दा नव्हते. पोलिसांनी अटक केल्यानंतर कोर्टासमोर हजर करण्यात आले आणि कोर्टाने त्यांना जामीन दिला.

---------

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**साबरोली चिंचपाडा (ता. शहापूर, जि. ठाणे) येथे ॲड. अरुणा गोरे यांचा आर्यवर्त फार्महाऊसवर खून झाल्याबाबत**

**(५) * २४४३९ श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ॲड. अरुणा गोरे या नामवंत वकील व सामाजिक कार्यकर्त्या हे त्यांच्या शहापूर तालुक्यातील (जि. ठाणे) सावरोली चिंचपाडा येथील आर्यवर्त फार्महाऊसवर दिनांक ६ फेब्रुवारी, २००६ रोजी एकट्याच असताना त्यांचा अज्ञात व्यक्तीने खून करुन मृतदेह एका विहिरीत टाकून दिल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शहापूर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मा. उपमुख्यमंत्री यांना शरद गोरे (पती) यांनी खूनाच्या चौकशीबाबत दिनांक ४ सप्टेंबर, २००६ रोजी विनंती पत्र देवूनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार दोषी असणाऱ्या गुन्हेगारांना अटक करुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) अद्यापपर्यंत कारवाई केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरीता** : (१) होय. सदर घटना दिनांक ३ फेब्रुवारी, २००६ रोजी घडली आहे.

(२) याप्रकरणी शहापूर पोलीस ठाणे येथे मयत महिलेच्या पतीने दिलेल्या खबरीवरुन गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(३), (४), (५) व (६) सदर प्रकरणी सावरोली, चिमपाडा, चांदरोटी माहुली, आसनगाव, आटगाव व शहापूर परिसरात खास बातमीदारामार्फत तसेच पोलीस पाटलांमार्फत तपास करण्यात आलेला आहे. तसेच सदर प्रकरणात फिर्यादीने मा.उपमुख्यमंत्री महोदयांना चौकशी करण्याबाबत पत्र दिल्यानंतरही सदर गुन्ह्याचा सखोल तपास करण्यात आला आहे. परंतु सदर गुन्ह्याचा सर्वतोपरी तपास करुनही सदर गुन्ह्यातील अज्ञात मारेकऱ्यांचा अद्याप शोध लागलेला नाही. तथापि, सदर गुन्ह्याचा सर्वंकष तपास चालू असून सहाय्यक पोलीस अधिक्षकांनी पर्यवेक्षण करुन गुन्हा उघडकीस आणून निर्गती करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

----------

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर घटना दिनांक 3 फेब्रुवारी, 2006 रोजी शहापूर (चिंचपाडा) येथे घडली. ॲड.अरुणा गोरे यांची त्या दिवशी हत्या झाली. खरे म्हणजे 2003 पासून ॲड.अरुणा गोरे सातत्याने पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी करीत होत्या. तेथील लोकांचा मला त्रास होत आहे अशा प्रकारची तक्रार त्यांनी दि.6 जून, 2003, दि.10 जानेवारी, 2004 व दि.9 डिसेंबर, 2005 अशा तीन वेळा तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये नोंदविल्या होत्या. असे

...6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ 11:30

श्री.संजय केळकर.......... ता.प्र.क्र.24439........

असताना कोणाला चौकशीसाठी बोलावले नाही. कोणाला ताब्यात घेतले नाही. महिला तक्रार करते, त्या महिलेच्या तक्रारीच्या संदर्भात कोणाला तरी चौकशीसाठी बोलावले पाहिजे. दुर्दैवाने दिनांक 3 फेब्रुवारी, 2006 रोजी त्यांची हत्या झाली.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 24439** .........

श्री. संजय केळकर ......

त्या ठिकाणी त्यांची शेत जमीन आहे, घर आहे. ॲड. अरुणा गोरे यांची हत्या होऊन दीड वर्ष होऊन गेले असले तरी या गुन्हयामध्ये अद्यापपावेतो एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही, या प्रकरणात कोणालाही चौकशीसाठी बोलावण्यात आलेले नाही. उत्तरात असे म्हटले आहे की, सदर प्रकरणी सावरोली, चिमपाडा, चांदरोटी, माहुली, आसनगाव, आटगाव व शहापूर परिसरात खास बातमीदारामार्फत तसेच पोलीस पाटलांमार्फत तपास करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, असे असतांना आतापर्यंत या प्रकरणात कोणत्याही आरोपीला पकडण्यात आलेले नाही. सदर प्रकरणात कोणालाही अटक होत नाही हे पाहून मयत पत्नीच्या पतीने माननीय गृहमंत्र्यांना यांसदर्भात पत्र लिहिले व हे पत्र लिहिल्यानंतर या प्रकरणाची पुन्हा चौकशी सुरु झालेली आहे. या प्रकरणामध्ये अक्षम्य दिरंगाई झालेली असून या प्रकरणातील सर्व वर्तन संशयास्पद आहे. या प्रकरणात कोणत्याही आरोपीला अटक न झाल्यामुळे त्या ठिकाणच्या वकील मंडळींनी बंदचे सुध्दा आव्हान केले होते. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणात अक्षम्य दिरंगाई का झालेली आहे? या प्रकरणात तीन वेळा अर्ज का करावे लागले? आतापर्यंत या प्रकरणात कोणत्याही प्रकारचा तपास का झाला नाही?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर गुन्हा घडून एक वर्ष एक महिना उलटून गेलेला आहे या प्रकरणात दिरंगाई झाली हे खरे आहे. या प्रकरणात वेळोवेळी तक्रार करावी लागली हे सुध्दा खरे आहे. सदर महिलेची हत्या झाल्यानंतर यासंदर्भात पोलिसांनी चौकशी केलेली आहे. परंतु या चौकशीत काहीही निष्पन्न झालेले नाही. या प्रकरणाचा तपास करण्याच्या दृष्टीने गुप्त बातमीदाराकडून शोध घेतला जात असून सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कालच सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांनी या सदनामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावर खूप लांबलचक भाषण केले होते. महिलेचा खून होऊन एक वर्ष एक महिना उलटून गेंला आहे परंतु अद्यापपावेतो कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. या ठिकाणी सांगण्यात आले आहे की, या गुन्हयाची चौकशी पोलीस पाटलाकडून करण्यात येत आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, कोणत्या

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 24439** .........

श्री. सरपोतदार.....

सेक्शनखाली आपण या गुन्हयाची चौकशी पोलीस पाटलांमार्फत करीत आहात? एक वर्ष उलटून गेले तरी मारेकरी सापडत नाहीत अशा प्रकारचे उत्तर या ठिकाणी देण्यात आलेले आहे त्यामुळे अशा प्रकारचे उत्तर देणे गृहखात्याला शोभते का? एक वर्ष होऊन सुध्दा या प्रकरणाचा काही सुध्दा तपास लागलेला नाही, सदर घटनेच्या संदर्भात त्या गावात एकही पोलीस अधिकारी जात नाही, मयत पत्नीच्या पतीला भेटत नाही. यासंदर्भात मयताच्या पतीने माननीय गृहमंत्र्यांना पत्र देऊन सुध्दा चौकशी होत नाही ही स्थिती महाराष्ट्रातील कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीने आम्ही आदर्शवत समजावी काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मयत महिलेचा खून गावापासून 6 कि.मी. अंतरावरील फार्म हाऊसवर झालेला आहे. सदर महिलेचा खून अज्ञात व्यक्तीने केलेला आहे. या प्रकरणाच्या संदर्भात कसून तपास चालू आहे. शहापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. आर.एस.जाधव यांच्याकडे या प्रकरणाच्या चौकशीचे काम दिलेले आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, गुन्हयाचा तपास करण्यात आलेला आहे तसेच या उत्तराच्या खाली असे म्हटले आहे की, गुन्हयाचा तपास चालू आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात शासनाचे नक्की काय म्हणणे आहे? ॲड. अरुणा गोरे यांचे शवविच्छेदन झाले होते काय? शवविच्छेदन झाले असल्यास शवविच्छेदनाच्या रिपोर्टमध्ये काय म्हटलेले आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, सदर गुन्हयाचा तपास चालू आहे. सदर मयत व्यक्तीचे पोस्टमार्टेम झाले असून,डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे मृत्यू झ ाालेला आहे असे शवविच्छेदनाच्या रिपोर्टमध्ये म्हटलेले आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24439.......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेता आपण त्यामध्ये लक्ष घालावे अशी माझी आपणास विनंती आहे. पोलीस पाटलांमार्फत तपास व्हायला लागला तर महाराष्ट्रात फार मोठे गंभीर प्रश्न निर्माण होतील. उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, " सदर प्रकरणात फिर्यादीने माननीय उपमुख्यमंत्र्यांना चौकशी करण्याबाबत पत्र दिल्यानंतर सदर गुन्ह्याचा सखोल तपास करण्यात आला आहे." माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, माननीय उपमुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या पत्रातील मजकूर काय होता ? पत्रामध्ये संशयितांच्या नावांचा उल्लेख करण्यात आला आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या पत्रामध्ये संशयितांची नावे दिलेली नाहीत. ॲड.अरुणा गोरे यांच्या खुनाचा तपास लवकर करण्यात यावा असा त्या पत्रात उल्लेख आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे. ॲड.गोरे यांनी पोलीस प्रोटेक्शन मागितले होते. त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये तीन-चार वेळा तक्रारी केल्या होत्या..........

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ॲड.अरुणा गोरे यांनी पोलीस संरक्षण मागूनही त्यांना पोलीस संरक्षण देण्यात आलेले नाही. त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये कोणा विरुध्द तक्रार केली होती त्यांची नावे मंत्रिमहोदय सभागृहाला सांगणार आहेत काय ?

**सभापती** : मी सन्माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, ॲड.अरुणा गोरे या नामवंत वकील व सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्यांनी त्यांच्या जीविताला धोका असल्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये तीन-चार वेळा सांगितले होते. त्यांनी ज्या तक्रारी केल्या त्यामध्ये कोणा संशयितांची नावे आहेत काय ? त्यांनी केलेल्या तक्रारींची पोलीस विभागाने गांभीर्याने का दखल घेतली नाही

..2..

**सभापती**.........

हे स्पष्ट होत नाही तोपर्यंत फक्त तपास चालू आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हा अन्वेषण विभागाच्या डी.एस.पी किंवा तत्सम दर्जाच्या अधिकाऱ्याकडे द्यावा आणि दोन महिन्यात त्याचा तपास करण्यात यावा. ॲड.अरुणा गोरे यांनी जीविताला धोका असल्याचे पोलीस स्टेशनला लेखी कळवूनही त्या संदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी असा मी आदेश देत आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे तांबळडेग (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) या गावात तसेच पनवेल (जि. रायगड) येथे माकडांनी धुमाकुळ घातल्याबाबत**

**(6) * 25663 मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री.राजन तेली , श्री. सुधाकर गणगणे** : सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे तांबळडेग (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) या गावात तसेच पनवेल (जि. रायगड) येथे माकडांनी धुमाकुळ घालून घरांची कौले फोडणे, फळे बागायतीची नासाडी करणे याबाबत मा. वन मंत्री यांना सिंधुदुर्ग जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी तसेच तांबळडेग विकास प्रतिष्ठानतर्फे सदर गावातील ग्रामस्थाना नुकसान भरपाई देऊन माकडांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करणे बाबत दिनांक 28 एप्रिल, 2006 रोजी वा त्या दरम्यान मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर गावातील ग्रामस्थांना नुकसान भरपाई देऊन माकडांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) मौजे तांबळडेग (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) या गावात माकडांनी केलेल्या उपद्रवाबाबत तांबळडेग विकास प्रतिष्ठानने आमदार सुधीर सावंत यांचे मार्फत ग्रामस्थांना नुकसान भरपाई देऊन माकडांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करणे बाबत दिनांक 28 एप्रिल, 2006 रोजी मा.वन मंत्री यांचेकडे लेखी मागणी केली हे खरे आहे.

पनवेल येथे माकडाचा उपद्रव झाल्याची तक्रार दिनांक 28 एप्रिल, 2006 ला प्राप्त झाली नाही. मात्र माहे डिसेंबर, 2006 मध्ये अलिबाग वन विभागातील नवीन पनवेल येथे नागरी वस्तीत उपद्रव होत असल्याची तक्रार उपवनसंरक्षक, अलिबाग यांचेकडे प्राप्त झाली.

(2) व (3) पनवेल भागातून वन कर्मचाऱ्यांचा माकडे पकडून वनात पाठविण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला परंतु त्यांनी माकडांना शहराबाहेर हुसकावण्यात यश मिळविले. माकडांनी केलेल्या नुकसानीसाठी शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही मात्र वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972, चे कलम 11 ब नुसार उपद्रव करणाऱ्या माकडांना पकडण्यास परवानगी देण्यात येते.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माकडांनी केलेल्या नुकसानीसाठी शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही. परंतु माकडांमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याचा शासन सहानुभूतीपूर्वक विचार करणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : माकडांनी केलेले नुकसान हे किरकोळ स्वरुपाचे असते त्यामुळे नुकसानाची भरपाई देण्याबाबत विचार करता येणार नाही. कायद्यामध्ये तशी तरतूद नाही आणि करता येणार नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माकडांमुळे होत असलेल्या नुकसानी संदर्भातील हा प्रश्न आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, माकडांनी केलेले नुकसान किरकोळ स्वरुपाचे असते, त्यामुळे नुकसान भरपाई देता येणार नाही. कायद्यामध्ये तशी तरतूद नाही. मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, माकडांमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. आपण माकडांना पूर्वज मानतो. माणसांच्या बुध्दीपेक्षा त्यांची बुध्दीमत्ता जास्त आहे. माकडे एखाद्या फळबागेत जाऊन फळांची नासधूस करतात. नारळाच्या झाडावर बसून नारळ खातातच,

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 11:45

ता.प्र.क्र.25663...

श्री.भास्कर जाधव....

परंतु त्यांना पिटाळून लावण्याचा प्रयत्न केल्यास, ते वरुन नेम धरुन नारळ खाली फेकतात. केळीची झाडेही उदध्वस्त करतात. ते खात काहीच नाहीत, परंतु ते सर्व काही उद्ध्वस्त करत सुटतात व नासधूस करतात. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, माकडाने केलेल्या नुकसान भरपाईच्या संदर्भात कायद्यामध्ये आपण काही तरतूद करणार आहात काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये इतर जनावरांनी किंवा वन्य प्राण्यांनी नुकसान केले तर त्यासंदर्भात आपण नुकसान भरपाई देतो. परंतु माकडापासून जे नुकसान होते, ते फार मोठे नसते. माकडे कुठेतरी कौल वगैरे फोडतात. ...(अडथळा) माकडांचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे, माकड व दुसरे म्हणजे, लंगूर. लाल तोंडाचे माकड असते व काळया तोंडाचे वानर असते. ते सतत स्थलांतर करीत असतात.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंदर्भातील नुकसान ही किरकोळ स्वरुपाची असते. कोकणामध्ये वन खात्याची जमीन 8 टक्के आहे. त्याठिकाणी माकडांना हाकलून किंवा पिटाळून लावण्याच्या संदर्भात आपण उपाययोजना करीत आहोत. याबाबतीत आपण नवीन पध्दती शोधली असून रबरी बुलेटच्या माध्यमातून आपण माकडांना हाकलून लावतो. असे प्रयोग आपण अनेक ठिकाणी केले असून त्यामध्ये आपण यशस्वीही झालेलो आहोत. तसेच, यापुढेही तक्रारी आल्यातर त्याठिकाणी वन अधिकाऱ्यांना ताबडतोबीने पाठविले जाईल व अशाप्रकारे तक्रारी कमी करण्याचे काम केले जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय वन मंत्रिमहोदयांनी पंढरपूरप्रमाणे आमच्या कोकणामध्ये वाऱ्या केल्या तर बरे होईल. मागे, आम्ही हत्तीपासून झालेल्या नुकसान भरपाईसंबंधीचा प्रश्न उपस्थित केला होता, त्यावेळी वन्य प्राण्यांमध्ये हत्ती हा प्राणी बसत नसल्याचे कारण सांगितले. परंतु आम्ही आग्रह धरल्यामुळे हत्ती या प्राण्यास वन्य प्राण्यांच्या यादीत घातले व त्यानंतर नुकसान भरपाई सुरु झाली. सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्हयातील फलोत्पादन जागांवर माकडे प्रचंड प्रमाणात नुकसान करतात. यासंदर्भातील नोंदी आपल्या खात्याकडे कमी

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 11:45

ता.प्र.क्र.25663...

श्री.विनोद तावडे....

आल्या असतील. कारण, शेतकरी तक्रारी करण्याकरिता गेले तर वन्य प्राण्यांच्या यादीत माकड हा प्राणी येत नसल्यामुळे आम्ही तक्रार लिहून घेणार नाही, असे आपले अधिकारी सांगतात. त्यामुळे तक्रारींची नोंद कमी होते. त्यामुळेच आपल्याला याबाबतीतील नुकसान किरकोळ वाटते. वास्तविक पाहता, वानरांमुळे व हत्तीमध्ये त्या भागात प्रचंड नुकसान होते. त्यामुळे याबाबतीत माझा असा प्रश्न आहे की, वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीमध्ये आपण माकड या प्राण्याचा समावेश करणार का ? तसेच, यासंदर्भात कोकणातील लोकप्रतिनींची व तेथील शेतकऱ्यांची बैठक माननीय मंत्रिमहोदय घेतील काय ? कारण, तेथील स्थानिक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रश्नावर कायमस्वरुपी मार्ग काढण्याच्या दृष्टीने माननीय मंत्रिमहोदय प्रयत्न करतील काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नासंबंधी मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे यासंदर्भात लवकरच अधिवेशन चालू असतानाच एक बैठक घेण्यात येईल. तसेच, कोकणातील लोक हे मुंबईमध्ये असतात आणि त्यांच्या स्वत:च्या शेती, वाडया हया रिकाम्या असतात.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, ज्या गांभीर्याने दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वन्य प्राणी किंवा माकडामुळे झालेल्या नुकसानी संदर्भात प्रश्न विचारत आहेत, त्याची झळ माझ्याही डोंगरी भागाला पोहचत आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.25663 पुढे सुरु..........**

सभापती पुढे सुरु.........

एकवेळ कळप आत आला की, संपूर्ण पिकांची नासधूस करतात, कुळं संपवून टाकतात. म्हणूनच वन्य प्राण्यांच्या अनुषंगाने जी यादी आहे ती शासनाला वाढवावी लागणार आहे. सन्माननीय मंत्रीमहोदय आपल्या उत्तरात असे म्हणतात की, या वानरांमुळे किरकोळ नुकसान होते. मी असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एखाद्या गावामध्ये 100 माकडे गेली किंवा वानरे गेली तर ती मोठया प्रमाणावर कौले फोडू शकतात, पिके नासवू शकतात. म्हणून मंत्रीमहोदयांनी याविषयी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची बैठक आयोजित करुन चर्चा करावी व यासंदर्भात जी वन्यप्राण्यांची यादी आहे त्याची व्याप्ती ती वाढवावी, यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्याची तयारी आम्ही दाखविली आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कोकणातील लोक मुंबईमध्ये नोक-यांसाठी येतात व कोकणातील त्यांची शेती दुस-यांना वहितीसाठी देतात, अशा प्रकारचे विधान सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात केले आहे. मला या ठिकाणी हे स्पष्ट करावयाचे आहे की, कोकणातील लोक जरी मुंबईमध्ये नोक-यांसाठी येत असले तरी त्यांच्या कुटुंबातीलच काही लोक हे कोकणात वास्तव्यास असतात व ते शेती करीत असतात. त्यामुळे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी जी असत्य माहिती सांगितली आहे, ती सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मंत्रीमहोदयांचे तेवढे वाक्य कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माकडांचा प्रार्दुभाव या विषयावर या सदनामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. या चर्चेचे कार्यवृत्त तपासले तर आपल्या असे लक्षात येईल की, माकडांच्या प्रार्दुभावाबद्दल उपाययोजना करण्यात येतील, माकडांच्या बंदोबस्ताबाबत परिपत्रक काढून ते पंचायत समित्यांपर्यन्त पाठवू, अशा प्रकारची आश्वासने मंत्रीमहोदयांनी दिलेली आहेत. प्रत्यक्षात शासनाने यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही. उलटपक्षी, सन्माननीय मंत्रीमहोदय कोकणासंबंधी अनावश्यक वक्तव्ये करीत आहेत. कोकणातील लोक नोक-यांसाठी

..2.........

**<u>ता.प्र.क्र.25663 पुढे सुरु</u>..........**

श्री.मधुकर सरपोतदार पुढे सुरु...........

मुंबईमध्ये येतात व त्यांची शेती दुस-या कुणाला वहितीसाठी देतात, हे ते कशाच्या आधारे म्हणत आहेत, हे आम्हाला समजत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, अशाप्रकारची वक्तव्ये त्यांनी करु नयेत. असा संदेश जर कोकणात गेला तर त्याचे फार वाईट परिणाम होऊ शकतील. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी मागील चर्चेमध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे जर त्यांनी परिपत्रक काढले असेल, काही उपाययोजना केल्या असतील, माकडांना हुसकावून लावण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे तयार केली असतील आणि ती पंचायत समित्यांपर्यन्त पोहोचविली असतील तर त्याची माहिती त्यांनी सभागृहाला द्यावी. ही माहिती त्यांनी या सभागृहामध्ये वाचून दाखवावी. अन्यथा, कार्यवाही केली नाही, हे त्यांनी मान्य करावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या परिपत्रकांचा उल्लेख केला आहे ती काढण्यात आली असून पंचायत समित्यांपर्यन्त पोहोचविली आहेत.

**सभापती** : ही सर्व परिपत्रके पुन्हा एकदा पंचायत समित्यांपर्यन्त पोहोचवावीत.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपण दिलेल्या सूचनेनुसार पुन्हा परिपत्रक पाठविण्यात येईल. त्याचप्रमाणे ही परिपत्रके सभागृहाच्या पटलावर देखील ठेवण्यात येतील. दुसरी बाब अशी आहे की, माकडांचा बंदोबस्त करण्यासाठी पूर्वी रबरी बुलेट वापरण्याची पद्धत नव्हती, ती आता आपण सुरु केली आहे. माकडांना पकडण्यासाठी विशिष्ट प्रकारचे लोक असतात, या लोकांचे दूरध्वनी क्रमांक स्थानिक कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. यापैकीच एक शब्बीर हनीफ सिंग, कोल्हापूर यांचा देखील दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. कोणत्याही परिस्थितीत माकडांकडून होणारा विद्ध्वंस थांबविण्याचा प्रयत्न वन विभागाकडून करण्यात येत आहे.

--------------------

..3............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील पोलीस यंत्रणेच्या प्रकल्प सुधारणा**
**या अहवालातील शिफारशींबाबत**

**(७) * २४४६१ श्री. धनाजी साठे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री.सय्यद जामा , प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्रीमती उषाताई दराडे , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , श्री.भास्कर जाधव , श्री. अरविंद सावंत , श्री. दिवाकर रावते ,डॉ. दिपक सावंत , श्री.परशुराम उपरकर , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. सुरेश जेथलिया , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २१४९९ ला दिनांक ४ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस यंत्रणेच्या प्रकल्प सुधारणा या अहवालातील शिफारशींची सुरु असलेली छाननी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या छाननीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी करण्यात येत असलेली छाननी अद्याप पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.सिद्धाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) नाही,

(२) प्रश्न उद्‌भवत नाही,

(३) सदर प्रकरणी विषयाचा आवाका मोठा असल्यामुळे या प्रकरणी आवश्यक ती माहिती गोळा करण्यास वेळ लागत आहे. त्यामुळे छाननी समितीस अभ्यासगटांकडून अहवाल अपेक्षित आहेत.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "छाननी समितीस अभ्यासगटांकडून अहवाल अपेक्षित आहे." माझा प्रश्न असा आहे की, या अहवालातील प्रमुख शिफारशी काय आहेत ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मेकेंझी ॲण्ड कंपनी यांनी सादर केलेल्या अहवालाची माहिती प्राप्त झाली आहे.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24461**.......

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ........

मॅकेन्झी आणि कंपनी यांनी सादर केलेल्या अहवालात पायलट प्रोजेक्ट राबविण्याचे ठरविले आहे. या पायलट प्रोजेक्टची फलनिष्पत्ती अशी आहे की, सध्याचे साप्ताहिक सुट्टीचे असलेले 33 टक्के प्रमाण 81 टक्के इतके वाढविता आले. पोलीस ठाण्यातील अधिकारी/कर्मचारी यांच्याशी संपर्क साधून भोवतालची परिस्थिती विचारात घेऊन समस्यांबाबत उपाययोजना सुचविल्या. बदलाचे महत्व शासकीय कर्मचारी/लोकप्रतिनिधी यांना सांगण्यात आले. समन्वय अधिकारी/कर्मचारी यांना बदलाचे महत्व विषद केल्यामुळे चांगले परिणाम दिसून आले. रुपये 25 कोटींची बचत झाली. तसेच, याच कंपनीने पोलीस कर्मचारी यांच्यावरील लाभ आणि प्रेरणेचा अभाव यास काही कारणे जबाबदार असल्याचे आपल्या अहवालात नमूद केली आहेत. ती कारणे अशी आहेत की, पोलिसांकडून चांगल्याप्रकारे जीवन जगण्याची असलेली मागणी. कालबाहय असलेली साधनसामुग्री. मर्यादित व्यावसायिक विकास. प्रशासनाचा दुबळा प्रतिसाद. प्रदानित केलेले कमी अधिकार देण्यासंबंधी सुचवण्यात आले आहेत. तसेच, साधन सामुग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी 1960 च्या पुढील बाबी विचारात घेऊन बदल करण्याची आवश्यकता आहे. गुन्हयाचे स्वरुप, कायदा व सुव्यवस्था, नक्षलवादी करवाया, लोकसंख्या अद्ययावत पोलीस यंत्रणेची सध्याची गरज. प्रत्येक घटकाचे मानक ठरवून त्यांची कर्तव्ये आणि जबाबदा-या ठरविण्यात याव्यात. उदाहरणार्थ पोलीस स्टेशन, चौकी, गुन्हे शाखा, विशेष पथक, वाहतूक शाखा इत्यादी. प्रत्येक पोलीस बीटला पुरेशी साधन सामुग्री उपलब्ध करुन देऊन बळकटी प्राप्त करुन घ्यावी. आठवडा सुट्टीसाठी प्रमाणबद्ध मानक ठरविण्यात यावे. रजा आणि प्रशिक्षण यासाठी 25 टक्के पदे निर्माण करण्यात यावीत. पोलीस बलात 1960 च्या मानकानुसार आवश्यक असलेल्या 75,000 पदांऐवजी 5000 अधिकारी आणि 35,000 पोलीस कर्मचारी इतकी वाढ करण्यात यावी, इत्यादी सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सप्टेंबर, 2006 मध्ये मॅकेन्झी कंपनीने आपला अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालातील शिफारशींची छाननी करण्याची कारणे काय आहेत ? तसेच, पोलीस यंत्रणेतील सुधारणांबाबत नॅशनल पोलीस कमिशन, धर्मवीर आयोग यांच्या शिफारशी लागू करण्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24461**.......

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महाराष्ट्र पोलीस दलावरील कामाचा वाढता ताण यासंबंधी मॅकेन्झी कंपनीकडून "प्रकल्प सुधारणा" अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. मॅकेन्झी कंपनीच्या अहवालाचा अभ्यास करण्यासाठी विविध अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली 14 समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी 12 समित्यांचे अहवाल प्राप्त झालेले आहेत आणि 2 समित्यांचे अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत. उर्वरित 2 समित्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य कार्यवाही करण्यात येईल.

------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील शिळफाटा-कल्याण रस्त्याच्या कामाबाबत**

**(8) * 25496 श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री.भास्कर जाधव , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , श्री. जैनुद्दीन जव्हेरी, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 22103 ला दिनांक 4 डिसेंबर, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्ह्यातील शिळफाटा-कल्याण या रस्त्याचे (वळण रस्त्यासहित) बांधकाम खाजगीकरणातून करण्याबाबतचा निर्णय दिनांक 24 जानेवारी, 2000 रोजी घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू रस्त्याच्या कामाचा कंत्राट दिनांक 26 जुलै, 2006 रोजी एन.एच.ए.आय. च्या काळ्या यादीत असलेल्या एका मलेशियन कंपनीला देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत राज्यातील अनुभवी व पात्र कंत्राटदार कंपनींना वगळून उपरोक्त कंपनीला कंत्राट देण्यासाठी कोणते निकष वापरण्यात आले,

(4) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(5) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री.अनिल देशमुख** : (1) होय.

(2) नाही. टप्पा-1 अंतर्गत भिवंडी-कल्याण-शिळ रस्त्याच्या कामाचे कंत्राट दिनांक 12 मे, 2006 च्या निविदा स्विकृती पत्राद्वारे मे.प्लस कन्सेप्ट कन्सॉर्शियम यांना देण्यात आले असून उपलब्ध माहितीनुसार त्यांचे नाव एन.एच.ए.आय.च्या काळ्या यादीत समाविष्ट नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ज्या कंपनीला काम देण्यात आले आहे त्या कंपनीचा सध्याचा प्रोग्रेस लक्षात हेता हे काम एका वर्षामध्ये पूर्ण होईल काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ज्या कंपनीला काम देण्यात आले आहे त्या कंपनीची प्रगती अतिशय चांगली आहे. या कंपनीला दिनांक 25 फेब्रुवारी, 2008 पर्यंत काम पूर्ण करावयाचे आहे. कंपनीतर्फे असे सांगण्यात आले की, एक-दोन महिन्यांच्या आत आम्ही काम पूर्ण करु.

.4...



**ता.प्र.क्र. 25496** ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील शिळफाटा-कल्याण या रस्त्यासंदर्भात सभागृहामध्ये अनेक वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. मागच्या अधिवेशनामध्ये यासंदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. माननीय मंत्री महोदयांनी या रस्त्याच्या कामास भेट दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, या रस्त्याच्या कामाची पाहणी मी स्वत: दर तीन महिन्यांनी करणार आहे. माझा प्रश्न असा आहे की, मागच्या 3 महिन्यांमध्ये सेट टार्गेट प्रमाणे काम झालेले आहे काय ? आणि जो विलंब झालेला आहे तो केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मागच्या वेळी सन्माननीय सदस्यांबरोबर मी या कामाची पाहणी केली होती आणि पुढची पाहणी तीन महिन्यांमध्ये करु असे सांगितले होते. परंतु आचारसंहिता असल्यामुळे आम्ही या कामाची पाहणी करु शकलो नाही. त्या भागातील सन्माननीय सदस्यांबरोबर पुन्हा कामाची पाहणी करण्यात येईल. या रस्त्याचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु आहे. 25 फेब्रुवारी, 2008 च्या आधी हे काम पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

यानंतर कु.खर्चे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25496........

श्री.विनोद तावडे : माननीय सभापती महोदय, हा शिळफाटा कल्याण रस्त्याचा आणि तेथे राहणा-या रहिवाशांशी संबंधित अशा प्रकारचा प्रश्न तसा गाजलेला आहे. सभागृहामध्ये लक्षवेधीच्या माध्यमातून देखील उपस्थित झालेला आहे. मला आठवते त्या प्रमाणे या प्रश्नाच्या संदर्भात लक्षवेधीवर सभागृहामध्ये चर्चा चालू असतांना चर्चेअंती माननीय सभापती किंवा उपसभापती अगर तालिका सभापतींनी काही निदेशही दिले होते. सभागृहामध्ये दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही झ ाली आहे काय ? झाली असल्यास काय झाली ? झाली नसल्यास का नाही झाली ? सभागृहामध्ये याबाबत नेमके कोणत्या स्वरुपाचे निदेश देण्यात आले होते ?

श्री.अनिल देशमुख : माननीय उप सभापतींनी सदर विषयावरील लक्षवेधीच्या चर्चेअंती निदेश दिले होते की, हे जे ठाणे जिल्हयातील शिळफाटा - कल्याण रस्त्याचे काम आहे ते अतिशय महत्वाचे काम आहे. या कामामुळे तेथे राहणा-या रहिवाशांची फार अडचण होते.

श्री.मधुकर चव्हाण : मंत्री महोदय, खरे खरे निदेश सांगा.

श्री.अनिल देशमुख : माननीय उप सभापतींच्या निदेशाप्रमाणे सदर काम हे एक " स्टिप्यूलेटेड प्रोजेक्ट " असल्यामुळे हे काम 18 महिन्याच्या आत पूर्ण झालेच पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे, माननीय उपसभापती महोदयांनी जे निदेश येथे दिले होते, ते खरे खरे सांगण्यात यावे, जे रेकॉर्डवर आहेत ते निदेश सांगण्यात यावे. माननीय मंत्री महोदयांना सदर कंपनीविषयी इतकी सहानुभूती का आहे ? हेच मला कळत नाही. माननीय उप सभापतींनी निदेश दिले होते की, सदर काम जर मुदतीत पूर्ण होत नसेल तर त्या कंपनीकडे दिलेले प्रोजेक्ट रद्द करण्यात यावे व इतर कंपन्यांकडून टेंडर्स मागविण्यात येऊन त्यापैकी कुठल्यातरी सक्षम अशा कंपनीकडे सदर प्रोजेक्ट सोपवून देण्यात यावे. माननीय मंत्रीमहोदयांना सदर कंपनीविषयी एवढे प्रेम,एवढी सहानुभूती का आहे ? हे मला कळण्याच्या बाहेरचे आहे. माननीय उप सभापतींनी सभागृहामध्ये निदेश दिल्यानंतरही तुम्ही ते पाळत नाहीत. सभागृहामध्ये देण्यात आलेले निदेश जर तुम्ही पाळले नसतील तर मग सभागृहाची माफी मागा, दिलगिरी व्यक्त करा, क्षमा मागा.

V - 2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25496........

श्री. अनिल देशमुख : माननीय उप सभापतींनी निदेश दिले होते की, सदर कंपनीच्या कामामध्ये काही अनियमितता असेल तर त्या कंपनीकडे दिलेले शिळफाटा - कल्याण रस्त्याच्या काम रद्द करण्यात येऊन अन्य कंपनीकडे सोपविण्यात यावे, परंतु तशी काही अनियमितात आढळून आली नाही, त्यामुळे सदर कंपनीकडील काम रद्द करण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही.

श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महोदय, हा माननीय उप सभापतींवर अन्याय होत आहे, त्यांच्या विशेष हक्कांचा भंग होत आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी माननीय उपसभापती महोदयांना सदर कामाबाबतची सर्व कागदपत्रे दाखविलेली आहे, त्यांचेसुध्दा समाधान झालेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सदर प्रस्तूत प्रकरणामध्ये माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सभागृहाची प्रतिष्ठा आणि आपले स्थान लक्षात घेता आणि पीठासिन अधिकारी म्हणून आपल्या चेअ्‌रवरुन माननीय उपसभापती साहेबांनी दिलेले निदेश लक्षात घेता सदर निदेश हे " मँडेटरी डायरेक्शन्स " असतात. ते शासनातर्फे पाळले गेलेच पाहिजेत. माननीय मंत्री महोदयांनी आता हे जे इकडचे तिकडचे करुन उत्तर दिलेले आहे ते बरोबर नाही. सभापती महोदय, हा प्रश्न आपण रोखून धरला पाहिजे निदान माननीय उप सभापतींच्या प्रतिष्ठेकरिता तरी आपण हा प्रश्न जरुर रोखून धरला पाहिजे, असे मला वाटते.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, माझी माननीय उपसभापती महोदयांशी सदर कामाच्या बाबतीत सविस्तर चर्चा झालेली आहे, मी त्यांना सदर कामाच्या बाबतीतील आवश्यक ती सर्व कागदपत्रे दाखविलेली आहेत, ते समाधानी आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : परंतु आम्ही असमाधानी आहोत.

श्री.नितीन गडकरी : हा माननीय उप सभापतींचा अपमान आहे.

श्री.अनिल देशमुख : अध्यक्ष महोदय, कृपया आपण मला आपण संरक्षण द्यावे. माझी एकच विनंती आहे की, तीन महिन्यापूर्वी सदर कामाच्या ठिकाणी माननीय उपसभापती व मी स्वत: व्हिजिट दिली होती. सदर भेटीं अंतर्गत माननीय उप सभापतींनी संपूर्ण कामाची व्यवस्थित पाहणी करुन सर्व कागदपत्रांची तपासणी केली, ते समाधानी आहेत, त्यांची काहीही तक्रार नाही, त्यामुळे सदर कंपनीकडील काम रद्द करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

V - 3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25496........

श्री.मधुकर सरपोतदार : सदर प्रश्न हा फक्त माननीय उपसभापती आणि माननीय मंत्री महोदय या दोहोंपुरताच मर्यादित नसून या सदनातील इतर सन्माननीय सदस्यांच्या समोर सदर प्रश्नावरील लक्षवेधीच्या चर्चेअंती निदेश देण्यात आले होते. सदर विषयावरील माननीय उप सभापतींनी दिलेले निदेशाचे पुढे काय झाले ? याबाबत सदनातील सगळया सन्माननीय सदस्यांना जाणण्याचा अधिकार आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ....

म्हणून त्यांनी येथे असे निवेदन करणे हेही सभागृहाची दिशाभूल करणारे आहे इतकेच नव्हे तर माननीय उपसभापतींचा अवमान करणारेही आहे. सभापती महोदय, कल्याण-शीळफाटा रस्त्या विषयी या सदनामध्ये आतापर्यंत इतकी चर्चा आणि प्रश्नोत्तरे झलेली आहेत की, शेवटी अत्यंत खेदाने आणि नाईलाजाने, उद्वेगाने माननीय उपसभापतींनी उद्‌गार काढले आहेत व त्यावेळी त्यांनी काही निदेशही दिले आहेत. त्यानंतर आता प्रश्न असा उपस्थित होतो की, माननीय मंत्री महोदय माननीय उपसभापतींना त्यांच्या चेंबरमध्ये जाऊन भेटले असतील आणि त्यांना संबंधित कागदपत्रे दाखवून त्यांचे समाधान केलेले असेलही, पण ते सांगण्याची जबाबदारी ही मंत्र्यांची नाही तर माननीय उपसभापतींची आहे. त्यांनी सभागृहामध्ये तसे सांगितले पाहिजे की, मी संबंधित सारी कागदपत्रे पाहिली आहेत तसेच मंत्र्यांबरोबर मी स्पॉट व्हिजिट देखील केली आहे आणि माझे समाधान झालेले आहे. असे झाले तरच त्यातून सभागृहाचे समाधान होईल अन्यथा होणार नाही.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी फक्त माननीय उपसभापतींनाच माझ्या सदरच्या दौऱ्यावर येण्यास सांगितले होते असे नाही तर त्या भागातील अन्य पदाधिकारीदेखील त्यावेळी तेथे आलेले होते आणि माननीय उपसभापतींच्यासह आम्ही तेथे जाऊन कामाची पाहणी केली आहे. आता या कामाचा प्रोग्रेसही अतिशय चांगला आहे आणि त्यांना जे टार्गेट दिलेले होते ते ते वेळेत पूर्ण करू शकतात अशी तेथे परिस्थिती आहे. सभापती महोदय, त्या भागामध्ये मी तीन महिन्यात पुन्हा गेलो असता तेथील संपूर्ण लोकप्रतिनिधींनाही मी माझ्या व्हिजिटमध्ये आमंत्रित केले होते जेणे करून लवकरात लवकर लोकप्रतिनिधींना घेऊन जाऊन त्यांना समक्ष तेथील कामाचा प्रोग्रेस दाखविता येईल.

**सभापती** : मी या ठिकाणी सभागृहाला, विशेषत: माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सदनामध्ये ज्या प्रश्नाबाबत अनेकदा चर्चा झाली त्यापैकी एका चर्चेच्या वेळी माननीय उपसभापती पीठासीन अधिकारी म्हणून येथे उपस्थित होते आणि त्यांनी या कामाच्या अनुषंगाने तेथे जी तातडी आहे आणि ज्या पद्धतीने कंत्राटदाराचे काम आहे त्याबद्दल सदनामध्ये स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतरच्या काळामध्ये मंत्री महोदयांनी स्वत: माननीय उपसभापतींच्यासह आणि इतरही स्थानिक लोकप्रतिनिधींसह त्या कामाच्या ठिकाणी स्पॉट व्हिजिट केली. त्यावेळेस तेथे काम प्रगतीपथावर असल्याचे सर्वांना दिसून आले. पण त्यापूर्वी ज्या भावना पीठासीन अधिकारी म्हणून

...... डब्ल्यू 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

येथे माननीय उपसभापती यांनी व्यक्त केल्या आणि निदेश दिले त्यानंतर मंत्र्यांनी पीठासीन अधिकाऱ्यांना म्हणजेच माननीय उपसभापतींना समक्ष भेटून त्यांच्यासह त्या कामाची पाहणी केली व त्यांना संबंधित सारी कागदपत्रेही दाखविली व त्यातून माननीय उपसभापतींचे समाधान झाले आहे असे आता मंत्री महोदयांचे म्हणणे आहे. असे असले तरी आता आपण मंत्री म्हणून हे स्टेटमेंट करीत आहात पण हे स्टेटमेंट आपण सुरूवातीसच केले असते तर ते अधिक बरे झाले असते. तेव्हा आता मी या बाबतीत माननीय उपसभापतींना माझ्या चेंबरमध्ये बोलावून घेतो, त्यावेळी मंत्री महोदय तसेच सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनाही मी तेथे बोलावून घेईन आणि सदर कामाबाबत त्यांचे समाधान झाले किंवा काय याची माहिती घेईन. त्यांचे समाधान झाले असले तरी त्यांनी याबाबत जे निदेश दिलेले आहेत ते महत्त्वाचे आहेत आणि शासनावर बंधनकारक आहेत, त्याबाबत काय करता येईल हेही मी पाहीन. तेव्हा मला वाटते हा प्रश्न येथे संपला आहे.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

यानंतर औचित्याचे मुद्दे मांडण्यास मी परवानगी दिली आहे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

***

...... डब्ल्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचे मुद्दे**

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, आज मी औचित्याच्या मुद्दा मांडून एका महत्त्वाच्या बाबीकडे सभागृहाचे आणि शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदय, हे वर्ष तीन पद्धतीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचे कार्यक्रम सरकारने जाणीवपूर्वक करावेत असे मला वाटते आणि असे करणे हे महाराष्ट्राच्या उच्च परंपरेला धरून होणार आहे. सभापती महोदय, 1857 च्या स्वातंत्र्य संग्रामाला या वर्षी 150 वर्ष पूर्ण होत आहेत तसेच आपल्या स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव देखील या वर्षी आहे आणि शिवाय शहीद भगतसिंग यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे. असा त्रिवेणी योग या वर्षी आलेला आहे. या वर्षामध्ये या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करून आजच्या तरूणांमध्ये वीरजोष निर्माण व्हावा आणि स्वातंत्र्य युद्धामध्ये ज्या क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांचे हौतात्म्य दिले आहे, प्राणांचे बलिदान केलेले आहे त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करावे तसेच 1857 पासून भारताच्या स्वातंत्र्यांसाठी ज्यांनी ज्यांनी आपल्या जीवाचे बलिदान केलेले आहे ....

( यानंतर श्री. गागरे .....एक्स 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी .....

त्याची पूर्णपणे माहिती तरुण पिढीला व्हावी या दृष्टीकोनातून अधिकाधिक कार्यक्रम आयोजित करावेत. याकरिता या वर्षीच्या अर्थसंकल्पात दीडशे कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी मी विनंती करतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सभागृहात कॅबीनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**सभापती** : मी 10 मिनिटासाठी सभागृहाची बैठक तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12 वाजून 11 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मघाशी मी औचित्याचा महत्वाचा मुद्दा मांडीत होतो. 1857 च्या स्वातंत्र्य संग्रामाला 150 वर्षे पूर्ण झाली या संदर्भात माझे म्हणणे मांडीत असतांना सत्ताधारी पक्षाचे कॅबिनेट मंत्री सभागृहामधून निघून गेले. एवढा गंभीर आणि राष्ट्रीय अस्मितेचा मुद्दा असून याकरिता केंद्र सरकारने आपल्या अर्थसंकल्पामध्ये त्या अनुषंगाने तरतूद केली आहे. आपल्या राज्य सरकारने देखील अर्थसंकल्पामध्ये त्यादृष्टीने काहीतरी तरतूद करावी अशाप्रकारची सूचना मला करावयाची असून आपणामार्फत देखील शासनाला त्यासंबंधी निर्देश दिले गेले तर शासनाकडून काहीतरी तरतूद केली जाऊ शकेल. या संदर्भात माझे म्हणणे मांडीत असतांना मंत्रिमहोदय सभागृहामधून निघून गेल्याबद्दल त्यांनी सभागृहामध्ये दिलगीरी व्यक्त करावी. त्याचप्रमाणे सभापती महोदय, आपण देखील शासनाला याकरिता अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्याकरिता निर्देश द्यावे अशी मी आपणास विनंती करतो.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मी दिलगिरी व्यक्त करते.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज सुरु असतांना मंत्रिमहोदयांच्या अनुपस्थितीमुळे सभागृहाचे कामकाज दहा मिनिटे तहकूब करावे लागणे ही प्रथा व पध्दत योग्य नाही. याकरिता सभागृहामध्ये कॅबिनेट मिनिस्टर्सनी सतत उपस्थित असणे आवश्यक आहे. या अनुषंगाने मी मंत्रिमहोदयांना समज देत असून आपण त्याची नोंद घ्यावी.

माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी औचित्याच्या मुद्दयाव्दारे 1857 च्या स्वातंत्र्य संग्राम लढयाला 150 वर्षे पूर्ण झाली असून त्याकरिता शासनाने अर्थसंकल्पामध्ये 150 कोटींची आर्थिक तरतूद करावी अशाप्रकारे सूचना केली आहे. याबाबत शासनाने नोंद घ्यावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, प्रत्येक अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहाचे कामकाज किती तास चालले, या कामकाजामध्ये किती विषयांवर चर्चा झाली, किती तारांकित प्रश्न चर्चेला आले आणि सभागृह तहकूब करावे लागल्यामुळे किती तास वाया गेले इत्यादी गोषवारा वाचून दाखविला जातो. त्याला जोडूनच मंत्र्यांच्या गैरहजेरीमुळे सभागृहाचा किती वेळ वाया गेला हे देखील वाचून दाखविण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ठीक आहे, माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माझा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. शालांत परीक्षा सुरु असतांना कल्याण, डोंबिवली शहरामध्ये सुमारे 6 ते 8 तास भार नियमनाची वेळ असतांना कित्येक तास भार नियमन केले जात आहे. त्याठिकाणी भारनियमनाच्या वेळेमध्ये अनियमिता होत आहे. त्याचप्रमाणे पूर्वसूचना न देता भारनियमनाच्या वेळेमध्ये बदल केला जात आहे. शासनाच्या निदर्शनास ही बाब आणून देखील शासनाने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले असल्याची भावना निर्माण झाल्यामुळे संतप्त जनतेने वेळोवेळी कल्याण, डोंबिवली येथे आंदोलन केले आहे. काल दिनांक 16 मार्च रोजी कल्याण येथील शिवाजी चौकामध्ये जनतेने उत्स्फूर्तपणे रस्ता रोको आंदोलन केले. पोलिसांनी लाठिमार व बळाचा वापर करुन हे आंदोलन थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु आंदोलन अधिक तीव्र झाले. या पार्श्वभूमीवर कल्याण व डोंबिवली येथील परिस्थिती अधिक चिंताजनक आणि गंभीर झाली आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची बाब असून शासनाने या विषयाकडे तातडीने लक्ष द्यावे याकरिता शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. आणि शासनाने यासंबंधी निवेदन करावे अशी विनंती करीत आहे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या सूचनेची नोंद घेण्यात येईल.

----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे.......... 12:25

**पृ.शी. व मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी, जगदीश गुप्ता,वि.प.स. यांनी "ऑगस्ट 2006 मध्ये पिंपळखुटा, ता.पातूर, जि.अकोला येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक नागरिकांच्या घरांची झालेली पडझड आणि त्यांचे झालेले आर्थिक नुकसान" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, संजय केळकर, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी "अध्यापक शिक्षण पदविका (डी.एड.) अभ्यासक्रमाकरिता सन 2005-2006 या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रथम वर्षाची परीक्षा नोव्हेंबर 2006 मध्ये घेतल्यामुळे निर्माण झालेल्या अडचणीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील,वि.प.स.यांनी "नागठाणा, ता.अहमदपूर येथील 40 शेतकऱ्यांनी ऊसाच्या प्रश्नावर तहसीलदार कार्यालयासमोर दिनांक 15 मार्च 2007 रोजीपासून केलेल्या बेमुदत उपोषणाबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, पाशा पटेल, गुरुमुख जगवानी, वि.प.स. यांनी "दिनांक 14-3-2007 रोजी नारायण रतनसिंह राजपूत हा ट्रक ड्रायव्हर वाळुंज येथून के.जी.ट्रान्सपोर्ट, बीड बायपास रोड येथे माल भरण्यासाठी जात असता, खाकी वर्दीतील पोलिसांच्या टोळीने दरोडा घालण्याचा केलेला प्रकार", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती (पुढे सुरु....

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, संजय केळकर, वि.प.स. यांनी "दिनांक 16-3-2007 रोजी झालेल्या इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या लोअर मराठी विषयाच्या पेपरमध्ये झालेल्या अनेक चुकांबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी "दिनांक 16-3-2007 रोजीच्या सुमारास नगरपंचायत समिती क्षेत्रातील (जि.अहमदनगर) अकोळनेर ग्रामपंचायतीच्या कार्यालयात सभापती, श्रीमती नंदा शेंडगे यांच्या डोक्यावर नारळ फोडण्याचा तसेच एका कार्यकर्त्याला मारहाण करण्याचा झालेला प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर ज्या सूचना आलेल्या आहेत, त्यांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

**पृ. शी.** : मळेवाड (जि.सिंधुदूर्ग) गावातील ब्रिटीशकालीन पुलाचा भाग कोसळल्यामुळे बंद करण्यात आलेली वाहतूक

**मु. शी.** : मळेवाड (जि.सिंधुदूर्ग) गावातील ब्रिटीशकालीन पुलाचा भाग कोसळल्यामुळे बंद करणत आलेली वाहतूक यासंबंधी सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड,भास्कर जाधव, रणजितसिंह मोहिते-पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदूर्ग सागरी महामार्गावरील शिरोड-मळेवाड दरम्यानचा मळेवाड गावातील ब्रिटीशकालीन पुलाचा काही भाग कोसळल्याने या पुलावरून जाणारी एस.टी.वाहतूक, अवजड वाहने, ट्रक इत्यादींची वाहतूक बंद करण्यात येणे, दरम्यान आरोंद्यावरून पणजीकडे 25 किलोमिटरचा फेरफटका मारून वाहने हाकावी लागत असणे,त्यामुळे प्रवासी वर्गात पसरलेला संताप, मळेवाड पंचक्रोशीत रहिवाशांत पसरलेली संतापाची लाट, सार्वजनिक बांधकाम खात्याबाबत नागरिकांत पसरलेली नाराजीची भावना, ग्रामस्थांनी आंदोलन छेडण्याचा दिलेला इशारा, मळेवाडच्या पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. "

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, वेंगुर्ला,सावंतवाडी तालुक्याजवळील मळेवाड पूल ब्रिटीशकालीन बांधलेला होता. काळया दगडाचे खांब रचून बाधलेला पूल आहे, तो खांब कोसळला. कोकणातील सागरी महामार्गावरील मळेवाड गावातील पूल आहे. त्याचबरोबर महामार्ग क्रमांक 17 वर देखील अशाचप्रकारचे ब्रिटिशकालीन पूल आहेत. त्या ठिकाणचे दगडी पूल कोसळणे,खांब कोसळणे असे प्रकार वारंवार घडतात. यामुळे वाहतुकीवर परिणाम होतो. या पुलाच्या ठिकाणी दुसऱ्या मार्गाने वाहतूक डायव्हर्ट केली. निवेदनामध्ये मळेवाडचा पूल दुरुस्त केल्याचे म्हटलेले आहे. अशाचप्रकारे मध्यंतरी तरळा ते वैभववाडी येथील दगडी पूल कोसळला. दगडी खांब कोसळल्यामुळे वाहतूक बंद झाली. त्याबाबतची काय पर्यायी व्यवस्था केली, याची माहिती नाही. माझा प्रश्न असा आहे की, जे ब्रिटीशकालीन पूल आहेत त्यांना दगडी खांबानी बांधलेले आहेत. ते कोसल्यामुळे पूल कोसळत आहेत. या पुलावरुन ट्रक, मोठमोठे ट्रेलर जात असल्यामुळे दगडी खांबावर ताण पडतो. अशाप्रकारचे कोकणामध्ये किती पूल आहेत, याचा शोध घेतलेला आहे काय ? शोध घेतला नसेल तर तो घेण्यात येणार आहे काय ? अशाप्रकारचे सिंधुदूर्ग जिल्हयात पूल असतील त्या ठिकाणी नवीन पूल बांध्णयाची प्रक्रिया या निमित्ताने सुरु करणार आहात काय ?

श्री.रविशेठ पाटील : मळेवाड पूल बांधण्याचे काम दिनांक 12-12-2005 पासून सुरु केलेले असून ते 2007 पर्यन्त पूर्ण होईल.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील .....

याबरोबर आणखी चार पूल बांधावयाचे आहेत. त्यामध्ये ओरस, कोंडरा, सातर्डा आणि मळेवाड या पुलांचा समावेश आहे. यासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद आहे. मळेवाड पुलाचा 54 लाख रुपयांचा खर्च आहे. 40 लाख रुपयांचे काम झालेले आहे. 13 लाख रुपयांचे काम शिल्लक आहे. ते काम पूर्ण होईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी चालू असलेल्या पुलाच्या संदर्भात उत्तर दिले आहे. या ठिकाणी जेष्ठ सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी अशा प्रकारचे जे अनेक ब्रिटीशकालीन पूल आहेत त्यासंदर्भात प्रश्न विचारला. त्यावेळची जी परिस्थिती होती त्यानुसार त्यावेळी हेवी लोड वाहतुकीची परिस्थिती नव्हती. आता दिवसेंदिवस हेवीवेट ट्रक, ट्रॉलीज, ट्रॅक्टर्स यांची वाहतूक होते. अशा जुन्या पुलांचा सर्व्हे केलेला आहे काय ? सर्व्हे करुन 100 वर्षापूर्वीचे जे पूल असतील ते नव्याने बांधण्याची योजना केलेली आहे काय ? नसल्यास लवकरात लवकर सर्व्हे करणार काय ? मळेवाड पूल काही दिवसांपूर्वी दुरुस्त झाला होता ही गोष्ट खरी आहे काय ? हा पूल दुरुस्त झालेला असताना तोच भाग पुन्हा कोसळला. तोच भाग कोसळला असेल तर हे काम निकृष्ट दर्जाचे झाले नव्हते काय ?

श्री. रविशेठ पाटील : हा ब्रिटीशकालीन पूल आहे त्यामुळे तो जुना पूल आहे. त्या ठिकाणी पर्यायी दुसरा पूल बाजूला बांधत आहोत. जो पूल दुरुस्त करीत होतो त्याला तीन फुटाचा खड्डा पडला होता. तो तीन फुटाचा रस्ता दुरुस्त केला. पर्यायी दुसरा पूल बांधलेला आहे त्यामुळे तो प्रश्न राहिलेला नाही. जे ब्रिटीशकालीन पूल आहेत त्यांचा सर्व्हे झालेला आहे. त्या ठिकाणी नवीन पूल बांधत आहोत.

श्री. परशुराम उपरकर : मळेवाड-सातर्डा या मार्गावर टाटा मेटॅलिक कंपनी आहे. त्या कंपनीच्या 40 टनी ट्रकची वाहतूक सतत या रस्त्यावरुन होते. आंबोली घाट सुध्दा या वाहनामुळे बऱ्याच ठिकाणी कोसळलेला आहे. दिवसाला किमान 100 ते 150 गाड्या धावतात. या पुलाचे जे डिझाईन केलेले आहे ते पाहता या पुलावरुन 40 टनी ट्रकची वाहतूक झाल्यानंतर त्या पुलाची जी

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. परशुराम उपरकर ....

परिस्थिती निर्माण होईल त्याबाबत शासन काय जबाबदारी घेणार आहे ? टाटा मेटॅलिक कंपनीला व्यवस्थितरीत्या वाहतूक होईल अशा ठिकाणाहून वाहतूक करण्यासाठी शासन निर्देश देईल काय ? जो नवीन पूल झालेला आहे त्या ठिकाणी दोन्ही बाजूने 100 मीटरचा रस्ता जोडण्याचे काम बाकी आहे. तेथील ग्रामस्थाना या जमिनीचा मोबदला शासन देणार आहे काय ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपकरकर यांनी जे सांगितले आहे त्याबाबत शासन निश्चितपणे चौकशी करील आणि जे जे आढळून येईल त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, हा सिंधुदुर्ग जिल्हयापुरता मर्यादित प्रश्न असला तरी असे जे पूल आहेत त्या पुलांचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. हे सर्वेक्षण शासन करणार काय तसेच त्याची कालमर्यादा काय आहे ? याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री. रविशेठ पाटील : बऱ्याच ठिकाणी सर्वेक्षण झालेले आहे. जे राहिलेले असतील त्यांचे सर्वेक्षण केले जाईल आणि त्या ठिकाणी नवीन पुलाचे काम केले जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांच्या प्रश्नाला उत्तर देत असताना माननीय मंत्रिमहोदयांनी कार्यवाही करु असे सांगितले. यासंदर्भात पूर्वी सर्वेक्षण केलेले आहे त्यावेळी त्या ठिकाणी टाटा मेटॅलिक कंपनीच्या हेवीवेट ट्रकची वाहतूक होते आणि त्यासाठी काही तरी करावयास पाहिजे हे शासनाच्या लक्षात आले नाही काय ? त्या पुलाचे, रस्त्याचे जे काम आहे ते किती दिवसात पूर्ण होईल आणि त्याबाबतीत किती दिवसात निर्णय घेतला जाईल ?

श्री. रवीशेठ पाटील : मळेवाडचे काम मे, 2007 पर्यंत पूर्ण होईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

**पृ. शी.** : जायकवाडी धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्याची दुरुस्ती न केल्यामुळे शेतीसाठी पाणी उपलब्ध न होणे

**मु. शी.** : जायकवाडी धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्याची दुरुस्ती न केल्यामुळे शेतीसाठी पाणी उपलब्ध न होणे यासंबंधी सर्वश्री श्रीकांत जोशी, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सय्यद पाशा पटेल, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठवाड्यातील जायकवाडी हे मोठे धरण सलग तिसऱ्यांदा पावसाने भरलेले असतानाही उजव्या व डाव्या कालव्याची दुरुस्ती न केल्यामुळे लाभक्षेत्रातील 75% जमिनीस शेतीसाठी पाणी उपलब्ध न होणे, खोटी आकडेवारी दाखवून कमांड एरियातील पाणी मिळालेल्या क्षेत्राचे मोजमाप वाढवून दाखविणे, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना त्याचा फायदा न होणे, यामुळे पैठण, घनसावंगी, गेवराई, माजलगांव, पाथरी, मानवत, परभणी, परळी, इत्यादी तालुक्यातील शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणे, जायकवाडी धरणाच्या निर्मितीपासून परभणी जिल्ह्यातील अंदाजे तीस हजार हेक्टर जमिनीस एकदाही पाणी न मिळून देखील त्या क्षेत्रास कमांड एरियातून वगळण्याची कार्यवाही शासनाने न करणे, त्याचबरोबर जायकवाडी प्रकल्पास असलेल्या सुंदर उद्यानास शासनाने चुकीच्या पद्धतीने खाजगीकरण केल्यामुळे उद्यानाची दुर्दशा होणे, पर्यायाने पर्यटकांची नाराजी होणे, एकूणच या प्रकल्पावर काही कोटींची गुंतवणूक कॅनॉल मध्ये करण्याची गरज असताना शासनाने टाळाटाळ करणे, जायकवाडी या प्रकल्पाकडे शासनाने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, जायकवाडी धरणाच्या बाबतीत मागेही विधिमंडळामध्ये प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी शासनाने उत्तर दिले होते. त्यानंतर माननीय मंत्री श्री. अजित पवार यांनी बैठक घेतली. त्यावेळी पैसे कमी पडू देणार नाही, शेतकऱ्यांना पाणी मिळण्यासाठी शासन जे पाहिजे ते करील असे आश्वासन दिले होते. परंतु प्रत्यक्षात काहीही कार्यवाही झालेली नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 12:35

(श्री. श्रीकांत जोशी....)

मी जो प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर आलेले नाही. जायकवाडी धरणाच्या निर्मितीपासून परभणी जिल्हयातील अंदाजे 30 हजार हेक्टर जमीन जी कमांड एरियामध्ये येते त्या जमिनीला पाणी मिळत नसल्यामुळे तो भाग कमांड एरियातून वगळण्यात यावा असा माझा पहिला प्रश्न होता. त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी सूचना दिल्यानंतर त्याबाबतीत काहीच कारवाई झाली नाही. माझा दुसरा प्रश्न असा होता की, 75 टक्के जमिनीला शेतीसाठी पाणी उपलब्ध होत नाही. खोटी आकडेवारी दाखवून सिंचन विभाग लोकांचे समाधान करीत आहे. पैठण डाव्या कालव्याची वहन क्षमता किती आहे ? कालव्याच्या दुरुस्तीसाठी किती खर्च येणार आहे ? या दुरुस्तीसाठी जे शंभर दीडशे कोटी रुपये लागतील ते किती दिवसामध्ये शासन उपलब्ध करुन देईल. या वर्षामध्ये दुरुस्तीचे काम पूर्ण होईल काय ?

डॉ. सुनील देशमुख : दोन कालव्यांच्या दुरुस्तीसाठी जवळ जवळ 285 कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यामधील 175 कोटी रु. हे डाव्या-मेन कालव्यासाठी आहेत. 25 कोटी रुपये डिसिट्रब्यूशन सिस्टीमसाठी आहेत आणि उजव्या कालव्यासाठी 85 कोटी रुपये आहेत. मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत 45.90 कोटी रुपये निधी मंजूर झालेला आहे. त्यातून कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत. सर्वच कामे काही एकदम पूर्ण होणार नाहीत. जस जशी पैशाची गरज भासेल तस तसे ते उपलब्ध करुन दिले जातील. दोन्ही कालव्यांची वहन क्षमता 1600 क्युसेक्स प्रति सेकंद होती ती. 2300 क्युसेक्स पर्यन्त वाढविलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : डाव्या कालाव्याची वहन क्षमता 3600 क्युसेक्स असताना फक्त 1200 क्युसेक्स पाणी वहन होते. तसेच उजव्या कालव्याची वहन क्षमता 2400 क्युसेक्स असताना फक्त 700 क्युसेक्स पाणी वहन होते. यामधील नेमकी वस्तुस्थिती काय आहे ते माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. परभणी जिल्ह्यातील कॅनॉलमध्ये 10 वर्षापासून झाडे-झुडुपे उगवलेली आहेत ती केव्हा साफ करणार आहात ? कॅनॉल आणि इतर गोष्टी बरोबर नसल्यामुळे लाखो शेतकरी आज पाण्या पासून वंचित राहिलेले आहेत ही बाब शासनाला भूषणावह नाही. तेव्हा या कॅनॉलसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. मानवत तालुक्यातील एका शेतक-याने जायकवाडी कॅनॉलचे पाणी वेळोवेळी तगादा लावून न मिळाल्यामुळे विष पिऊन आत्महत्या केली.

.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी....

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे त्या आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या घरी जाऊन आलेले आहेत. माझे म्हणणे असे आहे की, जे इरिगेशन पोटॅन्शियल आहे ते पूर्णपणे वापरले गेले पाहिजे. महाराष्ट्राच्या विकासाच्यादृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. तेव्हा शासन हे उर्वरित काम केव्हा पूर्ण करणार आहे ? इरिगेशन पोटॅन्शियल फूल कॅपॅसिटीने केव्हा युटिलाईज होईल ?

डॉ. सुनील देशमुख : हे जायकवाडी धरण 1976ला पूर्ण झाले. तेव्हा पासून ते 11 वेळा 75 टक्के आणि 7 वेळा पूर्ण भरले होते. धरण 7 वेळा पूर्ण भरलेले होते तरी देखील डिपेन्डिबिलिटी 75 टक्के असल्यामुळे डिस्ट्रीब्यूशन सिस्टिमद्वारे पाणी शेवटपर्यन्त पोहोचू शकले नाही. परभणी जिल्हयातील 30 हजार हेक्टर जमिनीला मिळाले. परंतु औरंगाबाद, जालना जिल्हयांना अपेक्षित सिंचन क्षमतेप्रमाणे पाणी देता आले नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 12:40

लक्षवेधी सूचना क्र.2......... डॉ.सुनील देशमुख....

मागील दोन वर्षात 100 टक्के धरण भरले. पूर्वीच्या 5-6 वर्षात कधीही 100 टक्के धरण भरले नसल्यामुळे थोडेसे दुर्लक्ष झाले. जेव्हा धरण 100 टक्के भरले तेव्हा त्याच्याकडे संपूर्ण लक्ष देऊन शेवटपर्यंत पाणी पोहोचले पाहिजे यासाठी मराठवाडा विकास कार्यक्रमाद्वारे 45 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले.

श्री.दिवाकर रावते : परभणी कॅनॉलमध्ये झाडेझुडपे वाढली आहेत ती काढल्याशिवाय पाणी पोहोचणार का?

डॉ.सुनील देशमुख : झाडेझुडपे मेन कॅनॉलमध्ये असतील तर ती आम्ही जरुर काढू.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, माजलगाव तालुक्यातील भाटवडगाव आणि मारोळा या गावातील 100 एकर व 250 एकर क्षेत्रात डिस्ट्रिब्युशन लाईन फुटल्यामुळे शेतात पाणी शिरुन शेतकऱ्यांचे नुकसान झाले. पैठणमध्ये बॅकवॉटरचे पाणी जाऊन डिस्ट्रिब्युशन लाईनचे नुकसान झाले असा अहवाल आला आहे का? पूर नियंत्रण रेषेचा फेर सर्वे करण्यासाठी गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचा प्रस्ताव आहे का? पैठणपासून आंध्रपर्यंतची संपूर्ण खेडी उद्ध्वस्त होण्याची परिस्थिती निर्माण झाली, याचे फेरनियोजन करण्याचा प्रस्ताव गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाने केला आहे का?

डॉ.सुनील देशमुख : 2005-06 मध्येच हे धरण 100 टक्के भरले, त्यापूर्वीच्या 5-6 वर्षात कधीही भरले नव्हते. फेर सर्वेक्षण करणार आहोत. त्या परिसरातील गावांचे नुकसान झाले. लोकांची जीवित व वित्तहानी झाली आहे. त्यामुळे फेर सर्वेक्षण आम्ही करणार आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खरे म्हणजे या ठिकाणी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे मंत्रीमहोदयांकडून दिली जात नाहीत ही खेदाची बाब आहे. निवेदनात म्हटले आहे की, कालव्याच्या वितरण व्यवस्थेमध्ये काही भागात पाणी जात नाही. हा भाग कोणता? परभणी जिल्हयातील वेगवेगळया ठिकाणी कॅनॉलमध्ये झाडेझुडपे उगवली आहेत ती आम्ही काढून टाकू असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. निवेदनामध्ये तसे म्हटलेले नाही. या सभागृहात 3 कोटी रुपये परभणी जिल्हयातील कॅनॉलची साफसफाई करण्याकरीता उपलब्ध करुन दिले होते. ती साफसफाई न करता निधी खर्च केला गेला. मी या संदर्भात यापूर्वी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. तेथील परिस्थितीचे प्रत्यक्ष चित्रण करुन कॅसेट उपलब्ध करुन दिली होती. शेतकऱ्यांची

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2......... श्री.दिवाकर रावते........

कॅनॉलबाबत असलेली मते रेकॉर्ड करुन आणली होती. त्याबाबत चौकशी करु असे तत्कालीन पाटबंधारे मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांनी सभागृहात आश्वासन दिले होते. संबंधित विभागाचे अधिकारी माझे मत नोंदवून घेण्यासाठी माझ्याकडे आले होते. त्यानंतर पुढे काय कारवाई झाली हे मला कळले नाही. सदनामध्ये कॅनालमधील झाडेझुडपांची साफसफाई करण्याकरीता 3 कोटी रुपये दिलेले असताना ते काम न करता निधी गिळंकृत केला. या संदर्भातील मी पुरावे सादर केले होते. आता मंत्रीमहोदयांनी कॅनॉलमध्ये झाडीझुडपे असतील तर आम्ही साफ करु असे सांगितले. ही परिस्थिती सत्य असल्याशिवाय मंत्रीमहोदय असे उत्तर देणार नाहीत. कॅनॉलमध्ये झाडे वाढली आहेत हे सत्य आहे की त्यावेळी दिलेला 3 कोटी रुपयांच्या निधीचा अपहार झाला हे सत्य आहे?

डॉ.सुनील देशमुख : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी चौकशीसंबंधी जो मुद्दा मांडला त्याची माहिती माझ्याकडे आता उपलब्ध नाही. परंतु तत्कालीन पाटबंधारे मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांच्या कार्यकाळातील हा प्रश्न आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भातील संपूर्ण माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, मागील 5-6 वर्षात पाऊस पडला नाही म्हणून कॅनॉलची दुरुस्ती झाली नाही. असे असेल तर शिकार समोर आल्यानंतर बंदूक हाती घ्यावी लागते का? पाऊस कधी पडेल हे शासनाला माहिती नाही. दर चार वर्षानंतर दुष्काळ पडतो हे खरे असेल तर पावसाळ्यापूर्वी कॅनॉलची दुरुस्ती झाली पाहिजे. कॅनॉलमध्ये वाढलेली झाडे काढली पाहिजेत. यंदा पाऊस पडेल म्हणून दुरुस्तीवर खर्च करणार आणि शेतकऱ्यांचा सीझन वाया घालविणार का?

डॉ.सुनील देशमुख : सिंचन न होण्याचे हे एकच कारण नाही. इतरही अनेक कारणे आहेत. वर्षानुवर्षे धरण न भरणे, क्रॉपिंग पॅटर्न आणि प्रत्यक्ष पीक घेणे यामध्ये फरक पडतो. प्रकल्पाची निर्मिती केली त्यावेळी केवळ 3 टक्के पाण्याचे नियोजन केले होते.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ KTG/ प्रथम श्री. भोगले.... 12:45

डॉ. सुनील देशमुख .......

अगोदर या ठिकाणी ऊसाचे क्षेत्र कमी प्रमाणात होते परंतु आता हे क्षेत्र वाढलेले आहे. या ठिकाणी अगोदर 4 हजार हेक्टर ऊसाचे क्षेत्र होते परंतु आता हे क्षेत्र 40 हजार हेक्टरपर्यंत गेलेले आहे. 4 हजार हेक्टरला लागणारे पाणी आणि 40 हजार हेक्टरला लागणारे पाणी हे आपल्याला कम्पेअर करावेच लागेल. टेलपर्यंत पाणी गेले तर त्या पाण्याचा उपयोग जास्तीत जास्त हेक्टरला होतो. शेतक-यांना जास्तीत पाणी मिळावे यासाठी आम्ही योजना करीत आहोत. प्रकल्पामधील पाणी साठा बघून सिंचन क्षमतेचा अंदाज बांधता येतो. उपलब्ध पाण्यामध्ये खरीपाचे किती क्षेत्र भिजेल, रब्बीचे किती क्षेत्र भिजेल याचा अंदाज बांधता येतो. या प्रकल्पातून बारमाही पाणी दिले जाते. सिंचन क्षमता असतांना पाणी वापरता येत नाही असे चित्र दिसते, परंतु जर एखाद्या वर्षी पाऊस चांगल्या प्रमाणात पडला तर धरणाचे पाणी कमी वापरले जाते म्हणजे याचा अर्थ शेतक-यांना पाणी मिळत नाही असा होत नाही. पाऊस कमी पडला तर धरणातील पाणी जास्त वापरले जाते. परभणी जिल्हयाची सिंचन क्षमता 49 हजार हेक्टरची आहे. आता ही सिंचन क्षमता दुप्पट झालेली आहे. मधील काळात पाऊस कमी पडल्यामुळे प्रत्यक्षात नियमित क्षमतेपेक्षा पाण्याचा वापर कमी झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मंत्री महोदय ने अभी कहा कि पूर्ण क्षमता का वापर होने के लिए मेंटेनेंस के लिए 285 करोड़ रुपए की जरुरत है, लेकिन उन्होंने अभी केवल 45.90 करोड़ रुपए दिए हैं. इसलिए मेरा प्रश्न यह है कि 285 करोड़ रुपए कितने दिन में देंगे ? मेरा मानना ऐसा है कि कमांड एरिया डिलिट करने की जरुरत नहीं है. जैसा कि माननीय सदस्य श्री. गडकरी ने कहा कि कॅनाल में बहुत से झाड़ हो गए हैं. कॅनाल मेरे घर के पीछे है और वहां से झाड़ में से पानी बहता है. वहां पर कॅनाल में झोंपड़ियां बन गई हैं. इसलिए मेरा प्रश्न है कि आप 285 करोड़ रुपए कितने दिन में देंगे ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आताच सांगितलेले आहे की, या कामासाठी एकूण 46 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या कामासाठी पैसे कमी पडू दिले जाणार नाहीत. या प्रकल्पाचे पाणी सर्व क्षेत्रात पोहचले नाही तर गोदावरी नदीवर 11 बंधारे बांधले जातील व परभणी जिल्हयातील शेतीला पाणी उपलब्ध करुन दिले जाईल.

. . . DD-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांना पुन्हा विनंती आहे की, जायकवाडी प्रकल्प, मराठवाडयाची हार्टलाईन आहे. या प्रकल्पामध्ये मोठे पोटेन्शीअल आहे. हा प्रकल्प मागील काही वर्षात कमी प्रमाणात भरला होता परंतु आता हा प्रकल्प 100 टक्के भरलेला आहे. या धरणाची पाणी साठवण क्षमता मोठी आहे. या धरणातील पाण्याचा पुर्ण क्षमतेने वापर केला तर फार मोठे क्षेत्र ओलिताखाली येऊ शकेल. गरज पडली तर एखाद्या नवीन धरणाचे काम पुढे ढकला, या बजेट मध्ये या प्रकल्पासाठी निधीची तरतूद केली नसेल तर मराठवाडयाच्या अनुशेषातून रक्कम काढून या प्रकल्पावर खर्च करा, कालव्याच्या कामावर रक्कम खर्च करा, कालवे व्यवस्थित करा. या ठिकाणचे कालवे व्यवस्थित केले तर 2 लाख हेक्टर क्षेत्राला फायदा मिळू शकेल. परंतु टप्प्या टप्प्याने या प्रकल्पावर खर्च करणे बरोबर होणार नाही. पुढील वर्षी अधिक पाऊस झाला आणि 100 टक्के धरण भरले तर त्या पाण्याचा लाभ शेतक-यांना होण्यासाठी या प्रकल्पाच्या कामासाठी रक्कम खर्च करा. या पाण्याचा फायदा मराठवाडयातील जनतेला होणार आहे. या प्रकल्पाच्या कालव्यासाठी मागील काळात 3 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत त्याची माहिती माननीय मंत्रीमहोदय देणारच आहेत. या कालव्यांची कामे योग्य पध्दतीने झाली तर पुढील वर्षी परभणी जिल्हयातील 35 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊ शकेल.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.......

हा दुष्काळी भाग आहे. तेव्हा या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ?

डॉ.सुनील देशमुख : मराठवाड्याला न्याय देण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. सन 2004-05 मध्ये औरंगाबाद, जालना जिल्ह्यातील 11 हजार 21 हेक्टरक्षेत्र सिंचनाखाली आले. सन 2006-07 मध्ये 31 हजार हेक्टरक्षेत्र सिंचनाखाली आले म्हणजे जवळपास 72 टक्के सिंचनाची क्षमता वाढलेली आहे. मागील वर्षी परभणीमध्ये 25,442 हेक्टरक्षेत्राला पाणी देण्यात आले होते. यावर्षी जवळपास 59 ते 60 हजार हेक्टर क्षेत्राला पाणी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पैठण डावा कालव्यातून जवळपास 14640 हजार हेक्टरक्षेत्राला पाणी पुरविण्यात आले होते. दोन वर्षात जवळपास 91 हजार हेक्टरक्षेत्राला पाणी पुरविण्यात आले. गेल्या वर्षी पैठण उजव्या कालव्यातून 1382 हेक्टरक्षेत्राला पाणी दिले, तर सन 2006 मध्ये 1691 हेक्टरक्षेत्राला पाणी दिलेले आहे म्हणजे जवळपास 97 टक्के सिंचन क्षमता निर्माण केलेली आहे. गेल्यावर्षी औरंगाबाद भागामध्ये 1440 हेक्टरक्षेत्राला पाणी दिले होते. सन 2006 मध्ये 1546 हेक्टरक्षेत्राला पाणी दिलेले आहे. म्हणजे 91 टक्के सिंचन क्षमता अचीव्ह केलेली आहे. गेल्या दोन-तीन वर्षात......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. जायकवाडी धरणाची पाण्याची क्षमता जास्त असल्यामुळे सिंचन मोठ्या प्रमाणावर झाले. यापूर्वी जायकवाडी धरण पूर्णपूणे भरले जात नव्हते. त्यामुळे पाणी पुरवठा कमी होत होता. परंतु मागील दोन वर्षे हे धरण पूर्णपणे भरत आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावर सिंचन होत आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्या उषाताई दराडे यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे. जायकवाडी धरण पूर्णपणे भरल्यामुळे त्या धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आले, त्यामुळे त्या परिसरातील लोक विस्थापित झाले. धरणातून पाणी सोडण्याची वेळ आली तर नदीच्या पात्रामध्ये पाणी सोडले जाते. परंतु यापूर्वी हे धरण पूर्णपणे भरलेले नसल्यामुळे तसा प्रसंग कधी आला नाही. त्यामुळे नदीचे पात्र आकुंचन पावले. मुंबईतील मिठी नदीची जी अवस्था झाली त्याप्रमाणे या नदीची अवस्था झालेली आहे. आता मिठी नदीचे पात्र रुंद करण्याची कार्यवाही सुरु आहे त्याप्रमाणे याही प्रकरणी कार्यवाही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

करण्यात यावी. तेव्हा त्याठिकाणी बॅरेजेस उभे केले पाहिजे. त्यासाठी लागणारा पैसा अनुशेषातून मिळणाऱ्या निधीतून खर्च करावा. असे केले तर अतिरिक्त पाणी वापरता येईल. जोड नद्यांना बंधारे बांधावेत त्यामुळे जे पाणी वाया जाते त्यास प्रतिबंध बसेल. सन्माननीय मंत्रिमहोदय, धरणाची जी सिंचन क्षमता आहे त्या संदर्भात माहिती देत आहेत.....

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, जायकवाडी धरण 100 टक्के भरल्यानंतर जवळपास....

श्री.नितीन गडकरी ( बसून ) : 100 टक्के सिंचन क्षमता वापरली जाणार आहे काय ?

**सभापती** : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, अलिकडच्या तीन वर्षाच्या काळात जायकवाडी धरण पूर्णपणे भरलेले आहे. या पाण्याचा जास्तीत जास्त वापर लाभक्षेत्राच्या विकासासाठी झाल्यास जवळपास दोन लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकेल. शेतकऱ्यास बारमाही, आठमाही व खरीपासाठी पाणी देता येईल. श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, कालव्यांच्या दुरुस्तीसाठी 46 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीमध्ये वाढ व्हावयास पाहिजे. अनुशेषांतर्गत मिळणाऱ्या निधीतून खर्च करण्यात येईल काय ? त्यादृष्टीने कोणते प्रयत्न करण्यात येणार आहेत ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, अपुऱ्या निधीमुळे काम रखडले असे कधीही होणार नाही असे आश्वासन मी सभागृहाला देतो. या कामासाठी जेवढा निधी लागेल त्याची तरतूद करण्यात येईल मग तो निधी अनुशेषाअंतर्गत असो वा..........

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : हे काम किती वर्षात पूर्ण कराल ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, काम सुरु आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आमच्या प्रश्नांस स्पष्ट उत्तरे मिळाली पाहिजेत. मराठवाडयाचा भाग अनुशेषग्रस्त व मागासलेला आहे. या प्रकल्पाचा फायदा मराठवाडयातील लाखो हेक्टर जमिनींना होणार आहे. सर्व मराठवाडयाचे चित्र बदलवणारा हा प्रकल्प आहे.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न सातत्याने मांडण्याचा उद्देश असा आहे की, एका बाजूला पाटबंधारे मंत्रीही आपणच आहात व दुसऱ्या बाजूला नियोजन मंत्रीही आपणच आहात. दोन्ही गोष्टीचा वापर करुन, आपण हे सर्व काम एक वर्षामध्ये पूर्ण करु शकाल किंवा काय ? याबाबतीत स्पेसिफीक असे सांगावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय म्हणतात की, यासाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही. मग, एका वर्षाच्या आत आम्ही हे सर्व काम पूर्ण करु, असे आपण सांगावे. आपण मंत्री असल्यामुळे आपणच मराठवाडयाला न्याय द्यावा, अशी आमची मागणी आहे. सभागृहामध्ये माननीय अजित दादा आले तर पुन्हा हा प्रश्न बाजूला राहील.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, वर्षभरात हे दोन्हीही कालवे पूर्ण सुस्थितीत आणण्याच्या दृष्टीने शासन सुधारणा करण्याचा प्रयत्न करेल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जायकवाडी धरणाला लागूनच त्याठिकाणी एक सुंदर उद्यान आहे. परंतु त्या उद्यानाचे खाजगीकरण करुन ते दुसऱ्यांना चालवण्यास दिले आहे. त्या उद्यानाची फार दुर्दशा झालेली आहे, हे खरे आहे काय ? असल्यास, त्यासाठी आपण कोणती उपाययोजना केली आहे ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे, त्या उद्यानाची दुर्दशा झालेली नाही.

प्रा.श्रीकांत जोशी : पूर्ण उद्यानाची वाट लागलेली आहे. सभापती महोदय, 45 कोटी रुपयांची प्रोव्हीजन असतानाही फक्त 6 कोटी रुपयेच शासन खर्च करु शकले आहे. सातत्याने याबाबतीत आम्ही आग्रह धरलेला आहे. त्यामुळे याबाबतीत माझी पुन्हा एकदा माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, कॅनॉलची दुरुस्ती करीत असताना, माननीय मंत्रिमहोदय

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.श्रीकांत जोशी....

जायकवाडी धरण पहायला येतील काय ? तसेच, त्या धरणावर 200-250 कोटी रुपये खर्च करण्यासाठी सक्षम अधिकार त्या अधिकाऱ्यांना आपण देणार काय ? आज त्याठिकाणी रुटीन पध्दतीने टेंडर होत नाहीत, त्यामध्ये पैसे खाल्ले जातात. त्यामुळे प्रत्यक्षात माननीय मंत्रिमहोदयांनी कॅनॉलची पाहणी करावी व याबाबतीतील सक्षम अधिकार अधिकाऱ्यांना द्यावेत. त्याठिकाणी पाणी चालू असतानाही कॅनॉलची दुरुस्ती करता येईल.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, त्याठिकाणी मी स्वत: जाऊन कॅनॉलची पाहणी करेन व पाणी सुरु असताना दुरुस्ती करता येते की नाही यादृष्टीने अंदाज घेण्यात येईल.

---------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रोहयोवरील मजुरांना किमान वेतन व धान्य वेळेवर न मिळणे

**मु. शी.** : रोहयोवरील मजुरांना किमान वेतन व धान्य वेळेवर न मिळणे यासंबंधी सर्वश्री शरद पाटील, जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, गोविंदराव आदिक,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत धुळे जिल्ह्यातील अनुक्रमे गोंदूर, फागणे व नकाणे येथील रोजगार हमी योजनेच्या कामावरील गरीब व गरजू मजुरांना शासनाच्या नियमानुसार माहे जानेवारी, 2007 पासून किमान वेतन व धान्य वेळेवर न मिळाल्यामुळे त्यांच्यावर ओढवलेली हलाखीची व आर्थिक कुचंबणेची स्थिती, कामाची गरज असूनही बेरोजगारांना वेतन व धान्य न मिळाल्याने कामावर जाणे शक्य नसणे, सदर कामावरील मजुरांना किमान वेतन कायद्याप्रमाणे 60 रुपये प्रतिदिन मिळावे, त्याचप्रमाणे पाच किलो मिटर पलीकडे काम उपलब्ध असल्यास किमान 10 टक्के जादा वेतन देण्यात यावे, त्याच बरोबर काम उपलब्ध नसल्यास बेरोजगारी भत्ता मिळावा, या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करुन धुळे जिल्ह्यातील 33 गावातील सुमारे 3000 मजुरांना चार नंबर फॉर्मवर काम मागण्यात आलेल्या मजुरांना काम मागूनही त्यांना काम देण्यात न येणे, मजुरांनी काम मिळण्यासाठी सतत जिल्हा व राज्य प्रशासनाकडे केलेली मागणी, काम न मिळाल्याने गरीब, गरजू मजूर, हवालदिल होणे, मजुरांची कामाची मागणी मान्य होत नसल्याने सर्व श्रमिक संघातर्फे दिनांक 14 मार्च, 2007 पासून पुकारलेले बेमुदत धरणे, आंदोलने, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हर्षवर्धन पाटील ( रोजगार हमी योजना मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) (...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या कामावर जे मजूर होते त्यांना फक्त 22 ते 36 रुपयेच मजुरी दिलेली आहे. किमान वेतन कायद्याप्रमाणे प्रतिदिन 60 रुपये मजुरी मिळणे आवश्यक आहे. अशाप्रकारचा कायदा असतानाही फक्त 22-36 रुपये मजुरी का देण्यात आली ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. तसेच, दुसऱ्या कामावर 10 टक्के मजुरी जादा देण्यात आली, कारण ते काम 5 किलो मीटर लांब होते. त्या कामावर प्रत्यक्षात किती मजुरी होती ? तसेच, या कामावरील मजुरांना धान्याचे वाटप वेळेवर मिळालेले नाही. ते देण्याच्या दृष्टीने शासन काही व्यवस्था करेल का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही कामे परिमंडळ 4 मध्ये मोडतात. त्यासाठी 47 रुपये हा जूना दर होता. ई.जी.एस.च्या मॅन्यूअलप्रमाणे 7 तास काम करावे, असे दरपत्रक असून त्यामध्ये जी कामे झाली, त्याचे मोजमाप व चौकशी दक्षता पथकामार्फत करण्यात आली असून त्याप्रमाणे 24 ते 37 रुपये मजुरी मिळालेली आहे. धान्याच्या बाबतीतची स्कीम एम.आर.ई.जी.एस.ची असून त्यानुसार आपण रोखीने पेमेंट देतो, धान्य देत नाही. तसेच, गोंदूरच्या कामावर 32 मजूर होते. बाभळवाडीच्या कामावर 45 व फागणे येथील कामावर 100 मजूर क्षमता होती.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत असे घडते की, मजूरी परवडत नसल्यामुळे मजूर कामावर येत नाही व कामे रखडली जातात. याविषयी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मजुरांच्या मजुरीसंदर्भात दिनांक 14 मार्च 2007 रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. शासनाने यापूर्वी जाहीर केल्याप्रमाणे मजूरांच्या मजूरीचे दर वाढविण्यात आले आहेत. या नवीन शासन निर्णयाप्रमाणे पूर्वी 47 रुपये असलेला दर आता 68 रुपये करण्यात आला आहे तसेच पूर्वी 45 रुपये असलेला दर आता 66 रुपये करण्यात आला आहे. त्यामुळे 14 मार्च 2007 पासून या राज्यातील रोजगार हमी योजनेमधील कामांसाठी येणा-या मजूरांच्या मजूरीमध्ये 68 रुपये व 66 रुपये अशी वाढ झालेली आहे. या नवीन बदलाप्रमाणे नव्याने अंदाजपत्रके तयार करावित व सुधारित दराची अंमलबजावणी करावी, अशाप्रकारच्या सूचना सर्व संबंधित अधिका-यांना देण्यात आल्या आहेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, एखाद्या कामासाठी मजूर उपलब्ध झाले नाही व काम रखडले असेल तर त्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मूळात मागणीनुसार काम उपलब्ध करुन देणारी ही योजना आहे. त्यामध्ये देखील कुशल व अकुशल असे दोन भाग आहेत. कुशल कामासाठी मॅन्युअलमध्ये वेगळी तरतूद आहे. मात्र, अकुशल कामासाठी मजूर अनिवार्य आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी दिनांक 14/07/2006 पासून काम उपलब्ध करुन देण्याबाबत उपोषण सुरु आहे व यासंबंधीची निवेदने मंत्रीमहोदयांना देण्यात आली आहेत. यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एकूण 33 गावातील निवेदने प्राप्त झाली आहेत. यानुसार 3 गावातील मजूरांना नियम 4 च्या नोटीसा देऊन व फॉर्म भरुन घेऊन कामे देण्यात आली आहेत. उर्वरित 28-29 गावातील निवेदनासंदर्भात शेल्फवरील कामांना मंजूरी देऊन कामे सुरु करण्याबाबतच्या सूचना उद्याच जिल्हाधिका-यांना देण्यात येतील.

---------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई, शिवडी नाका येथील व्हाईट स्टार या केमिकल कंपनीत रंगद्रव्याची अचानक फुटलेली टाकी

**मु.शी.**: मुंबई, शिवडी नाका येथील व्हाईट स्टार या केमिकल कंपनीत रंगद्रव्याची अचानक फुटलेली टाकी यासंबंधी सर्वश्री गोविंदराव आदिक, संजय दत्त, सुधीर सावंत, जैनुद्दीन जव्हेरी, कपिल पाटील, जयंत प्र.पाटील, शरद पाटील, राजन तेली, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 3 फेब्रुवारी, 2007 रोजी मुंबईतील शिवडी नाका बस डेपो परिसरातील व्हाईट स्टार या केमिकल कंपनीतील रंगद्रव्याची टाकी अचानक फुटल्यामुळे हया पावडरचे विषारी कण हवेत पसरुन नजीकच्या हनुमाननगर झोपडपट्टीत व विराणी अपार्टमेंटमध्ये राहणा-या 32 जणांना त्याची बाधा होऊन सुमारे 9 बालकांची परिस्थिती गंभीर होणे, तसेच त्यांना नजीकच्या परेल येथील के.ई.एम.रुग्णालयात दाखल करणे, या घटनेस जबाबदार असलेल्या मालकावर संबंधितांकडून कोणतीही कारवाई न होणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने चौकशी करुन करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बाबा सिद्धिकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----------------

..3..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने निदर्शनास आणून देण्यात आलेली घटना ही फार गंभीर स्वरुपाची आहे. विशेषत: मुंबई व ठाणे या शहरांमध्ये अनेक असे रासायनिक कारखाने आहेत की, ज्या कारखान्यांनी कोणत्याही प्रकारच्या सुरक्षा उपायांची अंमलबजावणी केलेली नाही. या शहरांमध्ये देखील भोपाळसारखी घटना घडण्याची वाट संबंधित अधिकारी पहात आहेत की काय, अशा प्रकारची शंका आमच्या मनामध्ये निर्माण होते. सन्माननीय मंत्रीमहोदयांना माझा असा प्रश्न आहे की, निवासी विभागात रासायनिक कारखान्यांना कधी, कोणी व कशी परवानगी दिली तसेच सदर कारखाने बंद करुन अन्यत्र हलविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

श्री बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, 1985 को इस केमिकल कंपनी को परमीशन दी गई थी. सम्माननीय सदस्य ने बताया है कि इस फेक्टरी की वजह से भोपाल जैसी घटना हो सकती है. मैं यह बताना चाहता हूं कि इस फेक्टरी में तीन वर्कर काम करते हैं. 1964 में मुंबई महानगरपालिका ने भी इस फेक्टरी को परमीशन दी थी. आज यह फेक्टरी बंद है. इस कंपनी के खिलाफ कारखाना अधिनियम, 1948 की धारा 7(अ)(2)(अ) के अन्तर्गत दादर मेट्रोपोलिटन कोर्ट में मामला दर्ज किया गया है.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पोलिसांनी या घटनेची चौकशी केली आहे काय ? गुन्हे केंव्हा दाखल करण्यात आले ? संबंधितांना कधी अटक करण्यात आली व त्रास झालेल्या व्यक्तिंना वैद्यकीय मदत देण्यात आली आहे काय ?

श्री बाबा सिद्दीकी :दिनांक 4.2.2007 को यह घटना हुई थी. इस घटना के बाद पुलिस घटना स्थल पर पहुंची थी और कंपनी के लोगों को गिरफ्तार किया गया था. 6 तारीख को इन लोगों को दादर न्यायालय में पेश किया गया था, न्यायालय से उन्हें 10 हजार रुपये की जमानत मिल गई है.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, एखाद्या केमिकल फॅक्टरीने रितसर परवानगी मिळविली आणि त्या कंपनीच्या शेजारी जर लोकवस्ती असेल तर त्याबाबत विभागामार्फत रिव्हीयू घेतला जातो काय ?

श्री.बाबा सिद्धीकी : श्री बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, हर साल फेक्टरी का इंसपेक्शन होता है. इस फेक्टरी का भी हर साल इंसपेक्शन होता था. इस घटना के बाद इस फेक्टरी के आसपास रहने वाले जिन लोगों को तकलीफ हुई थी, उनको वैद्यकीय देखभाल के अन्तर्गत रखा जाए, इस प्रकार के निर्देश दिए थे. हाऊस कीपिंग के लिए भी निर्देश दिए गए थे. यह भी निर्देश दिया गया है कि अगर फिर से श्युट होगा तो फेक्टरी बंद रखी जाए.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

----------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख.**

**पृ. शी.** : मतदान ओळखपत्र देण्याच्या कामात येत असलेल्या अडचणींबाबत.

**मु. शी.**: मतदान ओळखपत्र देण्याच्या कामात येत असलेल्या अडचणींबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.संजय दत्त यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे, त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"राज्यात मतदान ओळखपत्र देण्याची मोहीम राबविण्यात येत असून कल्याण डोंबिवली विभागात फेब्रुवारी, 2007 महिन्यामध्ये या मोहिमेची तीन टप्यात चाचणी घेण्यात येत असून ज्या कंपनीला कंत्राट दिले आहे त्या कंपनीच्या अनागोंदी कारभारामुळे मतदान ओळखपत्र देण्याच्या कामात मोठया प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या आहेत. यात ओळखपत्र फॉर्मचे वाटप पूर्ण न होणे, कॉम्प्युटर बंद असणे, तसेच मतदारांचे चुकलेले नाव मराठीत दुरुस्त करण्याचे सॉफ्टवेअर उपलब्ध असतांना देखील प्रशिक्षणा अभावी ते करता न येणे, त्यामुळे ओळखपत्र घेणा-यांची लांबचलांब रांग लागत असल्याने मतदान ओळखपत्र मोहिमेच्या चाचणीच्या वेळी भोंगळ कारभारामुळे अडचणी निर्माण झाल्याने या मोहिमेबाबत जनमानसात निर्माण झालेला संभ्रम हा विषय सभागृहाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे. याबाबत निवडणूक आयोगाने त्वरित दखल घेऊन यात सुधारणा करावी," यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना करीत आहे.

----------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** :औरंगाबाद येथील मोक्याच्या जागेवरील काही जिल्हापरिषद शाळा विद्यार्थी संख्येअभावी बंद पडणेबाबत.

**मु.शी.** :औरंगाबाद येथील मोक्याच्या जागेवरील काही जिल्हापरिषद शाळा विद्यार्थी संख्येअभावी बंद पडणेबाबत श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री.श्रीकांत जोशी यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे, त्यां□ ती मांडावी.

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"औरंगाबाद शहरातील अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेली चेळीपूरा कन्या जिल्हापरिषद हायस्कूल माध्यमिक प्रशाळा ही शाळा विद्यार्थी संख्येअभावी बंद करण्यात आली आहे. शैक्षणिक मागासलेल्या, अत्यंत गरीब वर्गातील, अल्पसंख्यांक व इतर समाजातील विशेषत: मुलींना चांगले शिक्षण देणारी शिक्षण मंदिरे जाणीवपूर्वक बंद पाडण्यात येत आहेत, असा खेद शिक्षकांनी व्यक्त केला आहे. यानंतरही मुलींना शिक्षण देणा-या जिल्हापरिषद माध्यमिक शाळा, औरंगपूरा व छावणी या शाळाही बंद करण्याचे षडयंत्र सुरु आहे.

मराठवाडयातील 352 जिल्हापरिषद माध्यमिक शाळांपैकी 275 शाळांना मुख्याध्यापक नाहीत. इंग्रजी व गणीत शिकविणारे शिक्षक नाहीत. जाणीवपूर्वक या जागा रिक्त ठेवून या शाळा बंद पाडण्याचे कटकारस्थान चालू आहे. माननीय शिक्षणमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. शासनाने यामध्ये लक्ष घालून ही शिक्षण मंदिरे पुनश्च प्रस्थापित केली पाहिजेत, यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----------

यानंतर कु.खर्चे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आदिवासी क्षेत्रातील शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळांना मागील 5 महिन्यापासून वेतन न मिळाल्याबाबत

**मु.शी.**: आदिवासी क्षेत्रातील शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळांना मागील 5 महिन्यापासून वेतन न मिळाल्याबाबत या विषयावर श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, ती त्यांनी मांडावी.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" आदिवासी क्षेत्रातील शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळांना मागील 5 महिन्यांपासून वेतन न मिळाल्याबद्दल "

महाराष्ट्र शासनाने शासनाच्या प्रचलित नियमानुसार विना अनुदानित शाळेच्या मुलांसाठी देखील अनुदान देण्यात येणार आहे असे सन 2004 -2005 व सन 2005 - 2006 शैक्षणिक वर्षामध्ये जाहीर केले होते तसेच, आदिवासी क्षेत्रातील शाळांकरिता करण्यात येणा-या उपाययोजनांतर्गत 290 तुकडया आणि 170 शाळांना शासनाने 100 टक्के अनुदान जाहीर केलेले आहे. ठाणे जिल्हयामध्ये आदिवासींचे प्रमाण जास्त आहे, या आदिवासी भागातील शहापूर,वाडा,मोखाडा,तलासरी या भागातील ज्या शाळा अनुदानावर चालतात त्या शाळेमध्ये काम करणा-या शिक्षकांना गेल्या नोव्हेंबर,2006 पासून वेतन मिळालेले नाही. सभापती महोदय, मी फक्त ठाणे जिल्हयाचे उदाहरण देत आहेपण ही संपूर्ण महाराष्ट्राचीच शोकांतिका आहे. दिनांक 12 फेब्रुवारी,2007 रोजी शासनाने तीन कोटी सहा लाख सत्तावीस हजार रुपये या शाळांसाठी आणि त्यांच्या तुकडयांसाठी अनुदान म्हणून मंजूर केले होते. ही रक्कम त्या तुकडयांना सुध्दा पुरली नाही. त्या शाळांना आणि तुकडयांना पूर्णपणे अनुदान मिळणे शक्य झाले नाही. गेले चार पाच महिने या शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. शहरी भागापेक्षा आदिवासी भागामध्ये काम करणारे शिक्षक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करीत आहेत आणि या शिक्षकांना जर पाच महिने वेतन मिळत नसेल तर ही अत्यंत दयनीय गोष्ट आहे. मी या विशेष उल्लेखाच्या

।। - 2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते......

माध्यमातून आपणास अशी विनंती करतो की, या शिक्षकांना तातडीने पगार मिळण्याच्या संदर्भात आपण शासनाला निर्देश द्यावेत.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

I I - 3....

**पृ.शी.**: ठाण्यातील घोडबंदर रोडवरील अनेक गृहसंकुलातील विद्यमान नाल्याची व गटारांची रुंदी,खोली वाढवून मिळण्याबाबत

**मु.शी.**: ठाण्यातील घोडबंदर रोडवरील अनेक गृहसंकुलातील विद्यमान नाल्याची व गटारांची रुंदी,खोली वाढवून मिळण्याबाबत या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे ती त्यांनी मांडावी.

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"झपाटयाने विकसित होत असलेल्या ठाण्यातील घोडबंदर रोडवरील अनेक गृहसंकुलातील हजारो नागरिक दिनांक 26 जुलै,2006 रोजीच्या हाहाकाराच्या छायेत वावरत असणे, घोडबंदर रोडच्या सहा पदरी क्रॉंकीटीकरणामुळे रस्त्यापासून काही गृहसंकुले तब्बल तीन फूट राहिल्याने पावसाळयात पूरस्थिती निर्माण होणे, गेल्या दोन वर्षात पावसाळयात विविध कारणाने नागरी वसाहतीमध्ये पाणी शिरणे, विद्यमान रस्ता, कॉंक्रिटीकरण कामामुळे रस्त्याचे सरसकट उंची 1 ते 3 फूट वाढल्यामुळे तसेच वाघबीळ नाका दलाल कंपनी व इ.महत्वाच्या ठिकाणी कल्वर्ट न केल्यामुळे डोंगरावरुन येणारे प्रचंड वेगातील पाणी यंदाही पावसाळयात त्रासदायक ठरण्याची भिती निर्माण होणे, त्यामुळे पावसाळयापूर्वी उर्वरीत 7 ठिकाणच्या कल्व्हर्टची कामे युध्दपातळीवर सुरु करणे, तसेच आवश्यकतेप्रमाणे विद्यमान नाल्यांची व गटारांची रुंदी,खोली वाढवून त्याचप्रमाणे डोंगरावर येणा-या पाण्याचे अनुमान काढून त्याला पूरक अशी पावसाळी पाणी वाहून जाणारी नाले यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता शासन याकउे करीत असलेले दुर्लक्षामुळे रहिवाश्यांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, त्यामुळे शासनाने तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता. "

ठाण्यामध्ये घोडबंदर रोडच्या भागामध्ये अनेक गृहसंकुलांमध्ये लाखो लोक राहतात. दिनांक 26 जुलै,2005 आणि 10 जुलै,2006 च्या पावसामुळे तेथे डोंगर पट्टी असल्यामुळे प्रचंड प्रमाणात पाणी त्या ठिकाणी जमा झाले आणि तेथील जनतेला भयंकर असा त्रास सहन करावा

I I - 4....





श्री.संजय केळकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लागला म्हणून त्या ठिकाणी एम.एस.आर.डी.सी.ने कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु केले आहे, सदर कामांतर्गत रस्त्यांची उंची 1 ते 4 फुटाने वाढविण्यात येत असून 10 पदरी रस्त्याचे काम चालू आहे. रस्त्यांची उंची तीन फुटाने वाढल्यामुळे तेथे आलेले पाणी साचून राहत आहे. रस्ते विकास महामंडळ आणि ठाणे महापालिका यांच्या कराराद्वारे तेथे कालव्याची व्यवस्था करण्याबाबत मेन्शन करण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी भेट दिली असता माझ्या असे लक्षात आले की, तेथे जवळ जवळ 23 ठिकाणी कल्व्हर्ट करण्याची आवश्यकता आहे परंतु सद्यस्थितीत तातडीने पावसाळ्यापूर्वी निदान सात ठिकाणी तरी युध्द पातळीवर कल्व्हर्ट करण्याचे काम हाती घेतले पाहिजे. विद्यमान नाल्यांची आणि गटारांची उंची आणि खोली वाढविण्याचे काम त्वरित युध्द पातळीवर घेतले तर तेथील जनतेला होणारा त्रास कमी होऊ शकतो. सदर काम रस्ते विकास महामंडळाने करावे की ठाणे महापालिकेने करावे या प्रश्नाकडे मी सभागृहाचे या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने लक्ष वेधू इच्छितो.

**<u>विशेष उल्लेखाबाबत</u>.**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला आपल्याकडून मार्गदर्शन पाहिजे आहे, मी गेले दोन तीन दिवस माननीय सभापतींच्या कार्यालयात विशेष उल्लेख देत आहे, तरीसुध्दा माझा विशेष उल्लेख स्वीकृत केला जात नाही, मी काही नियमाच्या बाहेर वागत तर नाही ना ? सभापती महाराज, महापालिकेमध्ये निवडणूक प्रक्रियेच्या संदर्भात 26 AB फॉर्म हे डुप्लिकेट दिले गेले आणि निष्ठावंत कॉंग्रेस कार्यकर्ता यांची तक्रार केली गेली, त्यांच्या विरुध्दच्या तक्रारीची माझ्याकडे फाईलही आहे.

यानंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

त्यामध्ये जी क्रिमिनल केस झाली आहे त्यासंबंधात विशेष उल्लेख मला येथे मांडावयाचा आहे. एका व्यक्तीने लोकशाही पद्धतीमध्ये काँग्रेस पक्षाच्या बी फॉर्म संबंधात तक्रारी केलेल्या आहेत त्याबद्दलचा विशेष उल्लेख मला येथे करावयाचा होता म्हणून मी सूचना माननीय सभापती कार्यालयामध्ये दिलेली आहे ...

**उपसभापती** : आपली ती सूचना अस्वीकृत झालेली आहे. ..

श्री. नितीन गडकरी : कशाच्या आधारे ती अस्वीकृत झालेली आहे ?

**उपसभापती** : त्याबाबत आपण माननीय सभापतींशीच बोलावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : पण कोणत्या कायद्याच्या वा नियमाच्या आधारे माझी ती सूचना अस्वीकृत केली गेली हे मला समजले पाहिजे ...

**उपसभापती** : आपण दिलेली सूचना निवडणूक आयोगाच्या कक्षेतील असल्याने अस्वीकृत केली गेली असल्याचे मला सांगण्यात आले आहे ... तरीही याउपर आपणास अधिक माहिती पाहिजे असल्यास आपण माननीय सभापतींशीच याबाबत बोलू शकता.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रकरणी श्री.तालेवार, पोलीस निरीक्षक, प्रताप नगर यांच्याकडे तक्रार देण्यात आलेली आहे. त्यामध्ये आता निवडणूक आयोगाचा कोणताही संबंध येत नाही. पण काँग्रेस पक्षाचा काही संबंध येत असेल तर ती बाब या सभागृहात आम्ही सदस्यांनी सभागृहात उपस्थित करावयाची नाही, त्यावर आम्ही येथे बोलावयाचे नाही असे सभापती कार्यालयातील लोकांचे म्हणणे आहे काय ? किंबहुना काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्र ओबीसी सेलच्या सेक्रेटरीनेच श्री.तालेवार, पोलीस निरीक्षक, प्रतापनगर पो.ठाणे येथे याबाबत तक्रार केलेली आहे. आणि ती बाब मला येथे विशेष उल्लेखाच्या द्वारे उपस्थित करावयाची आहे. तो माझा वैधानिक अधिकार आहे. ...

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, आपण हा विषय येथे काढल्याबरोबर मी ताबडतोब ती फाईल मागविली. त्यातून मला समजले की, आपण दिलेली विशेष उल्लेखाची सूचना ही अस्वीकृत करण्यात आलेली आहे. हा माननीय सभापतींचा निर्णय आहे. त्यामुळे आपणही येथे यावर जास्त बोलू नये आणि मीही त्याबाबत काही बोलणे योग्य होणार नाही.

...... जेजे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी या सभागृहाचा गेली 18 वर्षे सदस्य आहे. माझ्
या माहितीनुसार आणि अनुभवानुसार सभापती आणि उपसभापती कार्यालये ही नि:पक्ष असतात. सभागृहामध्ये सरकारच्या दृष्टीने काही अडचणीचा विषय येऊ नये म्हणून अशा प्रकारे जर निर्णय घेतले जात असतील तर ते योग्य नाही. मग ते विषय काहीही असोत आणि असे करणारे कोणीही असोत. पण अशा प्रकारे होणे हे माझ्या वैधानिक अधिकारावर अतिक्रमण आहे आणि मला ते अजिबात पटत नाही आणि मान्य नाही. मी ते सहन करून घेणार नाही. आपण म्हटले म्हणून आज मी गप्प आहे. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, पोलीस ठाण्यामध्ये केल्या गेलेल्या तक्रारीचाच मी आधार घेतलेला आहे त्यामध्ये निवडणूक आयोगाचा कोणताही संबंध नाही वा निवडणूक आयोगाकडे त्याबाबतची कोठलीही तक्रार पेंडींग आहे असे नाही. तर पोलीस ठाण्यामध्ये क्रिमिनल स्वरूपाची तक्रार केली गेली आहे त्यासंबंधात मला येथे विशेष उल्लेख करावयाचा आहे. ...

**उपसभापती** : मी या बाबतीतील माननीय सदस्यांच्या भावना माननीय सभापतींच्या कानी घालतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी हे अशा प्रकारचे माझ्या अधिकारावरील अतिक्रमण बिलकूल सहन करणार नाही. मी जे काही बोलेन ते रेकॉर्ड काढून बोलेन, इतरही खूप काही मी बोलेन. आज नाही तर उद्या तरी मला माझा हक्क मिळाला पाहिजे. अन्यथा मी येथेच बसून राहीन...

**उपसभापती** : ठीक आहे. आता यानंतर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा होणार आहे. पण तत्पूर्वी आपण चहापानाची सुटी घेऊ. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, 2.00 वाजता पुन्हा भरेल.

( 1.18 ते 2.00 मध्यंतर )

( यानंतर श्री.गागरे ....केके 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

सभापति महोदय, "मेटवा, तोड़ा, संपवा, जाळा" इस तरह का हमारा धोरण नहीं है, बल्कि "ज्योत से ज्योत जलाते चलो, प्रेम की गंगा बहाते चलो" इस धोरण के साथ शासन काम कर रहा है. इसी कारण जिला परिषद और पंचायत समिति के चुनाव में ग्रामीण जनता ने इस धोरण को समर्थन दिया, ऐसा मैं समझती हूँ.

सभापति महोदय, यह बात सही है कि हमारी राह कठिन है, मगर शासन बड़ी क्षमता से हर मुश्किल का सामना कर रहा है. राज्य की आर्थिक स्थिति कुछ सुधरी ही थी तो नैसर्गिक आपत्तियों और मनुष्य द्वारा निर्मित आपत्तियों ने राज्य की तिजोरी पर बोझा डाला. लेकिन शासन ने बड़ी समझदारी से, धैर्य से और परिपक्वता से इस मुश्किल का सामना किया. आज की जागतिक परिस्थिति में जहां हमारा किसान आत्महत्या करने की हद तक अपने को मजबूर पा रहा है, वहीं शासन ने एक अच्छे नियोजन के साथ किसानों की मदद करने का काम शुरु किया है. केवल राज्य शासन ही नहीं, बल्कि केन्द्र शासन ने भी इस ज्वलंत प्रश्न को गंभीरता से लिया है. विदर्भ के 6 जिलों को प्रधान मंत्री के माध्यम से 3 हजार 700 करोड़ रुपए का पॅकेज दिया गया. इस पॅकेज के द्वारा सिंचन व्यवस्था को सुधारने का काम, किसानों को अच्छे दर्जे के बीज देने का काम, जोड़ धन्धे के लिए प्रोत्साहन, पीक कर्ज और ब्याज माफ करने का नियोजन किया गया है. ये सभी सुविधाएं पॅकेज के माध्यम से किसानों को दी जा रही हैं. किसानों की आत्महत्या रोकने के लिए शॉर्ट टर्म रिलीफ के साथ साथ, लॉंग टर्म मेजर्स भी लिए जाएं, तभी हम किसानों की मुश्किल दूर कर सकेंगे, ऐसा मैं समझती हूँ.

सभापति महोदय, हमारे माननीय नेता श्री. शरद पवार ने जब केन्द्रीय सरकार में कृषि मंत्री का पद संभाला था, तब कृषि मंत्रालय का 65 हजार करोड़ रुपए का अर्थ संकल्प था और इस वर्ष के केन्द्रीय सरकार के बजट में 1 लाख 95 हजार करोड़ रुपए की तरतूद किसानों के लिए की गई है. इसी तरह से महाराष्ट्र राज्य के किसानों के लिए 6 प्रतिशत की ब्याज दर पर कर्ज उपलब्ध किया जा रहा है. कृषि उत्पन्न बाजार समिति के कायदे में बदल करके किसानों को सीधे मार्केट का लाभ देने का कार्य किया गया है. इन सारे उपायों से किसान को लाभ होगा. इन सब बातों के बावजूद आत्महत्या का कारण कहीं न कहीं उसकी सोच, उसकी मानसिकता पर

. . . LL-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान

निर्भर करता है. जो कर्ज लेता है, उसके बारे में हमारी मानसिकता ऐसी है कि शासन से लिया हुआ कर्ज अनुदान है, उसको रि-पे करने की आवश्यकता नहीं है. ऐसी एक मानसिकता बनी हुई है.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ...

और यह जो कर्ज का बोझ किसानों पर पड़ता है, उससे वह कर्ज के चक्रव्यूह में फंसता चला जाता है.कर्ज के चक्रव्यूह से बाहर आना आसान नहीं होता. फिर यह स्थिति किसानों को आत्महत्या की ओर ले जाती है, ऐसा मैं समझती हूं. इसलिए मैं यह जरुरी समझती हूं कि शासन की ओर से किसानों को अवेअर किया जाए और उसके माध्यम से किसानों की मानसिकता बदलने की कोशिश की जाए. अवेअरनैस प्रोग्राम के तहत किसानों को बताया जाए कि उन्होंने बैंक से जो कर्ज लिया है या शासन की तरफ से जो पैसा लिया है, उसे वापस करना है. वह पैसा माफ नहीं होगा. दूसरी बात यह है कि किसानों को जो कर्ज दिया जाता है,वह पर्याप्त नहीं होता है. इसलिए किसानों को इतना कर्ज दिया जाए कि उस राशि से उनका प्रोजेक्ट पूरा हो सके. आवश्यकता के अनुसार पैसा मिलेगा तभी वह उपयोगी होगा अन्यथा नहीं. देखा जाता है कि किसानों को थोड़ा-सा पैसा दिया जाता है तो वह पैसा किसी और काम पर खर्च हो जाता है. फिर किसान कर्जबाजारी की अवस्था में पहुंच जाता है. पूरे देश के किसानों की दयनीय अवस्था का सबसे बड़ा कारण यह है कि, कृषि उत्पादों पर अन्न प्रक्रिया का अभाव. विभिन्न देशों में कृषि उत्पादों पर अन्न प्रक्रिया का प्रतिशत इस प्रकार है, यूएसए में 66 प्रतिशत, थायलेंड में 95 प्रतिशत, मलेशिया में 85 प्रतिशत और भारत में केवल 2 प्रतिशत कृषि उत्पादों पर अन्न प्रक्रिया होती है. यह बहुत गंभीर बात है. इसलिए किसानों की आर्थिक स्थिति को बेहतर बनाने के लिए सरकार को इस दिशा में सोचना होगा और कृषि उत्पादों पर अन्न प्रक्रिया करने के लिए किसानों को अवेअर करना होगा. मेरा यह सुझाव है कि इस दिशा में शासन कदम उठाए. बड़े बड़े कारखाने खोलना अलग चीज़ है और ये छोटी छोटी चीजों का उत्पादन करना अलग चीज है. लेकिन हम इन छोटे उद्योग-धंधे खोलकर किसानों की हालत सुधार सकते हैं. इसलिए कृषि उत्पादों पर अन्न प्रक्रिया करने के लिए शासन की ओर से योजना बनाई जाएगी तो किसानों को बहुत फायदा हो सकता है. सेल्फ हेल्प ग्रुप अच्छा काम कर रहे हैं लेकिन उन्हें सही दिशा नहीं मिल रही है. एमसीईडी की जो ट्रेनिंग संस्था है, उनकी तरफ से फेडरेशन की बात कही गई है. लेकिन यह फेडरेशन का काम कहीं न कही् फुड प्रोसेसिंग से संबंधित प्रोजेक्ट मेकिंग का होना चाहिए, मार्केट की व्यवस्था का भी विचार होना चाहिए. इस तरह से फुड प्रोसेसिंग का काम सेल्फ हेल्प ग्रुप के माध्यम से आगे बढ़ सकता है. इसके माध्यम से कई लोगों को रोजगार भी

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ...

प्राप्त होगा. क्योंकि आज लोगों को नौकरी नहीं मिल रही है.इसलिए इस माध्यम से स्वयं रोजगार अभियान ही चलाना चाहिए. किसानों को इसके लिए प्रशिक्षण दिया जाए, उन्हें इस दिशा में अवेअर किया जाए, और कृषि उत्पादों पर अन्न प्रक्रिया करने के लिए किसानों को प्रोत्साहन दिया जाए. इस योजना को सुपर मार्केट से भी जोड़ा जा सकता है. आज सुपर मार्केट में अदरक-लहसून की पेस्ट मिलती है.साफ किया हुआ अनाज मिलता है. तो इस तरह से कृषि उत्पादों पर अन्न प्रक्रिया करके छोटी छोटी चीज़ें बनाकर किसानों को मदद पहुंचायी जा सकती है. इसलिए मेरा यह भी सुझाव है कि फुड प्रोसेसिंग को सुपर मार्केट से जोड़ा जाए. चूंकि इस योजना को सुपर मार्केट से जोड़ना मुश्किल काम नहीं है, सिर्फ शासन को प्रयत्न करने की आवश्यकता है.

सभापति महोदय, माननीय राज्यपाल जी के अभिभाषण में मानव विकास मिशन स्थापित किए जाने का जिक्र किया गया है.इस मिशन के द्वारा शिक्षा, आरोग्य के कार्य किए जाएंगे साथ साथ इसके माध्यम से प्रति व्यक्ति आय बढ़ाने की भी कोशिश की जाएगी. इस मिशन के लिए 50 करोड़ रुपये की राशि उपलब्ध कराई गई है. मैं इसका स्वागत करती हूं. लेकिन 50 करोड़ रुपये की तरतूद बहुत कम है, यह तरतूद बढ़ायी जानी चाहिए. इस योजना के तहत भी किसानों को राहत मिल सकती है. खास तौर से मराठवाड़ा के किसानों को राहत मिल सकती है.

सभापति महोदय, राज्य की ग्रामीण महिलाओं को समर्थ बनाने के लिए तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम कार्यान्वित करने का सरकार ने निर्णय लिया है. यह कार्यक्रम एक साल पहले से शुरु हो चुका है. लेकिन आज इस योजना पर अमल होता नहीं दिख रहा है.

इसके बाद श्री शर्मा..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान जारी (पूर्वी तालेवार)

सभापति महोदय, अंगनवाडी के बारे में नियोजन बराबर नहीं किया जाता है. उनके बिल 4 महीने तक नहीं मिलते हैं तो गरीब महिलाएं किस तरह से इस काम को संभालकर आगे बढ़ा सकती है. इसी तरह से महिला बचत गट के बारे में मैंने इस सभागृह में पहले भी मुद्दा उठाया है कि दुग्ध एवं पशु-पालन विभाग को कुछ न कुछ रिजर्वेशन महिला बचत गट के लिए करना चाहिए. इससे बहुत बड़ा फायदा हो सकता है. महिलाएं बहुत प्रामाणिक तरीके से गांव में दूध का कारोबार कर सकती हैं.

सभापति महोदय, कम्युनिटी मेरिज के निर्णय का मैं स्वागत करती हूँ. लेकिन यह योजना 6 जिलों से बढ़ाकर दूसरे जिलों के लिए भी लागू करनी चाहिए. दूसरे जिलों में भी किसान आत्महत्या कर रहे हैं. परभणी जिले में भी आत्महत्याएं हो रही हैं. कम्युनिटी मेरिज की सुविधा बहुत अच्छी है और यह दूसरे जिलों में भी पहुंचनी चाहिए.

सभापति महोदय, शासन एक कुटुंब के समान होता है और कुटुंब प्रमुख को अपने परिवार के सभी सदस्यों का ध्यान रखना पड़ता है. इस बात को नजरअंदाज न करते हुए शासन का मार्गक्रमण जारी है. एक माली को पूरे बगीचे के प्रत्येक पेड़ पौधे को खत पानी देना पड़ता है, उसके सिवाय चमन खूबसूरत नहीं हो सकता है. मैं आपके सामने एक शेर पेश करना चाहती हूँ:

"सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ताँ हमारा,
हम बुलबुलें हैं उसकी यह गुलिस्ताँ हमारा."

हमें गुलशन के हर रंग के फूलों का ध्यान रखना पड़ेगा. राज्यपाल महोदय के अभिभाषण में भले ही राज्य को प्रगति पथ पर रखने का अभिवचन है, लेकिन इसमें सामाजिक न्याय को नजरअंदाज किया गया है, ऐसा मैं मानती हूँ. ऐसी कई बातें हैं, जिनका उल्लेख इस अभिभाषण में होना चाहिए था. भूमिहीन दलित कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान योजना की शर्तें बहुत जाचक हैं. इन शर्तों की वजह से दलित समाज को जमीन नहीं मिलती है. कई विभागों का इसके साथ संबंध होने की वजह से कठिनाई आती है और कई साल लग जाते हैं. हमें यह योजना सिंगल अथॉरिटी के माध्यम से लागू करनी चाहिए.

. . . NN 2

17-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) NN-2
RDB/ SBT/ MAP/ 2.15

. . . श्रीमती फौजिया खान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, "डॉ. बाबासाहेब अंबेडकर सामाजिक न्याय भवन" एक अच्छी योजना है. आजकल जमीन का अधिग्रहण बहुत कठिन हो गया है, इसलिए यह कार्यक्रम अमल में कैसे आएगा. जमीन अधिग्रहण का काम सरल करने की आवश्यकता है.

सभापति महोदय, जिस तरह से मागासवर्गीय समाज बहुत पिछड़ा हुआ है, उसी तरह से मुसलिम समाज भी बहुत पिछड़ा हुआ है. सच्चर कमीशन ने इसके बारे में रिपोर्ट दी है. केन्द्रीय सरकार ने इस बात को स्वीकार करते हुए उनके लिए कई वेलफेयर स्कीम्स घोषित की हैं. ये स्कीम्स अमल में लाने का जिक्र इस अभिभाषण में कहीं पर दिखाई नहीं देता है. इस बात का कहीं न कहीं जिक्र होना चाहिए.

सभापति महोदय, मौलाना आजाद फायनेंसियल कारपोरेशन से लोगों को लोन नहीं मिलता है, क्योंकि इसकी "अट" बहुत मुश्किल हैं. ये "अट" जब तक हम कम नहीं करेंगे, तब तक लोगों को सामाजिक न्याय नहीं दे सकेंगे. अगर विकास की गाड़ी का एक चाक पंक्चर हो जाता है तो विकास की गाड़ी आगे नहीं जा सकती. अब मैं आपके सामने एक शेर पेश करती हूँ :

"ढूंढ उजड़े हुए लोगों में वफा के मोती,
ये खजाने तुझे मुमकिन है खराबों में मिलें."

शासन को यह बात ख्याल में रखनी होगी, तभी शासन को मत मिल सकते हैं. हमें इन लोगों का ख्याल रखना पड़ेगा. अगर हमने इनका ख्याल नहीं रखा तो निश्चित रुप से हमें भुगतना पड़ेगा.

सभापति महोदय, गरीब मरीजों की मदद के लिए जीवनदायी स्वास्थ्य योजना शुरु की गई है. अब तक यह योहना ह्रदय, किडनी एवं दिमाग की बीमारी के उपचार तक ही सीमित थी लेकिन अब कैंसर जैसे रोग का उपचार भी इस योजना के तहत किया जाएगा. लेकिन बीपीएल कार्डधारकों की सूची देखेंगे तो यह दिखाई देगा कि उसमें बड़ी बड़ी इमारतों में रहने वाले लोगों का भी समावेश किया गया है. इसलिए मेरा यह सुझाव है कि आर्थिक दृष्टि से कमजोर लोगों को अलग से प्रमाणपत्र देने की व्यवस्था की जाए ताकि सही मायनों में उनको इसका फायदा मिल सके. क्योंकि आज हम यह देख रहे हैं कि जो सचमुच गरीब मरीज है, उसे इस योजना का फायदा नहीं मिल रहा है और वे बेचारे इलाज के अभाव में मर रहे हैं. इसलिए गरीब लोगों को

. . . NN 3



. . . . श्रीमती फौजिया खान

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ही इस योजना का फायदा मिल सके इसलिए कोई न कोई रास्ता निकालने की आवश्कता है, ऐसा मुझे लगता है. इसलिए गरीबों को अलग से कोई कार्ड या प्रमाणपत्र देने की व्यवस्था की जाए.

सभापति महोदय, सरकार ने यह खुद कबूल किया है कि सर्व शिक्षा अभियान के अन्तर्गत सर्वे से पता चला है कि 6 से 14 आयु वर्ग के लगभग 4 लाख 30 हजार बच्चे विद्यालय छोड़ चुके हैं. सम्माननीय सदस्य श्री कपिल पाटील ने कहा कि जितने भी शिक्षा कार्यक्रम है, जैसे सर्व शिक्षा अभियान, वस्तीशाला इत्यादि, ये सब मर्ज करके बजट का 6 प्रतिशत प्रावधान केवल शिक्षा क्षेत्र के लिए ही किया जाए. मैं उनसे सहमत हूं. भारत के संविधान में सभी को उत्तम शिक्षा सुविधा प्राप्त करने का अधिकार प्राप्त है. लेकिन क्या सभी को शिक्षा प्राप्त हो रही है ? मुझे ऐसा लगता है कि जिस प्रकार से सारी योजनाओं का बोजवारा उड़ रहा है, उसी तरह से शिक्षा अभियान का भी न हो. इसलिए शासन की यह जिम्मेदारी है कि सभी को शिक्षा की सुविधा मुहैया कराए. अत: इस दिशा में शासन को कदम उठाना चाहिए, ऐसी मेरी मांग है. उसी प्रकार से बालवाड़ी पूरी तरह निग्लेक्ट है. छोटे बालकों की शिक्षा पर भी उचित ढंग से ध्यान नहीं दिया जा रहा है. इन बच्चों को शिक्षा देने के लिए जिन शिक्षकों की नियुक्ति की जाती है, उन्हें उचित प्रशिक्षण दिया जाना चाहिए. 80 प्रतिशत बौध्दिक विकास छोटी आयु में ही होता है. लेकिन उस ढंग से छोटे बच्चों को शिक्षा ही नहीं मिल पाती है. इन बच्चों को 8 वी पास शिक्षक पढ़ाते हैं.अब ये 8 वी पास शिक्षक क्या उचित ढंग से बच्चों का बौध्दिक विकास कर पायेंगे ? होना यह चाहिए कि बालवाड़ी में जाने वाले बच्चों को पढ़ाने के लिए, उनका बौध्दिक विकास करने के लिए अच्छी तरह से प्रशिक्षित और उच्च शिक्षित शिक्षक अच्छे वेतन पर रखे जाने चाहिए लेकिन इसका उल्टा होता है. बालवाड़ी में कम पढ़े-लिखे शिक्षक कम पगार पर रखे जाते हैं. इसलिए मेरा यह सुझाव है कि बालवाड़ी के बच्चों को पढ़ाने के लिए प्रशिक्षित और एक्सपर्ट ही रखे जाए. सरकार की तरफ से इस दिशा में कदम उठाये जाने चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण समाप्त करती हूं. धन्यवाद.

......

भाषण पूर्ण. नंतर श्रीमती गो-हे का भाषण.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 14:20

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

मी माननीय राज्यपालांचे अभिभाषण तपशीलवार वाचलेले आहे. अभिभाषणातील पहिल्या तीन, चार आणि पाच क्रमांकाच्या मुद्यामध्ये नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भाने उल्लेख केलेला आहे. अभिभाषणातील 79व्या मुद्यामध्ये बॉम्बस्फोटासारख्या दुर्घटनांचा यशस्वीपणे तपास केल्याने जनसामान्यांचा शासन व पोलीस यंत्रणेवरील विश्वास वाढला, असे म्हटलेले आहे. बॉम्बस्फोटाच्या संदर्भात माझी अपेक्षा अशी होती की, बॉम्बस्फोटामध्ये उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबाच्या पुनर्वसनासंबंधी, बॉम्बस्फोटाचे जे खटले अनेक वर्षे प्रलंबित आहेत त्या बाबतीत योग्य तो न्याय मिळण्यासंबंधी, बॉम्बस्फोटातील गुन्हेगार शाबीत होण्यासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असेल, परंतु अशा प्रकारचा कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. बॉम्बस्फोटामध्ये मृत्यू पावलेल्या आणि जखमी झालेल्या कुटुंबांच्या हालअपेष्टां वाढलेल्या आहेत. बॉम्बस्फोटाचा तपास करणा-या भट या कार्यक्षम अधिका-याचा मृत्यू संशयास्पद रीतीने झालेला आहे. असे असताना पोलीस यंत्रणेवरचा विश्वास वाढलेला आहे असे जे शासन म्हणत आहे त्याचा मला खेद होतो.

गेल्या वर्षीच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये शासनाने 113 कोटी रुपये खर्च केले असे सांगितले गेले. अतिवृष्टी झाल्यानंतर महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांमध्ये आमच्या पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि मी स्वत: देखील गेले होते. काही ठिकाणी वर्ष झाले तरी लोकांना नुकसान भरपाई मिळालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. आता पूररेषा नव्याने आखली जाणार आहे. ज्यांना वारंवार पुराचा फटका बसतो अशा लोकांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत शासनाने कोणतेही धोरण आखलेले नाही. दरवर्षी शेकडो माणसे आपली गुरे-ढोरे, बायका-मुले, असा सारा संसार गाडीमध्ये भरुन स्थलांतर करताना दिसतात. भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी लोकांनी आपल्या संपूर्ण संसारासह जसे स्थलांतर केले तशा प्रकारचे दृश्य सांगली, कोल्हापूरमध्ये पुराचा फटका जेथे बसत असतो त्याठिकाणी दिसते. हे लोक जेव्हा स्थलांतर करतात त्यावेळी शासन त्यांच्यासाठी साधी वाहनाची देखील व्यवस्था करीत नाही. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाच्या बाबतीत शासनाने आवश्यक ते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 14:20

(डॉ. नीलम गो-हे...)

सहकार्य केलेले आहे असे अभिभाषणामध्ये नमूद केलेले आहे.

सभापती महोदय, मुंबई आणि ठाणे हे भाग देखील भूकंपाचे केन्द्रबिंदू आहेत. तसेच ग्लोबल वॉर्मिंगमुळे पुढच्या 25 वर्षामध्ये समुद्राच्या पाण्याची पातळी वाढणार आहे असे वर्तमानपत्रातून छापून आलेले आहे. अशा वेळी नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन कसे करणार याबाबतीत शासनाने कोणतेही पावले उचललेली नाहीत. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासाठी जो निधी प्राप्त झाला त्याचा विनियोग कशा प्रकारे करण्यात आला ? डिझास्टर मॅनेजमेंट सेंटर उभे केलेले आहे त्यामधून किती लोकांना प्रशिक्षण दिले ? यासंबंधी अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख नाही याचा मला खेद होतो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे........

दुसरा एक महत्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे महाराष्ट्र राज्याचे माजी न्यायमूर्ती श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी दिनांक 16 ऑगस्ट, 2006 रोजी एक विस्तृत लेख दै.महाराष्ट्र टाईम्समध्ये लिहिला होता. त्या विषयाचा पाठपुरावा सन्माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी स्वत: पंतप्रधानांकडे केला आहे. तो विषय म्हणजे 1995 या वर्षी महाराष्ट्र विधानसभेने गोवंश हत्या बंदी विधेयक पारित केले. गुजराथ सरकारने अशा प्रकारचा कायदा पारित केला आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या काही वेगवेगळया निर्णयामुळे या कायद्याला प्रतिबंध होतो की काय अशी शंका निर्माण झाली आहे. परंतु सुप्रीम कोर्टाच्या 7 न्यायाधीशांच्या संविधान खंडपीठाने असा निकाल दिला की, हा कायदा योग्य आहे. महाराष्ट्र राज्याला स्वत: पारित केलेला कायदा अंमलात आणायचा आहे का? स्वत:च्या विधानसभेने पारित केलेला कायदा मान्य करीत असताना केंद्र सरकारने पुन्हा विचारणा केली की, राज्यात अनेक सरकारे बदलली, त्यामुळे महाराष्ट्राला कायदा अंमलात आणायचा आहे का? सरकार बदलले म्हणजे विधानसभेने केलेले कायदे संपूर्ण गैरलागू होतात का? गोवंश हत्या बंदी विधेयकामध्ये कल्पना अशी आहे की, घटनात्मकरित्या गायींची हत्या करता येणार नाही. या संदर्भात शासनाचा निर्णय आहे. पश्चिम बंगालमध्ये कम्युनिस्टांचे शासन आहे. त्या राज्यात ईदच्या दिवशी गायींची हत्या होत नाही. तसा कायदा पश्चिम बंगाल विधानसभेने पारित केला आहे. आपल्या कायद्यानुसार तो बैल लुळा पांगळा असेल, शारिरीकदृष्टया अपंग असेल तर त्याची हत्या करायला परवानगी मिळते. म्हणून ईदच्या सुमारास पनवेलजवळ बैलांचे डोळे फोडले जातात, हात-पाय तोडले जातात, त्यांना अपंग केले जाते, ते जखमी कसे आहेत असे दाखवून हत्या करण्याची सरसकट परवानगी मिळविली जाते. महाराष्ट्राच्या गृह विभागाने या संदर्भात निर्णय घेतला की, या कायद्याची अंमलबजावणी केली पाहिजे, ईदच्या दिवशी गायी व बैलांना कापायची परवानगी मिळणार नाही. महाराष्ट्राच्या कृषि विभागाने याला विरोध केला. पशुसंवर्धन विभागाने सांगितले की, गृह विभागाचा निर्णय मान्य नाही. गायी व बैलांची हत्या होणारच. न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी प्रश्न विचारला की, गुजराथमध्ये काँग्रेसचे सरकार असताना गोवंश हत्या बंदी कायदा पारित केला गेला. केंद्रामध्ये काँग्रेसचेच सरकार आहे. अशा वेळेला महाराष्ट्राला स्वत: पारित केलेला कायदा का मंजूर करायचा नाही? या संदर्भात महाराष्ट्र शासनाकडे काय उत्तर आहे? हा लोकांच्या भावनांशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे........

संबंधित प्रश्न आहे. सोमवारी गुढीपाडवा हा हिंदू नववर्षाचा दिवस आहे. अशा वेळेला महाराष्ट्र सरकार गोवंश हत्या बंदी कायदा कचऱ्याच्या टोपलीत टाकायला निघाले आहे. माजी न्यायमूर्तींनी जी अपेक्षा व्यक्त केली, वारंवार राज्य सरकारशी पत्रव्यवहार केला, हजारो गोवंश संस्था आहेत त्यांनी राज्य सरकारकडे व केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला या मुद्याचा उल्लेख राज्यपालांना अभिभाषणात करावासा वाटला नाही याबद्दल खेद होतो. ज्यावेळी शासनाकडून उत्तर मिळेल त्यावेळी 1995 साली गोवंश हत्या बंदी विधेयक मंजूर केले ते धोरण शासन मान्य करणार की नाही याचे स्पष्टीकरण मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे वेगवेगळे नवीन प्रकल्प आले. एसईझेडच्या माध्यमातून शासनाने स्वत:ची पाठ थोपटून घेतली. आम्ही एसईझेडला विरोध केलेला नाही. नागपूरच्या अधिवेशनामध्ये ठराव आणि अर्ध्यातासाची चर्चा झाली, अडीच तासाची वेगळी चर्चा झाली. वारंवार हा मुद्दा समोर आला की, नापिकी जमिनी घेतल्या पाहिजेत. लोकसभेत देखील पंतप्रधान, उद्योगमंत्री व अर्थमंत्री यांच्याकडून निवेदन केले गेले की, नापिकी जमिनी घेतल्या जाणार आहेत. प्रत्यक्षात पुणे व रायगड जिल्हयात सुपीक जमिनी एसईझेडच्या नावाखाली ताब्यात घेण्याचा उद्योग चालला आहे. या संदर्भात पुनर्वसन पॅकेज दिले असे म्हणतात. परंतु लोकांना विश्वासात घेऊन काम केले पाहिजे. नापिकी जमिनी घेतल्या पाहिजेत याबद्दल शासनाने धोरण स्पष्ट झालेले नाही. परंतु या संदर्भात दखल किंवा यत्किंचित उल्लेख सुध्दा नाही. पुनर्वसनाच्या संदर्भात शासनाने विचार केला आहे याची जाणीव देखील राज्यपालांच्या अभिभाषणात दिसत नाही याचा खेद वाटतो.

सभापती महोदय, 76 व्या मुद्यानुसार पर्यटनाला चालना देणार असे शासनाने म्हटले आहे. हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. याबाबत मला सुचवावेसे वाटते की, 78 व्या मुद्यामध्ये स्मारके संरक्षित करण्याच्या संदर्भात उल्लेख केला आहे. महाराष्ट्रामध्ये धार्मिक पर्यटन मोठया प्रमाणात होऊ शकते. अष्टविनायक व पंढरपूर यात्रा यांचा जगातील आणि इतर प्रांतातील लोकांच्या दृष्टीने धार्मिक पर्यटन म्हणून उल्लेख यावयास हवा होता.

(नंतर श्री.जुन्नरे..

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ......

या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या सुविधा दिल्या जात नाही किंवा तीर्थस्थळावर जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची कनेक्टीव्हीटी दिली जात नाही. समजा अष्ट विनायक, शिर्डी, पंढरपूर, कोल्हापूर या ठिकाणच्या तीर्थस्थळावर जावयाचे असेल तर कोणत्याही प्रकारची कनेक्टीव्हीटी दिली जात नाही तसेच या ठिकाणी गेलो तर भाविकांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. त्यामुळे धार्मिक पर्यटनासाठी शासनाने कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. साऊथमध्ये धार्मिक पर्यटनासाठी कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन दिली जात असते तसेच धार्मिक पर्यटनाच्या संदर्भात मोठया प्रमाणात जाहिराती दिल्या जातात परंतु आपला पर्यटन विभाग धार्मिक पर्यटनासाठी काहीही एक काम करीत नाही, त्यामुळे आपल्या पर्यटन विभागाने यासाठी काही तरी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गेल्या काही वर्षाच्या माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात स्त्री जन्मदर आणि मृत्यूदराच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला होता. अगोदर आपल्या येथे स्त्री जन्मदराची संख्या अधिक होती परंतु आपल्या माननीय राज्यपाल महोदयांच्या यावर्षीच्या अभिभाषणात स्त्री जन्मदराची संख्या कमी झाली आहे की, वाढली आहे याची माहिती मिळत नाही त्यामुळे या विषयाचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी करावयास पाहिजे होता असे मला वाटते.

सभापती महोदय, सन 2001 मध्ये महिला धोरणाच्या संदर्भात चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख साहेबांनी सांगितले होते की, स्त्री आर्थिक केंद्र धोरण राज्याने स्वीकारलेले आहे. परंतु यासंदर्भात काहीही वाटचाल झालेली दिसत नाही. स्त्रियांच्या संदर्भात सांगावयाचे झाल्यास, मंत्रालयातील आय.ए.एस. महिला अधिका-यांना प्रथम दर्जाचे पद दिले जात नाही. या महिला आय.ए.एस. अधिका-यांना नेहमी सेकंडरी स्वरुपाची पदे दिली जातात. या महिलांची क्षमता चांगली असतांना सुध्दा त्यांना डावलले जाते. यासंदर्भात या महिला आय.ए.एस. अधिकारी माननीय मुख्यमंत्रीमहोदयांना देखील भेटल्या होत्या परंतु तरी सुध्दा या महिलांना अद्यापपावेतो न्याय मिळालेला नाही. महिलांना नेहमी दाबून ठेवण्याचेच काम केले जात आहे. हे शासन नेहमी पुरोगामित्वाचा उदो उदो करीत असते परंतु मंत्रालयातील आय.ए.एस.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ......

अधिका-यांची अशी स्थिती असेल तर सर्व सामान्य महिलांची काय स्थिती असेल याची कल्पनाच केलेली बरी. त्यामुळे ज्या महिलांची क्षमता असेल त्या प्रमाणे स्थान मिळण्याची आवश्यकता आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, मला दुसरा मुद्दा असा मांडावयाचा आहे की, हे शासन एका बाजूला महिला आरक्षणाचा उदो उदो करीत असते परंतु या राज्याच्या मंत्रिमंडळात महिलांची संख्या किती आहे? विधान परिषद किंवा विधान सभेतील किती तरी सन्माननीय सदस्या किती तरी चांगल्या प्रकारचे काम करु शकतील अशी त्यांची क्षमता आहे परंतु हे शासन महिलांना मंत्रिपद देत नाही. ज्या महिला आमदार आहेत त्यांच्याकडे चांगल्या प्रकारची गुणवत्ता आहे परंतु असे असतांनाही महिला सदस्यांना मंत्रिपदापासून डावलले जात आहे ही वस्तुस्थिती सभागृहात उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्या मान्य करतील. राजकारणातील स्त्रियांना तीन फे-यातून जावे लागते. पहिल्यांदा महिलांना गुणवत्ता सिध्द करावी लागते, कार्यक्षमता सिध्द करावी लागते. त्यानंतर महिलांना गुण-दुर्गुणांना तोंड द्यावे लागते. नंतर महिला सत्तेजवळ पोहचल्यानंतर काही तरी कारण दाखवून त्यांना डावलले जाते. परंतु हिंदू ह्दय सम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे तसेच माननीय उध्दव ठाकरे यांनी महिला हया रणरागिणी आहेत त्यामुळे त्यांना योग्य तो न्याय दिलाच गेला पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे आणि तो विचार ते प्रत्यक्षात अंमलात देखील आणतात.

सभापती महोदय, हे शासन नेहमी महिला बचत गटाचा उल्लेख करीत असते. खरे म्हणजे महाराष्ट्रात एकूण खेडी किती आहेत व संपूर्ण बचत गटाची संख्या किती आहे याची माहिती काढली तर आपल्याला सर्व काही समजून येईल. खेडयातील 10-15 टक्के सुध्दा महिला, महिला बचत गटात नाहीत. ज्या महिला जंगलात लाकडे गोळा करतात, शेतात दिवसभर काबाडकष्ट करतात, ज्यांना एकवेळ खाण्याची भ्रांत आहे अशा महिलांना या बचतगटाचा काही एक उपयोग होत नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

गरीब, भुकलेल्या महिलांना सरकार बचतगटाचा सल्ला देत आहे. बचत गट हे एक माध्यम आहे पण एकमेव माध्यम नाही हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी निर्माण केलेल्या वस्तूंचे शासन प्रदर्शन भरवित आहे, परंतु त्यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देत नाही. ग्रामसभेत बचत गटातील महिला त्यांच्या उपेक्षा मांडतात, परंतु त्याची प्रतिपूर्ती शासनामार्फत होत नाही. याचा शासनने विचार केला पाहिजे. मी मांडलेले मुद्दे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नसल्यामुळे खेद व्यक्त करते आणि पुढील वर्षी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सुधारणा होईल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करते.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांचे आणि सरकारचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. माननीय राज्यपालांना राज्यातील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी सरकारला माझे शासन म्हणावे लागते याबद्दल त्यांच्या मनात कदाचित खेद वाटत असावा. कारण माननीय राज्यपालांनी मनाचा मोठेपणा दाखवून वेळोवेळी आघाडी सरकारला शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विजेचे वाढते भारनियमन, सिंचनातील अनुशेष इत्यादी मुद्यांवरुन राज्य सरकारवर टीका केली आहे. परंतु बरेचदा राजकारणात आपल्या मनाविरुध्द अनेक गोष्टी कराव्या लागतात. माननीय राज्यपालांचीही अवस्था अशीच होत असावी, सहन होत नाही आणि सांगता येत नाही. माननीय राज्यपाल महोदयांनी जरी सालाबाद प्रमाणे आघाडी सरकारच्या आलबेल कारभाराबाबत आनंद व्यक्त केला असला तरी त्यांच्या मनातील सत्य आम्ही ओळखतो.

माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आणि या सभागृहाच्या आदरणीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांच्या बाबतीत वाटले होते की, त्यांच्यावर उत्तरे देण्याची वेळ येईल. परंतु सालाबाद प्रमाणे याही वर्षी त्यांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या प्रस्तावावर आभार प्रदर्शन करण्याची संधी मिळाली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

राज्यात आजही शेतकरी आत्महत्या करीत आहेत. आजही विजेच्या भारनियमनाने जनता त्रस्त आहे. परीक्षांच्या मोसमात मुलांच्या दफ्तरात वह्या-पुस्तकांसह भारनियमनाचे वेळापत्रकही ठेवण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. एका मागून एक उद्योगधंदे बंद होत आहेत. राजकीय नेत्यांच्या दिवसाढवळ्या हत्या होत आहे. राजकीय पक्षांच्या उमेदवारांचे हात प्रतिस्पर्धी पक्षाकडून कलम केले जात आहेत. पाणी, वीज, रस्त्यांची दुर्दशा यांच्या त्रासाला कंटाळून जनता स्वयंस्फूर्तपणे रस्त्यावर उतरुन आंदोलन करीत आहे. त्यांच्यावर पोलिसांकरवी गोळीबार होत आहे. गेल्या चार वर्षात राज्यात 655 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ग्रामीण भागात 18-18 तासांचे लोडशेडींग होत असल्यामुळे जनता त्रस्त आहे. उमरेड येथे नागरिकांनी भारनियमाच्या विरोधात रस्त्यावर आंदोलन केले त्यांच्यावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यामध्ये चार शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. पण तरीही सहृदयी आणि सुसंस्कृत माननीय राज्यपाल मनाचा मोठेपणा दाखवून सरकारच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करीत आहेत, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

सभापती महोदय, सुप्रसिध्द, ख्यातनाम गझलकार स्व.सुरेश भट यांनी त्यांच्या एका कवितेत म्हटले आहे की,

सूर्य केव्हाच अंधारला यार हो
या नवा सूर्य शोधू चला यार हो
हे पहा आले नवे पहारेकरी
कैदखाना कोठला नवा यार हो

सभापती महोदय, आज राज्याचा अक्षरश: कैदखाना झालेला आहे. जनता भरडली जात आहे. राज्यकर्ते जनतेच्या जखमांवर मीठ चोळण्याचं काम करीत आहेत,. तरीही राज्यपाल म्हणतात माझे शासन चांगले काम करीत आहे.

सभापती महोदय, मी देखील आज पुन्हा एकदा राज्यपाल महोदयांचे, आघाडी सरकारचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री महोदयांचे आणि महाराष्ट्रातील कुलपती व माझे मित्र डॉ. पतंगराव कदम यांचे अभिनंदन करणार आहे.

राज्यातील भीषण परिस्थितीचे एकापेक्षा एक इरसाल नमुने माझ्यासमोर आज नाचत आहेत.

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 14:40

श्री.नितीन गडकरी....

गीतरामायणकार ख्यातनाम कवी, ग.दि.माडगूळकर यांच्यासमोर शब्द नाचत नाचत येत असत आणि मला घ्या, मला घ्या असे म्हणत असत. त्याचप्रमाणे आज राज्यातील विविध प्रश्न, समस्या आणि विदारक सत्य परिस्थिती माझ्यासमोर नाचत नाचत येत आहे आणि माझा उल्लेख करा, माझा उल्लेख करा, असा आग्रह करत आहे. मी त्या सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे.

एका वर्तमानपत्रामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना आलेले एक अतिशय सुंदर पत्र मी पाहिले. माझे सुसंस्कृत मित्र, माननीय उल्हास पवार साहेबांनाही ते आवडेल. याठिकाणी मी ते पत्र वाचणार आहे. माझे विचार त्यांनी जरुर त्यांच्या खास मित्रांना सांगावेत, अशी मी त्यांना अतिशय नम्र विनंती करतो. हे पत्र पुढीलप्रमाणे आहे. "माननीय मुख्यमंत्री, विलासराव देशमुख यांस, स.न.वि.वि., भारनियमनामुळे अनेक उद्योगधंदे बंद पडले आहेत किंवा त्यांच्यावर विपरित परिणाम घडला आहे, असे लोक म्हणतात. परंतु त्यामुळेच इनव्हर्टर व जनरेटर आणि तत्सम उद्योगांमुळे नवीन रोजगार निर्माण झाले आहेत. भारनियमनामुळे बहुमजली इमारतीतील लिफ्ट बंद आहेत, पण त्या कारणामुळेच लोकांना सहा ते सात मजले जिन्यावरुन चढत जावे लागते. परिणामी, लोकांनी दररोज व्यायाम करावा हे तुमचे उद्दिष्ट साध्य होत आहे. लोक हेल्थ क्लबमध्ये पैसे मोजून तंदुरुस्त राहण्यासाठी स्टीम बाथ घेतात, पण तुम्ही विनामूल्य ती सोय उपलब्ध करुन दिली आहे. कारण, अर्थातच भारनियमनामुळे पंखे चालत नाहीत. मुले तुम्हाला आनंदाने दुवा देत आहेत, कारण विद्युतपुरवठा नसल्यामुळे परीक्षेचा काळ असूनही पालक मुलांच्या मागे अभ्यास करा, असा लकडा लावत नाहीत. विशेष म्हणजे, भारनियमनामुळे "सांस-बहू"सारख्या टीव्हीवरील कंटाळवाण्या मालिकांपासून लोकांची मुक्तता झाल्यामुळे त्यांचा उत्साह कायम राहण्यास मदतच झाली आहे. पूर्वी लोक मोठया हॉटेलात हजारो रुपये मोजून मेणबत्तीच्या प्रकाशात हौसेने मेजवानी घेत, पण आता भारनियमन करुन तुम्ही ती सोय घराघरात उपलब्ध करुन दिली आहे. 50 वर्षापूर्वी वीज नसताना लोक कसे राहत होते, याचा फ्लॅशबॅक तुम्ही दाखवित आहातच, शिवाय ग्रामीण भागाचे दर्शन तेथे न जाताच आम्हाला घडवित आहात. एवढे सगळे फायदे दिसत असूनही काही नतद्रष्ट माणसे, म्हणजे माननीय रावते साहेबांसारखी, मोर्चे वगैरे काढून आपला धिक्कार करीत असतात. तरी त्यांचा आमच्यावर परिणाम होणार नाही, असे दाखवून तुम्ही गेंडयाची कातडी कशी असते, याची शिकवणच लोकांना देत आहात. तुमच्या या उदात्त कार्यामुळे

...2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

हजारो नागरिकांसमोर तुमचा सन्मान करण्याची संधी मला द्यावी."  सभापती महोदय, जसा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यात येतो, तसाच तुम्हाला महाराष्ट्र दूषण हा पुरस्कार देताना आम्हाला अतिशय आनंद होईल.  सभापती महोदय, तीन-चार व्यवसायांनी गेल्या दोन वर्षात फारच भरभराट केली आहे, हे आपल्याला मान्यच करावे लागेल.  या सरकारने काही क्षेत्रामध्ये फारच उत्तम काम केलेले आहे.  इनव्हर्टर, जनरेटर, हेल्मेट आणि मेणबत्या या चार व्यवसायांनी गेल्या दोन वर्षात आघाडी सरकारच्या असंवेदनशील कारभारामुळे सर्वाधिक व्यवसाय केला आहे.  अगोदर काँग्रेसचे कार्यकर्ते बजाज स्कुटरची एजन्सी मिळविण्यासंबंधी मागणी करीत असत, परंतु आता शहरी भागातील व खेडयापाडयातील नेते मंडळी इनव्हर्टरची एजन्सी मिळविण्यासाठी मागणी करीत आहेत.  दारुच्या दुकानाऐवजी ते आज इनव्हर्टरच्या एजन्सीची मागणी करीत आहेत.  कारण सध्या हा धंदा खूप तेजीत चालू आहे.  आज गावा-गावांमध्ये व खेडया-पाडयांमध्ये इनव्हर्टरच्या एजन्सी सुरु आहेत.  या व्यवसायास आपण प्रोत्साहन दिले आहे, त्याबद्दल मी सरकारचे मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांना धन्यवाद देऊ इच्छितो.  सभापती महोदय, प्रगतीशील, विकसनशील, संपन्न आणि समृध्द महाराष्ट्राला गेल्या सात वर्षांच्या राजवटीत या सरकारने कर्जबाजारीपणाच्या, बेरोजगारीच्या आणि अंध:काराच्या खाईत लोटले आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) TT-1

SRR/ KTG/ KGS/ प्रथम श्री.पुरी.... 14:45

श्री.नितीन गडकरी.........

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात 16 ते 18 तास आणि शहरी भागात 8 ते 10 तास भारनियमन असणे हे महाराष्ट्राला भूषणावह नसून दूषणावह आहे आणि म्हणूनच ज्याप्रमाणे महाराष्ट्रातील अनमोल रत्नांना महाराष्ट्र सरकारमार्फत महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार दिला जातो, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील तमाम जनतेकडून महाराष्ट्राची ही दूषणावह परिस्थिती निर्माण करण्याचे पातक ज्या रत्नांनी केले आहे त्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्र्यांना "महाराष्ट्र दुषण" हा पुरस्कार द्या, असे आवाहन मी स्वत: मध्यंतरी केले होते. केवळ मुख्यमंत्र्यांनाच नाही तर या राज्याचे उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील आणि या राज्याचे उर्जामंत्री, श्री.दिलीप वळसे-पाटील या तिघांनाही शिवाजी पार्क येथील मैदानात महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने महाराष्ट्र दूषण या सन्मानाने गौरवांकित केले तर मला वाटते योग्य होईल. एवढेच नव्हे तर सभागृहानेही एकमताने या तिघांच्या अभिनंदनाचा ठराव पास करावा, असे मला वाटते म्हणजे महाराष्ट्रात अशाच प्रकारचे वातावरण निर्माण करण्याकरिता व त्यांचे कार्य वाढविण्याकरिता, लोकांना मेणबत्तीचे जेवण देण्याकरिता आणि आरोग्यपूर्ण ठेवण्याकरिता प्रोत्साहन मिळू शकेल. इतकेच नव्हे तर सभापती महोदय, आपल्या सहयोगाने आणि सौजन्याने सभागृहामध्ये प्रत्येक टेबलवर मेणबत्त्या असाव्यात, सदस्यांच्या गळयात कंदील घालावेत आणि सन्माननीय सदस्य, श्री.उल्हास पवार यांच्यासारख्या साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये काम करणा-या नेत्याची भाषणे मेणबत्तीच्या आणि कंदिलाच्या प्रकाशात ऐकण्याची संधी आपण आम्हाला उपलब्ध करुन द्यावी म्हणजे आम्हाला खूप आनंद होईल. आपल्या सौजन्याने कंदिलाच्या अंधूक प्रकाशात सन्माननीय सदस्य, श्री.उल्हास पवार यांचे विचार ऐकण्याची संधी आम्हाला आपण उपलब्ध करुन द्यावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे. अर्थातच वीज नसल्यामुळे लाऊड स्पिकर यंत्रणा नसल्याने सन्माननीय सदस्यांना आपला आवाज वाढवावा लागेल. मला येथे सांगितले पाहिजे की, या सभागृहातील ॲकोस्टिक अतिशय चांगले आहे, निश्चितच आपले अधिकारी दूरदृष्टीचे आहेत. मी बांधकाम खात्याचा मंत्री होतो त्यामुळे मला याची चांगली माहिती आहे. या सभागृहात कुणी छोटया आवाजात जरी बोलले तरी ते सगळयांना ऐकू येऊ शकते. त्या अधिका-यांनी जरुर विचार केला होता की, भविष्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार येणार आहे, वीज अपूरी पडेल, लोडशेडिंग करावे लागेल, मेणबत्त्या लागतील, लाऊड स्पिकर बंद होतील, त्यामुळे त्यांनी अतिशय चांगला आराखडा तयार

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.............

केला. त्यांनी असा आराखडा तयार केला आहे की, या सभागृहाच्या कोप-यात जरी कुणी बोलले तरी ते सगळीकडे ऐकू येते. त्यामुळे विदाऊट लाऊड स्पिकर आणि मेणबत्ती व कंदिलाच्या अंधूक प्रकाशात सन्माननीय सदस्य, श्री.उल्हास पवार यांच्या विचारांचा आनंद घेण्याची संधी आम्हाला मिळेल, असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, मागील 7 वर्षामध्ये वीज निर्मितीसाठी 13 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची इरादा पत्रं आली होती, असे या सभागृहामध्ये सन्माननीय मंत्रीमहोदयांनी घोषित केले होते, सहयाद्रीवर जेवण झाले, मोठे कौतुक झाले. वर्तमानपत्राचे काही संपादकही अग्रलेख लिहितात कारण त्यांना अजूनही विश्वास आहे. 13 हजार कोटी रुपयांचे वीज प्रकल्प महाराष्ट्रात आणले, विजेचा प्रश्न आता सुटणार, असे नऊ पानी निवेदन करण्यात आले. ही सर्व इरादा पत्रं कुठे घुसली, कुठे धसली, काय झाले त्यांचे, याचा मंत्र्यांनाच पत्ता नाही तर आम्हाला काय असणार आहे ? फायनान्शियल क्लोजर नाही, फॉरेस्ट क्लिअरन्स नाही, पॉवर प्रोजेक्ट ॲग्रिमेंट नाही. तरी देखील सहयाद्री येथे मोठा कार्यक्रम करुन प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडियासमोर मोठया अभिमानाने माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी, माननीय ऊर्जामंत्र्यांनी जाहीर केले होते. महाराष्ट्र दूषण कार्यक्रम तर होईलच परंतु कंदील वाटपाच्या कार्यक्रमाचा उल्लेख देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात असावयास हवा होता, असे मला वाटते. पदाधिका-यांना एक कंदील, शिक्षकांना एक कंदील, प्राध्यापकांना एक कंदील, पत्रकारांना एक कंदील आणि आमदारांना 5 कंदील या योजनेतून द्यावेत. एक विनंती मला माननीय वित्तमंत्री महोदयांनाही करावयाची आहे. आता महाराष्ट्राचे बजेट सादर होणार आहे, त्यावेळी प्रत्येक सन्माननीय सदस्याला एक व्हीआयपी बॅग दिली जाईल, त्याबरोबरच एका खोक्यामध्ये एक कंदील देण्याचे सौजन्य त्यांनी दाखवावे, कारण त्यांनी बजेट कसे सादर केले आहे याचा रात्रीच्या वेळी अभ्यास करण्यासाठी या कंदिलाचा उपयोग सन्माननीय सदस्यांना होईल. त्यामुळे त्यांनी बजेटबरोबरच कंदिलाची भेट सन्माननीय सदस्यांना द्यावी, अशी मी सभागृहातील तमाम सन्माननीय सदस्यांच्या वतीने विनंती करतो. माननीय मंत्रीमहोदय अशी माहिती पुरवितात की, दरवर्षी 10 टक्के विजेची मागणी वाढते, जरूर मी सरकारचे अभिनंदन करतो. आता राज्यात 5 हजार मेगावॅट विजेची टंचाई

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

आहे. श्री.माधव गोडबोले, वीज मंडळाचे तत्कालिन कार्यकारी संचालक, श्री.विनय बन्सल, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, श्री.विलासराव देशमुख यांनी बाणेदारपणे मुंबई उच्च न्यायालयात ॲफेडेव्हिट केले. त्यांनी न्यायालयाला असे सांगितले की, महाराष्ट्राला विजेची गरज नाही, महाराष्ट्र विजेच्या दृष्टीने सरप्लस आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर .......... 14:50

श्री.नितीन गडकरी ........

ज्याप्रमाणे लोकमान्य टिळक बाणेदारपणे बोलले होते त्याप्रमाणेच माननीय मुख्यमंत्री आज या महाराष्ट्राला विजेची गरज नाही असे बाणेदारपणे बोलले आहेत. महाराष्ट्रातील जनतेची वाट लावून संपूर्ण महाराष्ट्राला अंधाराच्या खाईत लोटणा-या माननीय मुख्यमंत्र्यांचे, ऊर्जा मंत्र्यांचे आणि वीज मंडळाचे मी मनापासून अभिनंदन करतो. एक गोष्ट चांगली आहे. महाराष्ट्र राज्यात अंधार पडला, दंगे झाले तरी अभिनय कौशल्य मात्र खालपासून वरपर्यंत चांगले आहे. कोणत्याही पब्लिक मिटींगमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, महात्मा फुले यांची नावे घेतली जातात.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. समाननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, महात्मा फुले यांची नावे घेऊन टिंगल करु नये, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, महात्मा फुले यांची नावे घेऊन मी टिंगल करीत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, महात्मा फुले यांची नावे घेऊन जनतेला फसविण्याचे काम करणा-यांची मी टिंगल करीत आहे. खैरलांजी येथील दलित कुटुंबावरील अत्याचाराचे जे प्रकरण घडले त्याचे मला दु:ख आहे. महाराष्ट्रामध्ये दरवर्षी 10 टक्के विजेची मागणी वाढत आहे. विजेच्या संदर्भातील परिस्थितीची आपल्याला कल्पना आहे.

सभापती महोदय, आपल्याला माहिती असेल की, माननीय मुख्यमंत्री महोदय अमेरिकेला गेले होते. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना याबाबतची माहिती आहे. माननीय उद्योग मंत्री श्री.अशोक चव्हाण देखील त्यांच्या बरोबर गेले होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाचे प्रमुख दावेदार, कुलपती, महाराष्ट्राचे सहकार मंत्री, सांगली जिल्हयातील स्वाभिमानाचा ज्यांनी परिचय करुन दिला ते माननीय डॉ.पतंगराव कदम साहेब उद्योग मंत्री असतांना परदेशामध्ये गेले होते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले की, महाराष्ट्रामध्ये 950 कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक येणार आहे. परंतु अमेरिकेतील गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये आली नाही. अमेरिकेमध्ये मेणबत्त्यांना आकार देण्याचा व्यवसाय मात्र चांगला सुरु आहे. ज्यावेळी माननीय मुख्यमंत्री परत आले त्यावेळी त्यांना काचेच्या जारमध्ये लाल, पिवळया, हिरव्या रंगांच्या मेणबत्त्यांची प्रतिकृती भेट

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर .......... 14:50

श्री.नितीन गडकरी ........

मिळाली. माननीय मुख्यमंत्री महोदयांना त्या मेणबत्त्यांच्या उजेडामध्ये फाईव्ह स्टार जेवण जेवण्याचा आनंद मिळत आहे. महाराष्ट्रातील फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये मेणबत्त्यांच्या उजेडामध्ये जेवण केले जाते. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांना याची माहिती आहे. महाराष्ट्रामध्ये कॅन्डल डिनर प्रचलित आहे. महाराष्ट्रातील गरीब जनतेला 1000 रुपयांची भाजी आणि 500 रुपयांची पोळी विकत घेण्याऐवजी स्वत:च्या घरी कॅन्डल डिनर मिळू लागले आहे.

सभापती महोदय, माननीय केंद्रीय कृषीमंत्र्यांना क्रिकेटमध्ये जास्त रस आहे. काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रामध्ये एक बातमी आली होती. मार्टीन नावाच्या खेळाडूने माननीय श्री.शरद पवार साहेबांना धक्का मारला होता. हे वाईट झाले, त्या खेळाडूने तसे करावयास नको होते. हा महाराष्ट्राचा, भारताचा अभिमान आहे, असे काही लोक त्यावेळी म्हणाले. परंतु एक तरुण शेतकरी असे म्हणाला की, हा आपल्या देशाचा अभिमान नाही. त्या खेळाडूने माननीय कृषीमंत्री श्री.शरद पवार यांना असे सांगितले की, विदर्भ, मराठवाडयातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत, तुम्ही तिकडे जा. तुम्ही क्रिकेट खेळू नका. सभापती महोदय, वीज नसल्यामुळे वर्ल्ड कप मॅचेस टी.व्ही.वर बघता येणार नाहीत. मॅच बघण्यासाठी पैसे खर्च करुन टी.व्ही.वर जाहिराती देण्यात आल्या. टी.व्ही.वर जाहिराती देण्यासाठी पैसे कोठून आलेत तर .......

यानंतर कु.खर्चे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी........

देणा-यांनी तुम्हाला दहा रुपये दिले आणि आम्हाला एक रुपया दिला. घोडयांवर पैसे लावण्यात आले, मी काय सांगत होतो? या आधी मी कोणत्या विषयावर बोलत होतो ? क्रिकेटच्या जाहिरातींबाबत. तुम्ही एका कंपनीला जाहिरात दिली. सभापती महोदय, काय कल्पक स्ट्रॅटॅजी होती त्या कंपनीची जाहिरात करण्याची, परंतु आमच्या काही जिल्हयांमध्ये लोड शेडींगमुळे ती जाहिरातच दिसली नाही.

सभापती महोदय, आज जी महाराष्ट्राची परिस्थिती आहे, ती अतिशय वाईट आहे. अतिवृष्टी झाल्यानंतर 3,750 कोटी रुपयांचे पॅकेज माननीय प्रधानमंत्र्यांनी जाहीर केले. प्रधानमंत्री, राजासाहेब, आबासाहेब, दादासाहेब यांनी हेलिकॉप्टरमधून यवतमाळ येथे जाऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली आणि पंडितजींनी तर हेलिकॉप्टरमधूनच टाटा दाखविला. केंद्राने 3,750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केल्यानंतर शेतक-यांच्या आत्महत्या कमी झाल्या. काय बाणेदार बातमी आहे ही ! आणि त्यानंतर काल सभागृहात सांगितले गेले की, गेल्या चार महिन्यात महाराष्ट्रात 655 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आणि ही माहिती सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते किंवा दादांनी नाही सांगितली तर जे पूर्वी आमचे होते ते आता इकडून तिकडे आयात झालेले राज्याचे महसूल मंत्री माननीय श्री.राणे साहेबांनी सांगितले. राणे साहेबांचा उद्देश तुमच्या वर शरसंधान करावयाचा होता की काय ? हे मला माहित नाही. गेल्या चार महिन्यात या राज्यामध्ये 655 शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या ही माहिती त्यांनी या सभागृहात दिली. केंद्राने जाहीर केलेल्या 3,750 कोटी रुपयांच्या पॅकेजपैकी अद्याप फक्त 275 कोटी रुपये मिळालेले आहेत आणि याची चौकशी कुणी करावी ? माननीय प्रधान मंत्र्यांनी याची चौकशी करावयाला केंद्रातील इंटलिजन्स पोलीस ब्युरो ला सांगितले. तुम्ही महाराष्ट्रामध्ये 3,750 कोटी रुपये जाहीर केले, त्यापैकी किती पैसा शेतक-यांना मिळालेला आहे ? आणि किती मिळावयाचा बाकी आहे ? हे जाणण्यासाठी आय.बी.चे अधिकारी मुंबईत आले, ही चौकशी करीत आहेत. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत ? शेतक-याच्या आत्महत्या का थांबत नाहीत ? केंद्राने जाहीर केलेला पैसा खरोखरच शेतक-यांकडे जाऊन पोहोचत आहे की नाही ? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता त्यांना प्रधानमंत्र्यांनी मुंबईत पाठविलेले आहे.

अध्यक्ष महाराज, अजून काही गोष्टींकरिता मी या सरकारचे अभिनंदन करु इच्छितो

V V - 2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

कारण हे सरकार शेतक-यांचे " मसिहा ", " जाणता राजा " आहे. या राज्यात जर मर्सिडिज विकत घ्यावयाची असेल तर व्याजाचा दर साडे सहा टक्के आहे आणि ट्रॅक्टर विकत घ्यावयाला व्याजाचा दर आहे तेरा टक्के, बियाणे विकत घ्यावयाचे असेल व्याजाचा दर 13 ते 14 टक्के. हे सरकार आत्महत्या करणा-या शेतक-यांना व्याजाचे दर जास्त लावते याकरिता मी माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांचे अभिनंदन करु इच्छितो.

सभापती महोदय, या राज्यात 275 कोटी रुपयांचा घोटाळा करणारी नांदेड जिल्हा सहकारी बँक,280 कोटी रुपयांचा घोटाळा करणारी उस्मानाबाद जिल्हा बँक, 150 कोटी रुपयांचा घोटाळा करणारी नागपूर जिल्हा बँक ,50 कोटी रुपयांचा घोटाळा करणारी वर्धा जिल्हा बँक, 60 कोटी रुपयांचा घोटाळा करणारी यवतमाळ जिल्हा बँक कार्यरत अध्यक्ष महाराज या शेतक-याच्या अंगातून रक्त शोषून त्यांना आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त करुन माननीय मुख्यमंत्र्यांच्या आणि उप मुख्यमंत्र्यांच्या सौजन्याने आणि राष्ट्रवादी काँगेसच्या कार्यकर्त्यांनी या बँकांना वाचविण्यासाठी प्रयत्न केलेले आहे. याबाबत मी या सरकारचे व माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करीत आहे.

सभापती महोदय, या राज्यात कुपोषण चालू आहे, सात जिल्हयामध्ये 1862 बालमृत्यू झालेले आहेत, सदर बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले आहेत. 1302 अर्भके मृत्यू ,560 बालमृत्यू, अशा प्रकारे एकूण सात जिल्यांमध्ये जवळपास 1862 बालमृत्यू झाल्याचे सरकार आकडेवारी सांगते, काय संवेदनशील आहे आपले सरकार ?

यानंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

अशा या सरकारबद्दल मी काय बोलले पाहिजे ? मी विशेष रूपाने मुंबई हायकोर्टातून निर्णय आल्यानंतर अत्यंत संयमीपणे, कितीही आदिवासी मृत्यूमुखी पडले तरी त्याबद्दल दु:ख न करता, त्याबाबत कोणत्याही प्रकारे चिंता न करता आपला लक्ष्मी दर्शनाचा कार्यक्रम पाहतो. कालच या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मला म्हटले आहे की, गडकरी साहेब तुम्ही चिंता करू नका, आम्ही काँग्रेसवाले मोठे हुश्शार आहोत. आम्ही आपापसात कितीही भांडलो तरी सत्तेचा हा लोण्याचा गोळा तुम्हाला कधीही मिळणार नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, ते आम्हालाही माहीत आहे. पण तरीही या दोन्ही भावांना माझ्या शुभेच्छा देतो आणि त्यांचे अभिनंदनही करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्र. 61 मध्ये म्हटले आहे की, इन्स्टिटयूट फॉर मॅनेजमेंट डेव्हलपमेंट, स्वित्झरलँड, यांच्या वर्ल्ड कॉम्पेटेटिव्हनेस रिपोर्ट 2006 मध्ये समावेश झालेले महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य आहे. या अहवालानुसार स्पर्धात्मक तुलनेत आपले राज्य इटली, दक्षिण कोरिया, दक्षिण आफ्रिका आणि रशिया यांच्याही पुढे आहे. सभापती महोदय, यामध्ये इटलीच्याही पुढे महाराष्ट्र राज्य आहे असा उल्लेख केलेला आहे. मी या निमित्ताने समोर बसलेल्या आमच्या माननीय उपमुख्यमंत्र्यांना विचारू इच्छितो की, तुम्ही यात 'इटली'चा उल्लेख का केला ? यामध्ये मला राष्ट्रवादी काँग्रेसचे काही तरी षडयंत्र दिसते आहे. इटलीपेक्षाही महाराष्ट्र पुढे आहे असे म्हणून आपण यातून इटलीला अपमानित केलेले आहे. यामध्ये अगदी पद्धतशीरपणे इटलीपेक्षाही महाराष्ट्र पुढे आहे असा उल्लेख आला आहे त्यामुळे मला आमच्या मुख्यमंत्र्यांची काळजी वाटते. हा राष्ट्रवादी काँग्रेसचा गनिमी कावा आहे असे मी म्हटल्यास मला कोणी बोल लावू नये. याचा विपरित परिणाम आमच्या मुख्यमंत्र्यांना भोगावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. नाही तरी अगोदरच सन्माननीय श्री.विलासराव देशमुख हे वेगामध्ये असतात आणि सन्माननीय मंत्री डॉ. पतंगराव हे घाईमध्ये असतात. आणि आमचे उपमुख्यमंत्री माननीय आर.आर.आबा हे स्थितप्रज्ञ. सभोवताली काहीही झाले तरी हे आपले गप्प. पुणे जिल्हा तर त्यांनी माननीय अजितदादांना सांभाळण्यासाठी देऊन टाकला आहे. तेथे त्यांनी काहीही करावे. काही काही जिल्हे त्यांनी हे असे वाटूनच घेतले आहेत. त्यातूनच काही गुन्हेगारांनाही त्यांच्या पक्षाने जवळ केले आहे. त्याबाबत सांगावयाचे तर काहीही म्हणा, आबा राष्ट्रवादीमध्ये तुमचे कोणीही ऐकत नाही हेच खरे. सभापती महोदय, आमचे मित्र माननीय श्री.नारायणराव राणे हे तर

....... डब्ल्यूडब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर डोळ ठेवूनच बसलेले आहेत. म्हणजे केव्हा जमते आणि केव्हा त्या खुर्चीवर जाऊन बसतो असे त्यांना झालेले आहे, ते त्यांच्या धडपडीमध्ये यशस्वी व्हावेत अशा शुभेच्छाही मी या निमित्ताने त्यांना देतो. लोडशेडींग, आत्महत्या इत्यादीबाबत विरोधी पक्षामध्ये असताना माझ्या बरोबरीने बोलणारे नारायण राणे साहेब आता मात्र त्यांच्या मांडीला मांडी लावून गप्प बसलेले असतात. त्यावरून मला एक गाणे आठवते. ...

' कोण होतास तू, काय झालास तू, असा कसा बहकलास तू ... '

त्यावर ते म्हणतील, 'दिवसां मागूनी दिवस सरले, ऋतू मागुनी ऋतू, जीवलगे कधी मिळशील तू.. हे सहाव्या मजल्यावरील खुर्चीला उद्देशून त्यांचे बोलणे असणार आहे. आता विलासराव तरी मुख्यमंत्र्यांची खुर्ची कसे यांना देतील हे मला सांगता येत नाही. सभापती महोदय, आमचे परम मित्र सन्माननीय श्री.गोविंदराव आदिक तसेच नागपुरातील श्री.रणजित देशमुख यांचीही या खुर्चीपोटी काय हालत झाली ती आपल्याला माहितीच आहे. विलासराव, गोविंदराव आदिकांना एक गाणे म्हणून दाखवित असतील. ...

मुड़ मुड़ कर ना देख, मुड़ मुड़ कर ना देख,
जिंदगानी के सफर मे, तुम अकेले ही नहीं हो,
और भी तेरे हम सफर है .

विलासरावांचे मुख्यमंत्र्यांच्या या खुर्चीवर टिकून राहण्याचे कलाकौशल्य आणि चातुर्य खरोखरी वाखाणण्याजोगे आहे. एवढ्या सगळ्या विपरित परिस्थितीमध्ये असतानाही, मंत्र्यांचे कोणी ऐकत नाही ....

( यानंतर श्री. गागरे .... एक्सएक्स 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे...

आता दलित आमदारांमध्ये बोलणारा कॉंग्रेस पक्षाचा मी एकच सदस्य आहे. स्त्रियांवरील बलात्काराची प्रकरणे झाली. बल + अत्याचार म्हणजे बळाचा वापर करुन स्त्रियांवर अत्याचार करण्याचे प्रकार होत आहेत. बलात्काराच्या प्रकरणामध्ये आपली कामवासना शांत करण्यासाठी स्त्रियांवर लैंगिक अत्याचार केले जातात. आज प्रशासनामध्ये सुशिक्षित स्त्रिया काम करीत आहेत, त्यांचा देखील अमानुषपणे छळ केला जात आहे. तेव्हा अशा मागासवर्गीय स्त्रियांना संरक्षण दिले जाईल यादृष्टीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये एकही शब्द आढळत नाही. आपण मागासवर्गीयांच्या भरंवशावर निवडणुका जिंकू शकता. ज्यांना ज्यांना त्यांची आवश्यकता वाटते त्यावेळी निळा झेंडा लावल्याशिवाय निवडणुका पार पडत नाहीत.

सभापती महोदय, महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात मी आपणास तीन-चार उदाहरणे सांगणार आहे. श्रीमती अनुजा मोरे या ठाणे जिल्हयातील अन्नधान्य वितरण कार्यालयामध्ये लघुलेखिका म्हणून कार्यरत आहेत. गेली 25 वर्षे त्या कार्यालयामध्ये लघुलेखिकेचे काम करीत आहेत. त्या कार्यालयातील श्री. पराग नावाच्या एका अधिकाऱ्यांनी त्या महिलेकडे कामवासनेची इच्छा प्रकट केली. त्या गोष्टीला श्रीमती मोरे यांनी स्पष्ट नकार दिला. त्यामुळे संताप येऊन त्यांनी तिला "तुझको मै बरबाद करु दूँगा" असे सांगून एका वर्षामध्ये तिची सात वेळा बदली केली व तिला नोकरीमधून काढून टाकले. त्यानंतर दाद मागण्याकरिता ती महिला मॅटमध्ये गेली, महिला आयोगाकडे गेली व तिने त्यांच्याकडे न्याय मागितला. तिला पुन्हा नोकरीवर ठेवण्यात आले, परंतु तिला लघुलेखिकेचे काम मिळाले नाही, तिचा पगार रोखण्यात आला. तिच्या वडिलांचे निधन झाल्यामुळे ती रजेवर गेली म्हणून सहा महिने तिला पगार देण्यात आला नाही. तिच्याविरुध्द फाईल तयार करण्यात आली. ती फाईल मंत्रालयातील उपसचिव श्री. बोभाटे यांच्याकडे आली. मंत्रालयातील कक्ष अधिकारी, उपसचिव हे आय.ए.एस. नाहीत, वकील नाहीत. एखाद्याला बरबाद करण्याचे त्यांच्या मनामध्ये आल्यानंतर त्याप्रकारची निगेटीव्ह नोट , प्रस्ताव तयार करुन ती मुख्यमंत्र्यांपर्यंत पाठविण्यात येते. आणि मग त्या प्रस्तावावर मुख्यमंत्र्यांची सही होते. अशाप्रकारचे प्रकार सुरु असल्यामुळे मी त्यासंबंधी लक्षवेधी सूचना दिलेली आहे.

2 वाय 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे...

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार)**

सभापती महोदय, श्रीमती विजया मोडक यांचे दुसरे उदाहरण सांगता येईल. त्या शासनामध्ये हिवताप अधिकारी म्हणून काम करतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार श्री. सुशीलकुमार शिंदे व विद्यमान मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या काळामध्ये आरक्षणाच्या जागा भरण्यासंबधीचा आदेश निघाला. त्या आदेशानुसार श्रीमती मोडक यांनी आरोग्य खात्यामध्ये 11 जागा भरल्या. मी याठिक्राणी बलात्कार हा शब्द वापरीत नाही. परंतु शासनाच्या विभागामध्ये एखाद्या अधिकाऱ्याच्या मनाविरुध्द जर काही घडले तर वेगळया प्रकारे त्यांच्यावर अत्याचार करण्याचे प्रकार सुरु झाले आहेत. त्याबाबत आपण विचार करण्याची गरज आहे. श्रीमती मोडक यांनी आपल्या अधिकारामध्ये 11 जागा भरल्या म्हणून त्यांना बेकायदेशीररित्या कामावरुन काढून टाकण्यात आले, ती मागासवर्गीय महिला असल्यामुळे तिला सस्पेंड करुन आठ महिने झाले. शासनाच्या जी.आर. प्रमाणे सहा महिन्यामध्ये जर गुन्हा सिध्द झाला नाहीतर त्या कर्मचाऱ्यास शासनाने नोकरीवर घेतले पाहिजे. परंतु या महिलेला निलंबित करुन आठ महिने झाले तरी तिला नोकरीवर घेण्यात आले नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे (पुढे सुरु...

सभापती महोदय, भंडारा जिल्ह्यातील श्रीमती एस.के.गणवीर या लघुलेखिकेला नोकरीतून काढून टाकले. त्यानंतर त्यांना हायकोर्टामध्ये जावे लागले. हायकोर्टाने तीन महिन्यामध्ये नोकरीवर घेण्याबाबत कार्यवाही करावी असा निर्णय दिला. परंतु त्याबाबत शासन कोणतीही कार्यवाही करत नाही. त्या बाई आणि तिचे पती माननीय मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी मुंबईमध्ये आलेले आहेत. त्यांनी मला भेटून सांगितले की, मागासवर्गीयांचे प्रतिनिधी प्रा.जोगेंद्र कवाडे होते, त्यांनी सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे तुम्हाला हे सांगत आहोत. हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणीही केली जात नाही, म्हणजेच दुसऱ्या मार्गाने ते एक बलात्काराचेच प्रकरण आहे. मागासवर्गीयांना संरक्षण देण्याच्या संबंधाने माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणामध्ये काहीच उल्लेख केलेला नाही.

दुसरा मुद्दा सांगावयाचा आहे की, मुंबईतील बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमीच्या विकासासाठी माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी शासनातर्फे सन 2002 मध्ये 10 कोटी रुपये दिले. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे काम सरु झाले आणि थोडयाच दिवसामध्ये ते रेंगाळले. या संदर्भाने माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणामध्ये चैत्यभूमीच्या संबंधाने उल्लेख केलेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे मुंबईच्या चैत्यभूमीच्या बाजूला एन.टी.सी.ची मिल आहे. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री श्री.शंकरसिंह वाघेला यांच्याकडे एनटीसीच्या जागेवर शॉपींग मॉल उभा करण्याचा प्रस्ताव आहे. त्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारले तर मुंबईचे वैभव वाढेल. आज नरिमन पॉईन्ट या ठिकाणी संध्याकाळी प्रेमी युगुले हातात हात घालून फिरताना दिसतात, समुद्र किनाऱ्यावर बसलेले असतात. रात्र झाल्यानंतर समुद्र जसा शांत होतो, तशी ही प्रेमी युगुले नंतर शांत होतात.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. एनटीसी मिल ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या बाजूला नाही ती तेथून लांब आहे. सन्माननीय सदस्यांना कदाचित त्या ठिकाणची भौगोलिक माहिती नसावी. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये, असे माझे म्हणणे आहे.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : तपासून पाहून रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निकोसे यांचेही म्हणणे बरोबर आहे आणि एन.टी.सी.मिल स्मारकापासून लांब आहे. हे सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांचेही म्हणणे बरोबर आहे. केंद्र सरकारने मध्यंतरी एक योजना तयार केलेली होती. मिलची

SKK/ SBT/ MAP/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

काही जागा वापरुन चैत्यभूमीचा परिसर मोठा करण्याचा त्यांचा लॅन होता. तसे केद्र सरकारने ठरविलले होते.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय श्री. गडकरी साहेबांचेही म्हणणे मी दुरुस्त करतो. त्या प्लॅनमध्ये असे नमूद करण्यात आले की, एनटीसी मिलची जागा चैत्यभूमीसाठी घ्यावी. चैत्यभूमीसाठी जागा कमी पडते म्हणून नाही तर जास्त जागा देऊन त्या ठिकाणचा परिसर सुशोभित करता यावा म्हणून प्रयत्न झाला.

श्री. रमेश निकोसे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी श्रीमती सविता आंबेडकर या ब्राह्मण होत्या. बाबासाहेबांनी ब्राह्मण कन्येशी लग्न केले होते. त्यामुळे श्री.गडकरी साहेब आपण वधू पक्षाकडील आहात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित असल्यामुळे त्यांचा आमच्याशी संबंध आहे त्यामुळे आम्ही वर पक्षाकडील आहोत. त्यामुळे तुमचा-आमचा संबंध आहे. त्यामुळे आपण सगळे मिळून त्यांचे चांगले स्मारक करू...

**तालिका सभापती** : जातीचा उल्लेख रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : मी कोणत्याही जातीचा नाही. युतीच्या काळामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमीसाठी अडीच कोटी रुपयाची कामे केलेली आहेत. त्यावेळेस पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी मला बोलावून याबाबत सांगितले होते. त्यावेळेस पंतप्रधानांच्या कार्यालयातील त्यांचे पी.अे. सुधींद्र कुलकर्णी आणि मी एकत्र बसून चैत्यभूमीच्यासंधात प्लॅन तयार केलेला होता. त्यासाठी त्यांनी चांगली मदत केलेली होती.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

या स्मारकाला माझा कोणताही विरोध नाही. श्री. शंकरसिंह वाघेला हे आता आमच्या पक्षात नाहीत. त्यांना लक्ष्मीदर्शन झाल्यामुळे ते आमच्या पक्षातून फुटले. ते आता कॉंग्रेस पक्षात आहेत.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्यांच्या भाषणात ब्राम्हण जातीचा उल्लेख आला आहे. तो उल्लेख कामकाजातून काढून टाकावा.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार )** : जातीचा उल्लेख कामकाजातून काढून टाकण्यात येईल असे मी सांगितले आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, आपण ते भाष्य दुरुस्त करुन घ्यावे. दलित नेत्यांनी माझ्याकडे जी भाषणे दिलेली आहेत त्यामध्ये ब्राम्हण असा उल्लेख असल्यामुळे माझ्याकडून या ठिकाणी तसा उल्लेख झाला परंतु आपण ते दुरुस्त करुन घ्यावे. सभापती महोदय, मुंबईमध्ये बॉम्ब स्फोट झाले....

( सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी सभागृहातून जाण्यासाठी जागेवरुन उठतात )

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्याचे भाषण झाल्यानंतर आणखी एका सन्माननीय सदस्याचे भाषण झाल्याशिवाय सभागृह सोडू नये असा नियम आहे. सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांचे भाषण पूर्ण झाल्याशिवाय सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना नियमाप्रमाणे सभागृह सोडून जाता येणार नाही.

श्री. नितीन गडकरी : ठीक आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मुंबईमध्ये बॉम्ब स्फोट होणे, संसदेवर हल्ला होणे, रेल्वेमध्ये बॉम्ब स्फोट होणे, अतिरेक्यांजवळ आरडीएक्स सापडणे, नक्षलवादी चळवळीमध्ये काम करणारे असतील, त्यांच्याबाबत मला एकच विनंती करावयाची आहे की, या देशाचा कारभार चालविणारे संसद भवन उडवून देण्याऱ्याला, बॉम्ब स्फोट करणाऱ्याला फाशी होत असेल तर कोणत्याही पक्षाच्या लोकांनी त्या गुन्हेगाराला सपोर्ट करण्याचे धाडस करु नये. तसे केले तर जे लोक मरण पावलेले आहेत, जे सैनिक मरण पावलेले आहेत, ज्याची घरे उद्ध्वस्त झालेली आहेत त्यांचे काय होणार ? मुंबईमध्ये बॉम्ब स्फोट झाले. त्यामध्ये दाऊद असो की, कोणीही असो, तो

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. रमेश निकोसे ....

कोणत्या धर्माचा आहे याचा संबंध नाही. जे गुन्हेगार सापडलेले आहेत त्यांना शिक्षा झाली पाहिजे. त्यांना दयामाया दाखविण्याचे कारण नाही. त्यांना जर दयामाया दाखवली तर जे हजारो लोक मरण पावले त्यांचे काय ? रेल्वेमध्ये जे बॉम्ब स्फोट झाले त्यामध्ये निरपराध लोक मारले गेले. बायाबापडी मारली गेली. नोकरी करणारे लोक कार्यालय सुटल्यानंतर घरी जात असताना बॉम्ब स्फोटामध्ये मृत्यूमुखी पडले. त्यामुळे या गुन्हेगारांना दया कशासाठी दाखवावयाची ? जे झाले ते जाऊ द्या, यांना माफ करा अशा प्रकारचे वक्तव्य कोणत्याही पक्षाच्या लोकांनी करु नये. ज्यांच्याकडे आरडीएक्स सापडले त्यांना दयामाया दाखवू नये.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा की, राज्यात जे विजेचे भारनियमन चालू आहे त्यामुळे सगळीकडे शेतकऱ्यांची शेती पिकत नाही हे सत्य आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते सभागृहामध्ये बंगाली सदऱ्यावर रंगीबेरंगी राख्या लावून आले होते. त्यावेळी मी त्यांच्याकडे पाहात होतो. परंतु ते पोटतिडिकीने म्हणाले की, या ज्या राख्या आहेत त्या माझ्या बहिणींच्या आहेत. ज्यांचे पती मरण पावले त्यांच्या घरी मी गेलो होतो आणि त्या बहिणींनी मला राख्या बांधलेल्या आहेत असे त्यांनी सांगितले. त्यांच्या डोळ्यातून अश्रू गळावयास लागले. ते सभागृहामध्ये रडले. त्यांनी सांगितले की, मी माझ्या सदऱ्यावर ज्या राख्या बांधलेल्या आहेत त्या दाखवण्यासाठी बांधलेल्या नाहीत तर त्या महिलांनी मला या राख्या बांधलेल्या आहेत. शेतकऱ्यांची अवस्था फार खराब आहे. गव्हाचे पीक उभे आहे पण पिकाला पाणी देता येत नाही. ज्यावेळी पिकाला पाणी द्यावयाचे असते त्यावेळी भारनियमन असते. ज्यावेळी पिकाला पाणी द्यावयाचे नसते त्यावेळी दोन तीन तास वीज येते. अशा प्रकारे महाराष्ट्र या भारनियमनामुळे त्रस्त झालेला आहे. मला असे समजले की, कॅबिनेटच्या बैठकीमध्ये माननीय ऊर्जा मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांसमोर गळ घातली आणि सांगितले की, भारनियमन कमी करण्यासाठी प्रस्ताव दिल्यानंतर ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव मान्यता देत नाहीत.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 15:25

(श्री. रमेश निकोसे...

त्यावेळी माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी कॅबिनेटमध्ये असे सांगितले की, एक तर प्रधान सचिवांना तरी ठेवा किंवा मला तरी काढून टाका. सभापती महोदय, आज भारनियमनामुळे लोकांना फार हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षांमध्ये फार अडचणी येत आहेत, राज्यातील शेतीला या भारनियमनामुळे पाणी मिळत नसल्यामुळे शेती उद्ध्वस्त झालेली आहे. परिणामी शेतकरी आत्महत्या करीत आहेत. अशी एकूण चिंताजनक स्थिती राज्यामध्ये या भारनियमनामुळे निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये माननीय ऊर्जा मंत्र्यांनी भारनियमन कमी करण्याच्या प्रस्तावाला ज्या प्रधान सचिवांनी विरोध केला त्यांना ताबडतोब काढून टाकावे अशी मी या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, दोन-तीन वर्षापूर्वी नवबौध्द आणि अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा काढण्याचे ठरविण्यात आले होते आणि त्यासाठी फॉर्म देखील भरुन घेण्यात आले होते. परंतु शेवटच्या क्षणी या आश्रमशाळा शासना तर्फे चालविल्या जातील असा समाजकल्याण खात्याने निर्णय घेतला. परंतु 2002 सालापासून आजतागायत शासनाने नवबौध्द आणि अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा सुरु केलेल्या नाहीत आणि त्या खासगी संस्थांना देखील सुरु करण्याची परवानगी दिली नाही. माझी विनंती आहे की, या आश्रमशाळांच्या संदर्भात जे फॉर्म भरण्यात आलेले आहेत ते विचारात घेऊन आश्रमशाळा सुरु करण्याची परवानगी द्यावी.

सभापती महोदय, शासनाला मद्यापासून, दारुच्या दुकानांपासून मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. आज परिस्थिती अशी आहे की, दारुचे दुकान चालविणा-यांकडे, शैक्षणिक संस्था चालविणा-यांकडे अमाप पैसा आहे. हे लोकच आज शासन चालवित आहेत की काय असे वाटू लागले आहे. निवडणुकीमध्ये मर्जीतील उमेदवाराला निवडून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च केला जातो त्याचप्रमाणे मर्जीत नसलेल्या उमेदवाराला पाडण्यासाठी देखील मोठया प्रमाणावर पैसा खर्च केला जातो. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. दारु किराणामालाच्या दुकानावर देखील उपलब्ध करुन द्यावी अशी सूचना मध्यंतरी करण्यात आली होती. ज्या लोकांना दारु पिऊन मरायचे असतील ते मरतील. पण आता दारुच्या दुकानदारांकडून राजकारणाचा जो खेळ चालविला आहे तो तरी थांबेल. सभापती महोदय, मी आपणास एक शेर म्हणून दाखवितो.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

एक दिन हँस कर शमा ने परवाने से कहा,
तू जला तो, मेरी खता क्या
क्या शमा के शोलों में शरारे नहीं होते
अब नहीं होते भी, तुम्हारे नहीं होते
क्योंकि दरिया-ए-मोहब्बत के किनारे नहीं होते

सभापती महोदय, आज बौध्द, आदिवासी लोकांवर अत्याचार होत आहेत, शेतकरी आत्महत्या करीत आहेत. हे कुठे तरी थांबले पाहिजे. अन्यथा हेच लोक उद्या हातामध्ये शस्त्रास्त्रे घेऊन पैशाने मगरुर झालेल्या श्रीमंताची घरे जाळतील, त्यांना उद्ध्वस्त करतील. मरने के बाद एक ही रुपया मिलता है लेकिन वह भी श्मशान घाट पर जाते ही निकल जाता है. इसलिए मैं यह कहता हूं कि खाली हाथ आए हो, खाली हाथ जाओगे. क्यों ज्यादा पैसों का लोभ करते हो ? लोकांमध्ये पैशाचा मोह वाढलेला आहे. पैशासाठी गैरमार्गाचा वापर होत आहे. आज गैरमार्गाने पैसा कमावलेले लोकच नितिभ्रष्ट राजकारण करु लागले आहेत. ही स्थिती बदलली पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी दिनांक 14 मार्च, 2007 रोजी जे अभिभाषण केले त्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करणारा प्रस्ताव सन्माननीय सदस्या सौ.सुधाताई जोशी यांनी मांडला आणि त्या प्रस्तावाला अनुमोदन देण्याचे काम सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी केलेले आहे. हे काम त्यांच्याकडे प्रतिवर्षी दिले जाते. अनेकदा भाषण न करता सुध्दा त्या अभिनंदन करतात. याचे कारण असे की, या अभिभाषणामध्ये राज्यपाल महोदयांनी जे काही म्हटले तेच गेल्या वर्षीच्या अभिभाषणात म्हटले होते का? याची कधीतरी तुलना करुन बघावी लागते. हे शासकीय भाषण आहे. हे लिखाण राज्यपाल महोदय करीत नाहीत. कॅबिनेटची समिती असते, त्या समितीतर्फे हे अभिभाषण लिहिले जाते. हे अभिभाषण लिहिताना गेल्या वर्षी काय सांगितले आणि यावर्षी काय सांगितले पाहिजे याचा तुलनात्मकदृष्टया अभ्यास करण्याची आवश्यकता असते. आता तो अभ्यास करण्याची कोणाला आवश्यकता वाटत नाही. याचे कारण असे की, हे अभिभाषण म्हणजे केवळ तांत्रिक मुद्दा झालेला आहे. त्यातील गांभीर्य संपले, विचार संपला, अभ्यास संपला, सर्व काही संपले आहे. या लोकशाहीचे स्वरुप या पध्दतीने सुरु झाले आहे. गेल्या वर्षी भाषण करीत असताना मी प्रत्येक मुद्यांबद्दल राज्यपाल महोदयांचे अभिनंदन केले होते. तेच काम यावेळी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी केले आहे. त्यामुळे या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करायचे की नाही? करायचे तर का? असे दोन प्रश्न उपस्थित होतात. माननीय राज्यपाल हे आमच्या राज्याचे शासकीय प्रमुख आहेत. त्यामुळे त्यांच्या भाषणाच्या वेळी कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये याची काळजी घेण्याची आवश्यकता सर्वच लोकप्रतिनिधींची असते. बघा, या महाराष्ट्र राज्याची आणि विधिमंडळाची कार्यक्षमता काय आहे? प्रत्यक्षात भाषण सुरु झाले इंग्रजी भाषेतून. हे महाराष्ट्र राज्य आहे आणि या महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी आहे आणि मराठी भाषेतच कारभार करावा अशा प्रकारचा प्रस्ताव या सार्वभौम सभागृहांनी संमत केलेला आहे. त्याची अंमलबजावणी करावी अशा प्रकारचे आदेश माननीय हायकोर्टाने सुध्दा दिलेले आहेत. तरी देखील अभिभाषणाला सुरुवात झाली ती इंग्रजी भाषेतून. कमीत कमी सुरुवातीस माननीय राज्यपाल एक-दोन वाक्य जरी मराठी भाषेतून बोलले असते तर मी समजू शकलो असतो. परंतु तेवढे सौजन्य राज्यपाल या राज्याबद्दल दाखवित नाहीत याचे दु:ख वाटते. म्हणून प्रथम मी त्याबद्दल खेद व्यक्त करतो. माननीय राज्यपालांनी दोन वाक्ये सुध्दा मराठीत न उच्चारणे हा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...................

महाराष्ट्राचा अवमान आहे असे मी मानतो आणि म्हणून मी तसा उल्लेख करतो.

सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, जे सदस्य भाषण ऐकायला बसले होते, ज्यांना इंग्रजी भाषा कळते त्यांच्यासाठी ठीक आहे. पण महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी आहे, त्यासाठीच अभिभाषणाचा मराठी अनुवाद सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता होती. सन्माननीय सदस्या सौ.सुधाताई जोशी यांना मराठी अनुवाद उपलब्ध झाला का? नाही. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांना उपलब्ध झाला का?

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : काही वेळ ऐकायला मिळाला.

श्री.मधुकर सरपोतदार : असे असताना आम्ही राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करण्याचा प्रघात पडला आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्याला अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्याचा दंडक घालावा. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी राज्यपालांचे अभिनंदन केलेच पाहिजे. अन्य काहीही करा. म्हणजे विरोध करण्याचा प्रश्नच येणार नाही. यापूर्वी राज्यपालांनी अभिभाषणे केली आहेत. गेल्या वर्षीच्या अभिभाषणाची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. योग फक्त एकच चांगला आहे. मागील वर्षी राज्यपालांचे अभिभाषण 16 मार्च रोजी झाले आणि यावर्षी अभिभाषणावरील चर्चा 16 मार्चला सुरु झाली. मी आज 17 मार्च रोजी अभिभाषणावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे एवढाच फरक आहे. खरे म्हणजे 16 मार्च रोजीच विचार मांडणार होतो. परंतु कामकाजाच्या दृष्टीने अभिभाषणावरील चर्चेला उशिरा सुरुवात झाली त्यामुळे मी कालच्या चर्चेत सहभागी होऊ शकलो नाही. आमच्या पक्षाच्या वतीने वक्त्यांची जी नावे दिली होती त्यात पहिले नाव माझे होते. परंतु कालचे शिल्लक राहिलेले कामकाज आज प्रथम घेण्यात आल्यामुळे अभिभाषणावरील चर्चेला सुरुवात झाल्यानंतर मी आमच्या पक्षातर्फे पहिला वक्ता आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही असे मी समजतो.

सभापती महोदय, मागील वर्षी मी जे भाषण केले होते, त्या भाषणात मी विविध मुद्दे मांडले. ते मुद्दे मांडत असताना मी राज्यपाल महोदयांचे अभिनंदन केले होते.

(नंतर श्री.जुन्नरे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

माझ्याजवळ त्यावेळची सर्व माहिती उपलब्ध आहे. ही माहिती तपासून पाहिली तर आपल्याला दिसून येईल की, गेल्या वर्षीच्या अभिभाषणामध्ये आणि या वर्षीच्या अभिभाषणाच्या मुद्यात विशेष काही फरक नाही तर फक्त थोडी भाषा बदलली आहे. मला या राज्यशासनाला असे सांगावयाचे आहे की कमीत कमी जनतेची फसवणूक, दिशाभूल करतांना भाषेमध्ये थोडा तरी फरक करा. आपण गेल्या वर्षी माननीय राज्यपाल महोदयांच्या तोंडी जे शब्द घातले तेच शब्द याही वर्षी घातलेले आहेत त्यामुळे यामध्ये परिवर्तन होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 11 मध्ये "विदर्भातील सहा जिल्हयाकरिता पॅकेज "असा मुद्दा आहे. विदर्भातील शेतकरी आज आत्महत्या करीत आहेत. विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढलेले आहे. या सदनाचे नेते माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या चर्चेला उत्तर देतांना कालच सांगितले की, सहा महिन्यात विदर्भातील 567 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आत्महत्येचा सिलसिला अगोदरच्या प्रमाणेच पुढे चालू आहे. परंतु माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे की, विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे आमच्या मनात संभ्रम निर्माण झालेला आहे. शेतक-यांच्या आत्महत्येत वाढ होत असतानांही आपण खूष होत आहात याचेच आम्हाला आश्चर्य वाटते.

सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात नाही परंतु बाहेर बोलतांना म्हणतात की, काही जरी झाले तरी सत्ता आमच्याकडेच आलेली आहे. आमचा राज्यकारभार लोकांना मंजूर असल्यामुळेच लोकांनी आम्हाला निवडून दिलेले आहे. परंतु या निवडणुकीत लोकांनी आपल्याला कशा प्रकारे निवडून दिलेले आहे, निवडून येण्यासाठी आपल्याला काय काय करावे लागलेले आहे याची आपल्याला माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी साहेब यांनी विधानसभेचे अध्यक्षपद भुषविलेले आहे, ते नेहमी जबाबदारीने बोलतात याची मला कल्पना आहे. सुदैवाने मला आपल्या बरोबर काम करण्याची संधीही मिळालेली आहे. सभापती महोदय, ज्या पध्दतीने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका झालेल्या आहेत त्यामुळे मला लोकशाहीची काळजी वाटावयास लागली आहे. या निवडणुकीच्या संदर्भातील एकही मुद्दा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आलेला नाही हे मला मुद्दाम सांगावेसे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

वाटते. काल माननीय गृहमंत्र्यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या चर्चेला उत्तर देतांना तासगावच्या विषयाच्या संदर्भातच चर्चा केलेली आहे. त्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात काही एक माहिती दिली नाही केवळ दरोडे, बलात्काराच्या संदर्भात आकडेवारी दिली. त्यांनी सांगितले की, दरोडे आणि बलात्काराच्या घटनांची संख्या कमी झालेली आहे. माननीय गृहमंत्र्यांनी छाती पुढे काढून सांगितले की, "आपल्याकडील बलात्काराची संख्या कमी झालेली आहे." माननीय गृहमंत्र्यांनी अशा प्रकारचे स्टेटमेंट करणे हे काही योग्य नाही. शेवटी पोलिसांचे काम काय आहे? गुन्हा होऊ न देणे हे काम आहे की, गुन्हे कमी करणे हे पोलिसांचे काम आहे? शेवटी माणसाची प्रशासनिक क्षमता महत्वाची आहे. प्रशासनिक क्षमतेत वाढ होण्याची आवश्यकता आहे. गृहखाते सांभाळणे जे जबाबदारीचे काम आहे. ज्यावेळेस कै.बाळासाहेब देसाई आपल्या राज्याचे गृहमंत्री होते तेव्हा त्यांचा फार दरारा होता. गृहमंत्र्यांकडे तक्रार करेन असे कोणी सांगितले तर लोक घाबरत असत परंतु आताच्या गृहमंत्र्यांकडे तक्रार करेन असे सांगितले तर लोक हसतात. तुम्ही जो निर्णय घेता त्याचा परिणाम काय होतो हे महत्वाचे आहे. महिलांवरील बलात्कार थांबावे यासाठी आपण कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केलेली आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. परंतु या प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन केवळ आकडेवारी देणे हे काही योग्य नाही. कायदा आणि सुव्यवस्थेच्या चर्चेला उत्तर देतांना माननीय उपमुख्यमंत्र्यांचे मी काल दोन तास भाषण ऐकलेले आहे. आमदार असतांना त्यांनी केलेली भाषणे मी ऐकलेली आहेत तसेच उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी केलेली भाषणे मी ऐकलेली आहेत. त्यावेळेचे त्यांचे भाषण तपासले आणि उपमुख्यमंत्री म्हणून केलेले भाषण तपासले तर त्यामध्ये आपल्याल बराच फरक दिसून येतो. माणूस कोणत्याही जागेवर जावो त्याचे जे अंगीभूत गुण असतात त्याचा विकास कसा झाला हे महत्वाचे आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

सोशिकता किती आहे याला महत्व आहे. किती लोकांच्या गोष्टी ऐकून घेतल्यानंतर उत्तर देता याला महत्व आहे. काल सन्माननीय सदस्य श्री.नितिन गडकरी भाषण करीत असताना तासगावच्या मुद्यावरुन भावनावश होऊन त्यांच्या भाषणात अडथळा करुन जवळपास 40 ते 45 मिनिटे घेतली. माननीय उपमुख्यमंत्री उत्कृष्ट संसदपटू आहेत हे मला माहीत आहे. त्यांना विधानसभा सभागृहात "उत्कृष्ट संसदपटू" म्हणून पुरस्कार देखील मिळालेला आहे. मला त्यांच्या विषयी आदर आहे. त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीचा मी उल्लेख करतो. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, आमदार असताना त्यांनी केलेले कामगिरी आणि गृहमंत्री झाल्यावर केलेली कामगिरी यातील तफावत पाहिली तर त्यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आढळतो. आम्ही जेव्हा सत्तेत होतो त्यावेळी ते विरोधी पक्षात होते. त्यावेळी त्यांची काम करण्याची पध्दत मला पहावयास मिळाली होती. त्यावेळी त्यांनी कधीही लक्ष्मण रेषा ओलांडली नाही व आम्हीही ओलांडली नाही हे तेही मान्य करतील.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा मराठी अनुवाद ऐकण्याची यंत्रणा बंद पडली होती. ही यंत्रणा बंद आहे असे सर्वांच्या लक्षात आले. व्यासपीठावर माननीय सभापती व माननीय अध्यक्ष होते. मराठी अनुवाद ऐकण्याची यंत्रणा बंद पडली आहे हे लक्षात आल्यानंतर माननीय राज्यपालांचे अभिभाषण 10 मिनिटे थांबवून अनुवादाची यंत्रणा आपल्याला लगेच दुरुस्त करता आली असती, परंतु एकदा माननीय राज्यपालांचे अभिभाषण सुरु झाल्यानंतर ते सदस्यांना कळो अगर न कळो, मराठी अनुवादाची व्यवस्था सुरु असो किंवा नसो, सदस्यांनी ते ऐकावे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण सुरु झाल्यानंतर मध्येच बंद करायचे नाही असा कोणताही संकेत नाही. आपण इंग्रजांच्या प्रथा आणि परंपरा घेतल्या. परंतु त्यांची शिस्त घेतली नाही. या देशात इंग्रजांची सत्ता होती त्यावेळी कायदा आणि सुव्यवस्था चांगली होती. त्या काळातील गोष्ट सांगतो. एखादा पोलीस हवालदार रस्त्याने चालू लागला तर लोक बाजूला व्हायचे, परंतु आता एखादा मिनिस्टर जरी आला तरी कोणी त्याला विचारत नाही अशी परिस्थिती आहे. ही परिस्थिती का निर्माण झाली याचा गृहमंत्र्यांनी विचार केला पाहिजे. गृहमंत्री म्हणून ती त्यांची जबाबदारी आहे. संपूर्ण गृहदल त्यांच्या अखत्यारीत आहे. परवा मी कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नावर बोलत होतो त्यावेळी आपण सभागृहात उपस्थित नव्हता. त्यावेळी मी सांगितले होते की, रोज वर्तमान पत्र



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

उघडल्यावर पहिल्या पानावर ठळक बातमी असते, अमुक अमुक एका पोलीस अधिकाऱ्याला लाच घेताना पकडले, त्याच्याकडे अमाप संपत्ती सापडली. आजच्या वर्तमानपत्रात खेरवाडी येथील एका पोलीस अधिकाऱ्याला लाच घेताना पडकले अशी बातमी आली आहे. त्याच्याकडे करोडो रुपयांची मालमत्ता सापडली. तेलगी प्रकरणी पोलीस आयुक्तांना सस्पेंड होऊन तुरुंगात जावे लागले. ही सर्व कशाची लक्षणे आहेत ? गृह खात्यासाठी हे भूषणावह आहे काय ? गृहमंत्र्यांचा पोलीस खात्यामध्ये दरारा असला पाहिजे. गोड बोलून पोलीस अधिकाऱ्यांना तुमचा दरारा वाटणार नाही. गृह विभागात शिस्त नावाची गोष्टच नाही. तीन अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली. परंतु ते बदलीच्या ठिकाणी गेलेच नाहीत. मुंबईतच बसून राहिले. जेव्हा एखाद्या पोलीस अधिकाऱ्याची नवीन नियुक्ती केली जाते त्यावेळी नियुक्तीच्या पत्रात स्पष्ट उल्लेख केलेला असतो की, "Your services are likely to be transferable any where in the State." असे असताना बदली झालेले अधिकारी बदलीच्या ठिकाणी रिपोर्ट करीत नाहीत. बसून पगार घेतात. गेल्या सहा महिन्यात किती अधिकाऱ्यांनी अशाप्रकारे पगार घेतला त्याचा हिशोब मागण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 15:45

श्री.मधुकर सरपोतदार...

मला हे कळत नाही की, एखाद्या पोलीस अधिकाऱ्याची बदली केल्यानंतर तो बदलीच्या ठिकाणी का जात नाही ? तो येथेच का बसून राहतो ? माननीय आबा, आपण एका महत्वाच्या ठिकाणी बसलेला आहात. गृह खात्यामध्ये आपला दरारा निर्माण झाला पाहिजे. असे जर झाले तर आम्हाला आनंदच होईल व आम्ही लोकांना सांगू की, आमचे मित्र श्री.आर.आर.पाटील हे गृहमंत्री होते व त्यांचा पोलीस खात्यावर फार दबदबा होता. माननीय बाळासाहेब देसाई ज्यावेळी गृहमंत्री होते, त्यावेळी त्यांचा पोलिसांवर फारच दरारा होता. त्यांच्यासारखा दरारा आपल्यामध्ये किंवा इतर गृहमंत्र्यांमध्ये मला कधीही दिसून आला नाही. त्यांच्यासारखा दरारा व दबदबा आपल्यामध्ये असला पाहिजे, असे मला वाटते. माननीय आबा, आपण आज गृहमंत्री आहात, उद्या मुख्यमंत्रीही व्हाल, परंतु आपण जर शासकीय अधिकाऱ्यांवर ॲडमिनिस्ट्रेटीव्ह कॅपॅसिटी वापरली नाही तर ते पद आपल्याला मिळूनही काही उपयोग होणार नाही, हे मी याठिकाणी अतिशय विनम्रपणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील विदर्भाच्या 6 जिल्हयांकरिता जे पॅकेज देऊ केले, ते केवळ स्वप्नरंजनच राहणार आहे. हे पॅकेज जाहीर झाल्यानंतर त्या पैकेजचे पैसे मिळण्यास शेतक-यांचे किती हाल झाले, हे आपण पाहिलेले आहे. शेतकऱ्यांना आपले प्रशासकीय अधिकारी किती व कसे प्रश्न विचारतात, त्यांच्याकडून कशी माहिती घेण्याचा प्रयत्न करतात व प्रत्यक्षात त्यांना किती मदत मिळते, हे सर्व आपण पाहिलेले आहे. याठिकाणी आपण म्हटले आहे की, 12 शेतकऱ्यांना सुधारित शेतीसंबंधी माहिती देऊन मार्गदर्शन केले आहे. परंतु प्रत्यक्षात आपण तसे करत नाहीत. मला याठिकाणी प्रश्न विचारावयाचा आहे की, आज किती टक्के लोक अशिक्षित आहेत ? केरळ राज्यामध्ये एकही माणूस अशिक्षित नाही, असे केरळ राज्य सांगते. तसे सांगण्याचे धाडस आपण कधी करणार ? माननीय पुरके साहेबांना माझा प्रश्न आहे की, आम्ही प्रशिक्षित का होऊ शकत नाही ? लिहिता-वाचता येण्यापर्यंतचेही शिक्षण आपण लोकांना का देऊ शकत नाहीत ? आज आपण कुठल्याही प्रकारचे शिक्षण राज्यातील लोकांना देत नाही. आपण राज्यातील जनतेला असेच अशिक्षित ठेवणार का ? आपल्याला शिक्षण कम्पलसरी करावयाचे असेल तर याबाबतीत आपण कडक पाऊल उचलण्याची आवश्यकता आहे. मी माझ्या गावातील शाळेचे उदाहरण देतो. त्या ठिकाणच्या शाळेमध्ये जवळपास 100 मुले शिकण्यासाठी

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

जातात, त्याठिकाणी किमान 7 शिक्षकांची आवश्यकता असताना फक्त पाचच शिक्षक उपस्थित होते. त्या शाळेसाठी जागा आहे, परंतु त्याठिकाणी लादी बसवलेली नाही. ती सर्व जागा शेणाने सारवावी लागते. शाळेपासून 2 किलो मीटर लांब असलेल्या नदीवरुन मुलांना आपल्या स्वतःच्या कळशा घेऊन पाणी आणून शेणाने ती जागा सारवावी लागते. अशी परिस्थिती आज त्या शाळेची आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे होऊनही आपल्या राज्याची अशी अवस्था असून आपण माननीय राज्यपालांचे अभिनंदन करण्यास निघालो आहोत, हे बरोबर आहे का ? स्वातंत्र्य मिळवून आपण काय मिळवले ? माननीय गुजराथी साहेब, आपण स्पीकर असताना व त्यावेळी सुवर्ण महोत्सव असताना मी हा प्रश्न त्यावेळीही उपस्थित केला होतो. तो आपल्याला कदाचित आठवत असेल. स्वातंत्र्य मिळूनही माझ्या देशातील लोकांना पाणी, वीज, शिक्षण, अन्नधान्य, कपडे मिळत नाहीत. आज राज्यामध्ये कुपोषणामुळे नागरिकांचे मृत्यू होत आहेत. असे असतानाही आपण फक्त शब्दाचे जंजाळ उभे करुन एकमेकांवर टीका करण्याचे काम करीत आहात, हे योग्य नाही. याबाबतीत आपण अपेक्षित असे पाऊल टाकण्याचे काम करीत नाहीत, याचा मला खेद वाटतो. या प्रश्नी मी लोकसभेतही पोटतिडकीने बोललो व येथेही बोलत आलो आहे. ज्यावेळी लोकसभेमध्ये सुवर्ण महोत्सवाचा कार्यक्रम होता, त्यावेळी श्री.देवेगौडा हे पंतप्रधान होते, त्यांना मी प्रश्न केला की, असे समारंभ करण्यापेक्षा आपण हे प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने प्रत्येक राज्यातील दोन खेडी दत्तक घ्यावीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.रोझेकर...

श्री.मधुकर सरपोतदार........

आणि त्या दोन खेडयांवर प्रत्येकी 10 हजार रुपये खर्च करुन आदर्श खेडी कशी असावीत याचा आदर्श संपूर्ण भारताला घालून द्यावा, अशी विनंती केली होती.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांना मी थोडे थांबवितो. कारण, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावाचा आजचा दुसरा दिवस आहे. अजून काही सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. तेंव्हा, प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी किती वेळ बोलावे, हे आपल्याला एकदा ठरवून घ्यावे लागेल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण जर म्हणत असाल तर मी आताच थांबतो. परंतु, मी हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यांना किती वेळ देण्यात आला हे मी टिपून ठेवले आहे, तशी माझी नेहमीची पद्धत आहे. सन्माननीय सदस्या, श्रीमती फौजिया खान यांना 19 मिनिटे मिळाली, सन्माननीय सदस्या, डॉ.नीलम गो-हे यांना 15 मिनिटे मिळाली, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांना 33 मिनिटे मिळाली, सन्माननीय सदस्य, श्री.निकोसे यांना 28 मिनिटे मिळाली. आपण जर म्हणत असाल तर मी याच क्षणी खाली बसतो. मी सुरुवातीलाच उल्लेख केला की, काल आमच्या पक्षाकडून आम्ही चार सन्माननीय वक्ते निश्चित केले होते व आज चार निश्चित केले होते. परंतु, कालची चर्चा अपूर्ण राहिल्यामुळे आजचे वक्ते वाढले. कालच त्यांना संधी मिळाली असती तर ही वेळ आली नसती. खरे म्हणजे आज ही चर्चा मीच पुढे सुरु करणार होतो, परंतु इतरांना ती संधी मिळाली. त्यामुळे मी बोलणारच नव्हतो, नवीन सदस्यांना संधी मिळाली पाहिजे, आमचे आयुष्य बोलण्यामध्ये, टीका करण्यामध्ये आणि टीका सहन करण्यामध्ये गेले. त्यामुळे आम्हाला त्याचे काही वाटत नाही. परंतु, टीका करतांना ती सत्यावर आधारित असली पाहिजे, एवढेच आमचे म्हणणे आहे.

सभापती महोदय, या देशातील लोकांची जी परिस्थिती आहे ती पाहून शेतक-यांना अल्प मुदतीचे कर्ज 6 टक्के दराने उपलब्ध करुन देण्याची घोषणा या शासनाने केली. आतापर्यन्त किती शेतक-यांना अशा प्रकारच्या कर्जाचे वाटप झाले आहे, याची माहिती माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात देणे आवश्यक होते. परंतु, केवळ या योजनेचा उल्लेख आहे, किती शेतक-यांना कर्ज दिले याचा उल्लेख केलेला नाही.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार पुढे सुरु...........

सभापती महोदय, कोकणामध्ये जंगली हत्तींचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर आहे. सन्माननीय राज्यपाल हे कर्नाटक राज्यातील आहेत. ते त्या राज्याचे मुख्यमंत्री होते. जर त्यांनी कानडी भाषा आत्मसात केली असेल तर या हत्तींमुळे होणारा त्रास दूर करण्यासाठी त्यांची मदत घ्यावी. कोकणात माकडांमुळे होणा-या नुकसानीबाबत आजच सभागृहात चर्चा झाली. त्यावेळी सन्माननीय वनमंत्र्यांचे या विषयातील ज्ञान किती आहे, हे आपण सर्वांनी पाहिले.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जंगली हत्तींना परत पाठविण्याचे किती प्रयत्न केले गेले हे सांगण्यासाठी सन्माननीय सदस्य, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना कृपया संधी द्यावी, अशी माझ ी विनंती आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हा अतिशय गाजलेला किस्सा आहे. राज्य शासनाने, सन्माननीय वनमंत्री, श्री.बबनराव पाचपुते यांच्या नेतृत्वाखाली 'Elephant go back to home' अशा प्रकारची मोहिम राबविण्याचे ठरविले होते. ज्या मोहिमेचा उल्लेख मी केला त्याची भाषा स्थानिक लोकांना, कर्नाटकातील लोकांना, गावातील लोकांना कुणालाही कळली नाही. पण मोहिमेला सुरुवात झाली. त्या ठिकाणी वनमंत्री होते, आम्ही होतो, प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया यांचेही लोक होते, मुलाखती झाल्या. हत्तींना कशा पद्धतीने पिटाळण्यात येईल, दोडामार्गमधून त्यांना कसे बाहेर काढले जाईल, याबाबतची माहितीही सांगून झाली. दुपारी बारा-साडेबारा वाजता त्या ठिकाणी तीन हत्तींना आणण्यात आले.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ....... 15:55

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ..........

या हत्तींना तिथे सोडायचे म्हणजे हे हत्ती जंगली हत्तींना पुढे रेटतील आणि बाहेर काढतील, अशी ही संकल्पना होती. दुपारी 12.30 वाजता भर उन्हामध्ये माननीय वनमंत्री श्री.बबनराव पाचपुते, मी, काही अधिकारी, पत्रकार आणि फोट्रोग्राफर तेथे उपस्थित होतो. हत्ती आल्यानंतर त्यांची मुव्हमेंट सुरु झाली. कोकणामध्ये वेळू असतो. तो वेळू तोडायचा आणि त्याची फटफटी तयार करायची. तो वेळू जमिनीवर आपटला की "फटाक-फटाक" असा आवाज येतो. हत्तीला पळविण्यासाठी आम्ही तो वेळू जमिनीवर आपटला. दुसरे प्रात्यक्षिक असे होते की, दोरखंडाला मिरचीची पूड लावायची आणि तिसरे प्रात्यक्षिक असे होते की, फटाके फाडायचे. फटाके फुटतांना सुर्ररर.. असा आवाज येईल आणि त्यामुळे हत्ती पळून जातील, अशी अपेक्षा होती. त्या ठिकाणी थोडा चढ होता. हत्ती चढावावर उभे होते. म्हणून माननीय वनमंत्री श्री.बबनराव पाचपुते, अधिकारी, पत्रकार आणि फोटोग्राफर चढावावर गेले. मी तेथे गेलो नाही, मी खालीच थांबलो होतो. हत्ती पुढे आणि ही सर्व मंडळी मागे, अशी स्थिती होती. एक फोटोग्राफर हत्तीचा फोटो काढण्यासाठी एका हत्तीच्या पोटाखाली गेला आणि त्या हत्तीचा फोटो काढू लागला. त्या हत्तीला कदाचित जाणवले असेल की, आपल्या पोटाखाली कोणी तरी आहे. त्या हत्तीने त्या फोटोग्राफरला आपल्या सोंडेत पकडले आणि गरागरा फिरवून फेकून दिले. अचानक घडलेला हा प्रकार बघून माननीय वनमंत्री श्री.बबनराव पाचपुते, अधिकारी, आणि पत्रकार घाबरुन चढावावरुन खाली पळत आले आणि "एलिफंट गो बॅक टू होम" ही वन विभागाची मोहीम तेथेच थांबली.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला अशी माहिती मिळाली की, हत्तींना परत पाठविण्यासाठी जे तीन हत्ती आणले होते त्यापैकी एक हत्तीण होती. ती हत्तीण मागे राहिल्यामुळे ते हत्ती परत फिरले आणि सर्व अधिकारी तेथून पळून गेले.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या उदाहरणावरुन शासन किती कार्यक्षम आहे यावर प्रकाश पडतो. ज्यावेळी आमचे शासन होते त्यावेळी कोकणामध्ये हत्ती आले नव्हते. कर्नाटकच्या माजी मुख्यमंत्र्यांची आपण महाराष्ट्राच्या राज्यपाल पदी नेमणूक केली आणि या राज्यामध्ये हत्ती येऊ लागले. त्या हत्तींना कानडी भाषा समजते काय ? असे मी मघाशी बोललो आणि समजत असेल तर त्या हत्तींना तिकडे पाठवा. त्या हत्तींना मालवणी भाषा कळणार नाही.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ........

कारण मुंबईमध्ये राहणा-या लोकांना देखील मालवणी भाषा कळत नाही, तर त्या हत्तींना काय कळणार ? हा विनोदाचा भाग सोडून द्या. सभापती महोदय, या योजनेवर किती पैसे खर्च झाले हे मला माहीत नाही. मला असे सांगावयाचे आहे की, शासन येथेच आहे. परंतु हत्ती आणि माकडांमुळे मात्र लोकांचे हाल होत आहेत. माननीय वनमंत्र्यांना मी बोललो की, तुम्ही माकडांच्याबाबतीत काहीच काम केलेले नाही. माननीय वनमंत्री मघाशी चेष्टेने उत्तर देत होते.

यानंतर कु.खर्चे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली सिंधुदूर्गमधील हत्ती पळविण्याकरिता एक कमिटी नेमण्यात यावी.

श्री.मधुकर सरपोतदार : राज्यपालांच्या अभिभाषणामधील मुद्दा क्रमांक 26 मध्ये असे म्हटलेले आहे की,

" राज्यातील 26 जिल्हयांतील ग्रामीण भागांमध्ये पेयजल पुरवठयासाठी ग्रामस्थांच्या सहभागातून जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यात येत असून, या प्रकल्पाखालील 130 ग्रामपंचायतींमध्ये पाणीपुरवठा सुरु झाला आहे. "

सभापती महोदय, सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीची प्रशंसा आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असतांना महाराष्ट्रात आजही पिण्याच्या पाण्यासाठी खेडोपाडी दोन तीन मैल चालत जावे लागत आहे. आपले सरकार लोकांना पिण्याचे पुरेसे पाणीही खेडोपाडी देऊ शकत नाही. पिण्याच्या पाण्याची योजना प्रभावीपणे ग्रामीण स्तरावर राबवू शकत नाही. सभापती महोदय, मी आता जास्त वेळ घेणार नाही परंतु पुरवणी मागणीच्या वेळी मी यावर बोलणार आहे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेचे खूप कौतुक केले गेले,परंतु या योजनेबद्दलचा रोजचा भ्रष्टाचार प्रसिध्द होत आहे. रोजगार हमी योजना ही रोजगार हमी योजना नसून भ्रष्टाचार हमी योजना आहे. राज्यपालांनी दिलेले निदेश सुध्दा या ठिकाणी पाळले जात नाहीत आणि शासन इग्नोर करते.

सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी मगाशी मायनॉरिटीज यांच्याबाबत जे सांगितले त्याबाबत मीही सहमती दर्शवितो परंतु मी त्यांना एकच सांगेन की, या देशामधील जे कायदे आहेत, ते सर्वांसाठी समानच आहेत. तुमच्या समाजामध्ये जी मेहनत करण्याची वृत्ती आहे त्या वृत्तीचा मला सार्थ अभिमान आहे या वृत्तीमुळे तुमचा समाज फार काळ टिकू शकतो. घराघरामध्ये कशाचा तरी उद्योग असतोच. कुटूंब नियोजनाचा उपक्रम जर आपण यशस्वीपणे राबविला तर तुमचा समाज खरोखर खूप टिकू शकेल व त्याला योग्य तो न्यायही मिळेल, असे मला वाटते. " लांगुलचालना " या मुळे हा समाज मागे राहिला. मनुष्य जात म्हणजे एक समाजच आहे मग या मनुष्य जातीच्या समाजाकरिता बनणारे कायदेही समानच असले पाहिजेत, असे मला वाटते.

लोकसभेमध्ये असतांना मी एकच मुद्दा मांडला होता की, अरब कंट्रीजमध्ये जसे चोरी केल्याबद्दल हात कापले जातात आणि बलात्काराची शिक्षा ही फाशी आहे तशाच प्रकारचे कायदे

3I - 2....

17-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3I - 2

श्री.मधुकर सरपोतदार......

आपल्या देशात आणले पाहिजेत. हिंदूंनी सुध्दा अशा प्रकारचे कायदे का स्वीकारु नयेत ? हा माझा प्रश्न आहे. कायदा जसा सांगतो त्याप्रमाणे कायद्याची अंमलबजावणीही आपण करु शकतो हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, एवढे सांगून व माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3I - 3.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, कृपया मी आपला एकच मिनिट घेतो. माझी अशी विनंती आहे की, माझ्याजवळ जी कागदपत्रे आहेत ती मी आपल्याकडे देतो, कारण ही कागदपत्र नागपूर महानगरपालिकेमधील अेबी फॉर्म घोटाळयाबाबत पुरावा असणारी आहेत. माननीय आबा फार मोठया नैतिकतेच्या व कायद्याच्या गोष्टी करीत होते, पाच पाच लाख रुपयांना तिकिटे विकली गेली. माझे त्यांना आव्हान आहे की, त्यांनी सदर घोटाळयाची सी.आय.डी. चौकशी करावी. आहे का त्यांच्यामध्ये हिम्मत ?

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : यासंबंधी मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मगाशी माननीय उप सभापती चेअरवर असतांना त्यांनी सांगितल्याप्रमाणे आपला सदर मुद्दा पुढील विशेष उल्लेखाच्या वेळी चर्चेला घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सदर मुद्दयाचा ऊहापोह विशेष उल्लेखाच्या वेळी तर मी करणारच आहे परंतु ही कागदपत्रे पुराव्याखातर आपल्याकडे घ्यावीत, अशी मी आपल्याला विनंती करीत आहे. आता सध्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करतांना कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीमध्ये माझा हा मुद्दा मांडावयाचा राहून गेला होता, त्यासंबंधीची कागदपत्रे मी आता फक्त पुराव्याखातर आपल्याकडे जमा करु इच्छित आहे. माननीय आबा पाटील यांची या घोटाळयाच्या बाबतीत सी.आय.डी. चौकशी लावण्याची हिंमत आहे का ? तेवढे मला सांगण्यात यावे. तुर्तास आपण ही कागदपत्रे आपल्याकडे घ्यावीत, अशी मी आपल्याला विनंती करतो.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी त्यांचे भाषण लक्षपूर्वक ऐकत होतो. पण त्यांच्या भाषणात आता ते जो विषय वा मुद्दा सांगत आहेत त्याचा जराही उल्लेख आलेला नाही. असे असताना आता त्याबाबतचे पुरावे म्हणून कागदपत्रे ते माझ्याकडे देऊ शकत नाहीत, तसेच मलाही ते स्वीकारता येणार नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी हे एक सिनिअर सदस्य आहेत, येथील कामकाजातील जाणकार आणि अनुभवी सदस्य आहेत. तेव्हा त्यांनी ही बाब समजून घ्यावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री असलेल्या आमच्या गृहमंत्र्यांमध्ये हिंमत असेल तर त्यांनी खरे तर याबाबत चौकशी करायला पाहिजे ...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सन्माननीय श्री.गडकरी साहेब मला उद्देशून सारखे 'हिंमत आहे काय' असे विचारीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण माझी हिम्मत पाहिली आहे आणि पुढेही पाहू शकता. आपल्याकडे खरोखरीच एखाद्या बाबीसंबंधात काही गैर झाल्याचे पुरावे असतील आणि त्यात तथ्य असेल तर मग पक्ष कोठला आहे हे पाहण्याचे मला काहीच कारण नाही. त्याबाबत आमचे पोलीस नि:पक्षपातीपणेच चौकशी करतील एवढे आपण जाणून असा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री याबाबत चौकशी करण्यास तयार आहेत. तेव्हा आपल्या प्रथेप्रमाणे मी ही सर्व पुराव्याची कागदपत्रे आपल्यामार्फत त्यांना देण्यासाठी आपल्याकडे सुपूर्द करतो. आपण ही कागदपत्रे माननीय गृहमंत्र्यांकडे लगेचच पाठवावीत. तसेच माननीय गृहमंत्र्यांमध्ये खरोखरी हिंमत असेल आणि त्यांनी याबाबत चौकशी करून कारवाई करून दाखविली तर मी त्यांचे येथे निश्चितपणे अभिनंदन करीन, हे त्यांनीही लक्षात घ्यावे एवढेच मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो. (सन्माननीय सदस्य माननीय तालिका सभापतींकडे कागदपत्रे पाठवून देतात.) सभापती महोदय, आपल्याकडे पाठवून दिलेली ही कागदपत्रे आपणही त्वरित माननीय गृहमंत्र्यांकडे द्यावीत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता यानंतर सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली हे भाषण करतील.

........ 3जे 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानत असतानाच या सरकारचे देखील मी या निमित्ताने अभिनंदन करतो.

सभापती महोदय, गेल्या दोन वर्षामध्ये हे राज्य ज्या अडचणीतून जात आहे त्यातून मार्ग काढीत असताना अनेक चांगली धोरणे आणि योजना या शासनाने राबविल्या आहेत, स्वीकारल्या आहेत. नुकत्याच झालेल्या निवडणुकांचे निकाल पाहिल्यानंतर लोकशाही आघाडी सरकारने या राज्यामध्ये आतापर्यंत जी लोकोपयोगी कामे केली त्यावर विश्वास ठेवून जनतेनेदेखील त्यावर शिक्कामोर्तब केलेले आहे आणि त्यामुळेच मी या शासनाचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातील 87 मुद्यांद्वारा संपूर्ण राज्यातील सर्व प्रकारचे प्रश्न आणि घटक व अत्यावश्यक बाबींचा उल्लेख करून आघाडी सरकारने वर्षभरात केलेल्या गतिमान कामांचा आढावा घेऊन करावयाच्या उपाय योजना देखील आपल्यासमोर ठेवल्या आहेत. त्यातून या शासनाची उपक्रमशीलता दिसून येते. अतिवृष्टीमुळे राज्यातील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 491 कोटी रूपयांचे वाटप या शासनाने केलेले आहे तसेच दळणवळण व अन्य पायाभूत सुविधांच्या पुनर्निर्माणासाठी 113 कोटी रूपये खर्च केलेले आहेत. यामध्ये आपत्ती व्यवस्थापन हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी जे मास्टर ट्रेनर्स तयार केले त्यांची खरोखरी गरज होती. दरवर्षी अशा प्रकारे उद्‌भवणाऱ्या प्रसंगी त्यांची उपयुक्तता आपल्याला निश्चितपणे जाणवेल. दुसरे म्हणजे इयत्ता 9 वी व 11 वी च्या अभ्यासक्रमामध्ये आपत्ती व्यवस्थापन हा विषय समाविष्ट करण्याचे या शासनाने ठरविले आहे. सभापती महोदय, राज्य सरकारने प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने, त्यांची गाऱ्हाणी आणि तक्रारी निवारण करून, त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम ठरविणे आवश्यक आहे असे मला येथे सांगावयाचे आहे.

( यानंतर श्री. गागरे ..... 3के 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली .......

कारण विविध भागात वेगवेगळया कारणासाठी जमीन संपादित केली जाते. विविध प्रकल्प, औद्योगिक क्षेत्र किंवा अन्य काही प्रयोजनासाठी जमीन राखीव ठेवली जाते यामुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांचे पुनर्वसन व्यवस्थित केले पाहिजे. याकरिता राज्य सरकारची भूमिका सकारात्मक असली पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात अनेक नद्यांना दरवर्षी पूर व महापूर येतात. नदीकाठच्या गावांना मोठा तडाखा बसतो. विशेषत: कोकणात याचा मोठया प्रमाणात तडाखा बसतो. दरवर्षी अशा प्रकारचा पूरपरिस्थितीवर तात्पुरती उपाययोजना शासनाकडून केली जाते. वर्षभर काहीच नियोजन केले जात नाही. शासनाला विनंती आहे की, नेहमी पूरग्रस्त असणाऱ्या गावांचे आयडेंटीफिकेशन करुन त्यांच्याकरिता कायमस्वरुपी उपाययोजना करता येईल काय हे पाहिले पाहिजे. पूरप्रसंगी त्यांना तुटपुंज्या सुविधा मिळतात, त्यांना जास्तीत जास्त सुविधा देता येतील काय याचा विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याची सिंचन क्षमता वाढावी म्हणून वेगवेगळया प्रकल्पावर भरीव तरतूद करुन जागतिक बँकेच्या सहाय्याने अपूर्ण असलेल्या प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचे सांगितले आहे. त्या अनुषंगाने मी शासनाचे लक्ष कोकणातील सिंचन प्रकल्पाकडे वेधू इच्छितो, कोकणातील किमान 40 प्रकल्प शेवटच्या टप्प्यात आहेत, हे पूर्ण झ ाले तर कोकणातील शेतीला मोठया प्रमाणावर पाणी उपलब्ध होऊ शकेल. सदरहू प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील शाळा आणि अंगणवाडया यांच्याकडे लक्ष देण्याचे ठरविले आहे. शिक्षकांची संख्या कमी असल्याने लहानपणी मुलांचा पाया कच्चा होतो, त्यामुळे स्पर्धेत ग्रामीण भागातील मुले कमी पडतात. कोकणातील मुलांचा पाया भक्क्म करण्यासाठी आदिवासी व डोंगराळ भागातील लहान मुलांना शाळेत पोहोचविण्याच्या सुविधा, पुरेसे पूर्णवेळ शिक्षक व शाळेमध्ये भौतिक सुविधा शासनाने उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली .......

सभापती महोदय, पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून 4300 पेक्षा जास्त लांबीचे बारमाही रस्ते बांधून एकूण 1926 वाडया व वस्त्या जोडण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी 1107 कोटी खर्च करुन 6079 कि.मी. रस्ते बांधण्यात येणार आहेत. परंतु कोकणामध्ये काही जिल्हा परिषदेचे रस्ते आहेत, कोकणामधील राज्य मार्ग सोडले तर जिल्हा मार्ग व गाव मार्ग काही प्रमाणात उपेक्षित राहिले आहेत व जे अस्तित्वात आहेत ते अतिवृष्टीच्या काळात दरवर्षी खराब होतात, त्यामुळे कोकणातील रस्त्यांसाठी वेगळी तरतूद करावी, असे मला वाटते.

सभापती महोदय, राज्यातील कामगारांसाठी नांदेड येथे नवीन कामगार न्यायालय व वर्धा येथे नवीन औद्योगिक न्यायालय स्थापन केले आहे याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु कोकणातील शेवटचा किंवा टोकाचा माणूस व पश्चिम महाराष्ट्रातील शेवटचा किंवा टोकाचा माणूस यांना उच्च न्यायालयीन कामासाठी मुंबईत येऊन आपले काम करुन जावे लागते. त्याला हजारो रुपये खर्च करुन राहण्याची गैरसोय, वेळेचा अपव्यय अशा अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. शिवाय न्यायालयामध्ये मोठया संख्येने केसेस प्रलंबित आहेत. त्याचा भार कमी व्हावा म्हणून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर सांगली, सातारा या जिल्हयातील जनतेच्या सोयीसाठी कोल्हापूर येथे खंडपीठ व्हावे ही अनेक वर्षांची मागणी विचारात घेऊन उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे स्थापन करण्यासाठी योग्य ते प्रयत्न करावेत, अशी मी विनंती  करतो.

सभापती महोदय, पश्चिम घाटातील पाणी स्त्रोताचा अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी 1981 मध्ये डॉ.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने नेमलेल्या समितीने कोकणामध्ये छोटया जलविद्युत प्रकल्पाच्या प्रस्तावित जागांचे तातडीने सर्वेक्षण करण्याची व कोकणासाठी स्वतंत्र जलविद्युत अन्वेषण मंडळाची आवश्यकता असल्याची शिफारस केली होती. त्या अनुषंगाने लवकरात लवकर जलविद्युत प्रकल्प सुरु करण्याची घोषणा करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

श्री.राजन तेली .......

सभापती महोदय, शासनाने पर्यटनाचे धोरण जाहीर केले आहे. कोकणामध्ये 44 गड व किल्ले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयात 31 किल्ले आहेत, परंतु ते संरक्षित करण्याची आवश्यकता आहे. कोकणातील गड व किल्ल्यांचा विकास पर्यटन, पुरातत्व व बांधकाम खात्याने करावा. कोकणातील पर्यटन विकासामध्ये निर्माण होणाऱ्या अडचणी शासनाने दूर कराव्यात. कोकणातील पर्यटनाचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर येथील सर्व गड व किल्ल्यांकडे त्वरीत लक्ष देणे गरजेचे आहे.

.....यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

त्याचबरोबर केरळ, राजस्थान आणि गोवा या राज्यांमध्ये मार्केटींगसाठी मोठया प्रमाणावर तेथील शासन पैसा खर्च करीत आहे. परंतु महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून तशाप्रकारचा प्रयत्न याठिकाणी होत नाही असे मला वाटते. राज्य शासनाने पर्यटनाचे धोरण जाहीर केले असले तरी बेकारी नष्ट होण्यासाठी केरळ, राजस्थान आणि गोव्यामध्ये करण्यात आलेले पर्यटन व्यवस्थेच्या मार्केटींगप्रमाणे या राज्यात देखील मार्केटींग केले पाहिजे. ते जर आपण केले तर खऱ्या अर्थाने पर्यटन व्यवसायाला महत्व प्राप्त होईल असे मी याठिकाणी सुचवू इच्छितो आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन करुन माझे दोन शब्द संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये माझे विचार मांडण्याकरिता मी याठिकाणी उभा आहे. राज्यामध्ये गेल्या वर्षी अतिवृष्टी मोठया प्रमाणावर झाल्यामुळे अनेक जिल्हयांमध्ये महापूर आले. महापूर आल्यामुळे निर्माण झालेल्या आपत्तीचे निवारण करण्यासाठी शासनाने एकदा 491 व नंतर 133 कोटी रुपये खर्च केल्याचे सांगितले. परंतु नदीकाठावरील ज्या शेतकऱ्यांच्या विहिरींवर मोटारी बसविण्यात आल्या होत्या त्यांच्या मोटारी पाईपलाईनसहीत वाहून गेल्या. त्यामुळे त्यांचे जे नुकसान झाले आहे त्याची भरपाई म्हणून त्यांना एकही पैसा मिळालेला नाही. पश्चिम महाराष्ट्रामध्ये महापूर आला त्यावेळी तेथील शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये शेतीच्या दुरुस्तीकरिता देण्यात आले. परंतु तशाप्रकारचा महापूर मराठवाडयामध्ये येऊन तेथील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान मोठया प्रमाणावर झाले असतां त्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही. तेव्हा शासनाने फक्त पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी जी.आर. काढला होता काय? यामुळे मराठवाडयातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. नदीच्या काठावरील कोळी बांधव मासेमारीचा व्यवसाय करतात. महापूरामध्ये त्या कोळयांची जाळी आणि होडया वाहून गेल्या. त्यांना देखील शासनाने मदत कां केली नाही?

सभापती महोदय, विदर्भामध्ये शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणावर आत्महत्त्या केल्या. विदर्भातील सहा जिल्हयांसाठी जाहीर करण्यात आलेल्या पॅकेज अंतर्गत 3 हजार चेकडॅम बांधण्यात येणार आहेत. हे चेकडॅम बांधण्यात आल्यानंतर पाण्याची उपलब्धता वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये भर पडेल असे शासनाला वाटते. माझ्या लक्षात एक गोष्ट येत नाही की, उत्पादन वाढणार आहे की उत्पन्न वाढणार आहे? नेहमी उत्पादन वाढत असते उत्पन्न वाढत नसते. त्यामुळे याठिकाणी गफलत झाली असून ती आपल्याला समजत नाही. त्याचप्रमाणे ठिबक सिंचन आणि सेंद्रिय शेतीचा उल्लेख करण्यात आला आहे. विदर्भाच्या सहा जिल्हयामध्ये ठिबक सिंचन आणि सेंद्रिय शेती यांच्या माध्यमातून संत्र्याचे लागवडी क्षेत्र उभे करण्यात येणार आहे. सभापती महोदय, आज संत्रा पिकावर डिंका रोग पडू लागला आहे. या रोगावर मात करावयाची असेलतर रोडोमील नावाचे औषध 1400 रुपये किलो या भावाने घ्यावे लागते. संत्र्याचे 40 वर्षे जगणारे पिक जर 15 वर्षेच जगणार असेल तर ही शेती करण्यात अर्थ नाही. आणि इतके महागडे औषध घेऊन शेतकरी त्या पिकावर फवारणी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल...

करु शकत नाही. या रोगाचा प्रादुर्भाव कालव्याव्दारे देण्यात आलेल्या पाण्यामधून होतो. याकरिता शेतीसाठी ठिबक सिंचन योजनेची आवश्यकता आहे. या संदर्भात मी आपणास एक उदाहरण देतो की, 3.2 के.जी. प्रेशरचे स्प्रिंकलर चार वर्षापूर्वी 24 हजार रुपये सबसिडीमध्ये मिळत होते. दोन वर्षापूर्वी त्यावर 25 टक्के सबसिडी देऊन ते 11 हजार रुपयांना मिळू लागले. आणि आता पुन्हा त्यावर सबसिडी दिल्यानंतर देखील ते 22 हजार रुपये किंमतीला मिळते. एखाद्या वस्तूला सबसिडी दिल्यानंतर त्या वस्तूची किंमत कशी वाढते? ती किंमत कमी होण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत शासनाला शेतकऱ्यांच्या फायद्याकरिता खरेच काही करावयाचे असेलतर या वस्तू बाजारामध्ये कमी किंमतीमध्ये उपलब्ध झाल्या पाहिजेत.

सभापती महोदय, विदर्भामध्ये संत्र्याच्या उत्पादनावर प्रोसेसिंग करण्याकरिता मोर्शी आणि काटोलला प्रोसेसिंग युनिट बांधण्यात आले, परंतु ते उद्घाटनाअभावी बंद पडलेले आहेत. माननीय राज्यपालांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्तेसंबंधी माहिती देतांना सांगितले आहे की, एप्रिल 2006 मध्ये 66 टक्के आणि डिसेंबर 2006 मध्ये 28 टक्के प्रमाण असल्याचे सांगितले. परंतु माझ्याकडील खरी माहिती अशी आहे की, एप्रिल 2006 मध्ये आत्महत्त्यांचे प्रमाण 63 टक्के होते ते डिसेंबर 2006 मध्ये 84 टक्के झाले. त्यामुळे अशाप्रकारची खोटी माहिती हे शासन कसे देते हे माझ्या लक्षात येत नाही. शेतकऱ्यांच्या दु:खावर मीठ चोळण्याचे काम सुरु आहे, ही न समजण्यासारखी गोष्ट आहे. सभापती महोदय, या अभिभाषणामध्ये आणखी एक गोष्ट सांगण्यात आली की, राज्यामध्ये प्रगत माहिती तंत्रज्ञान धोरणानुसार गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याकरिता नवीन 45 आय.टी. पार्क स्थापन करण्यात आले आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे...... 16:20

श्री.पाशा पटेल (पुढे सुरु....

माझ्या माहितीप्रमाणे लातूर आणि औरंगाबाद या दोन्ही ठिकाणच्या आय.टी. पार्कच्या इमारती एचएससी बोर्डाला इमारत नाही म्हणून त्यांना भाड्याने देण्याचे काम चालू आहे. तसे वास्तव असेल तर महाराष्ट्रातील जनतेला शासनाने बनविले असे म्हणता येईल. त्याचबरोबर विजेच्या संबंधात बोलायचे तर रात्रीच्या वेळी क्रिकेटचे सामने खेळविले जातात यासाठी विजेचा वापर केला जातो. हे क्रिकेटचे सामने दिवसा खेळविले तर काय फरक पडणार आहे ? यापासून काही युनिट वीज आपल्याला वाचविता येईल. सरकारने शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचे आश्वासन दिलेले होते. आता पैसे देऊनही वीज मिळत नाही. पाच वर्षापूर्वी मोफत विजेचे आश्वासन जनतेला दिलेले होते, परंतु ते आश्वासन सरकारने पाळले नाही. यामुळे जनतेचा राज्यकर्त्यांवरील विश्वास उडून जाईल, याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. आतापर्यन्त कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्येकडे वळत होता, आता ऊस उत्पादक शेतकरी औषध फवारणीसाठी आणलेले औषध पिऊन आत्महत्येकडे वळत आहे. आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून गावामध्ये जातो, तेव्हा तेथील ऊस उत्पादक शेतकरी एकत्र येऊन आमचे पाय धरायला लागलेले आहेत. त्यांना दिलासा देण्याची आवश्यकता आहे. ज्याप्रमाणे कांद्याचे उत्पादन अतिरिक्त झाल्यानंतर जागेवर जाऊन नजर अंदाजाने कांदा खरेदी जातो. त्याप्रमाणे ऊसाच्या बाबतीत काहीतरी निर्णय करणे गरजचे आहे. सगळ्यात महत्वाचे म्हणजे लातूर येथील कारखान्याने वीज निर्माण केली. ती वीज चार वर्षापूर्वी राज्य सरकारने खरेदी केली असती व महाराष्ट्रातील इतर साखर कारखान्यांनीही वीज निर्मिती केली असती तर साखरेपेक्षा ऊसाच्या चिपाडाला किंमत जास्त आली असती आणि ऊसापेक्षा हिप्पीला किंमत जास्त आली असती. परंतु तसे झाले नाही, याचा खेद होतो. आज महाराष्ट्रातील शेतकरी ऊसासाठी अस्वस्थ झालेला आहे, त्यासंबंधीचे एकही वाक्य अभिभाषणामध्ये नाही. आपण हे सगळे शेतकऱ्यांच्या समाधानासाठी करतो आहोत. परंतु शेतकऱ्यांसाठी काही करत नाही. शेतकरी करेना शेती तर जग काय खाईल, धतोरा ? बळीराजाकडे दुर्लक्ष होणार असेल तर सरकार कोणासाठी चालविणार आहात ? शेतकऱ्यांपर्यन्त मदतीसाठी पैसे जात नाहीत. मदत घेणारे आम्ही येथे बसलेलो आहोत. ती मदत लोकांपर्यन्त पोहोचत नाही. शेतमालाच्या माध्यमातून त्यांना पैसे मिळू शकले तर ते त्यांच्यापर्यन्त पोहोचू शकतील. आत्महत्या करण्याचे प्रकार थांबतील. शेतकऱ्यांना गाई दिल्या जातात. गाई देऊन प्रश्न सुटणार नाही, तर गाईच्या दुधाला किंमत दिली तर त्यांचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

श्री.पाशा पटेल (पुढे सुरु....

प्रश्न सुटेल.आज कापसाला भाव मिळत नाही, म्हणून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. उद्या ऊसाला भाव मिळत नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करतील. दुसरे असे की, आपण शेतकऱ्यांच्या दृष्टीने तळी निर्माण करतो. परंतु आज त्या शेतकऱ्याला त्याचा उपयोग नाही तर त्याच्या नातू-पणतू असेल त्याला फायदा होईल. आज आपण काय करणार आहात ? हा खरा त्याच्यासमोर प्रश्न आहे, यासंबधाने विचार करणे गरजेचे आहे. वेळेअभावी मला सगळ्या गोष्टी बोलता येत नाहीत. माझी विनंती आहे की, राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्ये शासनाची पाठ थोपटण्याचा प्रयत्न केलेला आहे ते बरोबर नाही. आमचे समाधान झालेले नाही एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

---

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी या ठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल जो आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडलेला आहे आणि सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी अनुमोदन दिलेले आहे त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे.

महाराष्ट्रामध्ये सातत्याने जे प्रश्न असतात, विकास कामांच्या ज्या योजना आखावयाच्या असतात आणि परिपूर्ण करावयाच्या असतात त्याचा जो मुख्य गाभा या राज्यातील शेवटचा माणूस कसा जगेल हा असतो. आपल्या महाराष्ट्रामध्ये जी मनुष्यसंख्या आहे तिचे रुपांतर मनुष्यशक्तीमध्ये कसे केले जाईल, यासाठी वर्षभरामध्ये कोणती पावले उचलावी लागतील, यासंदर्भात त्याला केंद्रबिंदू मानून या अभिभाषणामध्ये त्याची चर्चा केलेली असते. या सर्व बाबी पूर्ण करीत असताना राज्यातील महागाई कोणत्या पध्दतीची आहे आणि या महागाईमध्ये, सध्याच्या अवस्थेमध्ये महाराष्ट्रातील माझ्या शेतकरी आणि शेतमजुरांची क्रयशक्ती वाढविण्याचा प्रयत्न आपल्याकडून झाला की नाही याची चर्चा होणे गरजेचे असते. आपल्याला त्याचा अंदाज घ्यावा लागेल. मनुष्यशक्ती वाढवित असताना, त्यांच्या हाताला काम देत असताना किंवा त्यांच्यावर महाराष्ट्र राज्याचा खर्च होत असताना त्याचे नियोजन योग्य पध्दतीने होत आहे की नाही, झालेला जो खर्च आहे तो सामान्य माणसांसाठी झालेला आहे की नाही आणि त्यामुळे तो माणूस देशाच्या विकासामध्ये बांधला जातो की नाही याचा विचार होणे गरजेचे आहे. आज ग्रामीण भागातील अवस्था पाहिली तर शहरांवर आपला जास्त भर आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी आपण असे म्हणत होतो की, हा देश कृषिप्रधान आहे. 80 टक्के जनता ग्रामीण भागात आणि 20 टक्के जनता शहरी भागात अशी अवस्था होती. सध्या अशी परिस्थिती आहे की, शहरीकरण वाढत आहे. 42 ते 48 टक्क्यापर्यंत शहरे फुगलेली आहेत आणि ग्रामीण भागातील सुशिक्षित जनता हाताला रोजगार मिळविण्यासाठी शहराकडे धाव घेत आहे. अशा परिस्थितीमध्ये आम्हाला ज्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करावे लागते त्या गोष्टींकडे लक्ष द्यावे लागणार आहे. माननीय श्री. शरद पवार हे केंद्र सरकारमध्ये कृषि मंत्री आहेत. आमच्या भागातील श्रीमती सूर्यकांता पाटील या केंद्रामध्ये ग्रामीण विकास खात्याच्या राज्यमंत्री आहेत. केंद्राच्या सहकार्याने महाराष्ट्रातील ग्रामीण भागामधील जे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्रीमती उषाताई दराडे ...

शेतकरी आहेत त्यांना नवीन पध्दतीने शेती करावयास लावणे ही बाब केंद्रबिंदू म्हणून धरली पाहिजे. आमच्या मराठवाड्याचा जो यक्ष प्रश्न आहे त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी उल्लेख केला. ऊसाचा प्रश्न फार गंभीर झालेला आहे. महापूर आल्यानंतर माननीय सभापतींनी निर्णय घेतला. सांगली आणि त्या परिसरामध्ये जो महापूर आला त्यासंदर्भात पुढे काय करावयाचे, पावसाळा जवळ आला आहे त्यामुळे त्याचा आढावा घेणे यासंदर्भात मी माझ्या दालनामध्ये बैठक घेणार आहे असे त्यांनी सांगितले. अशा वेळी याही गोष्टीचा विचार करावयास पाहिजे. मी शासनाचे तसे अभिनंदनच करणार आहे. ज्यावेळी गोदावरी नदीला पूर आला आणि पैठणच्या धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी बाहेर गेले. त्यामुळे गावागावामध्ये पाणी शिरले. जनावरांचे गोठे, कडबा वाहून गेला. शासनाने पैशाची मदत केली परंतु तरी सुध्दा पुनर्वसन पूर्ण झ ाले नाही. ते काम करावे लागेल. शासन ते करु इच्छिते की नाही ? शासन काम करते की करत नाही ? शासन काम करीत असले तरी त्या ठिकाणी कामे अपूर्ण राहतात. या अभिभाषणाकडे पाहात असताना केवळ नकारात्मक न बोलता जे काही केलेले आहे ते मान्य करावे लागेल आणि जे करावयाचे आहे ते सकारात्मक दृष्टीने करतो की नाही हे पहावे लागेल. सांगलीच्या संदर्भात, कोयनेच्या संदर्भात माननीय सभापतींकडे बैठक होणार आहे. त्याचप्रमाणे गोदावरीकाठच्या गावांच्या बाबतीत त्या ठिकाणी बैठक होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

सभापती महोदय, ऊसाच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे बीड जिल्ह्यामध्ये 3 लाख हेक्टरपेक्षा जास्त ऊस शिल्लक राहण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. पॅकेज मिळाले परंतु पॅकेज उशिरा मिळाल्यामुळे काही कारखाने उशिरा सुरु झाले. पॅकेज मिळाले नसते तर काय अवस्था झाली असती याची कल्पना सगळ्यांना येऊ शकते. माननीय श्री. शरद पवार यांच्याकडे शेतकऱ्यांविषयीची दृष्टी असल्यामुळे आपल्याला पॅकेज मिळालेले आहे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. मी महाराष्ट्र शासनाने अभिनंदन करते. ज्या ठिकाणी 50 किलामीटरच्या पुढच्या वाहतुकीसाठी ऊस शिल्लक राहणार असेल तर तो ऊस दुसऱ्या कारखान्यांना नेण्यासाठी प्रती टन प्रती किलोमीटर 1 रुपया अनुदान देण्याचा निर्णय शासनाने

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्रीमती उषाताई दराडे ....

घेतलेला आहे. त्याचा विचार केल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देते. परंतु तीन रुपयांपर्यंत किमान खर्च झाला तर कोणताही कारखाना तोट्यामध्ये जाऊन बीड जिल्ह्यातील ऊस उचलेल अशी परिस्थिती नाही. केजच्या कारखान्याला, आष्टीच्या कारखान्याला, पाथर्डीच्या कारखान्याला किंवा बाहेरच्या कोणत्याही कारखान्याला सांगावे. हा ऊस न्यावयाचा असेल तर आपल्याला या दृष्टीकोनातून अनुदान द्यावे लागेल. शासनाला हे अनुदान वाढवावे लागेल. जिल्हाधिकाऱ्यांकडून रिक्विझिशन करुन सगळे ट्रक ताब्यात घ्यावे लागतील. पश्चिम महाराष्ट्रातील कारखान्यांची जी यंत्रणा आहे ती यंत्रणा मराठवाड्यात, बीड जिल्ह्यामध्ये डायव्हर्ट करावी लागेल. जसे आपण नैसर्गिक आपत्तीकडे पाहतो, जसे आपण त्सुनामीकडे पाहतो,

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषाताई दराडे...)

महापुराकडे जसे पहातो, भूकंपाकडे जसे पहतो त्याप्रमाणे आणि तेवढ्याच गांभीर्याने महाराष्ट्र शासन या उसाच्या प्रश्नाकडे पाहील असा विश्वास मी या निमित्ताने व्यक्त करते.

या सदनामध्ये व्याजदराबाबत खूप चर्चा झाल्या.शेतक-यांना 6 टक्के व्याजाने कर्ज देण्याचा प्रयत्न माननीय श्री. शरदश्चंद्र पवार याच्या सहकार्याने महाराष्ट्र शासनाने केला. त्याची अंमलबजावणी कमी प्रमाणात झाली. ती अंमलबजावणी मोठ्या प्रमाणावर झाली पाहिजे. खरे म्हणजे तत्वत: मान्य करणे आणि मान्य करणे यामध्ये फरक आहे. तेव्हा नजिकच्या काळात शेतक-यांना 6 टक्क्या ऐवजी 4 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याचा शासनाने प्रयत्न करावा अशी मी शासनाला विनंती करते आणि जे काही निर्णय घेतले त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. महाराष्ट्राच्या संदर्भात मला दोन-तीन गोष्टींचा आवर्जून उल्लेख करावयाचा आहे. आज महाराष्ट्रामध्ये प्रत्येक श्रमशक्ती मागे अर्धीशक्ती ही महिलांची आहे. या महाराष्ट्रामध्ये श्रमशक्ती करणा-या आमच्या ज्या भगिनी आहेत त्यांच्या श्रमशक्तीला प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या बाबतीत शासनाने कोणती पावले उचलली आहेत ? यासंबंधी मागील वर्षाची आणि या वर्षाची काय परिस्थिती आहे याचे सिंहावलोकन करावे लागेल. महाराष्ट्रातील महिलांच्या श्रमशक्तीला विकास प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेण्याचा यशस्वी प्रयत्न आपण करीत आहोत. सभापती महोदय, महाराष्ट्राला यशाची परंपरा आहे. महिलांच्या संदर्भात आपण वारसा हक्क कायद्यामध्ये दुरुस्ती केली, कोर्ट फी कायद्यामध्ये दुरुस्ती केली. महिला आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले, महिला ग्रामसभांचा कायदा केला, पंचायत समितीमध्ये 3/4 बहुमत असल्याशिवाय अविश्वासाचा ठराव आणता येणार नाही असा कायदा केला. अशा प्रकारची पावले आपण उचलेली आहेत. याप्रमाणे प्रत्येक पावलागणिक आपण पुढे जात आहोत. ग्रामीण भागातील विकासाच्या संदर्भात आपण महिलांचा सहभाग ही कन्सेप्ट यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करीत आहोत. ज्या गावामध्ये महिलांच्या ग्रामसभा होतात त्या गावांचा विकास आपण करु शकलो आहोत. जिच्या हाती पाळण्याची दोरी होती तिच्या हाती आता झेंड्याची दोरी आलेली आहे. ज्या महिला ग्रामसभेच्या सरपंच झालेल्या आहेत त्या आज ग्रामस्वच्छता अभियानामध्ये माझ्या गावाचा पहिला क्रमांक कसा येईल यादृष्टीने प्रयत्न करीत आहेत. आज महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीमध्ये महिलांचा सरपंच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषाताई दराडे...)

म्हणून सहभाग फार मोठा नाही ही बाब खरी असली तरी आज ज्या महिला ग्रामसभेमध्ये सहभाग घेतात त्या ठणकावून सांगतात की, माझ्या गावामध्ये दारुबंदी झाली पाहिजे. ग्रामसभेमध्ये महिलांना तुम्हाला काय पाहिजे असे विचारल्यानंतर त्या सांगतात की, आम्हाला प्रथम पाणी पाहिजे, रस्ता नंतर दिला तरी चालेल, परंतु त्या आधी आमच्या गावातील दारु बंद करा. महिला ग्रामसभेमध्ये जेव्हा दारुबंदीचा निर्णय होतो त्यावेळी त्या गावची दारु बंद होते. बेलखंडी, पाटोदा, मालेगाव, रेवरी या गावांमध्ये महिलांनी केलेल्या ठरावामुळे दारु बंदी झालेली आहे. तसेच माझ्या साक्षीने 3 गावांची दारु शंभर टक्के बंद झालेली आहे हे मी याठिकाणी सांगू इच्छिते. आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या शेतक-यांची जगण्याची इच्छाशक्ती जागी केली पाहिजे.तसेच ज्या महिला शेतमजूर आहेत त्यांनाही जगण्याच्या इच्छाशक्तीची जाणीव करुन दिली पाहिजे. ही जगण्याची इच्छाशक्ती दिली तर त्यांच्यामध्ये स्वत:च्या पायावर उभे राहाण्याचे सामर्थ्य निर्माण होईल. महापूरामध्ये उद्ध्वस्त झालेला शेतकरी हा शासनाच्या मदतीवर अवलंबून राहात नाही. शासनाची त्याला मदत मिळते. ही मदत मिळण्यामध्ये ज्या काही त्रुटी असतील त्या दुरुस्त केल्या पाहिजेत आणि ती इच्छाशक्ती शासनाकडे आहे की नाही हा खरा प्रश्न आहे. आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्याचे समर्थन मी करणार नाही. परंतु जे लाखो शेतकरी आज जगत आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही, त्यांना जगण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. मराठवाड्यातील राजकारणी मंडळींचे पहिले वाक्य असे असते की, पश्चिम महाराष्ट्राचे राजकारणी हे मराठवाड्याला पाणी देत नाहीत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.......

ज्यावेळी ग्रामीण भागामध्ये आम्ही जातो तेव्हा सांगतो की, यावर्षी केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या नॅशनल हॉर्टिकल्चर मिशन योजनेतील 70 कोटी रुपये परत गेले. का नाही योजना राबविली? गांडूळ खताचे पैसे परत जातात. फुल शेतीचे, फळबागाचे पैसे परत जातात. माझ्या शेतकऱ्यांना या योजनेला योग्य दिशा देऊन अंमलबजावणी करण्यासाठी प्रोत्साहन दिले तर माझा मराठवाडा आणि बीड जिल्हा यातील शेतकऱ्यांचे आर्थिक परावलंबन दूर झाल्याशिवाय राहणार नाही. माझ्या पाटोदा तालुक्यात महासंघी नावाचे गाव आहे. त्या गावामध्ये महेंद्र गर्जे नावाच्या शेतकऱ्याच्या मार्गदर्शनाखाली गुलाब आणि निशीगंध फुलाची शेती झाली. माझ्या भगिनीने 1 एकर शेतामध्ये, जी माऊली तीन रंगाची लुगडी नेसते, तिने महिन्याला 15 हजाराचा निशिगंध अहमदनगर, पुणे आणि दिल्लीच्या बाजारामध्ये पाठविला ही गोष्ट माझ्या दृष्टीने अभिमानास्पद आहे. तुझे आहे तूजपाशी, तुझी जागा फुलापाशी. आपण फार संपलो असे नाही. पुष्कळ करण्यासारखे आहे. शेतकऱ्यांना आत्मविश्वास देण्याची गरज आहे. धारुर आणि वडवणी तालुक्यामध्ये जे शेतकरी कोणत्याही कारखान्याचे सभासद नाहीत. अशोक पाटील यांच्या कारखान्याचे सभासद नाहीत, जयदत्त क्षीरसागर यांच्या कारखान्याचे सभासद नाहीत. साठवण तलाव झाले. प्रचंड प्रमाणात शेतकऱ्यांनी ऊस लावला. शेतकऱ्यांच्या त्या ऊसाला नेणारा कोण आहे? नियोजनबध्द पध्दतीने ऊस किती लावायचा? प्रचंड प्रमाणात ऊस पिकल्यामुळे साखरेला भाव मिळणार नाही. ब्राझीलमध्ये साडेतीन हजार टनाचा कारखाना केवळ 90 लोक चालवितात. चीनने साखर क्षेत्रात प्रवेश केला म्हणून संकट आले आहे असे सांगितले जाते. परंतु आमच्या सुशिक्षित बेरोजगार युवकांना समजावून सांगणार कोण? शेतात ऊस लावल्यामुळे आज चारचाकी गाडी घेऊन फिरतो आहे म्हणून मी ऊस लावला पाहिजे या कन्सेप्टमधून योजना तयार केली. माझ्या मराठवाडा आणि बीड जिल्हयामध्ये केसर आंबा जो एक्स्पोर्ट झोनमध्ये आहे तो लावला तर औरंगाबादमधून हा आंबा जगाच्या पाठीवर जाऊ शकतो. केवळ मोटीव्हेशन करण्याची गरज आहे. माझ्या जिल्हयामध्ये हरिदास नावाचा डेप्युटी सीईओ आहे. महाराष्ट्रामध्ये जलस्वराज्य योजनेमध्ये आमचा जिल्हा पहिला, ग्रामस्वच्छता अभियान योजनेमध्ये आमचा जिल्हा पहिला. रात्र-रात्र मेहनत घेऊन हा अधिकारी शेतामध्ये फिरतो, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतो. त्यामुळेच राज्यामध्ये जलस्वराज्य योजनेमध्ये आमचा जिल्हा पहिला येऊ शकतो. विरोधकांनी..............................

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.......

आणि सत्ताधाऱ्यांनी एकमेकांविषयी विरोधासाठी विरोध, सत्तेसाठी सत्ता, राजकारणासाठी राजकारण करु नये. छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जे केले तेच सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार साहेब करीत आहेत. विकासाची भाषा असेल तर योजना करतात. माझ्या जिल्हयात केसर आंबा झाला, आवळा झाला. शेतकऱ्यांना पटले. 10 एकरामध्ये ऊस लावण्याऐवजी 5 एकरामध्ये लावायचा आणि 3 एकरामध्ये केसर आंबा लावायचा, दुधाचा धंदा करायचा. वाळवा तालुक्यात महिला सोसायट्या दुधाचा धंदा करतात. बचत गटाच्या माध्यमातून गावाच्या विकासासाठी प्रयत्न करतात. बचत गटाबाबत मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करते. मोठया प्रमाणात बांधणी झाली. परंतु महाराष्ट्र शासनाने त्यामध्ये सुसूत्रता आणण्याची गरज आहे. आर्थिक विकास महामंडळ एजन्सी म्हणून काम करते, सेवाभावी संस्था एजन्सी म्हणून काम करतात. गट बांधतात. फेडरेशन म्हणून को-ऑपरेटिव्हच्या माध्यमातून 32-33 संस्था उभ्या केल्या. परंतु पतपुरवठा मरणासन्न अवस्थेत आहे. डीसीसी बँकेच्या माध्यमातून गट चालवितात. सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी स्वत: गटाची चळवळ उभी केली आहे. गट बांधणी टार्गेट ओरिएन्टेड आहे असा मी आरोप करणार नाही. महिला बचत गटाची बांधणी टार्गेट ओरिएन्टेड नाही असे म्हणण्याची हिंमत करणार नाही. गट बांधले, त्या गटांना पैसा का मिळाला नाही याचा कधीतरी रिव्ह्यू घेतला पाहिजे. एका गटाला केवळ 6 महिन्याचे ट्रेनिंग दिले नाही म्हणून डीआरडीएचे 2 लाख रुपये मिळणार नसतील तर यावर नियंत्रण असले पाहिजे. या बचत गटावरील महिलांचा विश्वास उडणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. महिला ही अंगार आहे, शक्ती आहे. एकही गाव असे सापडणार नाही, ज्या गावामध्ये महिलांचा बचत गट नाही.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती ऊषा दराडे ...

या महिलांना बचतगट चालविण्याच्या संदर्भातील योग्य प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. बचतगटातील महिलांना गांडूळ खत, फुलशेती, दुधाचा उद्योग, मायक्रो फायनान्स, मार्केटींग याचे शिक्षण मिळाले तर महिलांचे आर्थिक उत्पन्न वाढू शकेल. महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागासाठी ज्या योजना, जे उपक्रम सुरु केलेले आहेत त्याचा चांगला परिणाम दिसून सध्या दिसून येत आहे. विदर्भाचा बॅकलॉग दूर करण्याचे काम महाराष्ट्र शासन प्रामाणिकपणे करीत आहे. दलित, आदिवासी, मागासवर्गीय, शेतकरी, शेतमजूर यांना जगण्याचा आत्मविश्वास देण्याचे काम महाराष्ट्र शासन करीत आहे. महाराष्ट्र शासनाच्या योजना 100 टक्के यशस्वी झाल्या असे मी म्हणत नाही परंतु या योजनेच्या माध्यमातून एक क्रांतिकारक पाऊल महाराष्ट्र शासन उचलत असल्यामुळे या योजनांचा उपयोग महाराष्ट्रातील जनतेला फार चांगल्या प्रकारे होत आहे. सभापती महोदय, एन्रॉन प्रकल्पाला समुद्रातून परत काढून त्याला नवसंजीवनी देऊन, महाराष्ट्राला अधांरातून प्रकाशात आणण्याचे काम शासनाने केलेले आहे. स्तुत्य असे काम महाराष्ट्र शासनाने केलेले आहे. वेळेची मर्यादा असल्यामुळे मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाला पाठिंबा देऊन माझे दोन शब्द पूर्ण करते.

--------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : आदरणीय सभापती महोदय, मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाला विरोध करण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. या ठिकाणी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या संदर्भातील अनेक सन्माननीय सदस्यांचे विचार ऐकलेले आहेत, किंबहुना माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचा विषय सोडून सुध्दा अनेक गोष्टी मी कालपासून ऐकत आलेलो आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे दुर्दैव आहे की, महाराष्ट्रावर सातत्याने अस्मितेचा घाला घातला जातो आणि या घाल्याला सुरुवात मराठी भाषेपासूनच होत असते. कित्येक वर्षापासून माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण इंग्रजीतूनच होत असते. त्यामुळे मराठी भाषेवर माननीय राज्यपाल महोदयांकडून जो घाला घातला जात आहे तो आम्हाला आता नवीन राहिलेला नाही. कित्येक वर्षापासून आम्हाला माननीय राज्यपाल महोदयांचे तेच तेच भाषण आणि तेच तेच मुद्दे ऐकावयास मिळत आहे. अभिभाषणाचा शेवट कोणत्या वाक्यानंतर होईल हे सुध्दा कळून चुकलेले आहे. माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण मी ऐकत असतांना माझ्या शेजारी एक नवीन सन्माननीय सदस्य बसले होते त्यांना मी सांगितले की, ज्यावेळेस सीमाप्रश्नाचा विषय येईल तेव्हा अभिभाषणाचा शेवट होईल. सभापती महोदय, आणि घडलेही मात्र तसेच. ज्यावेळेस माननीय राज्यपाल महोदयांनी सीमाप्रश्नाच्या मुद्याचा उल्लेख केला तेव्हा तो मुद्दा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील शेवटचाच होता. ज्या प्रमाणे वारकरी पंढरीच्या वारीला जातात त्या प्रमाणेच शासनाचा कारभार चाललेला आहे हे या वरुन दिसून येते. मागच्या अभिभाषणात जे मुद्दे असतात तेच मुद्दे पुढील वर्षाच्या माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात येत असतात. सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण हे सरकारच्या अर्थसंकल्पाचा आरसा असतो, चाहूल असते. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी अभिभाषणावरील तसेच त्यांनी माननीय विदर्भातील शेतक-यांच्या संदर्भातील, माननीय पंतप्रधांनाच्या पॅकेजच्या संदर्भातील विचार सुध्दा व्यक्त केलेले आहेत. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत असल्यामुळे या आत्महत्या थांबवाव्यात यासाठी माननीय पंतप्रधानांनी विदर्भातील शेतक-यांसाठी पॅकेज जाहीर केले, व हे पॅकेज देण्यासाठी माननीय पंतप्रधान विदर्भात गेले होते. परंतु यासंदर्भात मला आपल्याला सांगावयाचे आहे की, त्यावेळी एक शेतकरी माननीय पंतप्रधानांचे पॅकेजचे भाषण

....3

श्री. अरविंद सावंत.....

ऐकण्यास गेला, संपूर्ण भाषण ऐकले व बाजारात जाऊन त्याने एक बॉक्स विकत घेतला आणि आपल्या घरी घेऊन गेला आणि बायकोला म्हणाला हे बघ, आपल्या पंतप्रधानांनी शेतक-यांसाठी पॅकेज दिलेले आहे व ते पॅकेज मी घेऊन आलेलो आहे. तेव्हा त्या शेतक-याच्या बायकोने पॅकेज काय दिलेले आहे हे पहाण्यासाठी बॉक्स मध्ये हात घातला परंतु शेतक-याच्या पत्नीच्या हाताला काहीच लागले नाही तेव्हा ती आपल्या नव-याला म्हणाली की, बॉक्समध्ये हाताला काहीच लागत नाही त्यावेळेस तो शेतकरी आपल्या बायकोला म्हणाला की, यालाच "पॅकेज" म्हणतात. सभापती महोदय, जलस्वराज्य प्रकल्पाची काय परिस्थिती आहे हे जर या ठिकाणी माननीय विजयसिंह मोहिते-पाटील असते तर त्यांनी ते चांगल्याप्रकारे सांगितले असते.

सभापती महोदय, खडकवासला, वरसगाव आणि पानशेत येथील शेतक-यांच्या जमिनी धरणासाठी घेण्यात आल्या. या प्रकल्पग्रस्तांचे पुनवर्सन दौंड तालुक्यात करण्यात आले. दौंड तालुक्यातील शेतक-यांच्या जमिनी घेतल्या आणि ज्यांचे पुनर्वसन करावयाचे आहे त्या शेतक-यांना त्या जमिनी देण्यात आल्या. आपल्याला थोडी कमी जमीन मिळाली तरी हरकत नाही परंतु आपली जमीन जी जिरायत होती ती बागायत होईल आणि आपले उत्पन्न वाढेल या आशेवर हे शेतकरी होते. आपले भले होईल या आशेवर त्यांनी आपल्या जमिनी शासनाला दिल्या. दुर्दैवाने बारामती, इंदापूरला पाणी देण्यात आले परंतु ज्यांचे पुनर्वसन दौंड तालुक्यात करण्यात आले त्यांना मात्र पाणी मिळाले नाही. ज्या शेतक-यांचे पुनर्वसन झाले ते शेतकरी उद्ध्वस्त तर झालेच पण पुनर्वसित शेतक-यांच्या जमिनी घेण्यात आल्या ते शेतकरी देखील उद्ध्वस्त झाले. आज दौंडमध्ये पिण्याचे पाणी नाही, शेतीचे पाणी नाही, सिंचनासाठी पाणी नाही अशी अवस्था आहे. बारामती आणि इंदापूर या तालुक्यात मात्र पाण्याची व्यवस्थित व्यवस्था आहे. या बाबीचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कोठेही आढळून येत नाही याचा मला खेद होतो आहे. कोयना धरणामुळे जे लोक विस्थापित झालेले आहेत त्यांना देखील कसल्याही प्रकारचा लाभ मिळालेला नाही. एसईझेडच्या संदर्भातील सुध्दा तीच परिस्थिती आहे. ज्या प्रमाणे नंदीग्राम येथे एस.इ.झेड.च्या संदर्भात प्रकार घडला तसाच प्रकार आपल्या येथेही घडण्याची शक्यता आहे. माननीय शरदचंद्र पवार साहेबांना दूरदृष्टी आहे याची मला चांगली कल्पना आहे परंतु त्यांना आपली बारामती संपन्न करावयाची आहे "दौंड" नाही.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : आदरणीय सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर अनेकांच्या प्रतिक्रिया ऐकल्या. किंबहूना राज्यपालांच्या अभिभाषणाला सोडून सुध्दा आपण अनेक गोष्टी ऐकत होतो. अभिभाषणामध्ये राज्यपाल महोदयांचे जे उल्लेख आले त्यासंदर्भातील खेद प्रकट करण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्राचे दुर्दैव आहे की, सातत्याने महाराष्ट्राच्या आस्मितेवर घाला घालूनच सरुवात होते. तो घाला प्रथम भाषेवरच घातला जातो. मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि सतत गेले कित्येक दिवस भाषण पाहिले, भाषणाच्या वेळी नवीन आमदार बसले होते, सीमा प्रश्नाचा उल्लेख आला की, समजायचे राज्यपालांचे भाषण संपले. आणि अक्षरश: जसे पंढरीच्या वारीला जातो तसे भाषण झाले. राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे उद्याचा सरकारचा येणा-या अर्थसंकल्पाचा थोडासा आरसा किंवा चाहूल असते. ही चाहूल मनाला फुंकारा देणारी वाटत नाही. या ठिकाणी ताई म्हणाल्या की, शेतक-यांना पॅकेज मिळाले आहे. ताई यासंदर्भात मी आपल्याला किस्सा सांगतो. माननीय पंतप्रधान साहेब महाराष्ट्रात येऊन गेले. पॅकेज जाहीर केले. एक शेतकरी गेला आणि ते भाषण ऐकल्यानंतर घरात एक बॉक्स घेऊन आला. कारभारणीला म्हणाला, " कारभारणी गेलथो बर सभेला. तिकडं देशाचे पंतप्रधान आलथे. आपण गुंडासे बांधतो त्यानी पगडी बांधलेली, हे बघा एवढं मोठ पॅकेज दिल मला, घेऊन आलो घरला. बायको म्हणली, पॅकेज कुठं आहे बघू. त्याने पॅकेज दाखवले. तीन बॉक्समध्ये हात घातला हाताला काही लागेना म्हणून तीने नव-याला विचारले "कुठं काय"? तेव्हा शेतकरी म्हणाला त्यालाच पॅकेज म्हणतात. त्या बॉक्समध्ये काही नव्हत. शेतक-यांना काही मिळाले नाही. आपण या ठिकाणी जलस्वराज्यापासून जे जे मांडले, खरे म्हणजे येथे अजितदादा पाहिजे होते. पुण्यातून तुम्ही खडकवासला, वरसगाव या सगळया पाणलोट क्षेत्रातील धरण ग्रस्तांना दौंड मध्ये आणले. बारामतीत पाणी, इंदापूरला पाणी. सभापती महोदय, पुनर्वसन कायदा असे म्हणतो, की, त्यांना बागायती जमीन मिळाली पाहिजे. जिरायती जमीन तेथे होती. तेथील मुळ शेतक-यांनी आपल्या जिरायती जमिनी पुनर्वसन करण्यासाठी आलेल्या शेतक-यांना दिल्या. त्याने वाटले ठीक आहे माझ्या 10 एकरातील 2 एकर गेली तर काय हरकत आहे? परंतु जर उरलेली 8 एकर बागायती होणार असेल तर माझ्याही जीवनाचे भलं आहे. काल परवा कोयना ग्रस्तांचा प्रश्न होता. आजही कोयना येथील शेतकरी पाण्याविना, घराविना, शेतीविना फिरत आहेत, आमच्या महाराष्ट्रात. तरीही आमचे राज्यपाल सातत्याने सांगत राहतात.... नंदीग्रामला एसईझेडचा प्रकार झाला. माननीय शरदपवार साहेबांना दुरदृष्टी जरुर आहे परंतु ती बारामती संपन्न करण्याची आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ KGS/ 16:45

श्री.अरविंद सावंत.........

दौंड करायचा नाही. "गंगा आली अंगणी" पण ती स्वत:च्या अंगणात, दुसऱ्याच्या अंगणात द्यावयाची नाही. दौंडमध्ये तीच परिस्थिती आहे. सभापती महोदय, आपण पुणे जिल्ह्यातील आहात, त्यामुळे माझ्यापेक्षा आपणास जास्त माहिती असेल. पुणे आणि नगर या दोन जिल्ह्यांनी संपूर्ण महाराष्ट्र नासवला आहे.

नुकत्याच झालेल्या जिल्हापरिषदा आणि नगरपालिका निवडणुकांच्या काळातील कायदा आणि सुव्यवस्था पाहिली तर माननीय गृहमंत्र्यांच्या मनाला नक्कीच वेदना होतील. तसे ते संवेदनशील आहेत. शिर्डी येथे नगरपालिकेची निवडणूक होती. त्यासाठी 17 उमेदवार रिंगणात उभे होते. त्याठिकाणी एकेका मताचा भाव तीन हजार रुपये होता. आळंदी येथे सुध्दा एका मतासाठी तीन हजार रुपये भाव होता. आपण अध्यात्मातले जाणकार आहात. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली, त्यांना सुध्दा वाटले असेल की, आपण कमी खोलीवर समाधी का घेतली ? आळंदीमध्ये उमेदवारांना पळविले जाते हे ऐकून माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सुध्दा वेदना झाल्या असतील. माणूस म्हणून ते वेगळे आहेत. एका जाहीर सभेत ते बोलले होते की, "मला सहन होत नाही आणि सांगताही येत नाही" अशी माझी अवस्था झालेली आहे. सध्याच्या महाराष्ट्राची प्रगती पाहून माननीय राज्यपालांची सुध्दा अभिभाषण वाचताना तीच अवस्था झाली असेल.

सभापती महोदय, नगर जिल्ह्यातील मुळा-प्रवरा वीज पुरवठा संस्था 300-400 कोटी रुपयांनी तोट्यात आहे. त्या संस्थेच्या निवडणुकीमध्ये जी अहमहमिका पाहिली तेव्हा मला आश्चर्य वाटले. विखे-पाटील गट, म्हैसकर गटांना मोठ्या प्रमाणावर मतदारांना पैशाचे वाटप होत होते. ही लोकशाहीची शोकांतिका म्हणावी लागेल. सभापती महोदय, जिल्हापरिषदांच्या निवडणुकांसाठी आपल्याला सभागृहाचे कामकाज दोन दिवस बंद ठेवावे लागते. जिल्हापरिषद निवडणुकीचा आणि सभागृहाचा काय संबंध आहे ? परंतु त्यांना भय वाटते की, आपला अध्यक्ष कोणीतरी पळवेल, त्याला कोठे लपवायचे असा त्यांच्यासमोर प्रश्न असतो. हे लोकशाहीला भूषणावह नाही.

श्री.अरविंद सावंत.........

सभापती महोदय, नगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील करंजा गावामध्ये शिवसेनेचे उमेदवार श्री.रफिक शेख हे खुल्या प्रवर्गातून निवडणुकीसाठी उभे होते. ते निवडणुकीत पराभूत झाले. त्यांच्या घरात जाऊन त्यांना आणि घरातील महिलांना मारहाण करण्यात आली. ते पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यास गेले असता त्यांची तक्रार नोंदविण्यात आली नाही. म्हणून कदाचित गुन्ह्याची संख्या रोडावली असेल. शेवटी तेथील महिला पदाधिकारी पोलीस स्टेशनसमोर ठिय्या मांडून बसल्या आणि त्यांनी डी.एस.पी.श्री.दाभाडे यांना फोन केला,तेव्हा त्यांची तक्रार नोंदविण्यात आली. पंचायत समितीच्या सभापती श्रीमती शिंगाडे ह्या एका पंचायत समितीच्या कार्यक्रमाला जात असताना काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याने रस्त्यावरच उद्‌घाटनाचा नारळ त्यांच्या डोक्यावर फोडला. त्या तिथेच बेशुध्द पडल्या. त्यासंदर्भात पोलीस केस दाखल झाली नाही. त्या शिवसेनेच्या कार्यकत्या आहेत.माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख आहे की, राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था चांगली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना मी सांगू इच्छितो की, मी सुध्दा गावागावांत, दऱ्याखोऱ्यात फिरतो. त्याठिकाणी महिलांना कोणत्या प्रकारणी वागणूक मिळते हे मी पाहिलेले आहे. सभापती महोदय, आजच्या काळात गरीब माणूस निवडणुकीसाठी उभा राहू शकत नाही. त्याला प्रथम जात विचारली जाते. त्यानंतर त्या भागातील मतदार यादी पाहून त्याचे पोस्टमार्टेम करुन त्याठिकाणी कोणत्या समाजाची किती माणसे आहेत हे पाहिजे जाते.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

परंतु आम्हाला आमच्या दैवताचा म्हणजे, वंदनीय माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा अभिमान आहे. माननीय श्री.बाळा नांदगावकर हे विधानसभा सभागृहाचे सदस्य आहेत. ते पूर्वी नगरसेवक होते, आता आमदार आहेत. खुल्या प्रवर्गातील विभागातून ते आमदार झाले. त्यांना माननीय साहेबांनी जात विचारली नाही, आम्हीही विचारली नाही. परंतु आज जात-पातीचा व पैशाच्या राजकारणाचा उभ्या महाराष्ट्रामध्ये धुडघूस चालला आहे. त्यामुळेच मी जाणीवपूर्वक या दोन जिल्हयांचा उल्लेख केला. नगर जिल्हयातील प्रत्येक निवडणुकांमध्ये पैशाचे वाटप झाले. कारण, त्याठिकाणी साखरसम्राट आहेत. त्याठिकाणी आम्हाला इनकम टॅक्स नाहीच. पैसा भयंकर आहे. आज तेथील गरीब शेतकरी मरत असून धनाडय शेतकरी हे राजकारण करीत आहेत. यासंदर्भातील उदाहरण आम्ही हिंजवडीला पाहिलेले आहे. माननीय शरद पवार साहेबांकडे दूरदृष्टी आहे. पुण्यामध्ये आय.टी. आले. परंतु आपण हिंजवडीचा भाग पाहिला तर, एक भाग अमेरिकेसारखा दिसतो व दुसरा भाग हा ग्रामीण असल्यासारखा वाटतो. आज हिंजवडीमध्ये पाहिले तर, त्याठिकाणी एकही मराठी मुलगा वा भूमिपूत्र नोकरीसाठी नाही. मग, विकास कसला झाला ? त्याठिकाणी एक नगरसेवक भाषण करीत होते. ते म्हणाले की, कालपर्यंत शेतकऱ्यांच्या दारात दुचाकी वाहन होते, आता चारचाकी वाहन आले आहे. असे जर असेल तर आपण आपल्या घरातील देवाचा फोटो काढावा व आपल्या कृषि मंत्र्यांचा फोटो घरात लावावा. कारण आपल्या घरात हे वैभव आले, परंतु त्यासोबत काय काय दुरावस्ता आल्या, त्या आपणास माहिती नाहीत. माननीय गृहमंत्री महोदय, आपल्याला बारबालांचा कायदा करावा लागला. त्याच हिंजवडीतील मुले आज लोणावळयाला-पनवेलला येत आहेत. त्यांना 25-25 लाख रुपये एकरांना मिळाले, गाडया-घोडया आल्या. आज त्याठिकाणच्या घरातील प्रत्येक माणूस सांगतो की, आम्ही आमच्या घरातील एक माणूस राजकारणात सोडला आहे. कितीही पैसे खर्च केले तरी काहीही होणार नाही. मिशी फुटलेल्या मुलांनाही आज महत्वाकांक्षा येत आहे. आज तेथील मुलांना जिल्हा परिषदेचा सदस्य किंवा आमदार व्हायचे असेल तर ते सरळ बोललात की, साहेब, किती पैसे द्यायचे ते सांगा. काय-काय खर्च करायचे ते सांगा, आम्ही खर्च करु. आपण देत नसाल तर आम्ही दुसरीकडे जाऊ. अशाप्रकारची आज राजकारण्यांची शोकांतिका असून आज राज्यातील कायदा व सुव्यवस्था लयास जात आहे. सभापती महोदय, परवा कोंडाण्याच्या पायथ्याशी रेव्ह पार्टी झाली. पुण्याच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

विमानतळावर प्लेन लेट असल्यामुळे मी, माननीय श्री.शिवरकर, श्रीमती ढोले-पाटील ताई उभ्या होतो. त्यावेळी यासंदर्भात चर्चेच्यावेळी मी असे म्हणालो की, अहो, आपल्या पुण्यामध्ये फार मुले वाढली आहेत, पुण्यामध्ये परप्रांतीय मुले वाढलेली आहेत. परवा, टी.व्ही.वर मुलाकत असताना सिम्बॉयसिसच्या श्रीमती येरवडे यांनी परप्रांतीय मुलांना विचारले की, आपल्याला मराठी भाषा येते का ? त्यांनी सांगितले की, "When you go to Rome behave as Romans." ही मुले सिंहगडाच्या पायथ्याशी चरस, गांजा, अफू, दारु पित होते, त्यांना काहीच वाटले नाही. सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या हॉटेल्समध्ये कोणते अनैतिक धंदे चालतात, ते आपल्याला माहीतच आहे. दुर्दैवाने सिंहगडावर बिअरचे कॅन, दारुच्या बाटल्या मिळाल्या. मागील अधिवेशनामध्ये पन्हाळगडावर कोणते धंदे चालतात, त्याची मी माहिती दिली. आजही त्याठिकाणी तशीच अवस्था आहे. आज राज्यामध्ये कायदा आणि सुव्यस्थेची अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. ती सुधारण्याच्या दृष्टीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कुठल्याही प्रकारचा उल्लेख नाही.

सभापती महोदय, मी पाण्याच्या संदर्भात बोलणार आहे. आज कोकणामध्ये काय चालले आहे ? त्याठिकाणी 32 पाणलोट प्रकल्प केले. परंतु त्याठिकाणी कुठल्याही प्रकारची पाण्याची व्यवस्था नाही. आश्चर्य म्हणजे, गेल्या वर्षी एवढा पाऊस होऊनही 15 दिवसानंतर त्याठिकाणी एक थेंबही पाणी राहिलेले नाही. आज या प्रकल्पांवर कोटयावधी रुपये खर्च झाले आहेत. परंतु त्याठिकाणी पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे याचाही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिसत नाही.

सभापती महोदय, आपण मुंबईचे शांघाय करणार आहात, ते करा. मुंबईतून दरवर्षी 74 हजार कोटी रुपयांचा इन्कम टॅक्स जातो. परंतु त्या बदल्यात आम्हाला काय मिळते ? किती पैसे मिळतात ? ते आपण सांगावे. केंद्र सरकारने 337 कोटी रुपये दिले. परंतु ते मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व नांदेडसाठी दिले. परंतु मुंबईच्या हाती काय ? तरीही आमच्या नावाने शंख फुकायचे, हे योग्य आहे काय ? हे सर्व धोरण पाहिले तर अत्यंत वाईट अवस्था असल्याचे आपल्याला दिसून येईल.

..3.....



SSP/ KTG/ KGS/ पूर्वी श्री.अजित... 16:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

सभापती महोदय, दिनांक 18 मार्च रोजी माननीय संभाजी महाराजांची पुण्यतिथी आहे. संभाजी महाराजांचे स्मारक उद्याच्या राष्ट्राभिमानी, देशाभिमानी तरुण माणसांसाठी नेहमीच चेतना देणारे असेल. परंतु त्यांचे स्मारक आजही होत नाही. त्यासाठी राज्य सरकार पैसे देत नाही. माननीय गृहमंत्र्यांनी तरी यासाठी पैसे द्यावेत, अशी माझी आपणांस विनंती आहे. आपण तेवढा तरी विकास करावा. वाईट याचे वाटते की, त्याठिकाणी समोर एक कसली तरी शाळा आहे, परंतु संभाजी महाराजांचे स्मारक दहा-दहा रुपये खर्च करुन बांधले जात आहे, हे योग्य नाही. त्यामुळे या राष्ट्रतेजाच्या बाबतचा उल्लेख यामध्ये कुठेही दिसून येत नाही. राजगुरुंचे स्मारकही तसेच पडलेले आहे. त्यामुळे या राष्ट्रतेजांच्या स्मारकांचा उल्लेख यामध्ये असावयास पाहिजे होता, तो यामध्ये दिसत नाही.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत पुढे सुरु..........

त्याचप्रमाणे थोर स्वातंत्र्य सैनिक राजगुरुच्या स्मारकाचा प्रश्नही तसाच पडून आहे. राष्ट्राभिमान, राष्ट्रतेज देणारे हे सैनिक होते, त्यांचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करणे आवश्यक होते.

सभापती महोदय, खास करुन कोकणातील पर्यटन विकासासाठी देखील अनेक गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. त्या ठिकाणी जे किल्ले आहेत त्यांचा विकास होत नाही. याचा उल्लेख देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही.

सभापती महोदय, कोकणातील गरीब माणसाच्या घरात लक्ष्मी जात नाही तर ती ठराविक माणसांकडे जाते आणि हा गरीब कोकणवासी तसाच करवंटया हातात घेऊन फिरतो आहे. कारण, कोकणात जलसंवर्धन प्रकल्प पोहोचत नाहीत. याचा उल्लेख देखील उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात नाही. या सर्व बाबतीत मी खेद प्रकट करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

--------------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या, श्रीमती सुधाताई जोशी यांनी मांडलेल्या अभिनंदनाच्या प्रस्तावाला सन्माननीय सदस्य, ॲडव्होकेट गुरुनाथ कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले आहे आणि त्यावर सभागृहात चर्चा सुरु आहे. या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील दोन मुद्यांना मी समर्थन देणार आहे तर इतर मुद्यांबाबत खेद व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात असा उल्लेख आहे की, "राज्याच्या काही भागांत गेल्या पावसाळयात तुफान पर्जन्यवृष्टी झाली, तसेच, महापूराचे संकटही आले, या नैसर्गिक तसेच इतर मानवनिर्मित आपत्तीवर धैर्याने मात करीत राज्यातील जनता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीस उत्साहाने सामोरी गेली." सभापती महोदय, मी महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर राहतो, आमगांव हे माझे गाव आहे. त्या ठिकाणी सातत्याने नैसर्गिक आपत्ती येत असते, मी ही परिस्थिती लहानपणापासून बघितली आहे. आमच्या जिल्हयाचे सन्माननीय पालकमंत्री ज्यावेळी सभागृहात उपस्थित होते त्यावेळी जर मला बोलण्याची संधी मिळाली असती तर बरे झाले असते. नैसर्गिक आपत्तीमध्ये रस्ते खराब झाले होते, ते दुरुस्त करण्यासाठी राज्यसरकारने आमच्या जिल्हयाला निधी उपलब्ध करुन दिला होता, हा सर्व निधी तसाच पडून आहे. आज मार्च महिन्याची 17 तारीख आहे, 31 मार्चपर्यन्त जर हा निधी खर्च झाला नाही तर काय होईल ? राज्यशासनाने आमच्या जिल्हयाला निधी दिला परंतु पालकमंत्री जिल्हाधिका-यांना सांगतात की, माझी स्वाक्षरी होत नाही तोपर्यन्त निधी वितरीत करु नये. ज्या ठिकाणी विकासाची कामे व्हावयास पाहिजे होती त्या ठिकाणी विकासाची कामे थांबलेली आहेत. हे सांगत असतांना मला अत्यंत वेदना होत आहेत.

सभापती महोदय, सभागृहात शेतक-यांच्या आत्महत्येचा प्रश्न उपस्थित झाला. शेंतक-यांना ख-या अर्थाने मदत मिळावयास हवी होती. सन्माननीय सदस्य, श्री.पाशा पटेल यांनी यासंदर्भात गांभीर्याने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ज्यांच्या विहिरी गेल्या, मोटारी जळाल्या त्यांना मदत मिळालेली नाही. ज्यांची घरे बुडाली, घरात पाणी गेले त्या लोकांनाही अजून मदत मिळालेली नाही. शासनाने या सभागृहात सांगितले की, यांसाठी मोठे पॅकेज देतो. परंतु, हे

..3.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर पुढे सुरु...........

पॅकेज जाहीर करुन देखील या सर्व लोकांना अद्याप मदत मिळालेली नाही, हे मी या ठिकाणी खेदाने सांगत आहे.

सभापती महोदय, अन्न-धान्याच्या संदर्भात कोणी बोलले नाही. रॉकेल वितरणामध्ये प्रचंड मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु आहे, या भ्रष्टाचाराची चौकशी व्हावयास पाहिजे. परंतु, यासंबंधी माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात कुठेही दखल घेतलेली नाही. रॉकेलचा कोटा पेट्रोल पंप चालकांनाच देण्यात येतो. रॉकेलचा दर प्रति लीटर 11 रुपये असला तरी 15 रुपये, 20 रुपयांखाली कुठेही रॉकेल मिळत नाही. वीज तर मिळत नाही पण गरीबांना कंदील लावण्यासाठी रॉकेलही मिळत नाही, अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी विजेच्या संदर्भात विस्तृतपणे या ठिकाणी परिस्थिती मांडली आहे, त्यामुळे मी यासंदर्भात जास्त काही बोलणार नाही. परंतु, एकच मुद्दा सभागृहासमोर ठेवतो की, जे प्रामाणिकपणे बिले भरतात ते ख-या अर्थाने मरत आहेत, त्यांच्यावर आत्महत्या करण्याची पाळी आली आहे. ज्यांच्या घरात एक लाईट असेल त्यांना लाखो रुपयांची बिले येत आहेत. मी स्वत: बाजार समितीमध्ये आहे. बाजार समितीचे लाईटचे बिल मी बघितले. 2 रुपये 50 पैसे प्रति युनिट बिल असले तरी ते तीनपट, चारपट दाखविण्यात आले होते. विद्युत मंडळाने ग्राहकाला लुटण्याचे काम केलेले आहे. यासंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कुठलाही खेद प्रकट केलेला नाही. आम्ही जी बिले भरतो आहोत ती दीडपट, दुप्पट भरत आहोत आणि जो चोरी करतो तो राज्य करतो, अशी परिस्थिती आहे. शेतक-यांना तुम्ही मोफत वीज देऊ शकत नाही. उलट त्यांना दीडपट, दुप्पट वीज आकारणी करीत आहात, हे मी या ठिकाणी खेदाने नमूद करीत आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत पुढे सुरु..........

त्याचप्रमाणे थोर स्वातंत्र्य सैनिक राजगुरुच्या स्मारकाचा प्रश्नही तसाच पडून आहे. राष्ट्राभिमान, राष्ट्रतेज देणारे हे सैनिक होते, त्यांचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करणे आवश्यक होते.

सभापती महोदय, खास करुन कोकणातील पर्यटन विकासासाठी देखील अनेक गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. त्या ठिकाणी जे किल्ले आहेत त्यांचा विकास होत नाही. याचा उल्लेख देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही.

सभापती महोदय, कोकणातील गरीब माणसाच्या घरात लक्ष्मी जात नाही तर ती ठराविक माणसांकडे जाते. हा गरीब कोकणवासी तसाच करवंटया हातात घेऊन फिरतो आहे. कारण, कोकणात जलसंवर्धन प्रकल्प पोहोचत नाहीत. याचा उल्लेख देखील उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात नाही. या सर्व बाबतीत मी खेद प्रकट करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर .........

मला असे सांगावेसे वाटते की, जे पॅकेज जाहीर केलेले आहे ते बँकांना देण्याऐवजी सेवा सहकारी सोसायटयांना दिले असते तर अधिक चांगले झाले असते. सहकारी बँकांकडून सेवा सहकारी सोसायटयांना कर्ज दिले जाते. या संस्था शेतक-यांच्या आहेत. शेतक-याने कर्ज घेतले आणि त्या कर्जाची परतफेड व्याजासह केली तरी तो शेतकरी कर्जातून मुक्त होत नाही. कारण सहकारी बँका ते कर्ज सोसायटयांच्या नावाने जमा करतात. शेतक-याने जी रक्कम भरलेली असते ती रक्कम व्याजामध्ये जमा केली जाते. मग शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करेल ? कर्ज भरल्यानंतर देखील त्या शेतक-याच्या डोक्यावर कर्जाचा बोजा राहतो, हे शेतक-यांचे दुर्दैव आहे. शासनाने याची चौकशी केली पाहिजे. ख-या अर्थाने पॅकेज बँकांना न देता सेवा सहकारी सोसायटयांना दिले पाहिजे. सेवा सहकारी सोसायटयांमार्फत शेतक-यांना कर्जाचे वाटप करावयास पाहिजे होते. परंतु तसे झाले नाही. विदर्भासाठी पॅकेज जाहीर केले गेले. मी धान उत्पादक शेतकरी आहे. एका एकरामध्ये 7-8 क्विंटल धानाचे उत्पादन झाले तरी आम्ही समाधान मानतो. कितीही दुष्काळ पडला तरी एका एकरामध्ये 4-5 क्विंटल धानाचे उत्पादन होते. धानाचे उत्पादन कमी झ ाले तरी आम्ही चटणी भाकरी खाऊन जीवन जगतो. परंतु आत्महत्या करीत नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे आमच्या भागाातील शेतक-यांना कर्ज घ्यावे लागते. कर्ज घेतलेला शेतकरी अल्पावधीत आत्महत्या करतो. ख-या अर्थाने हे पॅकेज गोंदिया, भंडारा आणि चंद्रपूर जिल्हयाला देखील मिळावयास पाहिजे होते. आमच्या या तीन जिल्हयांवर अन्याय झालेला आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये फक्त 4 जिल्हयांचा उल्लेख करण्यात आलेला आहे, याचा मी खेद व्यक्त करतो. न्याय द्यावयाचा असेल तर सर्वांना समान न्याय दिला पाहिजे. मी कृषी उत्पन्न बाजार समितीचा सभापती आहे. माननीय पणनमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. माननीय पणनमंत्री चांगले काम करतात. त्यांनी शेतक-यांसाठी आखलेल्या योजना देखील चांगल्या आहेत. योजना शेतक-यांसाठी आहेत. परंतु शेतक-यांना त्या योजनांचा लाभ मिळत नाही. शेतकरी कर्ज घेतात. परंतु कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माल विकत नाहीत, हे मला खेदाने सांगावेसे वाटते. गरीब खेतकरी खूप उत्पन्न काढतो, असे नाही. छोटया शेतक-यांचा विचार केला तर बाजाराच्या योजनेमध्ये पंचायत समिती फसलेली आहे, असे माझे म्हणणे आहे. माननीय

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ SBT प्रथम श्री.रोझेकर ......... 17:00

श्री.केशवराव मानकर .........

राज्यपालांच्या अभिभाषणातील दोन मुद्यांबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. नागपूर विद्यापीठाला 150 कोटी रुपये दिले त्याबद्दल आणि राज्यातील वन क्षेत्रात राहणा-या गरीब व आदिवासी मजुरांना तेंदूपत्ता विक्रीतून होणारा निव्वळ नफा प्रोत्साहनार्थ मजुरी म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे त्याबद्दल मी माननीय राज्यपालांना धन्यवाद देतो. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र.21 आणि 29 चे मी समर्थन करतो. मी जिल्हापरिषदेवर तीन वेळा निवडून आलो आहे. मुद्दा क्रमांक 29 मध्ये असे नमूद केलेले आहे की, "संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानास लाभलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे स्वच्छतेच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशातील आदर्श राज्य म्हणून गणले जाऊ लागले आहे." हे मी मान्य करतो. परंतु ग्राम पंचायती या योजनेमध्ये सहभागी होत आहेत काय ? हा खरा प्रश्न आहे. ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने पाहिजे तेवढी तडफ दाखविली नाही. मी जिल्हापरिषदेवर तीन वेळा निवडून आलो आहे. मी प्रत्यक्ष तपासणी केली तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, एका गणातील 3-4 ग्राम पंचायती या योजनेमध्ये सहभागी होत नाहीत. काही ठिकाणी ही योजना फक्त कागदोपत्री राबविली जाते. म्हणून या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. वेळ कमी असल्यामुळे मी शेवटचा मुद्दा मांडतो.

यानंतर कु.खर्चे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर......

आमच्या जिल्हयात कोणताही ग्रामसेवक रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करावयाला तयार नाही. कामगारांनी आंदोलन छेडल्यानंतर ते " टेक्नीकल पर्सन " नाही म्हणून शासनाने घेतलेला निर्णयही ग्रामपंचायतीच्या मार्फत घ्यावयाला आमची हरकत नाही. टेक्नीकल पर्सन म्हणजेच इंजिनियर नाही म्हणून त्याच्या मताला किंवा आंदोलनाला किंमत नाही. प्रभावी रितीने ही रोजगार हमी योजना चालवावयाची असेल तर त्यासबंधात निषेध केला पाहिजे. आमच्या जिल्हयांमध्ये म्हणजे, चंद्रपूर,गोंदिया,भंडारा,गडचिरोलीमध्ये रोजगार हमी योजनेची कामे किती कमी झालेली आहेत. आमच्या जिल्हयांमध्ये किती मजूरांना 100 दिवसाचे काम दिले गेले आहे? एका दिवशी मी कलेक्टर साहेबांकडे गेलो असता जिल्हाधिकारी साहेब म्हणाले की, तुम्ही काहीही करा पण हे काम सुरु करा, भुमिपूजन करा पण कामही सुरु करा, प्रत्यक्षात मजुरांनी तेथे काम केले पाहिजे, त्यांना रोजगार मिळाला पाहिजे. 100 दिवसांचा रोजगार हमी योजनेचा जो कायदा आहे त्याची आपल्या राज्यात अंमलबजावणी होत नाही.

अध्यक्ष महोदय, दोन मुद्दे सोडून मी बाकीच्या मुद्दयांचे या ठिकाणी समर्थन करु शकत नाही. म्हणून मी राज्यपालांच्या अभिभाषणाला विरोध करीत आहे. आणि माझ्या भाषणाला या ठिकाणी विराम देत आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद शिक्षक ) : सन्माननीय सदस्या, श्रीमती सुधाताई जोशी यांनी मांडलेल्या राज्यपालांच्या आभारप्रदर्शन करणा-या प्रस्तावाचे मी या ठिकाणी समर्थन करीत आहे. सदर प्रस्तावास अनुमोदन देणारे सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांचे देखील मी या ठिकाणी अभिनंदन करतो.

शासनाच्या पॅकेज अंतर्गत शेतक-यांच्या मुलींच्या सामूहिक विवाहासाठी अनुदान योजना आणली. सन 2006 - 2007 साठी 10 हजार 120 विवाहासाठी 11 कोटी 13 लाख रुपये अनुदानापोटी उपलब्ध करुन देण्यात आले, या योजनेकरिता मी शासनाचे अभिनंदन करु इच्छितो परंतु या योजनेची व्याप्ती अजून वाढली पाहिजे. शासन ज्या कल्याणकारी योजना राबविते त्या योजनांची सर्व माहिती तळागाळातील व ग्रामीण स्तरावरीलल प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचली पाहिजे व त्या योजनेची अंमलबजावणीही पूर्णपणे प्रभावीरित्या झाली पाहिजे, असे मला वाटते.

ग्रामीण भागातील जनतेला सन 2006 - 2007 या वर्षामध्ये तीन लाखापेक्षा अधिक रकमेपर्यंत पीक कर्ज अल्प व्याज दरात उपलब्ध करुन दिले जाईल, म्हणजे फक्त 6 टक्के व्याजदराने उपलब्ध करुन दिले जाईल. शहरातील जो नोकरदार वर्ग आहे त्या वर्गाला मोटारसायकल चार टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध होते आणि शेतक-याला कर्जावर घेण्याकरिता 16 ते 17 टक्के व्याजदर द्यावा लागतो, म्हणून आपल्या देशाचे कृषि मंत्री नामदार शरदचंद्ररावजी पवार यांनी आग्रहाची भूमिका घेतल्यामुळे आमच्या शेतक-यांना तीन लाख रुपये इतक्या रकमेपर्यंतचे अल्पमुदतीचे पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

" संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान " ही योजना तत्कालीन ग्रामविकास मंत्री माननीय.आर.आर.पाटील साहेबांनी सुरु केली. त्यामुळेच अनेक खेडी स्वच्छ होऊ लागली. गावागावांमध्ये स्वच्छतेसंबंधीची बक्षिसे मिळविण्यासाठी स्पर्धा सुरु झाल्या, त्याचेच श्रेय म्हणून हे महाराष्ट्र राज्य देशातील आदर्श राज्य म्हणून गणले गेले, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

महाराष्ट्रामध्ये आम्ही सर्वजण शाहुमहाराज,महात्मा ज्योतिबा फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर या पुरोगामी विचारवंतांची भाषणे ऐकून शिक्षण हे परिवर्तनाचे माध्यम आहे, जीवनामध्ये जर आमुलाग्र बदल घडवावयाचा असेल, क्रांती घडवून आणावयाची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे म्हणत असतो.

यानंतर श्री.सुबंरे......

श्री. विक्रम काळे ....

परंतु अलिकडच्या काळातील शासनाचे निर्णय, त्यातील शिक्षण सेवक योजना, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध, कंत्राटी धोरण, कायम विनाअनुदान धोरण हे निर्णय गतिशील शिक्षण प्रक्रियेतील गतिरोधक आहेत. याबद्दल शासनाने ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे असे मला सांगावेसे वाटते. परंतु तरीही शासन यातूनही निश्चितपणे मार्ग काढील अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, 2005 च्या सर्वेक्षणानुसार 6 ते 14 वयोगटातील सुमारे 4 लाख 30 हजार मुले शाळाबाह्य होती. त्यापैकी 2 लाखापेक्षा अधिक मुलांना शाळेत आणण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे आणि त्या शासनाला आले आहे ही एक अभिनंदनाची बाब आहे. सर्वशिक्षा अभियान योजनेंतर्गत देखील याला चांगली चालना मिळेल आणि सर्व मुलांना दर्जेदार प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून या योजनेतून 26220 नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम शासनाच्या माध्यमातून पूर्ण केलेले आहे ही देखील एक अभिनंदनीय अशीच बाब आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न हा साऱ्या जनतेचा जिव्हाळ्याचा प्रश्न झालेला आहे आणि हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने देखील शासनाने पाऊल उचलले आहे. त्यातीलच एक भाग म्हणून बेळगावातील मराठी बांधवांच्यासाठी म्हणून दोन मराठी ग्रंथालयांना विकास करण्यासाठी या शासनाने विशेष अनुदान मंजूर केले आहे ही आणखी एक अभिनंदनाची बाब मला वाटते आणि म्हणून मी या शासनाचे त्याबद्दल अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राज्यातील 76 हजार अंगणवाड्यातील 6 वर्षांपर्यंतच्या 84,36000 बालकांना पोषण आहार, पूर्व प्राथमिक शिक्षण व इतर सेवा हे शासन उपलब्ध करून देत आहे. या 76 हजार अंगणवाड्यांपैकी 46 हजार अंगणवाड्यांना स्वयंसहाय्यता बचतगट आणि महिला मंडळे यांच्यामार्फत पूरक पोषण आहार पुरवठा सुरू आहे. त्यामुळे महिला बचत गटांना काम मिळाले व चांगल्या प्रतीचा आहार विद्यार्थ्यांनाही मिळू लागला आहे. सभापती महोदय, गरीब रूग्णांना मदत व्हावी म्हणून जीवनदायी आरोग्य योजनेची अनुदान मर्यादा वाढवून ती दीड लाख रूपये इतकी केली आहे शिवाय त्यात कर्करोगाचाही समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर आता त्यामध्ये एंजिओप्लास्टी आणि व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट या उपचारांचा देखील समावेश केला जाईल अशी मी या निमित्ताने शासनाकडून अपेक्षा करतो.

...... 3डब्ल्यू 2 ...

श्री. विक्रम काळे ....

सभापती महोदय, राज्यात असलेल्या वीज टंचाईच्या संबंधात येथे सर्वच सन्माननीय सदस्य बोलले आहेत. पण आपण सर्व जण हे जाणतो आहोत की, आज शासनाकडे अशी जादूची कांडी नाही की शासन त्वरित वीज मिळवू शकेल, निर्माण करू शकेल. आज राज्यामध्ये 17,400 मे.वॅ. वीजेची मागणी आहे. असे असताना 2006-07 वर्षामध्ये केंद्र सरकारच्या विविध प्रकल्पांमधून 1100 मे.वॅ. वीज उपलब्ध होत आहे तसेच परळी येथून 250 मे.वॅ. वीज उपलब्ध होणार आहे. या शिवाय 2007-08 मध्ये केंद्र शासनातर्फे सुमारे 1800 मे.वॅ. अतिरिक्त वीज व राज्य शासनाच्या घाटघर व पारस प्रकल्पांमधून सुमारे 500 मे.वॅ. वीज उपलब्ध होणार आहे आणि त्यातून देखील आपण वीज टंचाईचा प्रश्न सोडवू शकणार आहोत. या शिवाय अक्षय प्रकाश योजनेला देखील जनतेने उत्स्फूर्तपणे चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला. त्यामुळेच सुमारे 5500 गावे भारनियमना पासून मुक्त होऊ शकली आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी ऊसाविषयी देखील सगळेजण बोलले. आज नाही म्हटले तरी राज्यामध्ये ऊसाचे उत्पादन अतिरिक्त झालेले आहे. म्हणूनच केंद्रीय कृषी मंत्री सन्माननीय श्री. शरद पवार साहेबांनी एक खास भूमिका घेतली आणि राज्यातील 70 साखर कारखाने त्यामुळे सुरू होऊ शकले. त्यांनी ही भूमिका घेतली नसती तर हे कारखाने सुरू होऊ शकले नसते. त्यावेळी त्यांनी हे पाहिले नाही की, हे साखर कारखाने कोणाचे आहेत, त्यात भारतीय जनता पक्ष तसेच शिवसेना या पक्षाच्या लोकांचे देखील साखर कारखाने आहेत. परंतु शेवटी हा ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा आणि राज्यातील साखर कारखान्यांचा प्रश्न आहे हे लक्षात घेऊन माननीय श्री. शरद पवार साहेबांनी साखर कारखान्यांसाठी विशेष पॅकेजची घोषणा केली. त्यामुळेच आज राज्यात 70 साखर कारखाने सुरू होऊ शकेले आहेत. आणि त्यामुळेच नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये जनतेने या सरकारवर विश्वास टाकला आहे. साखर उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन या आघाडी सरकारने देखील वाहतूक अनुदान, रिकव्हरी अनुदान देण्याची घोषणा केली त्याचा दिलासा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळाला आहे आणि त्याबद्दल देखील मी या प्रस्तावाचे समर्थन करतो आणि अभिनंदन करतो.

***

( यानंतर श्री. गागरे ....3एक्स 1

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) :- सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण वाचल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की, मागील दोन वर्षामध्ये महाराष्ट्रातील काही भागात अतिवृष्टी झालेली आहे. अतिवृष्टीमध्ये ज्या घटकांचे नुकसान झाले त्यांना मदत करण्याची भूमिका शासनाने स्वीकारली आहे. यापूर्वीही अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने मदत केलेली आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोटयावधी रुपयांची मदत पूरग्रस्त व शेतकऱ्यांना केल्याचा उल्लेख आहे.

सभापती महोदय, अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे शिक्षण क्षेत्रामध्येसुध्दा मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. अनेक शाळा उद्ध्वस्त झाल्या आहेत. रायगडमधील तुडील गावातील शाळेवर डोंगर कोसळून तेथील शाळा उद्ध्वस्त झाली आहे, परंतु शासनाने या शाळेकरिता एक पैसाही मदत केलेली नाही. मुंब्रा येथील चार शाळा तीन दिवस पाण्याखाली होत्या. बऱ्याच शाळेतील फर्निचर व शालेय साहित्य देखील वाहून गेले आहे. या शाळांना शासनाने अद्यापही एक पैशाची मदत केलेली नाही. उल्हासनगर येथील शाळाही पाण्याखाली होत्या. शासनाने शेतकऱ्यांना आणि इतर घटकांना मदत केली आहे, परंतु केवळ शिक्षण क्षेत्राकडे, व विशेषत: शैक्षणिक संस्थाकडे शासनाची वक्रदृष्टी आहे. या संस्थांना किंवा विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या संदर्भात कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या भाषणात नाही.

सभापती महोदय, शासनाने राजीव गांधी सुरक्षा योजनेअंतर्गत कोटयावधी रुपये आमच्या विद्यार्थ्यांसाठी खर्च केलेले आहेत. पहिली ते उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सुरक्षा योजना शासनाने हाती घेतलेली आहे. इन्शुरन्स कंपनीकडून विद्यार्थ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात शासनाने योजना जाहीर केली आहे. शासनाने जी.आर.काढला आहे. ज्या विद्यार्थ्यांचे पूरपरिस्थितीमध्ये नुकसान झालेले आहे, त्यांना मदत मिळण्यासाठी इन्शुरन्स कंपनीकडे क्लेम करावा, म्हणजे कंपनीकडून मदत मिळेल असे म्हटले होते. विविध शाळेतून हजारो विद्यार्थ्यांचे क्लेम अर्ज कंपनीकडे गेले आहेत. शासनाने इन्शुरन्स कंपनीसोबत करार केलेला आहे. परंतु त्या क्लेममध्ये पूराने नुकसान झालेल्या बाबी येत नाहीत त्यामुळे इन्शुरन्स कंपनी क्लेम देऊ शकत

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ........

नाही असे कंपनीचे म्हणणे आहे. यामुळे हजारो विद्यार्थी मदतीपासून वंचित राहिले आहेत. या विद्यार्थ्यांना कोण मदत करणार ? शासनाने मदत करावी अशी अपेक्षा होती. परंतु शाळा व विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये कोणताही उल्लेख आढळला नाही.

सभापती महोदय, विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना पॅकेजद्वारे अनेक प्रकारे मदत देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे त्याबद्दल शासनाचे कौतुक करावयास हवे. परंतु केवळ शेतकऱ्याच्या आत्महत्येस महत्व दिले जात आहे. आज शिक्षण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या मोठया प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. मागच्या वर्षी मला जेव्हा भाषण करण्याची संधी मिळाली होती, तेव्हा मी 23 विद्यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्या केल्याची माहिती दिली होती. त्यानंतरही विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होत आहेत. परीक्षेच्या कालावधीमध्ये, परीक्षा संपल्यानंतर व निकाल जाहीर झाल्यानंतर फार मोठया प्रमाणावर विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होत आहेत. शासनाला शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर उपाययोजना करणे आवश्यक वाटते त्याप्रमाणे शिक्षण क्षेत्रामध्ये आमच्या छोटया छोटया बालकांच्या, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याच्या संदर्भातसुध्दा शासनाने काही तरी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आम्ही शासनासमोर एक प्रस्ताव ठेवला आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचे मानसिक संतुलन बिघडू नये यासाठी त्यांचे कौन्सिलिंग होणे गरजेचे आहे. प्रत्येक शाळेमध्ये विद्यार्थ्यांकरिता कौन्सिलर नेमण्याची मागणी शासनाकडे केलेली आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होत असताना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात त्याचा उल्लेख नाही, याचा खेद वाटतो.

सभापती महोदय, रोजगार हमी योजना अंतर्गत सिंचन विहीरीचा प्रकल्प शासनाने हाती घेतला आहे. अनेक विहिरी पूर्ण करण्याचे काम शासन करीत आहे हा चांगला उपक्रम आहे. मी कोकणचे प्रतिनिधित्व करत आहे.

.....नंतर श्री.सरफरे

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

हे काम कोकणामध्ये सुरु आहे. परंतु कालपर्यंत रोजगार हमी योजनेमध्ये 3172 सिंचन विहिरींची कामे सुरु होती ती अजून पर्यंत पूर्ण झालेली नाही. त्या कामांसाठी निधी उपलब्ध असतांना ती कां बंद पडली याची आपल्याला कल्पना नाही. शासनाच्या वतीने अनेक उपक्रम हाती घेतले जातात, परंतु ते खरोखर पूर्ण केले जातात काय? सुरु करण्यात आलेली कामे पूर्ण झाली आहेत किंवा नाही याचा कोठेही उल्लेख नाही.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील शाळांमध्ये आणि अंगणवाडयांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासंबंधी उल्लेख करण्यात आला आहे. परंतु आज स्थानिक स्वराज्य संस्थेच्या, महानगरपालिकेच्या, नगरपालिकेच्या आणि जिल्हा परिषदेच्या असलेल्या शाळांची काय अवस्था आहे? त्या शाळांमध्ये आज एकतर शिक्षक उपस्थित नाहीत. अनेक शाळा आज एकशिक्षकी आणि व्दिशिक्षकी आहेत. 7-7 वर्गखोल्यांमध्ये दोनच शिक्षक शिकविण्याचे काम करीत आहेत. अशाप्रकारे सात वर्गखोल्यांना शिकविण्याचे काम दोन शिक्षक करीत आहेत. तेव्हा ही परिस्थिती आपण बदलली पाहिजे. आपल्याला खऱ्या अर्थाने शैक्षणिक गुणवत्ता वाढवावयाची असेल, खऱ्या अर्थाने शैक्षणिक चित्र आपल्याला बदलावयाचे असेल तर आपल्याला पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. सभापती महोदय, मी ठाणे जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांचे सर्व्हेक्षण केले असता 63 टक्के शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, स्वच्छता गृहांची व्यवस्था नाही. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये मुले आणि मुली को-एज्युकेशन घेत आहेत, एकत्रित शिक्षण घेत आहेत त्याठिकाणी स्वच्छता गृहाची व्यवस्था नाही ही खेदाची बाब आहे. अशाप्रकारे हे शासन त्यांच्या जीवनाशी आणि त्यांच्या आरोग्याशी खेळत आहे. अनेक शाळांमध्ये झाडू मारण्यासाठी शिपाई नेमलेला नाही. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा साफ करण्याचे, झाडण्याचे काम विद्यार्थ्यांना करावे लागत आहे. शाळांचे अंगण शिंपण्याचे काम विद्यार्थ्यांना करावे लागत आहे. तेव्हा शिक्षणातील ही परिस्थिती आपण बदलणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, याठिकाणी रोजगार हमी योजनेचा उल्लेख करण्यात आला. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गरजू लोकांना काम देण्याचा चांगला उपक्रम शासनाने सुरु केला. परंतु खरोखर ही योजना राज्यामध्ये यशस्वी ठरली आहे काय? आज या योजनेमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे. भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे आपल्या कानावर येत आहेत, त्यासंबंधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभागृहामध्ये चर्चा होत आहे. रोजगार हमी योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीबरोबर या योजनेतील भ्रष्टाचाराच्या निर्मूलनाचे काम शासनाने हाती घेतले पाहिजे. त्याकरिता एखादी भ्रष्टाचार निर्मूलन योजना आखण्याची आवश्यकता आहे. त्यासंबंधी या अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आला नाही. सभापती महोदय, नवीन वर्गखोल्या बांधण्यासंबंधी अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. जवळ जवळ 26,220 नवीन वर्गखोल्या निर्माण करण्याचे काम केले जाणार आहे. या वर्गखोल्या निर्माण करीत असतांना सर्व शिक्षा अभियानातील पैसे घेतांना अनेक मुख्याध्यापकांचा बळी या योजनेमध्ये गेला आहे. सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्गत वर्गखोल्या बांधण्यासाठी जे पैसे येतात, ते शाळेचे मुख्याध्यापक आणि त्या गावचे सरपंच यांच्या संयुक्त सहीने बँकेमध्ये ठेवण्यात येतात. गावामध्ये सरपंच हा राजकीय पुढारी असल्यामुळे तो मुख्याध्यापकांना दम देतो आणि बँकेतील पैसे काढून घेतो. त्यामुळे त्या पैश्यांचा वर्गखोल्या बांधण्यासाठी उपयोग होत नाही. अशाप्रकारे या पैश्यांचा अपहार केला जातो, ते पैसे हडप केले जातात. त्यानंतर शिक्षण विभागाचे अधिकारी चौकशीसाठी गावामध्ये येतात आणि शासनाकडून पैसे घेतले असतांना वर्गखोल्या कां तयार झाल्या नाहीत? असे मुख्याध्यापकांना विचारतात. यामुळे त्या मुख्याध्यापकांना आत्महत्त्या करावी लागते. सभापती महोदय, कळंब तालुक्यातील बेल्लोरी येथील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुधाकर रामदास ठाकरे यांना त्या गावच्या सरपंचाने बँकेमधून पैसे काढून देण्याकरिता दम दिला. तरीसुध्दा मुख्याध्यापकांनी पैसे काढून दिले नाही, त्यांना विरोध केला म्हणून मुख्याध्यापकांना निलंबित करण्याची धमकी दिली. तेव्हा मुख्याध्यापकांनी रात्री विष प्राशन करुन आत्महत्त्या केली. आणि आत्महत्त्या करतांना त्यांनी आपल्या खिशामध्ये एक चिठ्ठी लिहून ठेवली.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानामध्ये गुणवत्ता विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला. मुलांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्याचा स्तुत्य हेतू यामागे आहे. परंतु या योजनेच्या संदर्भात मी छोटेसे उदाहरण सांगितले असले तरी अशी अनेक उदाहरणे घडत आहेत. प्रामुख्याने या योजनेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी लोकांना आत्महत्त्या कराव्या लागत आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरु....

शेतकऱ्यांच्या मुलींच्या सामुहिक विवाहासाठी अनुदान योजना ही चांगली योजना राबविण्यात येत आहे. परवा कितीतरी सामुहिक विवाह पार पडले. निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे सामुहिक विवाहासाठी शासनाकडून सहाय्य मिळू शकले नाही. तेव्हा ही योजना वेगळ्या पध्दतीने राबविली पाहिजे.

माननीय राज्यपालांनी शासनाने राज्यातक्रीडा संकुले निर्माण केल्याचा उल्लेख केलेला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खेळाची चांगली क्षमता आहे. त्यांच्या क्रीडा विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी काही तरी योजना आखणे आवश्यक आहे. माननीय राज्यपालांनी न्यायालयांनी किमान 50 टक्के न्याय निर्णय मराठी भाषेतून द्यावेत असे उच्च न्यायालयाने निदेश दिल्याचा उल्लेख केलेला आहे. या संबंधाने नेमकी शासनाने काय भूमिका घेतलेली आहे, त्या दृष्टीने कोणते प्रयत्न केलेले आहेत, याचा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही.आदिवासी क्षेत्रातील आदिवासी भागातील विना अनुदानित शाळा कायम अनुदानावर आणण्याबाबत शासनाने मान्य केलेले आहे, तसे आश्वासनही दिलेले आहे. त्याची अंमलबजावणी करावी. तसेच शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल करणे जरुरीचे आहे, त्याचा शासनाने विचार करावा. संगीतासारखा महत्वाचा विषय अभ्यासक्रमातून वगळलेला आहे. संगीतामुळे खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होत असतात, त्यामधून विद्यार्थी अभ्यासामध्ये एकाग्रता निर्माण करू शकतात. संस्कृतसारखा विषयही अभ्यासक्रमातून वगळलेला आहे. संस्कृत आणि संगीत विषयांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्याबाबतचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यानंतर गट साधन आणि समूह साधन योजनेच्या संबंधात शासन चांगल्या प्रकारचे काम करीत आहे अशाप्रकारचा राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. समूह साधन आणि गट साधनाच्याबाबतीत मुद्दाम सांगू इच्छितो की, केवळ उपचार म्हणून अशाप्रकारचा उपक्रम सुरु केलेला आहे. ज्यांना शिक्षण क्षेत्रामधील अनुभव नाही, शिकविण्याचा अनुभव नाही, शैक्षणिक प्रशासनामधील अनुभव नाही, अशाप्रकारचे लोक यामध्ये काम करीत आहेत. 10-15 वर्षे या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना ते लोक दम देतात, अशाप्रकारे विचित्र वागणूक ते देत आहेत. खरोखरच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवावयाची असेल तर समूह साधनामध्ये आमच्यामधील शिक्षक घ्यावेत, त्यांना संधी द्यावी. जे लोक या क्षेत्रामध्ये नवीन आलेले आहेत, त्यांना शिकविण्याचा अनुभव नाही त्यांच्याकडून चांगल्या प्रतीची कामे होणार नाहीत. या निमित्ताने अनेक गोष्टी बोलण्यासारख्या आहेत परंतु वेळेअभावी बोलता येत नाही. एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी आभारप्रदर्शनाचा प्रस्ताव मांडलेला आहे आणि त्यास सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले. या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे.

महाराष्ट्र सरकारने गेल्या काही वर्षात आर्थिक अडचणीतून जात असताना आलेल्या नैसर्गिक संकटांना तोंड देत अत्यंत उत्तम प्रकारे काम केलेले आहे, याचा उल्लेख करुन राज्यपालांनी दूरदृष्टी, मौलिक विचार, शासनाला केलेल्या विधायक सूचना, राज्याच्या विकासाचे नियोजनाचे विचार सूचित केलेले आहेत, याबद्दल राज्यपाल महोदयांचे मी अभिनंदन करते.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .......

त्याचप्रमाणे गेल्या वर्षी राज्यामध्ये महापुराचे संकट आले आणि त्या संकटामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हाहाकार माजला. अशा परिस्थितीमध्ये सुध्दा महाराष्ट्र शासनाने जे काम केलेले आहे ते कौतुकास्पद आहे.

मी या ठिकाणी काही बाबी निदर्शनास आणून देऊ इच्छिते. महापुराने या महाराष्ट्राला वेढले असताना बऱ्याच ठिकाणी त्यांचे पुनर्वसन करण्याचे काम शासनाने केलेले आहे. त्यांना मदत देण्याचे काम केलेले आहे. परंतु नदीकाठची जी गावे होती त्यांचे अद्यापपर्यंत पुनर्वसन झालेले नाही. अशी नदीकाठची जी गावे आहेत त्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. त्यासाठी जागतिक बँकेची मदत घ्यावी आणि या गावांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करावे अशी मी शासनाला विनंती करते. त्याचप्रमाणे जागतिक बँकेच्या माध्यमातून सागरी किनाऱ्यांचा आणि बंदरांचा सुध्दा विकास करावा. ज्यावेळी महापूर आला त्यावेळी बरीच बंदरे आणि समुद्र किनारे सुध्दा उद्ध्वस्त झालेली आहेत. आपण प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करतो ते जलदगतीने व्हावयास पाहिजे. राज्यावर ज्यावेळी संकट येते त्यावेळी त्या संकटाला तोंड देत असताना राज्य शासनाने कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची गरज असते. ज्यावेळी या राज्यावर संकट आले त्यावेळी शासनाने जे काम केलेले आहे ते कौतुकास्पद आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याची गरज आहे. 1994 साली आदरणीय श्री. शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित जमीन देऊन त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे आणि ते लवकरात लवकर झाले पाहिजे असा निर्णय घेतला होता. परंतु अद्यापपर्यंत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही. शासनाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन जलद गतीने करावे असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही शासनासाठी अतिशय चिंतेची बाब आहे असा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख केलेला आहे. शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या होतात त्यावर आपण नुसतेच बोलून चालणार नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत आपले मौलिक विचार या सभागृहामध्ये मांडलेले आहेत. मला शासनाला विनंती करावयाची आहे की, आपण शेतकऱ्याला काही तरी जोडधंदा, पूरक उद्योग दिला पाहिजे. शेतकऱ्यांना नुसता पूरक धंदा देऊन चालणार नाही किंवा त्यांची नुसती कर्जमाफी करुन चालणार नाही तर त्यांच्या हाताला काम

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्रीमती मंदा म्हात्रे .....

दिले पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सांगितल्याप्रमाणे त्याबाबत अंमलबजावणी झाली पाहिजे. सर्व लोकांपर्यंत त्या योजना पोहोचल्या पाहिजेत. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने दिलासा द्यावयाचा असेल तर शासनाने त्यांना शेतीच्या उपयोगी किटकनाशके, उत्तमप्रतीचे बियाणे तसेच सबसिडी दिली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या मुलीच्या सामूहिक विवाहासाठी अनुदान दिलेले आहे. याबद्दल सरकारचे अभिनंदन केले पाहिजे. शेतकऱ्यांवर जे कर्ज आहे त्यामध्ये शेतकऱ्यांकडून मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढले जाते आणि कर्ज फेडले नाही तर तो शेतकरी हवालदिल होतो आणि आत्महत्येला प्रवृत्त होतो. याचा साकल्याने विचार केला तर असे दिसते की, नुसत्या शेतकऱ्यांच्याच आत्महत्या होतात असे नाही. त्यामुळे ग्रामीण भागासाठी आपण जी योजना आणलेली आहे तशी योजना शहरी भागासाठी सुध्दा आणावी. 28 जानेवारीला आम्ही सामूहिक विवाह आयोजित केला होता. त्यामध्ये दलित, मुस्लीम, मराठा तसेच अनेक जातीची 41 जोडपी होती. आमचे जेष्ठ नेते आणि आमच्या पक्षाचे अध्यक्ष यांनी त्या सामूहिक विवाह सोहळ्याचे उद्‌घाटन केले होते. आम्ही या 41 जोडप्याचे विवाह कोणत्या परिस्थितीमध्ये केले हे त्यांनी पाहिले. आम्ही शासनाकडे अनुदान मागितले. ते देण्यात येईल असे सांगण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी यासंदर्भात सांगितले. अशा प्रकारे अनुदान न देता यासंदर्भात सविस्तर विचार करावा लागेल.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 17:35

(श्रीमती मंदा म्हात्रे...)

सभापती महोदय, अशा ज्या विवाह नोंदणी करणा-या संस्था आहेत, सामूहिक विवाह करणा-या संस्था आहेत त्यांना प्रत्येक जोडप्यामागे 11 हजार रु. दिले तर राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्यांचे प्रमाण, गरिबीचे प्रमाण, कर्जाचे प्रमाण कमी झाल्या शिवाय राहाणार नाही. लग्न ही अशी बाब आहे की, त्यामध्ये हुंडा दिला जातो. मुला-मुलीच्या लग्नामध्ये जर शेजा-याने लोकांना दारु, 10 किलो मटण खाऊ घातले तर त्या माणसाला आपल्याही मुला-मुलीच्या लग्नामध्ये ते द्यावे असे वाटते आणि कर्ज काढून त्या गोष्टी तो करतो. एक प्रकारचा सामाजिक दबाव असल्यामुळे या गोष्टी करणे त्याला भाग पडते. तेंव्हा अशा ज्या विवाह नोंदणी संस्था शहरी अथवा ग्रामीण भागामध्ये असतील त्या संस्थांना प्रत्येक जोडप्यामागे 11 हजार रुपये द्यावेत, अशी मी या निमित्ताने शासनाला सूचना करते. यामुळे ब-याचशा शेतक-यांना त्यांच्या मुलींच्या लग्नाच्या बाबतीत दिलासा मिळू शकेल.

सभापती महोदय, शेतक-याच्या शेतमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे. आज शेतकरी स्वत: कष्ट करुन देखील त्याला त्याच्या मालाच्या विक्रीसाठी दलालावर अवलंबून रहावे लागत आहे. दलाल शेतक-यांना लुबाडण्याचे काम करीत आहे. ही शेतक-याची दलालाकडून होणारी लुबाडणूक थांबली पाहिजे. शेतक-याच्या मालाला योग्य भाव मिळून त्याचा माल जागेवरच कसा विकला जाईल यादृष्टीने उपायोजना केली पाहिजे. जमिनीची तपासणी आणि खतांचा वापर यासंबंधीचा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे. याबाबतीत मी सांगू इच्छिते की, जमिनीचे परीक्षण झाले पाहिजे. त्याच बरोबर भूगर्भातील पाण्याची पातळी देखील वाढविण्याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी जलसंधारण धोरण राबविले पाहिजे. याठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे जल विद्युत केन्द्रे देखील उभी केली पाहिजेत. कोकणामध्ये फार मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. हे सर्व पावसाचे पाणी समुद्राला जाऊन मिळते. या पाण्याचा काहीच उपयोग होत नाही. आज राज्यात विजेचा तुटवडा आहे. कोकणामध्ये मोठया प्रमाणात द-याखो-या आहेत. या द-या-खो-यांमध्ये जेथे जेथे शक्य असेल त्या ठिकाणी छोटे छोटे वीज प्रकल्प उभे केले तर अनेक जिल्ह्यांना वीज मिळू शकेल आणि राज्याला वीज टंचाईला सामोरे जावे लागणार नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती मंदा म्हात्रे...)

सभापती महोदय, महिलांना सक्षम केले पाहिजे असे आपण नेहमी बोलत असतो. आज आपण ग्रामीण भागामध्ये महिला बचत गटांची स्थापना केलेली आहे. अंगणवाड्यांमधील मुलांना खिचडी देण्याचे काम महिला बचत गटांना दिलेले आहे. आज परिस्थिती अशी आहे की, या महिला बचत गटांना त्यांनी अंगणवाड्यांच्या संदर्भात केलेल्या कामाचे चार-चार महिन्यापासून पैसे मिळालेले नाहीत. या बचत गटातील महिलांना वेळेवर पैसे मिळाले नाहीत तर त्या आपले कुटुंब कसे चालवू शकतील ? घरातील कर्त्या माणसाला जर महिन्याचा पगार मिळाला नाही तर तो आपल्या कुटुंबाचे पोषण कसे करील ? तेव्हा महिला बचत गटांना त्यांनी केलेल्या कामाचे पैसे त्वरित द्यावेत. शासनाने ज्या ज्या योजना राबविण्याचे ठरविलेले आहे त्या योजनांची अंमलबजावणी केली पाहिजे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात आपण सातत्याने बोलत असतो. मुलगा किंवा मुलगी पदवीधर झाल्यानंतर देखील कोणताही व्यवसाय करीत नाहीत. कारण त्यांना तशा प्रकारचे शिक्षण मिळालेले नसते. तेव्हा प्रत्येक शाळेमध्ये एक हस्तकला व्यवसाय आणि कार्यानुभव शिक्षक असला पाहिजे अशी माझी शासनाला सूचना आहे. त्याचप्रमाणे वैद्यकीय शिक्षणासाठी मागासवर्गीय मुलींची फी शासन भरणार आहे काय, असा माझा शासनाला सवाल आहे ?

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...........

इतर मागासवर्गीय समाजातील मुलींची 50 टक्के फी शासन भरणार आहे का?

सभापती महोदय, क्रीडा संकुलासाठी पुण्यामध्ये क्रीडा संकूल बांधण्यासाठी 60 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. ठाणे, मुंबई, नवी मुंबई, ऐरोली, पनवेल या भागातील लोकांना मध्यवर्ती ठिकाण असलेल्या बेलापूर येथे भव्य असे क्रीडा संकूल उभे करावे आणि त्या ठिकाणी सर्व प्रकारच्या खेळांचे प्रशिक्षण द्यावे. नवी मुंबई आणि मुंबई एकमेकाशी जुळ्या असल्यामुळे भव्य स्टेडियम झाले तर रायगड, ठाणे, मुंबई येथील सर्व प्रकारच्या खेळाडूंना व विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. पुणे जिल्हयासाठी 60 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले त्याच धर्तीवर निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, गाव तेथे ग्रंथालय असले पाहिजे. ते ग्रामीण भागात सुरु करण्याची व्यवस्था झाली पाहिजे. महिला सरपंचांना एखाद्या गावात जायचे झाले तर स्वत:चे वाहन नसते. त्यांना पुरुषांच्या वाहनाची वाट पहावी लागते. महिला सरपंचाना एस.टी.चा मोफत पास देण्याची सुविधा उपलब्ध केली पाहिजे.

सभापती महोदय, 1981 साली आदरणीय श्री.शरद पवार साहेब महाराष्ट्राचे विरोधी पक्षनेते असताना त्यांनी सभागृहात जे भाषण केले होते, त्या भाषणातील दोन ओळी मी वाचून दाखवू इच्छिते. "आज आपले राज्य प्रगतीशील राज्य होत चालले आहे. मनुष्य संख्येचे मनुष्य शक्तीमध्ये रुपांतर करण्यासाठी जोपर्यंत आम्ही ठोस पावले टाकत नाही तोपर्यंत गरीबांच्या आणि बेकारांच्या प्रश्नांची सोडवणूक या राज्यामध्ये आणि देशामध्ये करता येणार नाही. हा प्रश्न जर आपण सोडविला नाही तर बेकार मंडळी उद्याच्या देशाची संपूर्ण शिस्त उद्ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही" असे आपल्या भाषणात सन्माननीय श्री.शरद पवार साहेब म्हणाले होते. मला याठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते की, आघाडी सरकार आर्थिक अडचणीतून जात असताना सुध्दा बेकार आणि तरुण मुलांना आय.टी.आय.च्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहे. 1981 सालचे स्वरुप आज महाराष्ट्रामध्ये बदलत गेले आहे एवढे सांगून या अभिभाषणाला माझे समर्थन देऊन मी माझे भाषण संपविते.

--------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) :सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी मांडला आणि त्या प्रस्तावाला सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी अनुमोदन दिले आहे. त्या प्रस्तावाचे मी स्वागत करण्यासाठी आणि अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित अनेक घटना मागील दोन वर्षात घडल्या. अतिवृष्टी, महापूर, बॉम्बस्फोट अशा अनेक संकटांना सामोरे जात असताना शासनाने पिकांच्या नुकसानीबद्दल, पूरग्रस्तांना भरीव अशी मदत व पुनर्वसनाच्या संदर्भात पावले उचलली. त्यासाठी केंद्र निर्माण केले आणि गरजू व अफेक्टेड लोकांना मदत केली. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जलस्वराज्य योजना, भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील सर्व शाळांना, अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असे चांगले कार्यक्रम हाती घेतले आहेत. आवास योजनेच्या संदर्भात बोलत असताना इंदिरा आवास योजना, राजीव गांधी निवारा योजनेद्वारे सर्व प्रकारच्या गरजू आणि गरीब जनतेसाठी चांगल्या प्रकारची घरे देण्यासाठी शासनाने योजना राबविली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ MAP/ प्रथम श्री. भोगले... 17:45 श्री. दिलीपराव सोनवणे ...

सभापती महोदय, प्राथमिक शिक्षण आणि सर्व शिक्षा अभियानांतर्गत जी मुले शिक्षणापासून वंचित झालेली आहेत अशा विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देऊन त्यांच्या शिक्षणाची सोय करण्याचा स्तुत्य कार्यक्रम शासनाने सुरु केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राष्ट्रीय बालकामगार योजनेची अंमलबजावणी करुन स्तुत्य असा कार्यक्रम शासनाने सुरु केल्याबद्दल मी शासनाचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो. जे निरक्षर आहेत त्यांना साक्षर करण्याचे काम शासनाने सुरु करुन एक चांगले पाऊल उचलले आहे. संतगाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान योजना राज्यामध्ये सुरु करुन ग्रामीण भागाला एक नवी दिशा देण्याचे काम माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांनी केलेले आहे. संतगाडगेबाब ग्राम स्वच्छता अभियानापासून महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला आदर्श मिळालेला आहे. आरोग्याच्या संदर्भात काम करीत असतांना निश्चितपणे काही समस्या पुढे आलेल्या आहेत परंतु या समस्या सोडविण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. सभापती महोदय, एडस्ची संख्या फार मोठया प्रमाणात वाढत आहे. परंतु नंदुरबार, धुळे, जळगाव या ठिकाणी हत्ती रोग डोके वर काढत आहे. त्यामुळे या रोगावर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तसेच ग्रामीण आरोग्य केंद्राची संख्या वाढविणे तसेच ग्रामीण आरोग्य केंद्रात डॉक्टरांची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील जनतेला जास्तीत जास्त सुविधा कशा उपलब्ध होतील याकडे शासनाने अजून अधिक लक्ष पुरवण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जीवन दायी आरोग्य योजनेचा फायदा बीपीएल कार्ड धारकांनाच मिळतो परंतु बीपीएलची जी मर्यादा आहे ती जर वाढविली तर त्याचा लाभ अधिक जनतेला घेता येऊ शकेल त्यामुळे बीपीएलची आर्थिक मर्यादा वाढविण्याची आवश्यकता आहे. कुपोषणाच्या संदर्भात देखील महाराष्ट्र शासनाने चांगले पाऊल उचलले आहे. कन्या-भृणहत्या रोखण्याच्या संदर्भात अजून जास्तीत जास्त उपाययोजना होण्याची आवश्यकता आहे. शेतक-यांच्या आत्महत्या हा चिंतेचा विषय असला तरी शासन या प्रश्नावर मात करीत आहे, शेतक-यांना जवळ घेण्याचा प्रयत्न करीत आहे ही चांगली बाब आहे. मला या ठिकाणी माननीय शरदचंद्र पवार साहेबांचा उल्लेख करावासा वाटतो की, त्यांनी शेतक-यांनी 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देणे, व्याज माफी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे ...

देणे , कमी व्याजाचे कर्ज वाढवून देणे अशा ज्या काही विविध योजना दिलेल्या आहेत त्या अतिशय स्तुत्य आहेत. या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील शेतक-यांना होणारच आहे. शेतक-यांसाठी माननीय पवार साहेबांनी विविध अशा योजना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. या योजनेमध्ये तुषार सिंचन, बी-बीयाणे, नवीन तंत्रज्ञांन विशेषत: मुला-मुलींचा सामूहिक विवाह अशा स्तुत्य योजना सुरु केलेल्या आहेत. मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, शेतक-यांसाठी सिंचन सुविधा अधिक मोठया प्रमाणात वाढवण्याची आवश्यकता आहे. शेतक-यांना चांगल्या प्रकारचे बी-बियाणे दिले, शेती तंत्रज्ञ ाान दिले, मार्गदर्शन केले, चांगला बाजारभाव दिला तर शेतक-याची आर्थिक स्थिती उंचावू शकेल. शेतक-यांना या योजनाचा लाभ मिळाला तर निश्चितपणे शेतक-यांच्या आत्महत्या थांबू शकतील. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी साहेब उपस्थित आहेत. त्यांनी चार-पाच वर्षापूर्वी सांगितले होते की, कापूस उत्पादक शेतक-याला क्विंटल प्रमाणे मदत न करता ती हेक्टरी दिली तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल व त्याप्रमाणेच आता शेतक-यांना हेक्टरी अनुदान मिळत आहे. सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात अजून काही गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. शाळा बाहय जे विद्यार्थी आहेत त्यांना जास्तीत जास्त प्रमाणात शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे तसेच शाळांचा दर्जा वाढण्याची आवश्यकता आहे. अपंग विद्यार्थी आणि शिक्षकांच्या संदर्भात उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. क्रीडांगण विकास हा भाग देखील महत्वाचा वाटतो.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे.....

ग्रामीण भागातील शाळाखोल्यांचे प्रश्न पूर्णपणे सोडविले पाहिजेत. मी सुरुवातीपासून सांगत आलो आहे की, विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामध्ये संगीत आणि कला या विषयाचा समावेश होणे गरजेचे आहे. महिला बचत गटांना अधिक प्रोत्साहन देता येईल यादृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत असे मला वाटते एवढे बोलून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे स्वागत करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब ( विधानसभेने निवडून दिलेले ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सन 2004 मध्ये प्रथम मी या सभागृहात आलो. तेव्हा पासून आजपर्यंत माननीय राज्यपालांचे अभिभाषण ऐकत आलो आहे. सन 2010 मध्ये जेव्हा मी निवृत्त होईन तेव्हा सुध्दा राज्यपालांच्या अभिभाषणाची तीच प्रत असेल असे मला वाटते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांचे विचार मांडताना अनेक विषयांचा परामर्ष घेतलेला आहे. महाराष्ट्र राज्य हे प्रगतशील राज्य आहे असा उल्लेख केला जातो. परंतु महाराष्ट्राची विजेच्या बाबतीतील परिस्थिती भयंकर बिकट आहे. असे असताना महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती कशी होईल असा माझ्यासमोर प्रश्न आहे. मागील तीन वर्षात माननीय ऊर्जा मंत्र्यांचे विजेच्या संदर्भात मांडलेले विचार मी ऐकलेले आहेत. सन 2006-07 मध्ये कशाप्रकारे वीज उपलब्ध होईल, वीज कशी उपलब्ध करु यासंबंधी सभागृहाला वेगवेगळ्या माध्यमातून दिलेली माहिती मी ऐकलेली आहे. राज्यात विजेचे भारनियमन बारा तासावरुन सोळा तासांवर गेले, सोळा तासांचे वीस तासांवर गेलेले आहे. आज महाराष्ट्राला 17 हजार 400 मे.वॅ.विजेची आवश्यकता आहे. 5 हजार 500 मे.वॅ.चा तुटवडा आहे. ही तूट भरुन काढण्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम केलेला आहे. या सरकारने महाराष्ट्राला प्रकाशाकडे नेण्याचा कोणताही कालबध्द कार्यक्रम दिलेला नसला तरी महाराष्ट्राला अंधकाराकडे नेण्याचा कार्यक्रम नक्कीच दिलेला आहे. सन 2010 मध्ये संपूर्ण महाराष्ट्र अंधारात असेल. राज्यात दरवर्षी 1 हजार 100 मे.वॅ.ची मागणी आहे. दरवर्षी या मागणीत वाढ होत आहे. परंतु त्यासाठी आतापर्यंत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. मागील पाच वर्षात विजेचे उत्पादन करण्यात आलेले नाही. सन 2006-07 मध्ये जवळपास 1200 ते 1400 मे.वॅ. विजेची निर्मिती करु असे सांगण्यात आले होते. वेगवेगळे प्रकल्प सांगण्यात आले, सामंजस्य करार दाखविण्यात आले. परंतु विजेचे कोणतेही उत्पादन झाले नाही. सभापती महोदय, राज्यात धोपावेचा 1600 मे.वॅ.चा नवीन प्रकल्प सुरु करणाच्या दृष्टीने तयारी केली आहे. असे सांगण्यात आले. त्यासाठी जमीन खरेदी केली काय ? जर जमीन खरेदी झाली नसेल तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

ॲड.अनिल परब.........

कोणतीही प्रक्रिया करता येणार नाही आणि कोणताही वीज प्रकल्प उभा राहण्यासाठी किमान 4-5 वर्षे लागतात. हे लक्षात घेता 2012 पर्यंत कोणत्याही वीज प्रकल्पाची निर्मिती होणार नाही. सभापती महोदय, केंद्र सरकारकडून राज्याला 1100 मे.वॅ.वीज उपलब्ध होते. आणखी वीज उपलब्ध करुन घेण्यासाठी केंद्र शासनाची एपीडीपीआरची योजना आहे. या योजनेमध्ये डिस्ट्रीब्युशनसाठी केंद्र सरकारकडून 12 टक्केप्रमाणे 55 टक्के लोन मिळते.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 17:55

ॲड.अनिल परब...

आजपर्यंत राज्य शासनाने लोन उचलण्यासाठी कुठल्याही प्रकारचा प्रयत्न केलेला नाही. दुसऱ्या बाजूला यासाठी बाकीच्या कंपन्यांनी अर्ज केला तर त्यांना आपण लोन मिळू देत नाहीत. एका बाजूला सांगावयाचे की, केंद्र सरकारच्या माध्यमातून वीज मिळणार आहे आणि दुस-या बाजूला सांगायचे की, राज्य शासनाच्या माध्यमातून वीज निर्मितीचे वेगवेगळे प्रकल्प उभे करण्यात येत आहेत. केंद्र शासनाने ज्या योजना आपल्यासमोर ठेवलेल्या आहेत, त्याबाबतीत या शासनाने अजूनपर्यंत काहीही केलेले नाही. याचा अर्थ, आपण या महाराष्ट्रातील जनतेची फक्त दिशाभूलच करीत आहात. आपण रत्नागिरी प्रकल्पातून 300 मेगावॅट वीज उपलब्ध होईल, असे सांगितले. एन्रॉनची वीज 2.65 रुपये दराने मिळणार असे सांगून ॲफिडेव्हीट केले की, आम्ही 1400 मेगावॅट वीज निर्मिती करीत आहोत. त्यातील अतिरिक्त 300 मेगावॅट वीज आम्ही गुजरात सरकारला देऊ, असेही आपण सन 2001 साली सांगितले. आपण एन्रॉन प्रकल्पातून 2.65 रुपये दराने मिळणारी वीज घेतली नाही व आज रत्नागिरी गॅसच्या प्रकल्पातील नाफ्त्याच्या माध्यमातून आपल्याला जी वीज मिळणार आहे, ती कमीत कमी 8-9 रुपये दराने मिळणार आहे. परंतु मध्यंतरी नाफ्ता नसल्यामुळे हा प्रकल्प बंद झाला. रत्नागिरीच्या प्रकल्पातून ज्या दराने वीज मिळणार आहे ती आपल्याला परवडणारी आहे का ? 2.65 रुपये दराने मिळणाऱ्या विजेस आपण विरोध केला. परंतु 8-9 रुपये दराने जी वीज आपण घेणार आहात, ती घेण्यासाठी आपल्याकडे पैसा कोठून आला ? यासाठी आपण पैसा कोठून उपलब्ध करणार आहात ? कारण, त्यासाठी कुठल्याही प्रकारची बजेटरी प्रोव्हीजन दिसून येत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये केवळ वचने दिली जातात, प्रत्यक्षात मात्र किहीही केलेले नसते. आपण फक्त लोकांच्या डोळयात धूळफेक करुन त्यांची फसवणूक करीत आहात. आपण यामध्ये कुठल्याही प्रकारची शाश्वती व गॅरंटी दिलेली नाही. यासाठी ठराविक अशी योजना नाही. 5,500 मेगावॅट विजेची तूट आम्ही वर्षभरात कमी करु, असे सन 2003 साली आपण सांगितले होते. यासंबंधीची डेडलाईन 2006-2007 पर्यंतची होती. परंतु आज 2007 साल संपत आले तरी अजूनही 5,500 मेगावॅट विजेची टंचाईच आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी डिसेंबर,2005 च्या भाषणात म्हटले होते की, सन 2009 मध्ये महाराष्ट्र शासन एवढी-एवढी वीज तयार करेल व अतिरिक्त वीज शेजारच्या राज्यांना विकण्यात येईल. परंतु प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे ? सन 2010 साली अशी परिस्थिती निर्माण

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

होणार आहे की, कमीत कमी 10 हजार मेगावॅट विजेची टंचाई महाराष्ट्रामध्ये निर्माण होणार आहे. अशाप्रकारे आपण भाषणांमधून जनतेची केवळ धूळफेक करीत आहात, हे योग्य नाही. पुढच्या वर्षीचे अभिभाषणही असेच राहील, असे मला वाटते. महाराष्ट्रातील वीज टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने आपण निश्चित असा कालबध्द कार्यक्रम आखावा व लोकांची किमान धूळफेक तरी करु नये, एवढेच मला म्हणावयाचे आहे. आज महाराष्ट्रात विजेचा प्रश्न हा अतिशय ज्वलंत होत चालला आहे. विजेमुळे महाराष्ट्र कोलमडण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. आपण 1400 कोटी रुपयांचा व 2100 कोटी रुपयांचा आकडा सांगता, परंतु हा पैसा आपण कुठून आणणार आहात. यासाठी कुठल्याही प्रकारची प्रोव्हीजन केलेली नाही. आपण लोकांना सांगता की, आम्ही विजेसाठी 1400 कोटी व 2100 कोटी रुपयांस मान्यता दिली आहे. परंतु प्रत्यक्षात आपण विजेसाठी किती रुपये खर्च केले ? विजेच्या बाबतीत शासनाने कुठल्याही प्रकारचे ठोस धोरण आखलेले नाही.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब पुढे सुरु..........

या विजेमुळेच महाराष्ट्रात अतिशय वाईट परिस्थिती निर्माण होईल, याची कृपया शासनाने नोंद घ्यावी.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असे म्हटले आहे की, "माझ्या शासनाच्या अत्यंत परिणामकारक व दक्ष कारवाईमुळे राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्यात माझ्या शासनास यश आले आहे." सभापती महोदय, मी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, पूर्वी मुंबईत नवीन पोलीस आयुक्त आले की, त्यांना पोलिसांकडून सलामी दिली जायची. मात्र, परवा मुंबईसाठी नवीन पोलीस आयुक्त नेमले गेले, ते मुंबईत आल्यानंतर त्यांना गुंडांनी सलामी दिली. ज्या दिवशी नवीन पोलीस आयुक्त मुंबईमध्ये आले त्याच दिवशी तिस-यांदा निवडून आलेले नगरसेवक, श्री.कमलाकर जामसंडेकर यांचा खून झाला. अशाप्रकारे राजकीय हत्या झालेल्या प्रकरणाबाबत पोलिसांचे धोरण ठरलेले असते. एखाद्या राजकीय व्यक्तिची हत्या झाली की, लगेच पोलीस जाहीर करुन टाकतात की, आपापसातील भांडणामुळे किंवा जमिनीच्या वादामुळे हत्या झाली असण्याची शक्यता आहे. अशाप्रकारे वक्तव्य करुन समाजाचे माईंड डायव्हर्ट करण्याचा प्रकार पोलिसांकडून केला जातो. जामसंडेकरांची हत्या झाल्यानंतर 7/8 दिवस पोलिसांना धागेदोरे मिळाले नाहीत. त्यावेळी मी अधिका-यांना सांगितले की, कित्येक दिवस पोलीस तपास करीत आहेत, पोलिसांना कोणतीही बातमी मिळत नाही. त्यांना मी हेही सांगितले की, एका गोष्टीची काळजी घ्या. अर्थसंकल्पीय अधिवेशन 14 तारखेला सुरु होणार आहे. आमच्या अंदाजाने पोलीस 11 किंवा 12 तारखेला आरोपी पकडतील. परंतु, 12 तारखेला पकडलेल्या आरोपींची चौकशी अधिवेशन संपेपर्यन्त कदाचित होणार नाही. आज 17 तारीख आहे. आजपर्यन्त तीन-चार आरोपी पकडलेले आहेत, त्याबाबत पुढे काय झाले, याची माहिती महाराष्ट्राच्या जनतेला मिळाली पाहिजे. परंतु, अजूनही पोलिसांना खरे मारेकरी मिळालेले नाहीत. खून कशासाठी झाला, हे कळलेले नाही. निवडणुकीच्या निमित्ताने त्यांना संपविण्यात आले, असे म्हटले जाते. सर्व पक्षाचे लोक एकत्र येऊन त्यांना संपवित असतील तर इतर पक्षाच्या उमेदवारांना त्याचा काहीही फायदा नाही. कारण, इतर पक्षाचे दोन उमेदवार एकाचवेळी नगरसेवक होऊ शकत नाहीत, कुणीतरी एकच

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब पुढे सुरु..........

नगरसेवक होऊ शकतो. आज असे सांगितले जाते की, जामसंडेकरांना डिसक्वालिफाय कराण्याचा उद्देश होता. परतु, जामसंडेकर डिसक्वालिफाय झाले असते तरी दुस-या पक्षाच्या लोकांना त्याचा काहीही फायदा झाला नसता. स्मॉल कॉज कोर्टात पिटिशन केले असते तरी निवडणूक रद्द झाली असती आणि पुन्हा नव्याने निवडणूक झाली असती. लोकांना ही वस्तुस्थितीच पटलेली नाही. या खूनाचा खरा सूत्रधार कोण आहे, मारेकरी कोण आहे, हे समजले पाहिजे. हे अधिवेशन संपेपर्यन्त हे खरे आरोपी पकडले जातील, असे वाटत नाही. सभापती महोदय, मुंबईत रात्री-बेरात्री फिरणारा मी कार्यकर्ता आहे. रात्री तुम्ही कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये जा, कुणालाही फोन लावा, मी आमदार बोलतो आहे म्हणून सांगा. रात्री आमदार वगैरे काही नाही, आमदार सकाळी 9 ते रात्री 9, रात्री 9 च्या नंतर आमचे राज्य असते, असे उत्तर तुम्हाला मिळेल. उपमुख्यमंत्री महोदय रात्री किती अधिकारी शुद्धीवर असतात हे दाखविण्यासाठी मी आपल्याला पोलीस स्टेशनमध्ये घेऊन जातो. रात्री कशा पद्धतीने काम चालते, हे आपण आपल्या डोळयांनीच बघा. पोलीस दल अतिशय वाईट परिस्थितीमध्ये आहे कारण त्यांचे मनोधैर्य खचलेले आहे. बॉम्बब्लास्टच्या बाबतीत माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले की, यशस्वीरित्या तपास करण्यात आला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन 1993 मध्ये सन्माननीय, श्री.शरद पवार हे मुख्यमंत्री होते, त्यांनी एक चांगले धोरण जाहीर केले होते. त्यांनी असे ठरविले होते की, बॉम्बब्लास्ट झाल्याबरोबर, पूर्वी पकडलेल्या स्फोटकांचा वापर त्यामध्ये करण्यात आला आहे किंवा कसे, याबाबतचा तपास करण्यात येईल, यामधील स्फोटके नसतील तर बॉम्बब्लास्टमध्ये परदेशी हात आहे, असे जाहीर करु, अन्यथा नाही. परंतु, हल्ली अशी परिस्थिती आहे की, बॉम्बब्लास्ट झाल्यानंतर काही मिनिटातच पोलीस किंवा मंत्री असे जाहीर करुन टाकतात की, परदेशी हात आहे. मी आज माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, जे बॉम्बब्लास्ट प्रकरणातील आरोपी आहेत, जामिनावर सुटलेले आरोपी आहेत, त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड पोलीस ठेवतात काय ? या सुटलेल्या आरोपींचे मॉनिटरींग करण्याची गरज आहे.

यानंतर श्री.बोरले..........

ॲड.अनिल परब ........

महाराष्ट्र शासनाची गुन्हा उकलण्याची एक पद्धत होती. परंतु आज पोलीस फक्त दिवस ढकलण्याचे काम करीत आहेत. पूर्वी खबरी लोकांना पैसे देऊन त्यांच्या जीवावर यंत्रणा उभी केली जायची. पोलिसांकडे आता ते साधन राहिलेले नाही. गुन्हेगारांशी संबंध ठेवल्यामुळे पोलीस दलातील काही अधिकारी घरी बसलेले आहेत. पोलिसांचे असे म्हणणे आहे की, शासनालाच गुन्हा उकलण्याची गरज नसेल तर आम्हाला काय गरज आहे ? पोलीस स्टेशनमध्ये जाऊन फक्त दिवस भरायचे काम पोलीस अधिकारी करीत आहेत. पोलीस दलामध्ये दोन गट आहेत. एक गट या टोळीचा आणि दुसरा गट दुस-या टोळीचा. गँगस्टरला पकडून आणल्यानंतर त्याला व्याजाने पैसे देणारे पोलीस अधिकारी देखील आहेत. गँगस्टरला पकडून आणल्यानंतर त्याला सांगितले जाते की, 25 लाख रुपये दे. गँगस्टरने जर सांगितले की, माझ्याकडे पैसे नाहीत तर पोलीस अधिकारी त्याला सांगतात की, पैशांची व्यवस्था आम्ही करतो. परंतु येथून बाहेर गेल्यानंतर तुला 30 लाख रुपये द्यावे लागतील. अशा प्रकारचे पोलीस अधिकारी काम करीत आहेत. खंडणीखोर जर कोणी असतील तर ते पोलीसच आहेत, अशी चर्चा बाहेर सुरु आहे. अशा पोलीस अधिका-यांना सरकारने शोधून काढले तर पोलीस दलाची प्रतिमा सुधारेल. ए.टी.एस.च्या अधिका-यांची गुन्हाचा तपास करण्यासाठी नेमणूक केली जाते. त्या अधिका-यांना प्रसिद्धीच्या शिखरावर नेले जाते आणि त्यांच्या विरुध्द संशयाची सुई फिरली तर त्यांच्याकडून तपासाची सूत्रे काढून घेतली जातात. पोलिसांचे खचलेले मनोधैर्य वाढविण्याची आवश्यकता आहे. पोलिसांचे मनौधैर्य वाढले तर महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था सुधारेल, असे मला वाटते. मला अजून ब-याच मुद्यांना स्पर्श करावयाचा होता. परंतु वेळेचे बंधन आहे. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांचे उत्तर ऐकण्याची आमची इच्छा आहे.

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.धनाजी साठे यांनी भाषण सुरु करावे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, बोलण्यासंदर्भात नियम कडक करावयाचे असतील तर सन्माननीय सदस्यांनी इतक्या मिनिटांच्यावर एकही मिनिट बोलायचे नाही, अशा सूचना आपल्याला द्याव्या लागतील. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर मी खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण येथेच थांबवितो.

---------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनाजी साठे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा ठराव मांडलेला आहे आणि त्या ठरावाला सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी अनुमोदन दिलेले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या ठरावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्र राज्याला प्रगतीच्या दिशेने नेत असतांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये काही गोष्टींचा उल्लेख असणे गरजेचे होते. सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यामध्ये दोन-तीन लाख टन ऊस शिल्लक राहणार आहे. आज शेतकरी हवालदिल झालेला आहे. ऊसाची विक्री कशी करावयाची असा प्रश्न शेतक-यांना पडलेला आहे. साखर कारखानदार शेतक-यांना अक्षरशः लुटण्याचे काम करीत आहेत. काही भागामध्ये 600 ते 650 रुपये टन या दराने ऊसाची खरेदी केली जाते. तेव्हा सर्व ऊसाची खरेदी केली जाईल अशी शाश्वती शासनाने ऊस उत्पादक शेतक-यांना देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, माढा तालुक्यातील 80 टक्के रस्ते खराब झालेले आहेत. कोणत्याही गावाला जायचे म्हटले तर सहजासहजी जाता येईल, असे रस्ते राहिलेले नाहीत.

यानंतर कु.खर्चे ........

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनाजी साठे.......

महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची प्रगती झाली असे म्हणत असतांना आपण कायम विनाअनुदानित तत्वाने शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहोत, त्याबाबत सुध्दा विचार झाला पाहिजे. या विनाअनुदानित तत्वामुळे या राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांवर उपाशी पोटी शाळेमध्ये काम करण्याची वेळ आलेली आहे. कायम विनाअनुदानित हे तत्व बदलणे अत्यंत गरजेचे आहे, यासाठी शासनाने जरुर विचार करावा, अशी मी शासनाला या निमित्ताने विनंती करतो. सभापती महोदय, आबा पाटील पूर्वी ग्रामविकास मंत्री असतांना पाणी पुरवठा योजना व्यवस्थित राबविली जायची परंतु आता पाणी पुरवठयाच्या बाबतीत शासनाने ग्रामीण स्तरावर गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. मधल्या काळामध्ये ग्रामपंचायती पाणीपुरवठा करु शकत होत्या परंतु लाईट बिलाचा जो प्रश्न आहे, तो अजूनही तसाच अधांतरी आहे त्याचाही शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे व काहीतरी ठोस उपाययोजना करुन लोकांच्या लाईफलाईनचा हा प्रश्न शासनाने सोडविला पाहिजे.

सोलापूर जिल्हयामधील उसाचा गंभीर प्रश्न आपल्यासमोर आहे. राज्यामध्ये आठ साखर कारखाने उभारणीखाली अडकलेले आहेत. त्यामध्ये मादा तालुक्याचा आणि जालन्याचा टोपे साहेबांचा साखर कारखाना, उमरग्यामधील दोन साखर कारखाने असे एकू ण मिळून आठ साखर कारखाने आहेत. त्यापैकी पाच कारखाने राष्ट्रवादी कॉंग्रेस, दोन कॉंग्रेस पक्षाचे आणि एक जनता दलाचा आहे. केवळ आर्थिक अडचणींमुळे हे कारखाने पुन्हा उभे राहू शकले नाहीत. या कारखान्यांना ठोस मदत करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने यात लक्ष घालावे आणि येत्या काळामध्ये निदान पुढच्या वर्षी तरी हे कारखाने सुरु व्हावेत, त्यामुळे शेतक-याच्या ऊसाचा प्रश्न सुटू शकेल. उपरोक्त बाबतीत शेतक-यांना मदत करणे गरजेचे आहे. एवढे बोलून व माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. जयहिंद ! जय महाराष्ट्र

---------

4I - 2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : माननीय मंत्री महोदयांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर द्यावे.

श्री.आर.आर.पाटील ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, दरवर्षी अर्थविषयक अधिवेशनापूर्वी राज्यसरकारने गेल्या वर्षभरात केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा. राज्यसरकारचे अनेक संकल्प माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या निमित्ताने राज्यभरातील जनतेला सांगावेत म्हणून अभिभाषणाची एक स्तुत्य सुरुवात आपल्या संसदीय प्रथेप्रमाणे सुरु झालेली आहे. आज दोन दिवस या सदनामध्ये चालू असलेल्या चर्चेला उत्तर द्यावयाचे म्हणून कै.यशवंतराव चव्हाण,कै.वसंत नाईक, कै.वसंतदादा पाटील, कै.शंकरराव चव्हाण, आणि बॅरिस्टर अंतुले साहेब, शरद पवार साहेब, मनोहर जोशी साहेब या सर्व दिग्गज माजी मुख्यमंत्र्यांनी माननीय राज्यपालांच्याअभिभाषणाच्या चर्चेवर उत्तर देत असतांना केलेली भाषणे मी कालपासून वाचून काढली, त्याचप्रमाणे त्या त्या परिस्थितीमध्ये त्या काळातील आमदारांनी या राज्याच्या विविध समस्या मांडल्या,प्रश्न मांडले, त्या सर्व चर्चा बहुतांश मी वाचल्या. राज्य जसजसे पुढे जात राहील, तसतसे राज्यामधील प्रश्न बदलतात. अनेक छोटया छोटया गोष्टीसाठी या विधानसभेमध्ये,विधानपरिषदेमध्ये चर्चा झालेली आहे, त्या चर्चा जर आपण वाचल्या तर आपल्यालाही आश्चर्य वाटेल की, सत्तर लोकांच्या पंक्तीमध्ये राज्यातील मंत्री जेवले कारण राज्यात बाजारामध्ये बाजरी आणि मक्याच्या धान्य वितरणास दोन दिवस उशीर झाला व त्यामुळे लोकांच्या चुलीही दोन दिवस पेटल्या नाहीत, हा प्रश्नही या सदनामध्ये मांडण्यात आला होता.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

आणि त्यावेळच्या मंत्र्यांनी दिलगिरी व्यक्त करून सांगितले की, एक दिवस विलंब होत आहे, तोपर्यंत राज्यातील जनतेने कळ काढली पाहिजे. बोट लवकरात लवकर आणून धान्य गावापर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. सभापती महोदय, या सदनामध्ये दोन वेळच्या चुली पेटत नाहीत या प्रश्नावर चर्चा झालेली आहे. राज्यामध्ये पुरेसे अन्नधान्य नाही याबद्दल चर्चा झालेली आहे. राज्याच्या सिंचनाचा प्रश्न पोटतिडकीने या सदनामध्ये मांडला गेलेला आहे. तरी मी या राज्याला भाग्यशाली राज्य मानतो. कारण या राज्याला खूप दिग्गज असे नेते मिळाले आहेत. सभापती महोदय, आज आपण जेथे आहोत तेथे आणण्यासाठी दूरदृष्टी ठेवून नियोजनपूर्वक काम करणारे अनेक नेते आपल्या महाराष्ट्राला मिळाले आहेत म्हणूनच महाराष्ट्राकडे पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, भौगोलिक प्रतिकूलता मोठ्या प्रमाणात आपल्या राज्याच्या वाट्याला आली आहे. राज्याचा 82 टक्के भूभाग हा बेसॉल्ट खडकाचा आहे आणि त्यामुळे पाणी अडविण्याची आणि साठविण्याची क्षमता या खडकामध्ये फार कमी आहे. राज्याला लाभलेल्या नद्या देखील उथळ आणि आखूड आहेत त्यामुळे इतर राज्यांप्रमाणे पाण्याची संपन्नता आपल्याकडे नाही. राज्याच्या कोकण भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस होत असूनही ते सगळे पाणी भूपृष्ठावरून आणि भूगर्भातून समुद्राला जाऊन मिळते. आपल्या राज्याचे वर्णनदेखील कवींनी 'दगडा-धोंड्याच्या देशा' असे केलेले आहे. सभापती महोदय, एका बाजूने या राज्यामध्ये पीक कमी पिकले असेल पण यास राज्याला मोठे करणारी माणसे मात्र या भूमिमध्ये अमाप पिकली आहेत. त्यामुळेच आज अनेक क्षेत्रामध्ये हे महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. आज एकविसाव्या शतकाची मानके बदलली आहेत. ज्ञानाला आज यापूर्वी कधीही नव्हते एवढे महत्त्व प्राप्त झालेले आहे. एक प्रकारे ज्ञान हे भांडवल बनले आहे. यामध्ये महाराष्ट्र कोठे आहे हे शोधण्याचा आपण प्रयत्न करतो तेव्हा त्या त्यावेळच्या प्रत्येक मुख्यमंत्र्यांनी या राज्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण काम केलेले आहे. समारोपाचे भाषण असा वा अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना केलेले भाषण असो, पुढील 25 वर्षांमध्ये या राज्यासमोर काय प्रश्न येऊ शकतील याचा अचूक वेध 1960 सालामध्ये राज्याच्या पहिल्या मुख्यमंत्री असलेल्या श्री.यशवंतराव चव्हाण यांनी घेतला होता. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे की, ज्यांनी आपल्या राज्यामध्ये जल आयोगाची स्थापना केली. लोकसंख्या वाढते आहे आणि त्यामुळे पाण्याची कमतरता वाढत जाईल हे लक्षात घेऊन त्यांनी त्यावेळेस जल आयोगाची स्थापना

..... 4जे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

केली होती. राज्यात साहित्याला आणि संस्कृतीला चालना देणारे नेतृत्त्व या राज्याला तेव्हा स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या रूपाने मिळाले होते. त्यानंतर प्रदीर्घ काळ या राज्यामध्ये सत्ता मिळालेले वसंतराव नाईक आणि वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री या राज्याला लाभले. त्यांनी देखील अभिमानास्पद अशीच कामगिरी सर्व क्षेत्रात केली आहे. त्यावेळी अन्नधान्याच्या बाबतीत आपला महाराष्ट्र तुटीमध्ये होता. दोन वेळा घरामध्ये चूल पेटत नव्हती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री असलेल्या वसंतराव नाईकांनी या सदनामध्ये उभे राहून सांगितले की, अन्नधान्याच्या बाबतीत हे राज्य मी स्वयंपूर्ण बनवेन ही माझी प्रतिज्ञा आहे. त्यावर एका आमदाराने त्यांना विचारले की, ही भीष्म प्रतिज्ञा आहे की, नाईक प्रतिज्ञा आहे ? त्यावर त्यांनी ताडकन उत्तर दिले की, ही नाईक प्रतिज्ञा आहे. त्यानंतर आठच दिवसांनी पुण्याच्या शनिवारवाड्यासमोर भाषण करताना त्यांनी सांगितले की, येत्या तीन वर्षामध्ये मी हे राज्य अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करून दाखवीन, तसे झाले नाही तर तुम्ही मला या शनिवार वाड्यासमोर फासावर द्या. काहीही झाले तरी हे राज्य अन्नधान्याच्या बाबतीत मी स्वयंपूर्ण करून दाखवीनच. सभापती महोदय, आज जेव्हा आपण ग्रामीण भागामध्ये फिरतो, तेव्हा त्यांच्या काही व्यथा या जरूर आहेत, अडचणी आहेत. शेतकऱ्यांच्या समोर डोंगराएवढे मोठे प्रश्न आहेत हे मी अमान्य करीत नाही. पण ज्या राज्यामध्ये केवळ 17 टक्के क्षेत्र ओलिताखाली येते आहे त्या राज्यामध्ये अधिकाधिक क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी मोठे प्रयत्न आजवरच्या मुख्यमंत्र्यांनी, शासनाने केले आहेत. त्यामुळेच इतर कोठल्याही राज्यापेक्षा या राज्यामध्ये पाटबंधाऱ्यांवर अधिक खर्च केला गेलेला आहे. भौगोलिक परिस्थितीमुळेच सर्वात कमी क्षेत्र या महाराष्ट्रात ओलिताखाली आलले आहे, केवळ 17 टक्के क्षेत्रच या राज्यात ओलिताखाली आहे. पण तरीही देशामध्ये कोठल्याही राज्यापेक्षा फळे निर्यात करणारे राज्य म्हणून महाराष्ट्र राज्य हे पहिल्या क्रमांकावर आहे. ...

( यानंतर श्री. गागरे .... 4के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

महाराष्ट्राच्या बाजूने प्रतिज्ञापत्र झाले पाहिजे होते परंतु ते झाले नाही. कधी कधी राहून, राहून वाटते की, या देशातील सर्व राज्यांना जे सहज मिळाले ते महाराष्ट्राला नेहमी लढून का मिळवावे लागते आहे? भाषावार प्रांतरचना होतांना सर्व राज्यांना भाषेप्रमाणे राज्य मिळाले. परंतु मुंबई मिळविण्यासाठी 150 लोकांना हौतात्म्य पत्करावे लागले. त्यांचे बलिदान देऊन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला. महाराष्ट्राला नेहमी लढावे लागते, परंतु लढत असतांना महाराष्ट्र हा अंतिम विजय प्राप्त करुन घेतो. या गोष्टी इतिहासामध्ये अनेक ठिकाणी आपल्याला बघावयास मिळतात. माझी ठाम खात्री आहे की, सुप्रीम कोर्टामध्ये हे सरकार मोठया ताकदीने लढेल आणि त्या कोर्टामधून महाराष्ट्राला न्याय मिळेल. या कामासाठी प्रा. एन. डी. पाटील यांच्या सल्ल्याने तसेच सीमा कमिटीमध्ये काम करणाऱ्या सर्वांच्या मार्गदर्शनाने ॲडव्होकेट श्री. हरी साळवे आणि श्री.शिवाजी जाधव या नामवंत वकिलांची नेमणूक केली आहे. मला विश्वास आहे की, हे महाराष्ट्र या सीमा प्रश्नामध्ये निश्चितपणे जिंकेल. ज्या जिद्दीने कर्नाटक सरकार सीमा भागातील कन्नड जनतेच्या पाठीमागे उभे रहाते, त्याच जिद्दीने हे महाराष्ट्र शासन महाराष्ट्रातील सीमावासिय बांधवाच्या पाठीशी उभे राहील या गोष्टीची या सदनामार्फत मी राज्याला ग्वाही देतो.

सभापती महोदय, आपण गेली दोन वर्षे बघितले आहे की, काही निसर्ग निर्मित व काही मानव निर्मित आपत्तीला राज्याला सामोरे जावे लागले आहे. राज्यामध्ये गेली दोन वर्षे पूर आला. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये कधी नव्हता इतका पाऊस पडला. एका पाठोपाठ एक संकटे आली. यामध्ये सरकारने मुंबई महानगरपालिकेला किंवा मुंबई महानगरपालिकेने सरकारला दोष देण्याचा प्रश्न नव्हता. इतिहासामध्ये कधीही नव्हता इतका विक्रमी पाऊस नोंदला गेला. आणि तो केवळ अल्प वेळेमध्ये नोंदला गेला. यामध्ये मुंबईतील लोक आणि घरे पाण्यामध्ये बुडाली, त्यामुळे कोटयावधी रुपयांचे नुकसान झाले. यामधून महाराष्ट्र सावरेल की नाही अशाप्रकारची साशंकता व्यक्त केली जात असतांना महाराष्ट्रातील जनतेला मनापासून धन्यवाद दिले पाहिजेत. मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये फिरत असतांना सर्वजण पक्षभेद विसरुन, जातीभेद विसरुन, धर्मभेद विसरुन एकमेकांना मदत करीत असल्याचे मला दिसले. महाराष्ट्रामध्ये त्यावेळी एकच धर्म विचारला जात होता तो फक्त मानवता धर्म होता. एवढया मोठया नैसर्गिक आपत्तीवर मानव धर्माने मात करुन त्या पूर परिस्थितीतून महाराष्ट्राला सावरले. ज्या ज्यावेळी नैसर्गिक आपत्ती येते त्यावेळी सरकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

प्रॉयॉरिटी बदलत रहाते, सरकारला हातातील कामे सोडावी लागतात, राज्याचे उत्पन्न घटत असते त्यावेळी जनतेचे उत्पन्न घटते, अनंत अडचणी येतात. त्यावेळी सरकारवर सुध्दा त्याचा परिणाम होतो. गेल्या वर्षी आलेल्या पूरामध्ये आपल्याला सानुग्रह अनुदान देता यावे म्हणून 104 कोटी रुपये लोकांना द्यावे लागले. ज्या लोकांची घरे बुडाली त्यांच्याकरिता 125 कोटी रुपये खर्च करुन त्यांची घरे बांधून द्यावी लागली. शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. वर्षभरातील हातातोंडाशी आलेले पीक पूरामध्ये बुडाले होते. त्यामुळे शेतकरी हताश होऊ नयेत याकरिता 473 कोटी रुपयांची तरतूद बजेटमध्ये करुन त्यांना मदत द्यावी लागली. सभापती महोदय, सलग दोन वर्षे येणारी नैसर्गिक आपत्ती कमी म्हणून की काय, या मुंबईतील रेल्वेमध्ये स्फोट झाले. आम्हाला अनेक वेळा विचारले जाते की, मुंबईमध्ये सुरक्षिततेच्या बाबतीत कमतरता आहे काय? उणीवा आहेत की काय? नेहमी या राज्याला उद्दिष्ट कां बनविले जाते? आपण जर युध्दशास्त्राचा अभ्यास केलातर नेहमी वर्मावर घाव घातले जातात, शक्तिस्थळावर हल्ले केले जातात. युध्दशास्त्राच्या नियमाप्रमाणे कधीही डोंगरामध्ये बॉम्ब फोडून देशामध्ये दहशत माजविली जात नाही. सभापती महोदय, आज देशामध्ये इन्कम टॅक्स, कॉर्पोरेट टॅक्स, एक्साईज डयुटीच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या तिजोरीमध्ये जो निधी जमा होतो त्यामधील 40 टक्के निधी महाराष्ट्रामधून जातो. त्यामधील 33 टक्के निधी मुंबई शहरामधून जातो. त्यामुळे जे शहर या देशाचे शक्तिस्थळ आहे, त्या शहराला उद्ध्वस्त करण्याचे काम होत आहे हे आपण सर्वांनी समजून घेतले पाहिजे. याकरिता देशाच्या सीमेपलिकडून कट करीत असतांना जर हा देश कमजोर करावयाचा असेल तर आपल्याला मुंबई उद्ध्वस्त केली पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु....

मुंबईमधील अर्थव्यवस्था खिळखिळी झाली तर देश कमकुवत बनतो या इराद्याने मुंबईमध्ये जातीय दंगली व्हाव्यात, अशापध्दतीने प्रयत्न केला जातो. अधुनमधून चार मतांच्या अपेक्षेने आम्ही कोणालातरी जातीयवादी, कोणालातरी धर्मवादी म्हणत असतो. सभापती महोदय, ज्यावेळेस मुंबईत रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाले, त्यामध्ये शेकडो लोक जखमी झाले, त्या जखमी माणसांना हॉस्पिटलमध्ये नेत असताना आणि ॲम्बुलन्स परत आणत असताना जसे हिंदू मोठया संख्येने मदत करत होते त्याचप्रमाणे मुस्लीम बांधवसुध्दा हिंदुंना वाचविण्याचा अटोकाट प्रयत्न करत होते. मालेगावमध्ये बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये मोठ्याप्रमाणावर मुस्लीम मारले गेले, जखमी झाले. तेव्हा मुस्लीमांना रक्त देण्याकरिता हिंदूंनी रांगा लावल्या होत्या. ज्यावेळेला संकट येते त्यावेळेलाच परीक्षा होत असते. रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाला तेव्हा दोन तासाच्या आत रेल्वे प्रशासनाने रेल्वे पूर्ववत सुरु करण्याची कार्यक्षमता दाखविली. चार तासामध्ये रेल्वेमध्ये बसण्याची हिंमत बहाद्दर मुंबईकरांनी दाखविली. लंडनमध्ये रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाले, त्यावेळेला सिक्युरिटीच्याबाबतीत तपासणी केल्यानंतरही 3 आठवडे तेथील नागरिकांची रेल्वेमध्ये बसण्याची तयारी नव्हती. परंतु सहा तासाच्या आत मुंबईकर व मुंबईचे जीवन पूर्ववत झाले हे जगाला दाखवून दिले. केवळ एखादे धार्मिक स्थळ हे शक्ती स्थळ असू शकत नाही किंवा विधानसभा आणि विधानपरिषद हे केवळ शक्ती स्थळ असू शकत नाही तर आपण सगळेजण त्या जनतेच्या आशा-आकांक्षेचे प्रतीक असतो. महाराष्ट्रातील 10 कोटी जनता हे खरे शक्तीस्थळ आहे आणि तेच मुळामध्ये मजबूत आहे. निसर्गाचा इरादा काय किंवा शत्रुचा इरादा काय ? त्याचा पराजय करण्याची हिंमत महाराष्ट्रातील जनतेमध्ये आहे. तसा महाराष्ट्राचा बाणाच राहिलेला आहे आणि तो पुढे घेऊन जाणार आहे. विजेच्या संदर्भाने मी नंतर बोलणार आहे. राज्याची परिस्थिती पाहिली तर कार्पोरेट क्षेत्रामध्ये 21 टक्के गुंतवणूक महाराष्ट्राने केलेली आहे. जवळजवळ 26 हजार कोटी रुपयाची गुंतवणूक गेल्यावर्षी महाराष्ट्रामध्ये झालेली आहे. याबाबतीत महाराष्ट्र हे देशामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. जगामध्ये स्पर्धा वाढलेली आहे. मूल्यमापन करणाऱ्या संस्थेपैकी स्वीत्झर्लंडमधील आयएमबी या सस्थेने तक्ता प्रकाशित केलेला आहे, त्यामध्ये महाराष्ट्र या एकमेव राज्याचा उल्लेख आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ KGS

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु....

त्यामध्ये भारताचे स्थान जगामध्ये 29 वे आहे आणि महाराष्ट्राचे स्थान 37 वे आहे. इटली, रशिया, आफ्रिका, दक्षिण कोरिया या देशांना महाराष्ट्राने मागे टाकलेले आहे. उद्योगाच्याबाबतीत हे राज्य अन्य राज्याच्या कोसोमील पुढे आहे. हे राज्य प्रगत होत चालले आहे, स्पर्धेचे शक्तीस्थान बनलले आहे, हे जनतेने सिध्द केलेले आहे. हे राज्य जगाचे शक्तीस्थान बनू शकते. हे करत असताना आमचा उद्देश असा आहे की, राज्यातील मनुष्यबळ विकसित केले पाहिजे. एखाद्या धरणाचे काम दोन वर्षे पुढे ढकलले किंवा....

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

एखाद्या रस्त्याचे काम आाणखी थोडे लांबले तरी चालेल परंतु या राज्यातील तरुण पिढीवर चांगले संस्कार करुन त्यांना चांगले शिक्षण देणे या कामाला प्राधान्य देण्याची भूमिका राज्य सरकारने स्वीकारलेली आहे. गेल्या वर्षी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणावर 10,679 कोटी रुपये इतका प्रचंड खर्च करीत महाराष्ट्र शासनाने आपली साक्षरता 71 टक्क्यापर्यंत पोहोचवलेली आहे. यामध्ये महाराष्ट्राचा देशामध्ये पहिला क्रमांक आहे असे मी म्हणणार नाही. 91 टक्के साक्षरता करत केरळ देशामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. परंतु दहा कोटी लोकसंख्या असलेले महाराष्ट्र हे मोठे राज्य आहे आणि मोठ्या राज्यांच्या यादीमध्ये महाराष्ट्र देशामध्ये याबाबतीत पहिला आहे आणि देशाच्या एकूण यादीमध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे. मला हे सांगण्यास अभिमान वाटतो. गेल्या दहा वर्षात महाराष्ट्र सरकारने जेवढ्या लोकांना साक्षर केले तेवढे साक्षर देशातील कोणतेही राज्य बनवू शकले नाही. महाराष्ट्राने शिक्षण क्षेत्रामध्ये खूप मोठे काम केले आहे. हे काम करीत असताना शिक्षण सेवकांचे प्रश्न आहेत, विनाअनुदानित शाळांचे प्रश्न आहेत, आम्हाला कायमच विनाअनुदानित ठेवणार काय ? असे अनेक प्रश्न आहेत. परंतु टप्प्याटप्प्याने या सर्व प्रश्नांवर आम्ही मात करु. परंतु आज साक्षरतेचा रेट वाढवून महाराष्ट्र आज देशामध्ये मोठ्या राज्यांच्या यादीमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे ही गोष्ट सांगण्यास मला अभिमान वाटतो. याच घडलेल्या माणसांना बळ देऊन त्यातून पुढे डॉक्टर, इंजिनिअर, आय.टी.क्षेत्रातील तज्ज्ञ तयार होतील. यातून सुजाण नागरिक तयार होतील आणि हे मनुष्यबळ महाराष्ट्राला पुढे घेऊन जाईल, हे लक्षात घेऊन आज प्राथमिक शिक्षणावर आम्ही चांगले लक्ष दिले आहे. त्याचप्रमाणे सर्व शिक्षा अभियान केंद्र सरकारने सुरु केले. गेल्या वर्षभरामध्ये 26 हजार शाळाखोल्या पूर्ण करीत आज जे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे त्यामध्ये पुढच्या दोन वर्षात सर्व शिक्षा अभियान आणि महाराष्ट्र सरकारचा कार्यक्रम यातून महाराष्ट्रामध्ये एकाही गावात पूर्ण शाळाखोल्या नाहीत अशी स्थिती असणार नाही. तीन वर्षामध्ये शाळाखोल्यांच्या बाबतीत महाराष्ट्राची स्थिती परिपूर्ण होईल. आपण शाळाखोल्यातून बाहेर पडल्यानंतर टप्प्याटप्प्याने मुलांना आधुनिक शिक्षण दिले पाहिजे, खेड्यापाड्यातील मुले सुध्दा संगणकाशी खेळली पाहिजेत, एकविसाव्या शतकाला साजेसे शिक्षण त्यांना उपलब्ध असले पाहिजे यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने डोळसपणे पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. माझी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. आर. आर. पाटील .....

निश्चित खात्री आहे की, या क्षेत्राला प्रथम प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे आणि राज्य सरकारने ते प्राधान्य दिलेले आहे.

सभापती महोदय, मी मान्यच करतो की, वीज क्षेत्रामध्ये जनतेने माफ न कराव्यात इतक्या चुका अलीकडच्या काळात विविध राज्यकर्त्यांकडून झालेल्या आहेत. कोणा एकाकडे बोट दाखविले तर चार बोटे आपल्याकडे वळतील अशी सगळयाच पक्षांची स्थिती आहे. एक भाषण प्रकाशित करण्याची मी आपल्याला परवानगी मागणार आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब ज्या खुर्चीमध्ये बसलेले आहेत त्याच खुर्चीवरुन 1997 साली माननीय श्री. शरद पवार साहेबांनी केलेले भाषण महाराष्ट्राच्या जनतेसाठी प्रकाशित करण्याची परवानगी मागण्यासाठी आपल्याकडे येणार आहे. एन्रॉनचा निर्णय झाला होता. त्यावेळी तज्ज्ञांनी आणि विचारवंतांनी वारेमाप टीका केली होती. युतीचे सरकार महाराष्ट्रामध्ये सत्तेवर आल्यानंतर वाटा कोणाला आणि घाटा कोणाला असे म्हणत एन्रॉनचा करार रद्द करण्याचा निर्णय तत्कालीन सरकारने घेतला. मी समर्थन करण्यासाठी उठलो होतो. मला त्यावेळचा प्रसंग आठवतो. एन्रॉनचे दलाल वगैरे बोलले गेले. सभागृहामध्ये गोंधळ झ ाला. मला बोलू दिले नाही. हे सर्व रेकॉर्डवर आहे. श्री. शरद पवार साहेब या सदनामध्ये बोलणार आहेत म्हणून काही तरुण प्रेक्षक गॅलरीमध्ये उपस्थित होते. त्यांचे या सदनातील सव्वा तासाचे भाषण आहे. त्याच्या प्रती काढून मी या सदनातील दोन्ही बाजूच्या सदस्यांना निश्चितपणे देणार आहे. याच खुर्चीवर बसून त्यांनी महाराष्ट्राला इशारा दिला होता की, "सत्ता येत असते, जात असते. मी मुख्यमंत्री असताना निर्णय घेतला होता, आज मी विधान परिषदेत विरोधी बाकावर आहे. माझ याकडे बघून निर्णय घेऊ नका. राजकीयदृष्ट्या निर्णय घेऊ नका. महाराष्ट्राचे भवितव्य बघून निर्णय घ्या. विकासाच्या प्रश्नामध्ये, आर्थिक प्रश्नामध्ये राजकारण आणाल तर या राज्याला समस्येला तोंड द्यावे लागेल." त्या भाषणाची प्रत माझ्याजवळ आहे. त्यांनी असेही म्हटले होते की, "जर आपण विजेच्या प्रश्नाच्या बाबतीत चुकीची भूमिका घेतली तर एक दिवस या राज्यातील राज्यकर्त्यांना विजेसाठी हातामध्ये कटोरा घेऊन शेजारच्या राज्याकडे जावे लागेल."

यानंतर श्री. शिगम...

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु....)

पण अध्यक्ष महाराज, त्यावेळी तसे होईल असे वाटले नव्हते. परंतु शेवटी सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडेसाहेबांच्या सुध्दा विजेची मागणी आणि गरज लक्षात आली आणि अरबी समुद्रामध्ये बुडविलेला एन्रॉन पुन्हा तुकारामाच्या गाथेप्रमाणे तिपटीने वर आला. पुन्हा 1999मध्ये राज्यामध्ये सत्तांतर झाले. आम्ही सत्तेवर आलो त्यावेळी एन्रॉन तिपटीने मोठा होऊन वर आला होता. एन्रॉन परवडणार की नाही अशा शंका उपस्थित केल्या जात होत्या. सभापती महोदय, हे भाषण भविष्यामध्ये कुणी वाचले तर महाराष्ट्रामध्ये चुकीचे बोलण्याचे पाप केले असे कोणी भविष्यात म्हणू नये म्हणून मी आज सांगू इच्छितो की, एन्रॉन बुडविणे आणि पुन्हा वर आणणे यामध्ये जेवढी बीजेपी-शिवसेना दोषी आहे तेवढ्याच पापाचे मानकरी आम्ही सत्तेत असलेले लोकसुध्दा आहोत असे प्रांजळपणे मी मान्य करतो. एन्रॉन येत होता त्यावेळी महाराष्ट्रात वीज पुरवठा होत होता. त्या काळामध्ये एन्रॉनकडे वेगळ्या दृष्टीने बघणा-यांच्या नजरा होत्या. त्या केवळ विरोधी बाकावर बसणा-यांच्या होत्या अशातला भाग नाही तर सत्ताधारी बाजूकडील लोकांच्याही तशा त्या होत्या. विजेची गरज आहे की नाही असा प्रश्न अनेकांनी 2000 सालामध्ये उपस्थित केला होता. त्यासंबंधी त्यावेळचे अग्रलेख आणि तज्ज्ञांची मतेही पाहाण्याची गरज आहे. विजेच्या संदर्भात गोडबोलेसाहेबांच्या अध्यक्षतेखाली देशस्तरावर काम करणा-या अनेक तज्ज्ञांची एक कमिटी नेमली. त्या तज्ज्ञांच्या कमिटीने रिपोर्ट दिला त्यावेळी पुढा-यांवर टीकेची झोड उठविली होती. पण आपल्या देशामध्ये जेव्हा एखादा नोकर चुकतो, तज्ज्ञ चुकतो त्यावेळी कधीच बोलले जात नाही. त्या तज्ज्ञांच्या कमिटीने असा रिपोर्ट दिला की, सरकार एन्रॉन आणण्यासाठी विजेची जी वाढीव मागणी जनतेसमोर मांडीत आहे ती चुकीची आहे. महाराष्ट्राकडे पुरेशी वीज असून कोणत्याही अतिरिक्त प्रकल्पाची महाराष्ट्राला आवश्यकता नाही. राजकीयदृष्टया निर्णय घेणा-यांची कोंडी झाली होती. परंतु तज्ज्ञांनी राजकीय आणि तात्विकदृष्टया निर्णय घेणा-यांची आणखी कोंडी केली आणि हातातोंडाशी आलेले निप्पॉन डेन्रो सारखे प्रकल्प होऊ शकले नाहीत. महाराष्ट्राकडे पुरेशी वीज उपलब्ध असून महाराष्ट्राला विजेची गरज नाही अशा प्रकारचे ॲफिडेव्हिट केले गेले. राज्याची विजेची मागणी कशी वाढत गेलेली आहे आणि विजेचा पुरवठा आणि निर्मिती कशी कमी होत आहे, कोणत्या सालामध्ये किती मागणी होईल या गोष्टी राज्यकर्त्यांनी सांगितल्या. या राज्यातील

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

तज्ज्ञांची मते महाराष्ट्रातील जनतेसमोर आहेत आणि राज्यकर्त्यांनी मांडलेली मते देखील महाराष्ट्राच्या जनतेसमोर आहेत. राज्यकर्त्यांची मते खरी ठरलेली आहेत. तज्ज्ञ सांगतात त्यापेक्षा डिमांड वाढलेली आहे. नवे प्रोजेक्ट झालेले नाहीत. आज आपण 5500 मे.वॅ. विजेच्या तुटीला सामोरे जात आहोत. मागील दोन वर्षापूर्वी सन्माननीय ऊर्जामंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील हे सत्तेमध्ये आहेत म्हणून विनाकारण त्यांना कोणी आरोपीच्या पिंज-यामध्ये उभे करणार असेल तर ती गोष्ट कदापिही करता कामा नये. एखादे झाड तोडायचे असेल, त्यासाठी शंभर घाव घालायचे असतील, आणि 99 जणांनी 99 घाव घातल्यानंतर शेवटी घाव घालणा-याने त्याच्या घावामुळे झाड पडले असे समजण्याची आवश्यकता नाही. विजेच्या प्रश्नाच्या बाबतीतही नेमकी अशीच स्थिती आहे. विजेच्या प्रश्नाच्या बाबतीत एकाला जबाबदार धरीत असताना पहिले 70 घाव हे तुमचे होते आणि नंतरचे 30 घाव आमचे होते. दोघांमुळे झाड तुटले. त्यावेळचे वर्तमानपत्रातील लेख आणि तज्ज्ञांची भूमिका बघावी. विजेच्या बाबतीत कोणाला दोष देण्यापेक्षा हे राज्य अंधाराच्या गर्तेतून कसे बाहेर पडेल यासाठी सामुदायिकपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. पण तुम्ही आम्ही राजकारण करतो. मला आठवते, विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आल्या होत्या.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 18:45

श्री.आर.आर.पाटील....

आणि हिंदू हृदयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी घोषणा केली की, आमचे लोक सत्तेवर आले तर आम्ही वीज माफ करु. निवडणुका तोंडावर आल्या होत्या. सत्तेची लालसा आम्हालाही होती. मरता क्या न करता. ते जर सत्तेवर येऊन वीज माफ करणार असतील तर आपण सत्तेवर आहोत तोपर्यंत निर्णय घेऊन मोकळे होऊ या असे आम्हालाही वाटले. कदाचित ती घोषणा झाली नसती तर विधानसभेच्या निवडणुका तोंडावर असताना हे धाडस आम्ही केले नसते. घोषणा तुम्ही केली आणि कृतीत आम्ही आणली व घोटाळा झाला. कोणाला मग ती प्रिंटिंग मिस्टेक म्हणावे लागले हे खरे आहे. बोलावयाचे झाले तर तो केवळ मते डोळयासमोर ठेवून घेतलेला अव्यवहार्य निर्णय होता. पण निर्णय तर झाला. व्हायचे ते नुकसान झाले. आता आपण फक्त अंतर्मुख होऊन यापुढच्या काळात काही प्रश्न, काही समस्या समान कार्यक्रमपत्रिकेवर घेतल्या पाहिजेत. राज्याला पुढे नेत असताना काही प्रश्नांवर सत्ताधारी आणि विरोधक यांचे मतैक्य असले पाहिजे. आज महाराष्ट्रात अंधार आहे म्हणून आम्ही रोज डांगोरा पिटायला लागलो आहोत. कोण भांडवल आणून ओतणार? महाराष्ट्रात काळोख आहे म्हणून आम्ही सांगू लागलो आहोत. ही परिस्थिती कशी दुरुस्त होईल? महाराष्ट्रात अंधार आहे असे म्हणतो त्यावेळी राज्याची परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे. रेकॉर्डवर सर्व आहे. 1994 साली मी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. शेजारच्या राज्याला वीज देता, ते पैसे देत नाहीत, तुम्ही त्यांना वीज का देता? पैशाची वसुली कशी करणार? असा तो प्रश्न होता. तत्कालीन सन्माननीय उर्जामंत्र्यांनी उत्तर दिले की, वीज साठवून ठेवता येत नाही. प्रकल्प बंद केला तर लवकर सुरु करता येत नाही. विजेचे सातत्य राहणे, वीज वाया जाण्याऐवजी शेजारच्या राज्याला देण्यामध्ये राष्ट्रीय हित आहे, पैसे आजचे उद्या मिळतील. अतिरिक्त वीज होती. 24 तास विजेची सवय लोकांना लावली होती. आज मोर्चे निघतात, मोडतोड होते. राज्य अंधारात गेले म्हणून तक्रारी केल्या जात आहेत. आज देशामध्ये 69 हजार मे.वॅट विजेची कमतरता आहे. महाराष्ट्रात 5500 मे.वॅट विजेची कमतरता आहे. महाराष्ट्रात घरे आणि लोकसंख्या देशाच्या तुलनेत 10 टक्के आहे. देशातील तूट आणि महाराष्ट्रातील तूट विचारात घेतली तर आज देशाच्या तुटीच्या तुलनेत महाराष्ट्रातील तूट निश्चितच कमी आहे. तरी सुध्दा इतर राज्यांमध्ये ती जाणवत नाही. आपल्या राज्यात ती जाणवते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 18:45

श्री.आर.आर.पाटील....

याचे प्रमुख कारण म्हणजे आजपर्यंत वीज मुबलक उपलब्ध होती म्हणून लोकांना 24 तासाची विजेची सवय लावली. आज कमतरता भासल्यानंतर त्रास जाणवतो.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे राज्यकर्त्यांना, तुम्ही सत्तेवर असताना तुम्हाला कधी वाटले नाही, आम्ही सत्तेवर असताना आम्हाला कधी असे वाटले नाही की, हे राज्य तुटीमध्ये चालले आहे. राज्यामध्ये विजेची तूट भासली. गुजराथ राज्याने व्यवहार्य निर्णय घेतला. आपल्याकडे वीज कमी आहे त्यामुळे सिंगल फेजिंग केले पाहिजे. म्हणून शेतीसाठी केला जाणारा वीज पुरवठा, उद्योगांसाठी केला जाणारा वीज पुरवठा आणि गावांसाठी केला जाणारा वीज पुरवठा यामध्ये सिंगल फेजिंग केले. एखाद्या गावामध्ये 200-250 पंप असतात. त्या गावामध्येच 2-3 हजार घरे असतात. आज दोघांचाही वीज पुरवठा एकाच लाईनवरुन आपण करतो. त्यामुळे सगळीकडे मागणी वाढली की, वीज कमी पडते. त्यामुळे आपल्याला लोडशेडिंग करावे लागते. त्याचा फटका घरामध्ये राहणाऱ्या आणि शेतामध्ये पंप चालविणाऱ्यांना बसतो. यासाठी यंत्रणेमध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. याबाबत टप्पा क्रमांक-1 म्हणून जो डिसेंबर, 2007 मध्ये पूर्ण करणार आहोत. 7176 गावे ही सिंगल फेजिंग झालेली असतील. कदाचित शेतामध्ये 24 तास वीज नसेल, परंतु घरांमध्ये 24 तास वीज असेल अशी स्थिती एका वर्षात राज्यातील 7176 गावांमध्ये करण्याचा कार्यक्रम आखला आहे, नव्हे तो कार्यक्रम कालबध्द आहे. 1 डिसेंबर, 2007 पर्यंत या गोष्टी संपविल्या जाणार आहेत. पुढच्या डिसेंबरच्या नागपूर अधिवेशनामध्ये सन्माननीय श्री.सरपोतदार साहेब, आठवण ठेवून आपण किती उद्दीष्ट पूर्ण केले असा प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे उत्तर सन्माननीय उर्जामंत्री देतील. मी तिथे साक्षीदार असेन. माझेही या प्रश्नाकडे लक्ष असेल. हे सिंगल फेजिंग केल्यानंतर गावातील वीज पुरवठा टप्प्याटप्प्याने सुरळीत होईल.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

सभापती महोदय, संपूर्ण देशात विजेची कमतरता असतांना देखील महाराष्ट्र अंधारात बुडाला आहे असे म्हटले जाते परंतु यांसदर्भात मला आपल्याला काही आकडेवारी द्यावयाची आहे. हरियाणा राज्यामध्ये कृषीपंपाला 5 तास 34 मिनिटे वीज उपलब्ध करुन दिली जाते, पंजाबमध्ये खरीप हंगामासाठी 8 तास वीज उपलब्ध करुन दिली जाते तर रब्बीसाठी 4-5 तास वीज उपलब्ध करुन दिली जाते, गुजरात राज्यामध्ये 8 तास वीज उपलब्ध करुन दिली जाते, मध्यप्रदेशामध्ये 12 तास वीज उपलब्ध करुन दिली जाते व आठवड्यातून एक दिवस ऑफ घेतला जातो. आज महाराष्ट्रात 8 तास वीज पुरवठा न चुकता केला जातो. अन्य विषयाच्या तुलनेत आपण पास असलो तरी इतिहासाच्या तुलनेत आपण नापास आहोत. या राज्याला अंधारातून आपण निश्चितपणे बाहेर काढू. हे सरकार केवळ घोषणाच करते परंतु अंमलबजावणी मात्र काही करीत नाही असे विरोधी पक्षाकडून बोलले जाते परंतु वस्तुस्थिती तशी नाही. वीज कोठून कोठून उपलब्ध होणार आहे याची माहितीच मी आपल्याला देणार आहे. परळी येथून 250 मे.वॅ., पारस येथून 250 मे.वॅ.वीज 3 महिन्यात निर्माण केली जाणार आहे. गेल्या वर्षभरामध्ये 589 मे.वॅ.,मिळाली होती परंतु या वर्षी 1528 मे.वॅ. वीज मार्च पर्यंत अतिरिक्त मिळणार आहे. त्याच्या पुढील वर्षी 1358 मे.वॅ. वीज आपण जे प्रोजेक्ट हाती घेतले आहेत त्यातून मिळणार आहे. विजेच्या संदर्भात मध्यंतरी बरीच आंदोलने झाली, वीज गेली कोठे असे प्रश्न उपस्थित करण्यात आले. आपण जी कारणे जनतेला सांगत होतो ती कारणे दुर्दैवाने जनतेला पटू शकले नाही. जनतेला वीज दिली पाहिजे ही वीज महागडी घेऊन का होईना पण जनतेला वीज दिली पाहिजे म्हणून शासनाने महागडी वीज घेण्याचा निर्णय घेतला. सभापती महोदय, टाटा पॉवर कंपनीची 500 मे.वॅ. वीज मुंबईला मिळत असते परंतु त्यांच्या वीज यंत्रणेत बिघाड झाल्यामुळे त्यांच्याकडे 500 मे.वॅ. वीज निर्माण होत नसल्या कारणाने टाटाला कंपनीला 500 मे.वॅ. वीज. उपलब्ध करुन द्यावी लागली तसेच ही वीज देणे बंधनकारक असल्याने टाटा पॉवर कंपनीला 500 मे.वॅ. वीज उपलब्ध करुन द्यावी लागली. गेल्या वर्षी दाभोळ प्रकल्पातून 710 मे.वॅ. वीज निर्माण झाली परंतु या वर्षी दाभोळ प्रकल्पाला गॅस पुरवठा न झाल्यामुळे 300 मे.वॅ. वीज कमी निर्माण झाली. त्यामुळे दाभोळ प्रकल्पाची 400 मे.वॅ.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

आणि टाटा पॉवर कंपनीची 5 मे.वॅ. अशी 900 मे.वॅ. वीज एमएसइबीला कमी मिळाली. दाभोळ वीज प्रकल्प हा केंद्रशासनाच्या ताब्यात असून टाटा पॉवर कंपनी ही खाजगी कंपनी असल्यामुळे या दोघावर राज्यशासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. या दोघांकडून राज्यशासन वीज पर्चेस करीत असते. ज्या गोष्टी एम.एस.ई.बी.च्या नियंत्रणात नसतांना देखील एम.एस.ई.बी.ला जबाबदार धरुन एम.एस.ई.बीच्या अतिधका-यांना मारहाण करण्यात आली कार्यालये जाळण्यात आली त्यामुळे पोलिसांना चुकून गोळीबारही करावा लागला. त्यामुळे जनतेने राज्यसरकारकडे असलेले अधिकार सुध्दा बघून घेण्याची आवश्यकता आहे. शासनाची कोणतीही चूक नसताना शासनाला आरोपीच्या पिंज-यात उभे रहावे लागले आहे.

सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्या ही महाराष्ट्राच्या दृष्टीने एक शोकांतिका आहे. किती शेतक-यांच्या आत्महत्या कमी झाल्या यापेक्षा राज्यात एकाही शेतक-याला आत्महत्या करावी लागणार नाही अशी परिस्थिती निर्माण होण्याची आवश्यकता आहे. विदर्भातील आत्महत्या होणा-या 6 जिल्हयात माननीय पंतप्रधान, राजकीय व्यक्ती व्यथित होऊन आल्या होत्या व विदर्भातील शेतक-यांना काही तरी आर्थिक मिळावी यासाठी केंद्र सरकार तसेच राज्य शासनाने आर्थिक मदत केली. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, सगळी कामे राहिली तरी चालतील, सर्व विकास कामे बंद पडली तरी चालतील परंतु 24 तास काबाडकष्ट करणा-या शेतक-याचे, कामगाराचे जीवन सुखी राहिले पाहिजे असे शासनाचे धोरण आहे. राज्यशासनाचा केंद्रबिंदू हा कष्टकरी आणि कामगार असला तरी त्यासाठी मंत्रिमंडळाने एकमताने अनेक पध्दतीचे निर्णय घेतले. यासाठी शासनाकडून 1075 कोटीचे पॅकेज घोषित करण्यात आले त्यानंतर माननीय पंतप्रधांनानी स्वत: विदर्भात येऊन 3500 कोटी रुपयाचे पॅकेज सहा जिल्हयासाठी घोषित केले.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

आपण बारकारईने पाहिले तर तातडीची मदत म्हणून 1300 आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी एक लाख रुपयांची मदत देण्यात आलेली आहे. पॅकेज अंतर्गत 4 लाख 20 हजार खातेदारांना त्यांच्या थकित खातीपोटी 239 कोटी रुपये जमा करण्यात आलेले आहेत. त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन तसेच सावकारी कर्ज क्लिअर करण्याची भूमिका सरकारने स्वीकारलेली आहे. कमी अधिकार असताना सुध्दा ही कारवाई केलेली आहे. ज्या शेतकऱ्यांची कर्जे दामदुप्पटीने वाढत होती त्यांच्यासाठी भूविकास बॅंकेमार्फत 51 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले होते. दामदुप्पट कर्जावरील व्याजापोटी 46 कोटी रुपयांची भरपाई केलेली आहे. पीक विमा योजने अंतर्गत शेतकऱ्यांचा विमा उतरविण्यात आलेला आहे. नापिकी झाली तर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी 3 लाख 17 हजार शेतकऱ्यांचा विमा उतरविला आहे. गेल्या वर्षी जवळपास 1919 कोटी रुपये शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. शेतकऱ्यांना हे कर्ज केवळ सहा टक्के व्याजाने उपलब्ध करुन दिलेले आहे. शेतकऱ्यांना चांगली बी-बियाणे तसेच दुभती जनावरे पुरविण्यात आलेली आहेत. मुलींची लग्न कशी करावीत हा शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न सोडविण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. जवळ जवळ 10200 शेतकऱ्यांच्या मुलींची सामुदायिक पध्दतीने शासकीय खर्चाने विवाह लावण्यात आले. आत्महत्या प्रकरणांमध्ये कशी घट होत गेली ते मी आपणा सर्वांना सांगतो. जून महिन्यात 50 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या, जुलै महिन्यात 48, ऑगस्टमध्ये 44, सप्टेंबरमध्ये 44, ऑक्टोबरमध्ये 40, नोव्हेंबरमध्ये 34, डिसेंबरमध्ये 35 आत्महत्या झाल्या. जून महिन्याच्या तुलनेत विचार करता 28 टक्के घट झालेली आहे. मी या घटलेल्या संख्येला महत्व देत नाही. जोपर्यंत एकही आत्महत्या होणार नाही अशी परिस्थिती निर्माण होत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली आहे, असा अर्थ काढणे योग्य होणार नाही. सभापती महोदय, जवळपास 9 लाख 96 हजार खातेदारांना 1919 कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आलेले आहे. या वर्षी सिंचन प्रकल्पाला 395 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. ज्या परिसरात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत त्याठिकाणी जास्तीत जास्त मदत देण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. या सर्व उपाययोजना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

शासनाने ठरविल्या नव्हत्या. त्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीमध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधी देखील होते. त्यांनी सुचविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. शेतकरी मग तो कोणत्याही भागातील असो, विदर्भातील असो, मराठवाड्यातील असो, कोकणातील असो वा खानदेशातील असो की, पश्चिम महाराष्ट्रातील असो, सिंचन क्षमता वाढत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होणार नाही,त्यांची दुर्दशा संपुष्टात येणार नाही. अनियमित पडणाऱ्या पावसामुळे शेतकरी जे पिकेल ते पिकवून घेतो, परंतु जे विकेल ते पीक घ्यावे यासाठी धैर्य दाखवीत नाही. शेतकरी हे धैर्य दाखवीत नाही तोपर्यंत त्यांना स्थैर्य प्राप्त होणार नाही. म्हणून या परिस्थितीमध्ये परिवर्तन घडवून आणावे लागेल आणि त्यासाठी सिंचनाला अनन्यसाधारण महत्व दिले पाहिजे. सभापती महोदय, गेल्या वर्षी एआयबीपीकडून सिंचनासाठी 3500 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे. शहरांची संख्या वाढत आहेत. त्याप्रमाणात अडचणी देखील वाढत आहेत. शहराच्यां अडचणी संपल्या पाहिजेत. केंद्र सरकारने अर्बन मिशन सुरु केले आहे. महाराष्ट्रातील शहरांच्या विकासाठी जे.एन.एन.यु.आर.एम.. ( जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन ) मधून सर्वाधिक निधी महाराष्ट्राला केंद्र सरकाकडून मिळालेला आहे. त्याबद्दल मी माननीय पंतप्रधानांना धन्यवाद देतो. मुंबईत मेट्रो प्रोजेक्ट सारखा प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. मुंबईने  झ ापाट्याने कात टाकायला सुरुवात केली आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KTG/ MAP/ SBT/ KGS/ पूर्वी श्री.अजित... 19:00

श्री.आर.आर.पाटील...

ओव्हर ब्रिज, रस्ते, सागरी मार्ग, मेट्रोचे काम होत आहे. मुंबईला भेडसावणाऱ्या ज्या समस्या आहेत, त्या लवकरात लवकर संपुष्ठात येतील. केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी महाराष्ट्राकडे खेचला जाईल, अशा पध्दतीच्या उपक्रमांना गती मिळेल. सेनेच्या निवडून आलेल्या नगरसेवकांच्या, महापौराच्या सहकार्याने व केंद्र शासनाच्या मदतीने राज्य शासन मुंबईचे प्रश्न सोडवू शकेल. देशाची ही आर्थिक राजधानी सक्षम व शक्तीशाली बनवण्याच्या दृष्टीने, या शहराला चांगल्या सुविधा मिळण्याच्या दृष्टीने या शहरामध्ये अनेक कामे चालू आहेत. जागतिक दर्जाचे हे शहर आणखीनच उठावदार होईल, असा माझा विश्वास आहे.

मुंबईचा विचार करता, आज महाराष्ट्रातील 58 टक्के जनता खेडयांमध्ये राहते. त्यांचा विकास करण्याचे काम जिल्हा परिषदा, ग्रामपंचायत आणि पंचायत समित्यांवर सोपवलेला आहे. केंद्रामध्ये आणि राज्यामध्ये एकाचवेळी पंचायत राज व्यवस्था सुरु झाली. मी काही काळ ग्रामीण विकास मंत्री होतो, त्यावरुन मला सांगण्यास आनंद होतो की, महाराष्ट्राची शक्तीस्थळे या महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती आहेत. आज त्याठिकाणी लाखो कार्यकर्ते काम करतात. या खात्यामध्ये काम करणारी सरकारची यंत्रणाही अभिमान वाटावा असे काम करत आहे. मघाशी एका अधिकाऱ्याचा उल्लेख झाला. परंतु आज शेकडो अधिकारी पंचायत राज व्यवस्थेमध्ये स्वत:ला वाहून घेऊन काम करीत आहेत. माननीय सभापती महोदय, आपणही त्या यंत्रणेमधून पुढे आलेले कार्यकर्ते आहात. आज आपल्या महाराष्ट्रातील पंचायत राज हे देशातील कुठल्याही पंचायत राजपेक्षा अधिक सक्षम आणि शक्तीशाली आहे. आपले पंचायत राज काय करु शकते हे मी संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान चालवताना बारकाईने पाहिलेले आहे. यशवंत ग्राम समृध्दी योजना किती चांगल्या पध्दतीने चालू शकते हे मी अनुभवलेले आहे. तसेच, महाराष्ट्र सरकारने सुरु केलेली निर्मल स्वच्छता योजना ही केंद्र सरकारने जशीच्या तशी स्वीकारलेली आहे. मला सांगण्यास अभिमान वाटतो की, दरवर्षी ज्या गावांमध्ये 100 टक्के शौचालये बांधलेली असतील आणि जी गावे निर्मल स्वच्छता योजना व हागंदरी मुक्त असतील त्या गावांतील सरपंचाचा आणि ग्रामस्थांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान केला जातो व त्या गावाला 2 लाख रुपयांचे बक्षिसही देण्यात येते. याबाबतीत पहिल्या वर्षी 39 गावे पहिली आली. पहिल्या वर्षी देशातील 39 गावे सिलेक्ट करण्यात आली, त्यामध्ये 13 गावे ही

..2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

महाराष्ट्रातील होती. म्हणजे, 1/3 गावे ही महाराष्ट्रातील होती. दुसऱ्या वर्षी देशातील 750 गावे निर्मल स्वच्छतेच्या बाबतीत सिलेक्ट झाली, त्यातील 358 गावे ही महाराष्ट्रातील होती. त्यामध्ये पहिल्या वर्षी 1/3 व दुसऱ्या वर्षी निम्मी गावे महाराष्ट्राची होती. मला सांगण्यास आनंद होतो की, यावर्षी देशातील 3200 गावे सिलेक्ट झाली असून त्यामध्ये महाराष्ट्रातील 2953 गावांचा समावेश आहे. म्हणजे, त्यामध्ये जवळपास 90 टक्के गावे महाराष्ट्राची असून केवळ 10 टक्के गावे संपूर्ण देशाच्या इतर राज्यातील आहेत. महाराष्ट्रातील व्यवस्थापन किती सक्षमपणे काम करु शकते व लोक कामाने किती पेटलेले आहेत, हे सिध्द झालेले आहे. सभापती महोदय, एका शौचालयासाठी आपण 4500 हजार रुपयांचे अनुदान देतो. मी ग्रामविकास खात्याचा मंत्री होतो, त्यावेळी याबाबतीत 478 कोटी रुपये खर्च केले. मोठया प्रमाणात गावांमध्ये शौचालये बांधण्यात आली. परंतु त्याबाबतीत काही गावांमध्ये असे अनुभवायास येते की, काही गावांमध्ये लोकांचे राहते घर छप्पराचे व कौलाचे आहे, परंतु शौचालये मात्र स्लॅबची बांधलेली आहेत. काही कुटुंबातील लोकांनी शौचालयाचा वापर करण्यापेक्षा त्याठिकाणचे भांडे काढून कोंबडयाचा खुराडा केला, तर काही लोकांनी शौचालयाचा उपयोग सरपण ठेवण्यासाठी केला. ग्रामविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी मला शौचालयाची छायाचित्रे आणून दाखवली. एका माणसाने तर शौचालयाचे भांडे काढून त्याठिकाणी चक्क देवाचा देव्हाराच करुन टाकला होता. अशाप्रकारची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे केवळ शौचालय बांधून उपयोग नाही तर लोकांना याबाबतीतील लोकशिक्षण देण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते. त्यामुळेच आपण याबाबतीतील 4500 रुपयांची सबसिडी आता 500 रुपये केलेली आहे. सबसिडी कमी करुनही महाराष्ट्रामध्ये शौचालयांचे तेवढेच उद्दिष्टे पूर्ण झालेले आहे.

**( सभापतीस्थानी : माननीय सभापती )**

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.........

सगळीच कामे सरकारच्या पैशातून केली तर चांगली होतात, असे नाही. कधी कधी लोकांना प्रोत्साहित करण्याची देखील आवश्यकता असते. आता राज्यातील लोक खूप प्रोत्साहित झाले आहेत आणि त्यामुळे महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा जलद गतीने बदलतो आहे. त्यावरुन हा महाराष्ट्र एकविसाव्या शतकाला साजेसा बनेल, असे निश्चितपणे वाटते.

सभापती महोदय, एक प्रश्न सन्माननीय सदस्यांकडून वारंवार उपस्थित केला जात होता की, युतीच्या काळात 22 हजार 800 कोटी रुपयांचे असलेले कर्ज आघाडीच्या काळात 1 लाख 28 हजार कोटी रुपयांवर पोहोचले आहे. आघाडीच्या सात वर्षाच्या कार्यकाळात 94 हजार कोटी रुपयांची कर्जवाढ झाली, हे आम्ही मान्य करतो. आपण नेहमी बघतो की, खेडयामध्ये राहणा-या शेतक-याच्या वडिलांनी कर्ज काढले असेल तर त्याची मुले ते नंतरच्या काळात फेडण्याचा प्रयत्न करतात. परंतु, व्याजाची रक्कम वाढत राहिल्याने कर्ज फेडण्यामध्ये त्यांचे आयुष्य जाते. 22 हजार 800 कोटी रुपयांचे कर्ज त्यावेळी युती शासनाने काढले होते, त्यावेळी कर्जाचा व्याजाचा दर साडेसतरा टक्के एवढा होता. एवढया चढया व्याजदराने कर्ज काढण्याबाबत आम्ही त्यावेळी विरोध करीत होतो. त्यावेळचे कार्यवृत्त जर आपण काढून पाहिले तर एवढया चढया दराने कर्ज काढले तर ते कोणी फेडायचे, असा प्रश्न आम्ही सातत्याने विचारीत होतो. कारण, भविष्यातील चित्र आम्हाला स्पष्ट दिसत होते. कदाचित आघाडी सत्तेवर येईल याची आम्हाला खात्री वाटत होती. त्यावेळी आम्हा विरोध करणा-यांना सांगितले जात होते की, जो मर्द असतो तोच कर्ज काढू शकतो आणि कर्ज काढण्याची त्याच्यामध्येच हिंमत असते. 22 हजार 800 कोटी रुपयांचे कर्ज काढणारे मर्द असतील तर आमची मर्दुमकी दाखविण्याचीही आवश्यकता होती. दिखाऊ स्वरुपाची चार कामे करणे आणि फार मोठा विकास झाला असे म्हणणे, असे कधी होत नाही. जी धरणे सहयाद्रीच्या कडया-कपारीत बांधण्यात आली आहेत त्यातील किती धरणे सामान्य लोक जाऊन बघतात ? काही कामे ही दिखाऊ असतात तर काही कामे विकासाची असतात, डोळयांसमोर रोज न येणारी असतात. मुंबईत बसल्यावर रोज ओव्हरब्रिज दिसणारच. परंतु त्यापेक्षा दहापट खर्च करुन ग्रामीण भागात बांधलेली धरणे कुणी बघत नाही. व्याज वाढले त्यामुळे कर्ज रक्कमही वाढली. परंतु, अशाप्रकारे चढया दराने कर्ज काढून नका, अशी टिका आम्ही कर्ज काढण्याच्या वेळीच केली होती, हे सत्यही आपल्याला सभागृहाच्या कार्यवृत्तात बघावयास मिळेल.

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

तिरुपतीला जेवढे नारळ फुटत नाहीत तेवढे नारळं युती शासन महाराष्ट्रात फोडत होते. नारळ फोडण्याच्या बाबतीत युती शासनाने गुरवालाही मागे टाकले होते. एवढया मोठया प्रमाणावरील कामे पूर्ण कशी होणार, असे प्रश्न आम्ही त्यावेळी विचारीत होतो. कर्ज काढून जी कामे युती शासनाने सुरु केली होती ती पूर्ण करण्यासाठी आणि काढलेल्या कर्जाचे व्याज भरण्यासाठी शासनाला कर्ज काढावे लागले. युती शासनाच्या काळात सुरु केलेल्या कामांची टेंडर्स देखील त्याच शासनाने दिली होती, त्यामध्ये देखील मारामा-या झाल्या होत्या व खूप गुंतागुंत होती. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपण सहकार खाते घेऊन बसला होता, या कामांबाबत आपल्याला कुणी विचारीत नव्हते, तुम्ही लई सरळ आहात. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांना सर्टिफिकेट देण्यासाठी मी कधीही दुबळेपणा दाखविणार नाही. एकतर ते मुंबईतील, सहकाराशी त्यांचा संबंध कमी. शेतीशी संबंधित, पाटबंधारेशी संबंधित खाते त्यांच्याकडे दिले असते तर बरे झाले असते. असो, हा भाग वेगळा. पण युती शासनाने एवढया मोठया प्रमाणावर कामे सुरु केली होती, कामे अर्धवट राहिली होती, ती कामे तशीच ठेवणे महाराष्ट्राच्या दृष्टीने योग्य नव्हते. एकतर व्याज भरण्यासाठी पुन्हा कर्ज काढायचे आणि कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढायचे, असे चालले होते. युती शासनानेच करुन ठेवायचे आणि मोठे झ ााले की, त्याची जबाबदारी विसरायची. मी ग्रामीण भागातून आलेलो आहे. यापेक्षा स्पष्ट सांगून खाली उतरत नाही. सुरुवातीला छोटे दिसते पण मोठे झाल्यावर त्याची जबाबदारी कोणी घेत नाही, अशी परिस्थिती आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही शांततेने सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांचे भाषण ऐकत आहोत. याचा अर्थ अशा प्रकारे टोमणे मारुन ते भाषण करणार असतील तर आम्हाला अडथळा निर्माण करावा लागेल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, कृपा करुन माझ्या भाषणात जेवढे टोमणे वाटत असतील ते रेकॉर्डवरुन काढून टाकावेत.

**सभापती** : मी तपासून पहातो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आघाडी शासन काय दिवे लावत आहे, हे आम्ही बघतो आहोत.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझ्या भाषणातील जे जे टोमणे वाटत असतील ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावेत, अशी विनंती मी यापूर्वीच केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी महाराष्ट्रामध्ये युतीचे शासन होते त्यावेळी आपण मंत्रिमंडळामध्ये नव्हता. आपण मंत्रिमंडळामध्ये असते तर असे झाले नसते. ज्यावेळी महाराष्ट्रामध्ये युतीचे शासन होते त्यावेळी तुम्ही खासदार होता.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ज्यावेळी महाराष्ट्र राज्यामध्ये युतीचे शासन होते, त्यावेळी मी या सभागृहाचा सदस्य होतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आघाडी शासनाच्या कार्यकाळात राज्यावरील कर्ज 94 हजार कोटी रुपयांनी वाढले आहे, हे मी पूर्वीच मान्य केले आहे. पण जे उत्पन्न वाढवितात ते मर्द असतात. महाराष्ट्र राज्याचे महसुली उत्पन्न 60 हजार कोटी रुपयांच्यावर नेण्यात आमच्या शासनाला यश मिळाले आहे. इतर राज्यांच्या योजनांपेक्षा आपल्या राज्याच्या योजना मोठया आहेत. दरवर्षी 12 हजार कोटी रुपये व्याजावर खर्च होत आहेत. म्हणजे राज्यातील महसुली उत्पन्नाच्या 20 टक्के रक्कम निव्वळ व्याजावर खर्च होत आहे. कर्जामध्ये वाढ झाली, असे विरोधी पक्षातर्फे अनेक वेळा सांगितले जाते. राज्यामध्ये युतीचे शासन असतांना राज्याचे महसुली उत्पन्न आणि द्यावे लागणारे व्याज याची टक्केवारी बघितली तर आजचे कर्ज त्यामानाने कमी आहे. आज जे प्रकल्प सुरु आहेत ते पूर्ण करण्यासाठी आणखी कर्ज काढावे लागले तरी ते काढले जाईल.

विधान परिषदेमध्ये आणि विधान सभेमध्ये ज्यावेळी सन्माननीय सदस्य भाषणे करतात त्यावेळी त्यांची भाषणे ऐकून आम्हाला व्यथा होतात. 105 हुतात्म्यांच्या बलिदानातून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झालेली आहे. कोकण, विदर्भ, खानदेशचा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित झाला तर अशी चर्चा होते की, प्रादेशिक अस्मिता राज्याच्या एकतेवर घाला आणू शकते. मी राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, विदर्भ, मराठवाडयाचा अनुशेष पूर्णपणे दूर करुन कृष्णा खो-यातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 16 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. कृष्णा खो-यातील प्रकल्प पूर्ण करुन राज्यातील पाटबंधारे योजनांसाठी 16 हजार कोटी रुपये खर्च केले जातील आणि या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. ग्रामीण भागातील शेतक-यांच्या व्यथा दूर केल्या जातील. या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. पुढच्या वर्षामध्ये

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ........

राज्य सरकार कोणते उद्दिष्ट डोळयासमोर ठेऊन वाटचाल करणार आहे, हे मी सभागृहाला थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे करीत असतांना मानव विकास निर्देशांक लक्षात घेऊन राज्याची प्रगती करण्यावर भर दिला जाईल. आम्ही असे मिशन तयार केले आहे की, गरीब लोकांना, अल्पसंख्यांक समाजाला पाठीमागे ठेऊन प्रगतीचा दावा केला जाऊ शकत नाही. खेडयापाडयामध्ये राहणारा मागासवर्गीय, गरीब, अल्पसंख्यांक समाज यांना पाठीमागे ठेवले तर महाराष्ट्र राज्याला प्रगतीचा दावा करता येणार नाही. प्रगतीचे फळ सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी खूप चांगली भाषणे केलेली आहेत. राजकीय अभिनिवेशातून टिका केली गेली तर ती मी समजू शकतो. लोकशाहीमध्ये टिका करुन सरकारला योग्य दिशा देणे विरोधकांचे काम आहे. परंतु ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना कधी नव्हे एवढया कविता आणि विनोदाचा आधार आजच्या भाषणामध्ये घ्यावा लागला. ज्यावेळी बोलण्यासाठी मुद्दे शिल्लक नसतात त्यावेळी कविता आणि विनोदाचा आधार घ्यावा लागतो. मी सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकलेली आहेत.

यानंतर कु.खर्चे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.......

लोकशाहीमध्ये सरकारने केलेले एखादे काम चांगले की वाईट हे निश्चित करण्याचा मानd काय आहे ? कितीही चांगले काम केले तरी सदर काम चांगले झाले, असे मोकळेपणाने म्हटले तर सन्माननीय विरोधी पक्षामध्ये आणि सत्ताधारी पक्ष यामध्ये फरक काय तो राहिला ? असे जर झाले तर मग पुणे महानगरपालिकेसारखेच होईल. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यामध्ये ठराविक अंतर राहणे अत्यंत आवश्यक आहे आणि ते ठेवावेच लागते. सरकारने जरी चांगले काम केले तरी त्याकडे जनतेच्या हिताकरिता विरोधकांच्याच दृष्टीकोनातून पाहणे अत्यंत गरजेचे आहे. टीकाटिप्पणी करणे हे तुमचे कामच आहे, विरोधी पक्षाने आमच्या कामाला चांगले म्हणावे अशी लोकशाहीमध्ये माझी अपेक्षा नाही. संसदीय प्रथेमध्ये विरोधकांची हीच भूमिका अपेक्षित असते. लोकशाहीमध्ये सरकारच्या कामाचे मुल्यमापन कसे करावयाचे ? सरकार योग्य दिशेला चालले आहे की नाही? सरकारची दिशा चुकलेली आहे का ? या सर्वांचे मूल्यमापन करावयाला एकच मापदंड असतो ती म्हणजे "राज्यातील जनता." या राज्यातील जनतेने हे मूल्यमापन कसे केलेले आहे ? यवतमाळ जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या, त्यावेळी सरकारची भूमिका चुकलेली होती, हे मी मान्य करतो, त्यावेळी सर्वजण ठरवून सरकारच्या मागे लागावे, अशा प्रकारे मागे लागले होते. निवडणूकीचा निकाल लागला त्याच्या आदल्या दिवशी मी आणि माननीय मुख्यमंत्री बसलो होतो, काय होईल ? असा अंदाज बांधतांना मी माननीय मुख्यमंत्र्यांना असे सांगितले की, राज्याचे कृषी व सहकार मंत्री हे काँगेसचे असल्यामुळे विजेच्या प्रश्नावर,कापसाच्या प्रश्नावर, शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावर एवढा ऊहापोह होऊन विरोधी पक्षाकडून त्याचे भांडवल करण्यात आले होते म्हणून निवडणूकीच्या निकालाबाबत मला असे वाटत होते की, काँगेस उमेद्वारांचे डिपॉझिट तरी वाचेल की नाही ? जनतेने धक्काच बसेल असा कौल दिला आणि काँगेस त्या जिल्हयात सत्तेवर आले, अशा प्रकारचा धक्का जनतेने सर्वच राजकारण्यांना दिला. महाराष्ट्राच्या पंचायती राज निवडणूकांमध्ये आणि महापालिकेच्या निवडणूकांमध्ये जनतेने धक्कादायक कौल दिल्यामुळे विरोधकांनी आत्मपरीक्षण करणे अत्यंत गरजेचे होऊन बसलेले आहे. जनतेने सरकारला नापास केलेले नाही. जनतेने शासनाला नापास केलेले नाही त्यामुळे लोकशाहीमध्ये सरकारच्या बाजूनेच जनतेने समर्थन दिलेले आहे. जनतेच्या हितासंबंधीच सरकारचा उद्देश यापुढेही राहील. विजेचा प्रश्न

4V -2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

निवडणूकीमध्ये भांडवल करण्यासाठी वापरला होता, तरीसुध्दा विजेचा प्रश्न हा अतिशय गंभीर असल्यामुळे तो सोडविण्यासाठी आवश्यक असलेली तातडीची दक्षता व उपाययोजना याच सरकारमध्ये आहे, हे जनतेने सुध्दा ओळखलेले आहे.  विजेचा प्रश्न,शेतक-यांच्या आत्महत्यांचा प्रश्न,कापसाचा प्रश्न इत्यादि प्रश्न सुटल्यानंतर नवीन प्रश्न निर्माण होण्यास आम्हीही संधी देणार नाही व उपस्थित प्रश्न देखील टप्प्या टप्प्याने सोडवू.

यानंतर श्री.सुंबरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

आता अधिकचे न बोलता, योग्य दिशा दाखविणारे, गती दाखविणारे आणि लोकाभिमुख कारभार करणारे हे सरकार आहे हे मानक जनतेने सिद्ध करून दाखविले आहे म्हणून महाराष्ट्रातील जनतेचे मी आभार मानतो आणि या ठिकाणी या चर्चेच्या माध्यमातून आमच्या मित्रांकडून करण्यात आलेल्या सूचनांबद्दल त्यांचेही आभार मानतो तसेच पुढील दोन वर्षात निवडणुका नसल्यामुळे अधिक चांगले सहकार्य त्यांच्याकडूनही मिळेल अशी अपेक्षाही करतो आणि आपल्या सगळ्यांना पाडव्याच्या शुभेच्छा देऊन मी भाषण संपवितो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सभागृहापुढील आजचे दिवसाचे कामकाज संपले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, गुरूवार, दिनांक 22 मार्च 2007 रोजी दुपारी 12.15 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 7 वाजून 21 मिनिटांनी, गुरूवार, दिनांक 22 मार्च 2007 रोजीच्या दुपारी 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही